**( अध्यक्षस्थानी माननीय अध्यक्ष )**

**वृत्तपत्रात छापून आलेल्या बातमीबाबत**

डॉ. दीपक सावंत ( सार्वजनिक आरोग्य मंत्री ) : अध्यक्ष महोदय, काही वृत्तपत्रांमध्ये महाराष्ट्रामध्ये केवळ 21 सायकियाट्रिस्ट आहेत, अशी बातमी छापून आलेली आहे. परंतु, आपल्याकडे 21 सिट्स आहेत व दरवर्षी 21 सायकियाट्रिस्ट तयार होत आहेत, केवळ एवढीच सुधारणा मला करावयाची आहे.

.............

श्री. अजित पवार : अध्यक्ष महोदय, सभागृहामध्ये कोरम ठेवण्याची जबाबदारी सत्ताधारी पक्षाची आहे. सभागृहात कोरम नाही, याबाबत मी माझे ऑब्जेक्शन नोंदवित आहे.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, ...

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील आपल्याला काय बोलायचे आहे ?

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, मलाही सभागृहात कोरम नाही हेच सांगावयाचे आहे.

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी. / मु.शी. :** तोंडी उत्तरे

*राज्यात विद्युत अपघातात वीज कर्मचारी व नागरीकांचे झालेले मृत्यू*

*(१) * ४४२८० श्री.सुनील प्रभू (दिंडोशी), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.डि. मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) : सन्माननीय ऊर्जा मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-*

*(१) राज्यात विद्युत अपघातात दरवर्षी सर्वसाधारणपणे साडेसात हजार वीज कर्मचारी आणि नागरिक मृत्यू पावतात अशी माहिती दिनांक १७ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,*

*(२) असल्यास, या प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय,*

*(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दरवर्षी सर्वसाधारणपणे साडेसात हजार वीज कर्मचारी आणि नागरिकांचा मृत्यू होण्याची विवक्षित कारणे काय आहेत,*

*(४) असल्यास, मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या व नागरिकांच्या वारसदारांना शासनामार्फत आर्थिक मदत देण्याबाबत व विद्युत अपघात रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,*

*(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?*

*श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे नाही. मुख्य विद्युत निरीक्षक यांच्या अहवालानुसार सन २०१४-१५ यावर्षात एकूण १००१ मानवी प्राणांतिक (वीज कर्मचारी व नागरिक) अपघात झालेले आहेत.*

*(२) यासंदर्भात महावितरण व मुख्यय विद्युत निरीक्षक यांच्या मार्फत चौकशी करण्यात आली आहे.*

*(३) अनवधानाने प्रभारीत वाहिनीच्या संपर्कात येणे, अनधिकृत काम/वापर, सुरक्षिततेकडे दुर्लक्ष/ सुरक्षिततेचा अभाव, देखभालीचा अभाव, वीज प्रवाह उतरल्यामुळे, फ्लॅशओवर, सदोष उपकरणे/ अवजारे/ हत्यारे, यांत्रिक इतर कारणामुळे अपघात इ. विद्युत अपघाताची कारणे आहेत.*

*(४) प्राणांतिक विद्युत अपघात झालेल्या कर्मचारी/नागरिक यांच्या वारसदारांना व अप्राणांतिक विद्युत अपघात झालेल्या कर्मचारी/ नागरिकांना महावितरणच्या नियमानुसार त्वरित आर्थिक मदत दिली जाते. तसेच विद्युत अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी महावितरणतर्फे विविध उपाययोजना सतत करण्यात येत असतात. जानेवारी,२०१६ मध्ये दिनांक ११.१.२०१६ ते १७.१.२०१६ हा सप्ताह विद्युत सुरक्षा सप्ताह म्हणून आयोजित करुन महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेमध्ये विद्युत सुरक्षाविषयक जनजागृती करण्यात आली आहे.*

*(५) प्रश्न उद्‌भवत नाही.*

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 44280....

श्री. सुनील प्रभू : अध्यक्ष महोदय, या तारांकित प्रश्नाच्या लेखी उत्तरामध्ये सन 2014-2015 या वर्षात 1001 मानवी प्राणांतिक अपघात झालेले आहेत असे नमूद केलेले आहे. महावितरण व्यवस्थे मार्फत जेथे ट्रान्सफॉर्मर उघडे आहेत, जेथे विद्युत बॉक्स आहेत, वॉल जोडणी आहे तेथे उपाययोजना म्हणून महावितरणने कोणकोणती व्यवस्था केलेली आहे ? जे 1001 मृत्यू झाले आहेत, त्याकरिता वितरण मधील डेप्युटी इंजिनिअर अथवा तत्सम दर्जाच्या किती अधिकाऱ्यांवर वितरण व्यवस्थे मार्फत कारवाई झाली ? झीरो वायरमन प्रत्येक भागात वापरले जातात, त्यांच्याकडे कोणतेही कौशल्य प्रशिक्षण नसते. अशावेळेस महावितरण व्यवस्थे मार्फत जे झीरो वायरमन वापरले जातात त्यांना वितरण व्यवस्थे मार्फत कौशल्य प्रशिक्षण दिले आहे काय ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महोदय, राज्यातील वीज वितरण प्रणालीमध्ये मोठ्या प्रमाणावर होणारे अपघात व त्यात काही कर्मचारी व नागरिक बळी पडणे या अत्यंत महत्त्वाच्या विषयावरील प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. सुनील प्रभू व अन्य सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केल्याबद्दल मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो.

अध्यक्ष महोदय, राज्यात मागच्या 40 वर्षांपासून आपण जे काही इन्फ्रास्ट्रक्चर उभे केले आहे, त्यामध्ये अजूनही मोठ्या प्रमाणावर मेन्टेनन्स नाही. त्यावेळेच्या भौगोलिक परिस्थितीनुसार पोल, ट्रान्सफॉर्मर उभे झाले आहेत. तेव्हा ते उपलब्ध तांत्रिक अनुभवाच्या आधारावर उभे करण्यात आले. ही बाब खरी आहे की, आता रस्ते मोठ्या प्रमाणावर रुंद झाले आहेत. मोठ्या प्रमाणावर लोकांची घरे बनली. अनेक लोकांच्या घरावरून लाईन्स जात आहेत. कारण अगोदर उघडे प्लॉट्स होते, जमिनी होत्या त्यामुळे लाईन्स टाकण्यात आल्या. आता रस्त्याच्यामध्ये ट्रान्सफॉर्मर आले, रस्ते रुंद झाले त्यामुळे तेव्हाच्या गरजेप्रमाणे डेव्हलपमेंट झाले. आता मोठ्या प्रमाणावर ते डेव्हलपमेंट प्लान करावे लागेल. त्यामुळे जे जुने इन्फ्रास्ट्रक्चर आहे त्याचे पुनर्निमाण करण्याची गरज आहे. राज्यातील ही सर्व व्यवस्था कार्यान्वित करण्याकरिता जवळपास 5 हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. आपण प्रत्येक जिल्ह्याचा याबाबतचा एक प्लान तयार केला आहे. मुख्य विद्युत निरीक्षक आणि जिल्हा विद्युत निरीक्षक यांच्या माध्यमातून संपूर्ण जिल्ह्यामध्ये सर्व्हे करण्यात आला व अपघातस्थळांच्या हॉटस्पॉटची यादी तयार करण्यात आली. मुख्य विद्युत निरीक्षक आणि

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 44280....

श्री. चंद्रशेखर बावनकुळे.....

जिल्हा विद्युत निरीक्षक यांनी तयार केलेली यादी टार्गेट करुन अपघात जेथे होतात तेथे कॉन्सन्ट्रेशन करुन ते रिमूव्ह कसे होतील व अपघात कसे होणार नाहीत, याची काळजी शासन घेणार आहे.

अध्यक्ष महोदय, ही गोष्ट खरी आहे की, काही मृत्यूंना महावितरण जबाबदार आहे. लाईनमनला पोलवर चढता येत नाही, त्यामुळे त्यांनी झीरो वायरमन नेमले. गावातील कोणतरी मुलगा ज्याला काही प्रशिक्षण नाही त्याला पोलवर चढविले. त्यातून ते लोक मृत्युमुखी पडले आहेत. याबाबतची आकडेवारी आपल्याला प्राप्त होणार आहे. ही गोष्ट खरी आहे की, सन 2014-2015 मध्ये 1000 च्या वर अपघात झाले. सन 2015-2016 मध्ये 600 ते 650 इतके अपघात झाल्याची आकडेवारी प्राप्त झालेली आहे. त्याबाबतचा रिपोर्ट प्राप्त होणे बाकी असून तो आज 31 मार्चपर्यंत प्राप्त होईल. किती माणसे मेली यापेक्षा ती कशाने करत आहेत हे जास्त महत्त्वाचे आहे. आपण हे अपघात पूर्णच्या पूर्ण कसे थांबवू शकू हे पाहिले पाहिजे. त्यामुळे 10 वर्षानंतर यावर्षी प्रथमच आपण विद्युत सुरक्षा सप्ताह घेतला. त्या माध्यमातून सर्व शाळा, एस.टी. स्टँड व घराघरातून दिल्या जाणाऱ्या महावितरणच्या प्रत्येक बिलावर कशी काळजी घ्यावी, याबाबतच्या सूचना दिलेल्या आहेत. एवढ्या मोठ्या महावितरण कंपनीच्या माध्यमातून या पध्दतीने आपण उपाययोजना करीत आहोत. अजून प्रभावी उपाययोजना करण्याची गरज आहे. खूप मोठ्या उपाययोजनांची गरज नाही तर अजून काय प्रभावी उपाययोजना करता येतील, याबाबत शासन काळजी घेत आहे. निश्चितपणे हे मृत्यू रोखले पाहिजेत, ही शासनाची जबाबदारीच आहे. आपण यातून पुढे जाणार आहोत.

अध्यक्ष महोदय, ही गोष्ट खरी आहे की, झीरो लाईनमनचा मृत्यू झाल्याबाबत अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही. मात्र मुख्य विद्युत निरीक्षकांकडे जबाबदारी दिली आहे. एमएसईबीच्या कर्मचाऱ्यांच्या चुकीमुळे, त्यांनी चुकीची व्यक्ती पोलवर चढविली, प्रशिक्षण नसलेली व्यक्ती पोलवर चढविली. त्यांना दुसऱ्या माणसाला पोलवर चढविण्याचा अधिकारच नव्हता. परंतु,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 44280....

श्री. चंद्रशेखर बावनकुळे ....

तरीही अशा व्यक्तीला चढविले गेले त्या सर्व लोकांचा 3 महिन्यांच्या आत रिपोर्ट तयार करुन, कोणकोणत्या व्यक्तीमुळे कोण-कोणता मनुष्य गेला याबाबत मुख्य विद्युत निरीक्षकांच्या माध्यमातून तपासून तद्‌नंतर संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यावर कारवाई करण्यात येईल.

श्री. सुनील प्रभू : अध्यक्ष महोदय, मी संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली हे विचारले होते. महावितरण व्यवस्थेने कौशल्य प्रशिक्षण देण्यासाठी आतापर्यंत कोणत्या प्रकारच्या उपाययोजना केल्या आहेत, ही माहिती मी विचारली होती. आतापर्यंत पाहिले तर महाराष्ट्रात झीरो वायरमनच काम करीत आहेत. मेलेल्यांमध्ये झीरो वायरमन आहेत, प्रशिक्षित लोक मेलेलेच नाहीत. याकरिता सब इंजिनिअर, डेप्युटी इंजिनिअर, असिस्टंट इंजिनिअर यांच्या लेव्हलच्या कोणत्या अधिकाऱ्यावर कारवाई झाली ? कर्मचारी मेलेले असतानाही इतक्या वर्षात त्या विरोधात महावितरणने अशाप्रकारची कारवाई का केली नाही ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महोदय, आम्ही 26 सर्कलमध्ये प्रशिक्षण केंद्र तयार करण्याचा कार्यक्रम सुरु केला आहे. महापारेषणचे प्रशिक्षण केंद्र अत्यंत प्रभावी आहे. 400 व्होल्ट असतानाही महिला लाईव्ह लाईनवर काम करु शकते, अशाप्रकारचे प्रशिक्षण त्या प्रशिक्षण केंद्रात दिले जात आहे. महावितरणमध्ये आपण जी प्रशिक्षण केंद्र तयार करीत आहोत, त्या प्रत्येकाची क्षमता 30 आहे. ही गोष्ट खरी आहे, की अनधिकृत माणसाला प्रशिक्षण देता येत नाही. परंतु, आपण आऊटसोर्सींग मधून जे कंत्राटी कामगार नेमले आहेत, त्यांना प्रशिक्षण देण्याची योजना आपण तयार केली आहे. हे अपघात 2-3 प्रकारचे आहेत. पहिले अपघात म्हणजे नागरिकांनी केलेल्या फॉल्टमुळे होणारे अपघात आहेत तर दुसरे म्हणजे घरावरुन गेलेल्या वायरमुळे पंतग उडविताना होणारे अपघात आहेत. तिसरे अपघात झीरो वायरमनचे आहेत. मात्र झीरो वायरमन रेकॉर्डवर येत नाहीत. तो मेल्यानंतर रेकॉर्डवर येतो की, यांनी हा माणूस ठेवला होता.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

आऊटसोर्सींग मधून जे कंत्राटी कामगार नेमले आहेत, त्यांना आपण प्रशिक्षण देत आहोत. ज्यांना आपण ऑफिशिअली आऊटसोर्सींग केले आहे, त्यांच्या स्कील डेव्हलपमेंटचा कार्यक्रम तयार केला

...6/-



ता.प्र.क्र. 44280....

श्री. चंद्रशेखर बावनकुळे .....

आहे, त्यानुसार आपण पुढे जात आहोत. आपण त्याची पूर्ण् तयारी केलेली आहे. आपण आता जे 6 हजार विद्युत सेवक घेतले आहेत, त्यांनाही आपण प्रशिक्षण देऊनच पोलवर चढविणार आहोत. आऊटसोर्सींग मधून जे कंत्राटी कामगार नेमले आहेत, त्यांना आपण प्रशिक्षण देत आहोत. ते देण्याचा पूर्ण कार्यक्रम तयार केला आहे. परंतु, जे झीरो वायरमन आहेत ते रेकॉर्डवर नाहीत, त्यामुळे त्यांना प्रशिक्षण देण्याचा प्रश्न येत नाही.

अध्यक्ष महोदय, लाईव्ह लाईनवर कोणताही मनुष्य चढविणे हा एकप्रकारचा गुन्हा आहे. सन 2011-2012 ते सन 2014-2015 पर्यंत जी 520 प्रकरणे आहेत, त्या 520 प्रकरणांचा शोध घेऊन कारवाई करु

B-1/...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.44280.....

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, यामध्ये आऊट सोर्सिंगचे कर्मचारी आहेत, त्यांना प्रशिक्षण नव्हते. या संपूर्ण घटनेची जबाबदारी त्या विभागाच्या उप अभियंता, कार्यकारी अभियंता यांच्यावर असते. या घटनेला हे अधिकारी जबाबदार आहेत. ही जबाबदारी त्यांच्यावर निश्चित करण्यात यावी. त्यामध्ये या कर्मचाऱ्यांची माहिती घेण्यात यावी. ते अपात्र असतील, शारीरिकदृष्ट्या विकलांग असतील, त्यामुळे पोलवर चढू शकत नाही यांच्याकरिता व्हीआरएस योजना राबवली पाहीजे किंवा त्यांना अन्य काम दिले पाहीजे. त्यांनीच परस्पर माणूस हाताखाली ठेवलेला आहे व तो पोलवर चढून काम करीत असल्यामुळे अपघात होतात. त्यासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल असे आपण सांगितले. महावितरणच्या या अपघातामध्ये वायरमनकडून निष्काळजीपणा केला जातो. पूर्वी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या इलेक्ट्रॉनिक, इलेक्ट्रीकल इन्सपेक्टरमार्फत ही चौकशी होत होती. परंतु आपण त्यांचे अधिकार काढून घेतले आहेत. महावितरणकडून झालेल्या हलगर्जीपणाची चौकशी कोण करणार आहे? निष्काळजीपणा झाल्याबाबत चौकशी करणारी कोणती यंत्रणा आहे. तुमचेच अधिकारी तुमच्याच कर्मचाऱ्यांची चौकशी करणार असतील तर यातून काहीच निष्पन्न होणार नाही. त्यामुळे अशा प्रकरणांची चौकशी करणारी पूर्वी असलेली व्यवस्था निर्माण करणार आहात काय किंवा अन्य व्यवस्था निर्माण करण्याचे प्रयोजन केलेले आहे काय, असा माझा पहिला प्रश्न आहे. विशेष करुन नागरी वस्तीच्या ठिकाणी बसविलेले ट्रान्सफार्मर ओपन आहेत. त्यांना केवळ छोटेसे कंम्पाऊंड केलेले आहेत. मोठ्या शहरांमध्ये नागरी वस्तीमध्ये असे ट्रान्सफार्मर्स असून यामुळे जीवीत हानी होते. ट्रान्सफार्मरच्या रिलोकेशनबद्दल निर्णय घेण्याची किंवा जीवित हानी होणार नाही याकरिता काही उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. आपण हॉट स्पॉटबद्दल म्हटले, परंतु मानस मेल्यानंतर हॉट स्पॉट शोधले आहे काय? एवढी वर्षे यंत्रणा डोळे झाकून काम करीत आहे काय? नागरीवस्तीमध्ये अपघात होऊ नये म्हणून तेथील ट्रान्सफार्मर रिलोकेशन करण्याबाबत निर्णय घेतला जाणार आहे काय, असा माझा प्रश्न आहे.

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महोदय, होय. आपण 5 हजार कोटी रुपयांचा आर ॲण्ड एमचा प्लॅन तयार केला असून तो इम्प्लीमेंट करणार आहोत, जे शहरी भागामध्ये आणि ग्रामीण भागामध्ये अपघाती स्पॉट आहेत. दुसरी बाब अशी की, तातडीने ॲक्सीडंट स्पॉट म्हणजेच

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

दररोज अशा घटना घडतात. त्या ठिकाणी एका पेक्षा जास्त घटना घडल्या, ते स्पॉट प्राधान्याने घेतले जाणार आहेत. असे सर्व जिल्ह्याचे स्पॉट आयडेंटीफाय झालेले आहेत. आपण सांगितलेली बाब खरी आहे की, विद्युत निरिक्षणालय हे पूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे होते. सार्वजनिक बांधकाम विभागात आमचे 900 कर्मचारी काम करीत होते. ते आपण विथ्ड्रॉल केले. मी आपल्याला जबाबदारीने सांगतो की, ही बाब पीडब्ल्युडीकडे होती, तेव्हा 1800 कर्मचाऱ्यांचा मृत्यु होता. हे एक वर्षापासून इकडे आणल्यामुळे व त्याला स्ट्राँग केले. यासंदर्भात आपण प्रचार, प्रसार केला, सप्ताह घेतला, सात दिवस घरोघरी फिरलो, यामुळे यामधील प्रमाण कमी झाले आहे. परंतु मी फार सुधारणा झाली असाही दावा करीत नाही. परंतु झीरो लाईनमन जास्त मरत आहे, नागरिकांच्या एरियामध्ये जास्त अपघात होत आहेत...(अडथळा)...

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, आमचा स्पेसिफिक प्रश्न आहे. पीडब्ल्युडीकडे असलेले विद्युत निरीक्षकाचे काम काढून घेतले आहे. आपल्याच यंत्रणेचे अधिकारी आपल्याच यंत्रणेची चौकशी करणार असेल तर ते इफेक्टीव्ह होणार नाही. त्यामुळे याकरिता स्वातंत्र एजन्सी म्हणजेच त्या यंत्रणेचा प्रभाव या एजन्सीवर पडणार नाही, अशी एजन्सी निर्माण केली पाहीजे. असे झाले तरच हे शक्य आहे. मानसांचा व जनावरांचा मृत्यु होत आहे. सहा, सहा महिने यासंदर्भातील दावे निकाली निघत नाहीत. लोक हेलपाटे मारुन थकले आहेत. आमच्यावर जबाबदारी येणार नाही, याकरिता आपल्या अधिकाऱ्यांमध्ये चढाओढ सुरु असते. स्वातंत्र रिड्रेसल फोरम केल्याशिवाय निःपक्षपातीपणे न्याय मिळणार नाही. याकरिता काही व्यवस्था निर्माण करणार आहात काय, असा माझा प्रश्न आहे.

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महोदय, मुख्य विद्युत निरीक्षणालय शासनाच्या अधिनस्त आहे. पूर्वी ते पीडब्ल्युडीच्या अधिनस्त होते. हे कंपन्यांकडे नाही. कोणाकडे आहे, याने काही फरक पडत नाही. परंतु मुख्य विद्युत निरीक्षणालय कंपनीकडे नसून शासनाच्या आधीन आहे. ही सेपरेट व्यवस्था असून शासनाच्या अधिनस्थ राहून काम करीत आहे. त्यामुळे एखादा अपघात झाल्यास हे त्यामध्ये गडबड करतील असा प्रकार होणार नाही. त्याबाबत पोलीस केसेस होतात, एफआयआर होतात, त्यासंदर्भातील सर्व रेकॉर्ड त्या ठिकाणी असते. मोठ्या प्रमाणात होणारे ॲक्सीडंट थांबविणे आवश्यक आहे. याबाबत आम्ही सांगितलेल्या दोन महत्वाच्या उपाययोजना

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.44280.....

श्री. चंद्रशेखर बावनकुळे.....

करणे गरजेचे आहे. कुठल्याही परिस्थितीत ॲक्सीडंट स्पॉट रिमुव्ह करणे, राज्याचा आर ॲण्ड एम करणे आणि लोकांच्या घरावरुन वायर गेलेले आहेत, ट्रान्सफार्मर रस्त्यावर पडलेले आहेत. लाईनमनने मोठ्या प्रमाणात झीरो लाईनमन नेमले आहेत. या तीन बाबी ॲक्सीडंटच्या आहेत व त्या दूर करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत.

श्री. सुभाष देशमुख : अध्यक्ष महोदय, हा प्रश्न अपघातात कर्मचारी आणि नागरिकांच्या झालेल्या मृत्युसंदर्भातील आहे. मानेगाव येथे वादळामुळे विजेच्या तारा खाली पडून त्यात एका व्यक्तीचा मृत्यु झाला होता. याबाबत तातडीने संबंधितास मदत करण्यात यावी, अशा सूचना माननीय ऊर्जा मंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिल्या होत्या. परंतु खालून रिपोट चुकीचा आल्यामुळे मदत मिळू शकली नाही. तसेच संजवाड व इतर गावात शॉर्ट सर्किटमुळे काही नुकसान झालेले आहे. तेथील झोपड्या जळाल्या होत्या, त्यावेळी देखील माननीय ऊर्जा मंत्र्यांनी मदत करण्याचे निदेश दिले होते. परंतु त्यांना अद्यापपर्यंत मदत देण्यात आलेली नाही. या तीन, चार प्रकरणांबाबत म्हणजेच अपघाताने मृत्यू झालेल्या व झोपड्या जळालेल्या कुटुंबातील सदस्यांना खासबाब म्हणून आपले दातृत्व दिले जाणार आहे काय, असा माझा आपल्यामार्फत मंत्री महोदयांना प्रश्न आहे.

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महोदय, महावितरणच्या चुकीमुळे ॲक्सीडंट झाला तर आपण मदत देतो. परंतु या केसमध्ये तपासणी करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांच्या प्रकरणाची पुन्हा चौकशी करुन महावितरणमुळे म्हणजेच आमच्या चुकीमुळे अपघात झाला असेल तर निश्चितपणे संबंधितास नुकसान भरपाई देण्यात येईल.

श्री. ग. आ. देशमुख : अध्यक्ष महोदय, निरनिराळ्या कारणांमुळे अपघात होत आहेत. त्यापैकी एका कारणाची या ठिकाणी चर्चा झालेली नाही. वीज वितरण कंपनीने हजारो वीज जोडण्या दिलेल्या आहेत. खांब आणि तारा ओढून देण्याऐवजी केबल कनेक्शन देऊन जोडण्या दिलेल्या आहेत. पाच ते सात वर्षे झाले तरी त्या बदलल्या जात नाहीत. त्या अपघाताची या ठिकाणी नोंद घेतलेली आहे काय. केबल कनेक्शन वीज वितरणाच्या धोरणामुळे घेण्यात आलेले आहेत. आपण 5 हजार कोटी रुपये सांगितलेले आहेत. राज्याकरिता ही रक्कम फार कमी आहे.

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

हजारो जोडण्या, केबल कनेक्शन दिलेले आहेत. त्या जोडण्या किती दिवसामध्ये पोल टाकून आणि तारा ओढून बदलून देण्यात येणार आहे, हा माझा पहिला प्रश्न आहे. मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तीच्या वारसांना वीज वितरण कंपनीमार्फत किती रक्कम दिली जाणार आहे, याचा उल्लेख लेखी उत्तरामध्ये करण्यात आलेला नाही. याबाबतीत काही धोरण ठरविण्यात आले आहे काय, असल्यास कोणते, असे माझे प्रश्न आहेत.

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महोदय, महावितरण आपल्या दारी या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना आणि घरगुती लोकांना इन्फ्रास्ट्रक्चर नसतांना कनेक्शन देण्यात आले, ही बाब खरी आहे. ते इन्फ्रास्ट्रक्चर पुन्हा उभे करुन कनेक्शन रेग्युलाईज केबल टाकून केले, त्यांना पूर्ण इन्फ्रास्ट्रक्चर करण्याची योजना हाती घेण्यात आलेली आहे. महावितरण आपल्या दारी या योजनेंतर्गत लवकरात लवकर कनेक्शन मिळावे म्हणून त्यांना इन्फ्रास्ट्रक्चर करीत आहोत. मी माननीय महसूल मंत्री श्री. एकनाथराव खडसे साहेबांचे यांचे अभिनंदन करतो. त्यांनी राज्याचे महसूल मंत्री झाल्यानंतर एक महत्वाचा निर्णय घेतला. मृत्यु झाल्यास देण्यात येणारी 2 लाख रुपयांची मदत डबल केली म्हणजेच 4 लाख रुपयांची मदत देण्याचा निर्णय केला. मदत व पुनर्वसन विभागाचा संबंधित जीआर महावितरणने जशाचा तसा स्वीकारला आहे. अगोदर 2 लाख रुपये मिळत होते, त्यामध्ये वाढ केल्यामुळे आता 4 लाख रुपये मदत मिळते. नुकसान भरपाई दिल्यामुळे मृत्युमुखी पडलेला व्यक्ती परत येत नाही. परंतु त्या कुटुंबाला आधार मिळतो. मदत व पुनर्वसन विभागाने काढलेला नवीन जीआर महावितरणला लागू करण्यात आलेला असून आपण त्यानुसार नुकसान भरपाई देत आहोत.

श्री. अजित पवार : अध्यक्ष महोदय, नैसर्गिक संकट येऊन घडणाऱ्या बाबींचासंबंध मदत व पुनर्वसन विभागाशी येतो. परंतु या बाबीमध्ये नैसर्गिक संकट नाही. यामध्ये विभागाकडून चूक झाल्यामुळे त्या व्यक्तीला जीव गमवावा लागतो. मंत्री महोदय यासंदर्भातील 2 निर्णय घेणार आहेत काय. एखादी व्यक्ती अपघातामध्ये मृत्युमुखी पडली तर तिच्या वारसाला 5 लाख रुपयाची मदत देण्यात यावी...(अडथळा)...नैसर्गिक संकट येऊन झालेला मृत्यू, याकरिता 4 लाख रुपयांची मदत देणार आहात. पुरामध्ये वाहून जाणे किंवा आणखी काही घटना घडल्यास मदत व पुनर्वसन विभागाचा निर्णय आहे. हे नैसर्गिक संकट आहे. परंतु या ॲक्सीडंटमध्ये वीज मंडळाचा दोष असतो. ऊर्जा विभागाचा दोष असल्यामुळे अशा घटना घडतात. ...C/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.44280

श्री.अजित पवार.....

म्हणून ही घटना घडते. प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या दिल्या जातात त्याप्रमाणे विद्युत अपघाताने एखाद्या कुटुंबातील कर्ता व्यक्ती मयत झाला तर त्याच्या वारसदारास नोकरी देण्यात येईल काय, नसेल तर अपघातग्रस्त व्यक्तीच्या कुटुंबियास 5 लाख रुपये नुकसान भरपाई देण्यात येईल काय ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महोदय, विद्युत अपघात झालेल्या वीज कर्मचारी / नागरिकांना मागील वर्षी 2 लाख रुपये आर्थिक मदत देण्यात येत होती ती आता 4 लाख रुपये करण्यात आली आहे. याप्रकरणी माजी ऊर्जा मंत्री तथा सन्माननीय सदस्य श्री.अजित दादा पवार यांनी 5 लाख रुपये वारसदारांना आर्थिक मदत करण्याबाबत मागणी केली आहे. वीज कंपन्यांची स्थिती फार चांगली नाही परंतु त्यांच्या सूचनेचा विचार शासनाकडू करण्यात येईल.

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य यांनी नोकरीसंदर्भात प्रश्न विचारला होता, त्याचे उत्तर माननीय ऊर्जा मंत्री यांनी द्यावे.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महोदय, महावितरण कंपनीतील आऊट सोर्सिंग कंत्राटी कामगार यांचे विद्युत अपघातामध्ये निधन झाले तर त्यांना कायम कर्मचाऱ्यांप्रमाणे सर्व लाभ देण्यात येतील, यापूर्वी सदरहू लाभ त्यांना पूर्वी देण्यात येत नव्हते.

श्री.अजित पवार : अध्यक्ष महोदय, सकाळच्या वेळी वीज आल्यानंतर शेतकरी शेतीला पाणी देण्याकरिता जात असतात.अनेक वेळा वादळी वारे किंवा इतर कारणाने विद्युत वायर तुटून जमिनीवर पडलेली असते व त्यावर पाय पडून शेतात जाणाऱ्या व्यक्तीचा मृत्यू होतो. अशा विद्युत अपघाताने एखाद्या कुटुंबातील कर्त्या व्यक्तीचा मृत्यू झाला तर त्यांच्या बाबत सहानुभूतीपूर्वक विचार करुन त्याच्या वारसदारांस अनुकंपा तत्वाचे धोरण लागू करण्यात येईल का ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महोदय, विद्युत अपघातामुळे निधन झालेल्या नागरिकाच्या कुटुंबियांना अनुकंपा तत्वावर सामावून घेता येणे शक्य नाही. कारण विद्युत अपघाताने निधन झालेल्या नागरिकाच्या कुटुंबियांना 4 लाख रुपये आर्थिक मदत देण्यात येते. यामध्ये 1 लाख रुपये वाढवून देण्याची मागणी सन्माननीय सदस्यांनी केली आहे. यासंदर्भात विद्युत बोर्ड व होल्डींग

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.44280

श्री.चंद्रशेखर बावनकुळे....

कंपनीसमोर जावे लागणार आहे, त्यासंदर्भात शासन स्तरावर विचार करण्यात येईल. आऊट सोर्सिंगच्या माध्यमातून विद्युत मंडळामध्ये जो कंत्राटी कर्मचारी नेमला आहे त्याचे विद्युत अपघाताने निधन झाले तर त्याच्या वारसासाठी अनुकंपा धोरण लागू करण्यात येईल. विद्युत अपघाताने निधन झालेल्या नागरिकांच्या वारसाना अनुकंपावर घेण्यासंदर्भातील धोरण आज तरी तयार करणे शक्य नाही. यासंदर्भात विचार करण्यात येईल.

श्री.गुलाबराव पाटील : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी कंत्राटी कामगारासंदर्भात माहिती दिली. सदनातील ग्रामीण भागातील सर्व सन्माननीय सदस्यांना माहीत आहे की, ग्रामीण भागात झिरो वायरमन शिवाय रात्री कोणीच कामावर येत नाही. कोणताही वायरमन नियुक्ती असलेल्या मुख्यालयाच्या ठिकाणी राहत नाही. प्रत्येक गावातील सरपंच व संबंधित कनिष्ठ अभियंता यांना माहीत आहे की, झिरो वायरमन म्हणून कोण काम करते. या वायरमनची नोंदणी करुन त्यांना प्रशिक्षण देऊन व त्यांना वयामध्ये बसवून नोकरी देण्यात येईल काय ? महानगरपालिका किंवा नगरपालिकामार्फत क्रेनच्या सहाय्याने उंचावरील विद्युत वाहिन्यांची कामे करण्यात येतात. लाईटची कामे करण्यासाठी अ व ब क्लास मधील 40-50 हजार लोकसंख्या असलेल्या गावांची निवड करुन तेथे क्रेन उपलब्ध करुन देण्यात येईल काय ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी झिरो लाईनमन बाबत सांगितलेली माहिती खरी आहे. माननीय ग्रामविकास मंत्री श्रीमती पंकजाताई मुंडे यांनी एक योजना तयार केली असून त्यास आम्ही समर्थन दिले आहे. झिरो लाईनमनची नोंदणी करुन एक ग्रामपंचायत, एक लाईनमन व एक ग्राम विद्युतसेवक अशा प्रकारची योजना करण्याचे प्रस्तावित आहे. विद्युतसेवक नेमाताना झिरो लाईनमन यांना अनेक दिवसांचा अनुभव असतो. त्यांना पुःन्हा प्रशिक्षण देऊन प्रमाणपत्र देण्यात येईल व ग्राम विद्युतसेवक योजनेमध्ये समाविष्ट करण्यात येईल. एका तालुक्याला एक टावर लोडर देण्यासंदर्भातील सन्माननीय सदस्यांच्या मागणीचा शासन स्तरावर विचार करण्यात येईल.

------------

.....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**कोल्हापूर जिल्ह्यातील महावितरण कंपनीने कंत्राटी कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीच्या रकमेचा केलेला गैरव्यवहार**

(2) * **५१६४६ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) कोल्हापूर जिल्ह्यातील महावितरण कंपनीमधील कंत्राटी कामगारांची भविष्य निर्वाह निधीची रक्कम त्यांच्या वेतनातून कपात करुनही, महावितरण कंपनीने ती न भरता स्वतःकडे ठेवून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याचे दिनांक १२ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, यासंदर्भात मुख्य कार्यकारी संचालक व भविष्य निर्वाह निधी मुख्य प्रबंधक यांचेकडे लेखी निवेदन देऊनही अद्याप कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(4) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कंत्राटी कामगारांची भविष्य निर्वाह निधीची रक्कम भरण्याबाबत व गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही. तथापि कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात होणाऱ्या भविष्य निर्वाह निधीच्या रकमेचा गैरव्यवहार झाल्याबाबत दि. १४ व १५ फेब्रुवारी, २०१६ च्या स्थानिक दैनिक वर्तमानपत्रात बातम्या प्रसिध्द झाल्या होत्या.

(2), (3) व (४) आयुक्त, क्षेत्रिय भविष्य निर्वाह निधी, उप प्रादेशिक कार्यालय, कोल्हापूर यांच्यामार्फत चौकशी सुरु आहे.

(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.प्रकाश आबिटकर : अध्यक्ष महोदय, कोल्हापूर येथील कंत्राटी कामगार कंपनीने कामगारांचा प्रॉव्हिडंट फंड जमा केला नाही. त्यामुळे संबंधित कर्मचारी तरुणांची आर्थिक कुचंबना होत आहे, त्यांना त्रास होत आहे, यासंदर्भात मी प्रश्न उपस्थित केला आहे. याप्रकरणी शासनाने

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.51646

श्री.प्रकाश आबिटकर...

दिलेल्या उत्तरामधील माहिती व माझ्याकडे उपलब्ध माहितीमध्ये विसंगती आहे. खालच्या स्तरावर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करावयास पाहिजे होती, ती करण्यात आली नाही. कोल्हापूर जिल्ह्यातील महावितरण कंपनीचे काम 5 कंत्राटी कामगार संस्थेतील 150 कंत्राटी कामगारांच्या माध्यमातून करण्यात येते. या कंत्राटी कामगारांच्या प्रॉव्हिडंट फंड प्रकरणी उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्तरावरील श्री.शिरीष काटकर यांची नियुक्ती सन 2012 मध्ये करण्यात आली होती. महावितरण कंपनीचे संबंधित अधिकारी व कंत्राटी कामगार संस्था यांनी कंत्राटी कामगारांच्या प्रॉव्हिडंट फंडाची रक्कम त्यांच्या खात्यात भरावयाची आहे. कुंपनानेच शेत खाल्ले तर तक्रार कोणाला करावयाची, असे या दोघांचे साटेलोटे आहे. या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या प्रॉव्हिडंट फंडाची 60-70 हजार रुपये रक्कम अद्याप भरण्यात आलेली नाही. यांसदर्भातील तक्रारी प्रॉव्हिडंट फंड कार्यालयामध्ये देखील करण्यात आल्या आहेत. सदरहू प्रकरणी कोल्हापूर महावितरण कंपनीचे अधिकारी व संबंधित ठेकेदार यांनी माहिती लपवून चुकीची माहिती सभागृहाला दिली आहे. याप्रकरणी तात्काळ चौकशी करुन संबंधित दोषी अधिकाऱ्यांना निलंबीत करण्यात येईल काय ? तसेच, सदरहू 5 कंत्राटी कामगार कंपन्यांना ब्लॅक लिस्टमध्ये टाकण्यात येईल काय ? या अनुषंगाने कंत्राटी कामगार अत्यंत वाईट अवस्थेत असल्याने मंत्री महोदयांसमवेत दोन वेळा बैठका घेण्यात आल्या आहेत. परंतु त्यांना आजपर्यंत कोणतीही खात्री देण्यात आलेली नाही. त्यामुळे सदरहू कंत्राटी कर्मचारी अस्वस्थ असून प्रसंगी त्यांनी आत्मदहनाचा इशारा दिला आहे. राज्यातील या कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेण्याबाबत तात्काळ बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल काय ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महोदय, कोल्हापूर महावितरण कंपनीमध्ये 292 कंत्राटी कर्मचारी काम करीत आहेत. या कर्मचाऱ्यांच्या प्रॉव्हिडंट फंडची साडे बारा टक्के रक्कम कंत्राटी कामगाराने व साडे बारा टक्के रक्कम महावितरण कंपनीने भरावयाची आहे. महावितरण कंपनीने संबंधित कंत्राटदाराला सदरहू साडे बारा टक्के रक्कम द्यावयाची आहे व कंत्राटदाराने

.....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.51646

श्री.चंद्रशेखर बावनकुळे......

कंत्राटी कर्मचाऱ्याच्या वेतनातून साडे बारा टक्के रक्कम कपात करुन ती प्रॉव्हिडंट फंडमध्ये जमा करावयाची आहे. आतापर्यंत सदरहू प्रॉव्हिडंट फंडाची रक्कम भरण्यासंदर्भात अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले आहे. सरहू प्रकरणी काही कंत्राटदारांनी रक्कम दिली नाही व काही कंत्राटी कर्मचाऱ्यांनी साडे बारा टक्के रक्कम प्रॉव्हिडंट फंडमध्ये भरण्यासाठी दिली नाही. त्यामुळे राज्याचे प्रॉव्हिडंट फंड कमिश्नर यांचेकडून सदरहू प्रकरणाची चौकशी केली जाईल. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्यानुसार कंत्राटदार व संबंधित अधिकारी यांच्या संगनमताबाबत चौकशी करण्यात येईल. तसेच, जर संबंधित अधिकाऱ्याने कामगार आऊट सोर्सिंग करण्याचे कंत्राट घेतले असेल तर त्यास सस्पेंड करण्यात येईल.

श्री.प्रकाश आबिटकर : अध्यक्ष महोदय, संबंधित अधिकाऱ्याने कामगार आऊट सोर्सिंगचे कंत्राट घेतलेले नाही. पी.एफ.ची रक्कम भरण्यासाठी संबंधित अधिकाऱ्याची को-ऑर्डीनेटर ऑफिसर म्हणून जबाबदारी आहे. परंतु त्यांनी याप्रकरणी दाद दिलेली नाही. त्यामुळे महावितरण कंपनी व कंत्राटदार यांचेकडून रक्कम वसूल करुन पी.एफ.मध्ये भरलेली नसल्याने याप्रकरणी अहवाल मागवून त्यांना निलंबित करण्याची शिफारस करण्यात येईल काय ? कंत्राटी कामगारामध्ये अनेक अनुभवी व प्रशिक्षित तरुण काम करीत आहेत त्यांना तत्काळ सेवेत सामावून घेण्यात येईल काय ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महोदय, सदरहू प्रकरणी प्रॉव्हिडंट फंड कमिश्नर यांचे मार्फत चौकशी करुन संबंधित अधिकारी दोषी असतील तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. राज्यातील अनेक जिल्ह्यातील अनेक कंत्राटी कर्मचाऱ्यांची पी.एफ.ची रक्कम त्यांच्या पी.एफ.खात्यामध्ये जमा केली नाही. त्यामुळे ऑन लाईन कसे करता येईल..... पी.एफ.अकाऊंट बाबत नियम करण्यात आले आहेत. प्रत्येक कंत्राटी कर्मचाऱ्याचे पी.एफ. खाते असावे व त्यासोबत त्याचे वेतन व आधारकार्ड क्रमांक लिंक अप करण्याचे आदेश काढण्यात आले आहेत.

यानंतर D-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.51646......

श्री. चंद्रकांत बावनकुळे....

या जानेवारी महिन्यापासून आपण राज्यातील सात ते साडेसात हजार कंत्राटी कामगारांचे आधार कार्ड आणि त्यांचे अकाऊंट नंबर आपण लिंकअप करतो आहोत. त्यामध्ये असा एकही कर्मचारी सुटणार नाही की, त्याचा आपल्याकडे आऊटसोर्सिंग अकाऊंट नंबर असेल. आपण यांना कायम करण्याची मागणी करीत आहात त्यासंबंधी आपण त्यांना कंत्राटी कायद्यानुसार घेतले आहे, आऊटसोर्सिंग कायद्याप्रमाणे घेतले आहे. त्यामुळे त्यांना नियमित करण्यासंबंधी विनंती असली तरी राज्यातील प्रकल्पग्रस्त आणि अनुकंपा उमेदवार मोठ्या प्रमाणात आहेत. त्यामुळे हे प्रकल्पग्रस्त आणि अनुकंपावरील उमेदवार नियुक्त झाल्यानंतर महावितरणला वाटेल की, काही जागा विद्युत सेवकाच्या निघतील त्यावेळी शासन याचा विचार करु शकेल. पण सध्या अनुकंपाचे आणि पीएपीचे लोक शिल्लक आहेत आणि कंत्राटी कामगार हा आपण कंत्राटी कायद्यान्वये घेतलेला आहे. त्यामुळे त्यांना नियमित करण्याची तरतूद नाही. तरीही आपल्या सूचनांचा शासन विचार करेल.

श्री. शशिकांत शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी उत्तर दिलेले आहे. पण कंत्राटी कायद्याच्या माध्यमातून जे काही फायदे असतात ते कंत्राटदार कामगारांना देतात काय, याचे व्हेरीफिकेशन होणे गरजेचे असते. कंत्राटी कामगारांसाठी आपण कंत्राटी कायद्यानुसार मान्य केलेल्या सर्व सुविधा त्यामध्ये मिनिमम वेजेसप्रमाणे पगार, पी.एफ. ग्रॅज्यूएटी देण्यासंबंधी प्रिंसीपल एम्लायमेंट म्हणून आपण कार्यवाही करता काय, याचे उत्तर द्यावे. आता आपण उत्तरामधून असे सांगितले की, बऱ्याच जागा रिक्त आहेत. दुसरे या अवघड कामासाठी आपण त्याच जिल्ह्यातील आयटीआय डिप्लोमा झालेल्या मुलांना आपण कंत्राटी पध्दतीने ठेवलेले आहे. आपण प्रकल्पग्रस्त आणि अनुकंपाची भरती करणार असल्याचे सांगितले असले तरी आज जवळ जवळ 50 टक्क्यांच्या वर आपल्याकडे जागा रिक्त आहेत आणि या जागा आपण कंत्राटी पध्दतीने भरणा करीत आहात. हे कामगार वर्षानुवर्षे आपला जीव धोक्यात घालून काम करीत आहेत. त्या ठिकाणी मेन इलेक्ट्रिशियन असताना हा कंत्राटी कामगार काम करतो तर यांना प्राधान्य देऊन कायम करण्याची भूमिका घेणार आहात काय ?

2.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.51646......

श्री. चंद्रकांत बावनकुळे....

अध्यक्ष महोदय, कंत्राटी कामगार कायद्याप्रमाणे जे 42 टक्के लोडिंग आहे. ही गोष्ट खरी आहे की, त्या कंत्राटी कामगाराला अनुज्ञेय सुविधा मिळतात की नाही हे आजपर्यंत प्रभावीपणे तपासले गेलेले नाही. पण आता आपण 12 ऑक्टोबर 2015 रोजी एक परिपत्रक काढून त्यामध्ये स्पष्टपणे उल्लेख केला आहे की, त्यांचे आधारकार्ड काढून ते त्यांच्या अकाऊंटला लिंकअप करुन त्यांना ऑनलाईन डायरेक्ट पेमेंट झाले पाहिजे अशी सुविधा केलेली आहे. या परिपत्रकाची प्रत आपल्याकडे पाठवितो. दुसरे म्हणजे जे 42 टक्के लोडिंग आहे. ते पूर्णपणे गेले पाहिजे याची काळजी शासन घेणार आहे. पुढच्या तीन महिन्यामध्ये म्हणजे जुलैच्या अधिवेशनापर्यंत राज्यातील संपूर्ण कंत्राटी कामगाराच्या नावासह, त्यांचे आधारकार्ड क्रमांक, त्यांचे अकाऊंट नंबर आणि त्यांना मिळणारे ए टू झेड फायदे यांचे रेकॉर्ड तयार करुन ते सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतील. आता राहिला प्रश्न त्यांना कायम करण्यासंबंधी तर महावितरणने मागील 3-4 महिन्यांपूर्वी 6 हजार विद्युत सेवक त्या ठिकाणी नेमले आहेत. आणखी जर अशी परिस्थिती आली तर आपण त्यांना पुन्हा नेमू. आता 3 हजार उमेदवार वेटिंगमध्ये आहेत. एकूण यादी 9 हजारांची होती. त्यापैकी 6 हजार घेतले असून आता 3 हजार वेटिंग आहेत. आपल्याकडे कर्मचाऱ्यांचे वारस आणि पीएपीचे उमेदवार आहेत. या सर्व बाबींचा विचार करुन त्यांना कसे स्थान देता येईल ते प्राधान्याने देण्याचा विचार करण्यात येईल.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांना माझे दोन प्रश्न आहेत. एक म्हणजे कंत्राटी कामगारांना आपण ज्या अर्थी कामावर घेतो, त्या अर्थी एमएसईबीला काम पूर्ण करण्यासाठी त्या कामगारांच्या सेवेची गरज आहे. त्यामुळे आपण त्यांना सेवेत सामावून घेऊ शकतो. त्यामुळे जे हजारो कामगार कंत्राटी म्हणून सेवेत आहेत, त्यांना सेवेत घेताना नेहमीच्या परीक्षा घेताना ते पूर्वीचे कंत्राटी कामगार आहेत असे समजून थोडेसे जास्त वेटेज देण्याचा प्रयत्न माननीय मंत्री महोदय करतील काय ? जेणेकरुन त्यांना नोकऱ्या मिळतील. दुसरा प्रश्न असा आहे की, माननीय मंत्री महोदयांनी संपूर्ण महाराष्ट्रात दौरा केलेला असून बऱ्याच ठिकाणी त्यांनी सांगितले आहे की, अधिकाऱ्यांना सस्पेंड करु वगैरे तर मघाशीच्या प्रश्नाच्या उत्तरात आपण शून्य लाईनमन्स असे जे सांगितले आहे त्यामुळे माझा प्रश्न एवढाच आहे की आपण मंत्री झाल्यापासून

3.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.51646......

श्री. जयंत पाटील....

आतापर्यंत किती अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना त्यांनी सस्पेंड केलेले आहे. मी त्यांना फोन केला होता की, ठराविक एका माणसावर जास्त अन्याय होतो म्हणून त्याला सस्पेंड करु नका. तरी देखील असे फोन न येता आपण अशा सस्पेंड केलेल्या अधिकारी व कर्मचारी यांची संख्या किती आहे.

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महोदय, ही बाब खरी आहे की, कंत्राटी कामगारांसाठी पुढच्या काळात जेव्हा जागा निघतील त्यावेळी काही ना काही प्रमाणात आरक्षण ठेवले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत शिंदेजी यांना मी सांगू इच्छितो की, पीएपीची पदे भरल्यानंतर ज्या नवीन जागा निघतील त्यावेळी कंत्राटी कामगारांना काही ना काही आरक्षण ठेऊन मुख्य प्रवाहामध्ये कसे आणता येईल याचा विचार होईल.

डॉ. पतंगराव कदम : अध्यक्ष महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी जिल्हावार दौरा केला आहे. इफेक्टिव्ह प्रशासन राबविण्याचा त्यांचा मानस आहे. सांगलीच्या दौऱ्याच्या वेळी मी स्वतः हजर होतो. इतक्या तडफेचा पहिला मंत्री महाराष्ट्रात मिळाला आहे असे मला वाटले. पण प्रत्यक्षात वस्तुस्थिती अशी आहे की, 7-7, 8-8 गावांना एक लाईनमन आहे. विदर्भाच्या भाषेत त्याने त्याच्या हाताखाली आणखी एक टिल्लू नेमलेला. आपण सांगता की, ग्रामविकास मंत्री निर्णय घेणार आहेत. पण हे सर्व कधी होणार आहे. माणसे मरायला लागली आहेत. आपण ज्या घोषणा केल्या, त्या जर अंमलात आणल्या तर आम्ही आपला जाहीर सत्कार करु.

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महाराज, यासंबंधी कालच बैठक झाली. त्या बैठकीमध्ये मी ग्रामविकास मंत्री आणि वित्तमंत्री आम्ही सर्वांनी चर्चा केलेली आहे. सन्माननीय सदस्य डॉ. पतंगराव कदम यांचा यामध्ये आग्रह असल्यामुळे लवकरात लवकर प्रत्येक गावासाठी एक ग्राम विद्युत सेवक नेमण्याची कार्यवाही करण्यात येईल. अध्यक्ष महाराज, यामध्ये माझ्या एकट्या विभागाचा संबंध नाही. यामध्ये ग्रामविकास विभाग, वित्त विभाग आणि माझा विभाग मिळून आम्ही हे शेअर करीत आहोत. यामध्ये कायद्यात दुरुस्ती करावी लागणार आहे. म्हणून सन्माननीय सदस्य डॉ. पतंगराव कदम साहेब आपल्या सूचनांचे लवकरा लवकर पालन करण्यात येईल.

-------

4.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**मौजे खंडाळा (ता.नरखेड, जि.नागपुर) येथे मे. मिडलॅण्ड स्टोन यांनी अवैधरित्या गौण खनिजाचे उत्खनन केल्याबाबत**

**(3) *44892 श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मौजे खंडाळा (ता.नरखेड, जि.नागपुर) येथील सर्व्हे नं. 55/1 व 130 मध्ये मे. मिडलॅण्ड स्टोन यांनी अवैधरित्या गौण खनिजाचे उत्खनन केल्यामुळे, स्थानिक नागरीकांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार, नरखेड यांनी दिनांक 7 जानेवारी, 2015 रोजी पारित केलेल्या आदेशानुसार 7 कोटी 64 लाख 66 हजार इतकी दंडाची रक्कम शासनाकडे जमा करण्याचे आदेश दिल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, पारित केलेल्या आदेशास उपविभागीय अधिकारी, काटोल यांनी तहसिलदारांच्या आदेशाची व केलेल्या पंचनाम्याची शहानिशा न करता स्थगिती आदेश दिल्याने शासनाचे` मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(4) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने ठेकेदाराकडून रॉयल्टी वसूल करण्याबाबत तसेच उपविभागीय अधिकारी, काटोल यांच्याविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (1), (2), (3) व (4) मौजे खंडाळा (बुज) ता. नरखेड येथील सर्वे नं. 55/1 व 130 मधील खाणपट्टाधारक मंजूर क्षेत्राबाहेर व जास्त खोल उत्खनन करीत असल्याची तक्रार तहसिलदार नरखेड यांना प्राप्त झाली होती. सदर तक्रारीनुसार तहसिलदार नरखेड यांनी सदर खाणपट्टयातील उत्खननाचे मोजमाप केले असता, खाणपट्टाधारकाने शासन जमा केलेल्या स्वामित्वधनाच्या रकमेपेक्षा जास्त उत्खनन केल्याचे आढळून आल्यावरून दिनांक 07/01/2015 च्या आदेशान्वये रूपये 7,64,66,746/- एवढ्या रकमेच्या दंडाचे आदेश पारित केले.

सदर आदेशाविरूध्द खाणपट्टाधारकाने उपविभागीय अधिकारी काटोल यांच्यासमोर दाखल केलेल्या अपीलामध्ये, उपविभागीय अधिकारी काटोल यांनी दि.27/02/2015 रोजी आदेश पारीत करून खाणपट्टाधारकाने मध्य रेल्वेकडे जमा केलेल्या स्वामित्वधनाची रक्कम मध्य रेल्वेने तहसिलदार नरखेड यांच्यामार्फतत दि. 25/02/2015 रोजी चलनाद्वारे शासनाकडे जमा केली असल्याने, तहसिलदार नरखेड यांचे आदेश रद्द केले.

उपविभागीय अधिकारी, काटोल यांनी पारित केलेले उक्त आदेश खाणपट्ट्याच्या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार उचित आहेत किंवा कसे याची शहानिशा करुन गरजेनुसार सदर आदेशाचे पुनरीक्षण करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी नागपूर यांना देण्यात आल्या आहेत.

(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

5....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.44892......

श्री. योगेश सागर : अध्यक्ष महोदय, माझा प्रश्न असा आहे की, 7 जानेवारी 2015 ला त्या खाणपट्टाधारकाला 7 कोटी 64 लाख 66 हजार इतक्या रकमेचा दंड लावला होता. उपविभागीय अधिकारी यांनी या आदेशाला 25 फेब्रुवारी 2015 ला स्थगिती दिली होती. स्वामित्वधनाची ही रक्कम खाणपट्टाधारकाने मध्य रेल्वेला जमा केली होती. मध्य रेल्वेने ती रक्कम तहसिलदाराकडे 25 फेब्रुवारी 2015 ला जमा केली आहे. परवान्यापेक्षा जास्त गौणखनिज उत्खनन केले असल्यामुळे खाणपट्टाधारकाला 7 ते 7.5 कोटी रुपयांचा दंड आकारलेला आहे. पण यामध्ये स्वामित्वधनाची जी रक्कम असेल ती तर मूळ रक्कम असेल किंवा अधिकची रक्कम भरली असेल तर त्याची माहिती मंत्री महोदयांनी द्यावी. दुसरे म्हणजे 31 जानेवारी 2016 ला या खाणपट्टाधारकाची लिज संपली होती तर 25 फेब्रुवारी 2015 ला या स्वामित्वधनाची अधिकची रक्कम वसूल केली गेली आहे की, नाही हा पहिला प्रश्न आहे आणि दंड वसूल केला गेला असेल तर किती दंड वसूल केला गेला आहे.

D-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 44892........

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, खाण धारकाला 5 वर्षासाठी ही खाण देण्यात आलेली आहे. 5 वर्षामध्ये अतिरिक्त उत्खनन केल्याची तक्रार स्थानिक तहसिलदाराकडे आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे करण्यात आली. सदर तक्रारींच्या अनुषंगाने खाणधारकाच्या संदर्भामध्ये मोका तपासणी करुन माहिती घेण्यात आली. त्यानंतर हे लक्षात आले की, सदर खाण धारकाने अतिरिक्त उत्खनन केलेले आहे आणि स्वामित्वधनाचा आणि रॉयल्टीचा पैसा भरलेला नाही. म्हणून स्थानिक तहसिलदाराने 7 कोटी 64 लाखांचा दंड भरण्याची नोटीस दिली. दरम्यानच्या काळामध्ये त्याने प्रांत अधिकाऱ्याकडे अपिल केले. रेल्वेचा ठेकेदार असल्याने स्वामित्वधनाच्या रॉयल्टीची रक्कम रेल्वेकडे भरल्याची माहिती दिली. ठेकेदाराने दिलेल्या माहितीच्या आधारावर कागदपत्रांची छाननी करुन दंड कमी करण्यात आलेला आहे. या सर्व प्रकरणाची चौकशी केल्यानंतर असे लक्षात आले की, स्वामित्वधनाची रक्कम परस्पर रेल्वेकडे भरण्याची आवश्यकता नव्हती. ही रक्कम सरकारकडे जमा करायला पाहिजे होती. प्रांत अधिकाऱ्याने 7 कोटी रुपयांची रक्कम 1 कोटीपर्यंत कमी केली. प्रांत अधिकाऱ्याला तसे अधिकार आहेत. परंतु अशा संदर्भामध्ये 7 कोटी 64 लाखावरुन त्याचा दंड 1 कोटीपर्यंत कमी केला. त्यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्याला पुर्ननिरीक्षण करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. प्रांत अधिकाऱ्याने तपासणी करणे गरजेचे होते की ठेकेदाराने स्वामित्वधनाची रक्कम सरकारकडे न भरता रेल्वेकडे भरली आहे. तर रेल्वेकडे खरोखर भरली आहे की नाही याची तपासणी झालेली नाही.

अध्यक्ष महोदय, जरी रेल्वेकडे भरले असले तरी नियमामध्ये तशी तरतूद नाही. जरी भरले असले तरी तत्कालीन कालखंडामध्ये सदर रकमेवरीलशासनाचे व्याज बुडालेले आहे असे प्रथमदर्शन लक्षात आल्याने संबंधित प्रांत अधिकाऱ्याची चौकशी सुरु करण्यात आलेली आहे. प्रांत अधिकाऱ्याला नायिक अधिकार असल्याने चौकशीच्या आधी जिल्हाधिकाऱ्याकडून या विभागाची माहिती घेण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. जिल्हाधिकाऱ्याकडून चौकशीचा अहवाल आल्यानंतर ताबडतोब जे दोषी असतील त्या सर्वांवर कठोर कारवाई करण्यात येईल आणि आवश्यकता भासल्यास ठेकेदाराने शासनाचा महसूल बुडविला यांसदर्भात नियमामध्ये ज्या काही

......2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 44892........

श्री.एकनाथराव खडसे.......

तरतूदी आहेत. त्या सर्व तरतूदी अधिकाऱ्यांनाही लागू होतील आणि त्याचबरोबर ज्यांनी हे उत्खनन करुन कर बुडविला यासाठी एक नवीन कायदा अस्तित्वात आणलेला आहे. त्या कायद्याच्या आधारे कारवाई करण्यात येईल.

श्री.सुनिल केदार : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे तहसिलदाराने केलेली आखणी आणि त्यावर जिल्हाधिकाऱ्याने दिलेला स्टे अशाप्रकारची बरीच प्रकरणे नागपूर जिल्ह्यात आहेत. शासनाचा कर बुडविला त्याबद्दल त्याच्यावर कारवाई करण्यात येणार आहे. यासाठी एक कालबध्द कार्यक्रम ठरविण्यात येणार आहे काय? प्रांत अधिकाऱ्याने किती दिवसात निकाल लावावा, कलेक्टरने किती दिवसात निकाल लावावा याचे धोरण ठरवून तशा प्रकारचे आदेश शासन देणार काय ?

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, सदर प्रकरणामध्ये अहवाल आल्यानंतर तातडीने कारवाई करण्यात येईल. राज्यामध्ये अशाप्रकारचे छापील रेव्हेन्यु दाखल असतात यामध्ये वर्षानुवर्षे कालापय होतो. आजही असे म्हटले जाते की, आजोबाने दाखल केलेला खटला नातवापर्यंत चालत असताना तो सुध्दा म्हातारा होतो. कालच विधान परिषदेमध्ये एक नवीन कायदा राज्य सरकारने मंजूर केला. सिव्हील ॲप्लीकेशनच्या संदर्भात फास्ट ट्रॅक कोर्टासारखे खटले निकाली निघाले पाहिजेत. वर्षानुवर्षे हे खटले प्रलंबित राहतात. त्यामुळे न्याय मिळत नाही आणि न्याय न मिळाल्यामुळे नाकारण्यासारखी परिस्थिती येते. म्हणून विधान परिषदेमध्ये कायदा मंजूर करण्यात आला तो विधानसभेमध्ये येणार आहे. कधी झाला नाही असा क्रांतीकारी निर्णयाचे विधान परिषद सभागृहामध्ये सन्माननीय सदस्य श्री.सुनिल तटकरे तसेच सर्व विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी कौतुक केले आणि हा कायदा एकमताने मंजूर झाला. सिव्हील ॲप्लीकेशनच्या संदर्भात वर्षानुवर्षे चालणारे खटले आहेत ते एक वर्षाच्या आत निकाली निघावेत यासंदर्भातील कायदा मंजूर झाला. विशिष्ट परिस्थितीमध् 6 महिने किंवा अधिक मुदतवाढ देण्याच्या संदर्भामध्ये कायद्यामध्ये तरतूद आहे. 20-25 वर्षे खटले प्रलंबित राहत होते. आता राज्यामध्ये कोणताही खटला एक वर्षाच्या वर प्रलंबित राहणार नाही असा कायदा मंजूर केला. हे सर्व अपिल एक वर्षाच्या आत निकाली काढण्यासाठी कायद्याने बंधन घालण्यात आलेले आहे. म्हणून जिल्हाधिकाऱ्यांना ज्या सूचना

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 44892........

श्री.एकनाथराव खडसे......

दिलेल्या आहेत त्यात प्रथमदर्शनी तथ्य आढळून आलेले आहे की, 7 कोटी रुपयांची रक्कम सदर प्रांत अधिकाऱ्याने स्वतःच्या अधिकारामध्ये एक कोटीपर्यंत आणली आणि ठेकेदाराला 6 कोटी रुपये माफ केले. म्हणून सदर प्रकरणाची चौकशी करुन एक महिन्याच्या आत नियमात तरतूद आहे त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

श्री.पंतगराव कदम : अध्यक्ष महोदय, उत्खननाच्या बाबतीत महसूल मंत्री महोदयांनी खूप चांगले निर्णय घेतले. सरकारच्या ज्या लिप्ट इरिगेशन योजना आहेत त्याच्या आजूबाजूला सुध्दा उत्खनन होऊ लागलेले आहे. त्यामुळे प्रचंड नुकसान होत आहे. लिप्ट इरिगेशनपासून 5 किलोमीटर अंतरावरील उत्खननाला परवानगी नाकारणार काय?

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, अशा तक्रारी आल्या आणि त्यामुळे लिप्ट इरिगेशनला धोका, हानी पोहचत असेल त्याठिकाणी परवानगी देऊ नये. अशाप्रकारच्या सूचना त्या-त्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात येतील. सरसकट निर्णय घेता येणार नाही.

श्री.सुभाष पाटील : अध्यक्ष महोदय, संबंधित खाणीचे मोजमाप आधुनिक यंत्रणेमार्फत करणार काय? कारण तहसिलदाराने मॅन्युअली मोजमाप केलेले आहे. नियमानुसार रॉयल्टीची रक्कम अगोदर भरावी लागते. खाण मालक हा रेल्वेलाच माल देत नाही तर अन्य ठिकाणी सुध्दा माल देतो. मोजमाप आधुनिक यंत्रणेमार्फत करणार काय? आणि 7 कोटीपेक्षा जास्त महसूल राज्य सरकारकडे जमा होईल काय?

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, नवीन ईटीएस प्रणाली आणलेली आहे. ईटीएस प्रणाली तंतोतंत असून त्याचे मोजमाप सुप्रिम कोर्टाने सुध्दा मान्य केलेले आहे की, यामध्ये गैरव्यवहार किंवा चूक होण्याची शक्यता फार कमी आहे. म्हणून सदर प्रकरणाची ईटीएस प्रणालीद्वारे फेर तपासणी करण्यात येईल आणि यातून जे काही निष्कर्ष निघतील त्यानंतर आवश्यकता असेल तर याही पेक्षा अधिक स्वामित्वधन वसूल करण्यासंदर्भातील कारवाई करता येईल.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 44892........

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, वाळूचा प्रश्न अतिशय गंभीर होत चाललेला आहे. कायदा व सुव्यवस्थेतून निर्माण होणाऱ्या घटना आहेत. यात तहसिलदारापासून, उप विभागीय अधिकाऱ्यांपासून, अंगावर गाड्या घालण्यापर्यंत असे अनेक प्रकार घडत आहेत. एवढे निर्बंध असूनही बांधकामे कोठेही बंद नाहीत. खाजगी बांधकामे सर्रास चालू आहेत. मागच्या काळात आणि आताही चालू आहेत. कितीही नियम केले तरी बांधकामे बंद होत नाहीत. आज मुंबई, पुण्यामधील बांधकामे बघितली तर बांधकामाची किंमत केवळ हजार, दोन हजार प्रति स्क्वेअर फुट वाळूच्या किमतीमुळे वाढलेले आहे. 6 कोटी रुपये कोणी घेतले याबाबत चौकशी करण्यात यावी. महसूली अधिकाऱ्यांवर सातत्याने हल्ले होत आहेत त्याकरिता त्यांना कुठलेच संरक्षण नाही.

F-1.........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे पाटील ......

महसूल अधिका-यांवर जे हल्ले होतात. त्यांना स्वसंरक्षणाकरिता काहीच व्यवस्था नाही. अनेक वेळा महसूल अधिका-यांनी मागणी केली की, हे काम आमच्याकडे ठेवू नका. हे काम पोलीस यंत्रणेकडे द्या किंवा स्वतंत्र यंत्रणा उभी करा. स्वतः जीविताला धोका पत्करुन या अधिका-यांनी कशी कारवाई करायची. या संबंधी काही स्पष्ट धोरण, महसूल विभागाच्या अधिका-यांना स्वसंरक्षणाकरिता किंवा त्यांना पोलीस संरक्षण देऊन कारवाई करण्यासंदर्भात निर्णय घेतला पाहिजे. याबाबत काही धोरणात्मक निर्णय करणार आहात का ? हा माझा पहिला प्रश्न आहे. आपण सांगता दक्षता समित्या स्थापन झाल्या आहेत. हया दक्षता समित्या जिल्हा निहाय स्थापन झाल्या आहेत का ? त्यांच्या किती बैठका झाल्या ? राज्य स्तरावर काही निर्णय झाले आहेत का ? कोणताही जिल्हा घ्यावा, तिथे हया वाळू माफीयांच्या धुडगोसामुळे हे सगळे कायदा सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण झालेले आहेत. आपण अनेक प्रकारचे निकाल धेतले नियम केले आहेत. पण जरब बसत नाही. या दोन प्रश्नांसंदर्भात शासन काय निर्णय करणार आहे.

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी यासंदर्भात महत्वाचे प्रश्न मांडले. यापूर्वी सुध्दा सभागृहामध्ये वाळू संदर्भातील वेगळे धोरण मी स्पष्ट केले होते. वर्षानुवर्षे वाळू धोरणामध्ये आपण कालानुरुप आवश्यक होते तसे बदल करत आलो. मुंबई सारख्या शहरामध्ये बांधकामे बंद राहतच नाहीत. वर्षभर तुमचा लिलाव असो वा नसो. वाळू बांधकामासाठी मिळते, ब्लॅकने आणली जाते, असेल त्या मार्गाने वाळू आणली जाते. या सर्वाचे कारण शोधण्यात आले ते असे आहे की, जे लिलाव कधी फेब्रुवारीमध्ये कधी मार्चमध्ये होतात. मार्च ते जून पर्यंत त्यांना वाळू उचलायला वेळ मिळतो. जून महिन्यानंतर पाऊस पडला की, जून पासून पुन्हा मार्च पर्यंत वाळू उचलायला त्यांना परवानगी नसते. मधल्या काळामध्ये लिलावाची मुदत संपलेली असते. मधल्या काळात वाळू मिळत नाही. त्यामुळे अशा प्रकारचे माफीया तयार होतात, भाव वाढतात, दर वाढतात असे प्रकार होतात.

अध्यक्ष महोदय, यासंदर्भात वाळूचे थोडक्यात धोरण सांगतो. राज्य सरकारने वाळूच्या संदर्भातील टाईम टेबल निश्चित केलेले आहे. पूर्वीची पध्दती वगळून या वर्षीपासून जून

.....2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे.........

महिन्यामध्ये वाळूची लिलाव करण्याची स्थाने निश्चित करणे, जुलै आणि ऑगस्ट महिन्यामध्ये अशा स्वरूपाचे स्पॉट आहेत. त्या स्पॉटचे वर्गीकरण करुन त्या ठिकाणी लिलावाच्या संदर्भातील कार्यपध्दती निश्चित करुन जाहिराती वैगरे काढून ऑगस्ट महिन्यामध्ये पूर्णत: ऑगस्ट सप्टेंबरमध्ये प्रक्रिया पूर्ण करणे. 1 ऑक्टोबरला सर्व प्रक्रिया पूर्ण होऊन वाळू लिलाव प्रत्यक्ष वाळू उचलण्यासाठी परवानगी देणे, आणि 1 ऑक्टोबर पासून पुढच्या 1 ऑक्टोबर पर्यंत त्याला वाळू उचलण्यासाठी परवानगी देणे, 12 महिने या संदर्भातील पावसाळा वगळून वाळू उपलब्ध झाली तर यासंदर्भात भाव आणि माफीया कमी होतील असा सरकारचा अंदाज आहे. वाळूचे जे घाट आहेत ते जर घेतले गेले नाही, लिलावामध्ये आले नाही तर अशा वाळू घाटाच्या संदर्भात सरकारच्या ज्या एजन्सी आहेत, त्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था असो, शासकीय एजन्सी असो यांना जर वाळू आवश्यक असेल लागत असेल ज्या वाळू घाटाचा लिलाव झालेला नाही. अशा वाळू घाटांमधून राज्य सरकारच्या प्रचलित, आज आपण वाळूचे 400 रुपये रॉयल्टीचे दर घेतो. या रॉयल्टीच्या दराने वाळू उचलण्याची परवानगी सरकारच्या एजन्सीला देण्यात येईल. यापेक्षा अधिक आवश्यकता भासली तर राज्य सरकार स्थानिक स्वराज्य संस्था आहेत ग्रामपंचायती वैगरे सारख्या त्यांना सुध्दा देण्याच्या संदर्भात विचार करेल. म्हणून वाळूच्या संदर्भात धोरण सांगितले.

अध्यक्ष महोदय, संरक्षणाच्या संदर्भात म्हटले आहे की, या ठिकाणी अशा स्वरूपाची कोणी गुंडागर्दी करीत असेल किंवा मारहाण करीत असेल तर त्यांना एम.पी.डी.ए. मध्ये गुन्हा दाखल करण्याच्या संदर्भात अलाहीदा कायद्यामध्ये दुरुस्ती केली आणि मोक्कापर्यंत ही कारवाई करावी अशी असेही त्यांना सूचित केलेले आहे. एम.पी.डी.ए. चे गुन्हे दाखल करण्याच्या सूचना दिल्या आणि त्या दाखल करण्यास सुरुवात झालेली आहे. वाळूच्या संदर्भात पाच पट वाळूचा दंड वसूल करण्याची कारवाई केली. परंतु काही सन्माननीय सदस्यांनी व श्री.नारायण राणे यांनी म्हटले आहे. पाच म्हटल्या मुळे ते पाच पट करायला लागले. पाच पटीपर्यंत केले पाहिजे. ती सुध्दा सुधारणा पाच पटीपर्यंत करतो आहोत. कोणाला वाटले दोनपट करा, तीनपट करा, एकदम पाच केल्यामुळे लोड वाढतो आहे. तर या संदर्भामध्ये अशा आवश्यक सुधारणा सरकारने कायद्यामध्येच केलेल्या असल्यामुळे वाळुबाबतचे टाईम टेबल आणि त्या टाईम टेबलनुसार वाळू उपसा या राज्यामध्ये होईल.

.....3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

***मालेगाव शहरातील केबल चालकांनी केबल जोडणींमध्ये केलेला गैरप्रकार***

*(४) * ५२६८७ श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) : सन्माननीय महसूल मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-*
*(१) मालेगाव शहरामध्ये अंदाजे १,२०,००० केबल कनेक्शन असताना केबल चालक शासनाकडे फक्तत११,००० कनेक्शन असल्याचे दाखवून शासनाच्या करोडो रुपायांच्या महसूलाचा अपहार करत असल्याबाबतचे निवेदन, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.महसूल मंत्री यांना दिनांक २५ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,*
*(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,*
*(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने केबल जोडणींमध्ये गैरप्रकार करणाऱ्या केबल चालकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,*
*(४)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?*

*श्री. एकनाथराव खडसे : (१) अश्या प्रकारचे निवेदन शासनाकडे दि.२२.०३.२०१६ रोजी प्राप्त झाले आहे.*
*(२) व (३) सदर प्रकरणामध्ये जिल्हाधिकारी, नाशिक यांचेमार्फत विहीत नियमांनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.*
*(४) प्रश्न उद्‌भवत नाही.*

श्री आसिफ शेख : अध्यक्ष महोदय, मालेगांव शहर और महानगरपालिका क्षेत्र में 1 लाख 20 हजार केबल कनेक्शन्स है. लेकिन मालेगांव शहर के केबल ऑपरेटर केवल 12,000 केबल कनेक्शन्स की संख्या बताते है. इस कारण से करोड़ों रुपये का महसूल शासन को नहीं मिल रहा हे. सरकार ने सेटऑप बॉक्स लगाना कम्पलसरी किया है. इस बारे में सरकार ने एक रेट फाईनल किया है. मेरी जानकारी के अनुसार सेटऑप बॉक्स के लिए एक हजार रुपये की राशि लेनी चाहिए. लेकिन क्रिमिनल लोगों को यह काम देकर, वे दो हजार रुपये की राशि वसूल कर रहे है. सरकार से मेरी विनती है कि इस बारे में सख्त कार्रवाई की जानी चाहिए और केबव कनेक्शन की जो संख्या कम बतायी जा रही हे उस बारे में जांच की जानी चाहिए और कार्रवाई की जानी चाहिए.

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी अत्यंत चांगला प्रश्न विचारलाा अनेक ठिकाणी अशा स्वरुपाचे कनेक्शन मोठया प्रमाणावर दिले जातात. परंतु त्याचा प्रत्यक्ष कर भरला जात नाही. कधी कधी केबल ऑपरेटर स्वतः या संदर्भात पैसा वसूल करतात.

.....4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे......

परंतु राज्य सरकारकडे भरत नाही. यामध्ये दोन प्रश्न आहेत. एक तर सरळ सेट टॉप बॉक्स बसविण्याच्या संदर्भातील आहे. मालेगाव शहरामध्ये अशी संख्या एक लाखाच्यावर आहे. अशी तक्रार तेथील माजी आमदार श्री.रशिद शेख यांनी सरकारकडे केली होती. त्या तक्रारीच्या अनुषंगाने त्या संदर्भातील चौकशी केली असता असे लक्षात आले की, मालेगाव शहरामध्ये शहरी भागात 5961 व ग्रामीण भागात 5566 एवढी नोंदणी झालेली आहे. परंतु यापेक्षा कितीतरी अधिक केबल्स् कनेक्शन देण्यात आलेले आहे. म्हणून कलेक्टरच्या माध्यमातून तिथल्या अतिरिक्त जिल्हाधिका-यांना सूचना देऊन तेथे समित्यांची नियुक्ती केलेली आहे. त्या ठिकाणी ते तपासणी करत आहेत. नंतर असे लक्षात आले की, समित्यांची तपासणी करत असताना त्या समित्यांपैकी कोणी तरी आधीच कळवत होते. आम्ही तुझ्याकडे उद्या येणार आहे. त्यामुळे ते लोक कनेक्शन बंद करुन टाकत होते. कनेक्शन आमच्याकडे नाही आहे असे दाखवत. रँडम पध्दतीने म्हणजे समित्या तयार केल्या. सकाळी चिठ्ठया टाकून सकाळीच त्यांना सांगण्यात येते की, या भागामध्ये जावे. आता असे लक्षात यायला लागले आहे की, 6000 पेक्षा किती तरी जास्त कनेक्शन आहेत. त्याची सर्वत्र तपासणी सुरु आहे. राज्यभरामध्ये केबलच्या संदर्भात सेट टॉप बॉक्स बसविण्याची मोहीम सुरु केलेली आहे. डी.टी.एच. बॉक्स बसविण्याचा आग्रह केंद्र सरकारने धरलेला आहे. ज्या ठिकाणी डी.टी.एच. बॉक्स बसविले जाणार नाही. त्याचे प्रक्षेपण बंद करण्याच्या संदर्भात मागिल जानेवारी पासून आतापर्यंत दोन वेळा प्रक्षेपण बंद केले. त्यामुळे आता डी.टी.एच. बॉक्स बसविण्याची मोहीम जोरदारपणे सुरु आहे. राज्य सरकारच्या महसूलामध्ये वाढ होईल अशी माझी अपेक्षा आहे.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, याच प्रश्नाशी संबंधित या सभागृहाचे सन्माननीय सदस्य आमदार श्री.गणपतराव गायकवाड यांनी राजीनामा दिलेला आहे. कारण त्यांना आपण नवीन पध्दत सांगितली त्याप्रमाणे असेस्मेन्ट केल्यावर त्यांची दीड कोटी रुपयांची थकबाकी निघाली. त्यामुळे त्यांनी ठाणे जिल्हाधिका-यांच्या बाबतीत तक्रार केलेली आहे. हे खरे आहे काय ? त्यांनी राजीनामा दिलेला आहे ही बातमी वर्तमान पत्रात आली हे खरे आहे काय ?

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, या प्रश्नाशी त्याचा काही संबंध नाही.

**अध्यक्ष :** प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

G-1.........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./ मु.शी.** : स्थगन प्रस्तावाच्या सूचना

**अध्यक्ष** :सन्माननीय सदस्य श्री.राधाकृष्ण विखे पाटील, श्री.जयंत पाटील, श्रीमती दीपिका यांनी "राज्यात गत दोन महिन्यात 80 लहान मुलींवर बलात्कार करुन त्यांची हत्या केल्याचे निदर्शनास येणे" या विषयावर स्थगन प्रस्तावाची सूचना दिली आहे.

श्री.अजित पवार : अध्यक्ष महोदय, या सभागृहातील सन्माननीय सदस्यांच्या एक गोष्ट लक्षात आली पाहिजे की, पीठासीन अधिकाऱ्यासह 288 आमदार या सभागृहाचे सदस्य आहेत. विधानसभेचे सदस्य व आमदार म्हणून आपणास सभागृहात बसण्याचा अधिकार आहे. पण विधानसभा सभागृहाचा सदस्य असलेल्या व्यक्तींना याच सभागृहाच्या गॅलरीमध्ये बसण्याचा अधिकार नाही. ही बाब सर्व सदस्यांनी लक्षात घेतली पाहिजे.

**अध्यक्ष** : मी सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, विधानसभेच्या कोणत्याही सदस्याने याच सभागृहाच्या गॅलरीमध्ये बसता कामा नये. कदाचित नवीन सदस्यांना ही बाब माहिती नसेल.

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : अध्यक्ष महोदय, काल सिंधुदूर्ग जिल्हयात घडलेल्या घटनेसंबंधी राज्य सरकारने निवेदन केलेले आहे. मला राज्य सरकारची नेमकी भूमिका समजत नाही. काल सन्माननीय सदस्य डॉ.सुनील देशमुख यांनी मांडलेला हक्कभंग आपण स्वीकारला आहे. सन्माननीय सदस्य श्री.बच्चू कडू यांच्याकडून घडलेल्या घटनेमुळे कर्मचारी संपावर जात आहेत. श्री.बच्चू कडू यांनी फार मोठा गुन्हा केला असे समजून सरकारने पोलीस दलातर्फे त्यांना अटक केलेली आहे. याबाबत सरकारची नेमकी भूमिका काय आहे ? श्री.बच्चू कडू यांच्या प्रकरणाबाबत सरकारने खुलासा करावा अशी आम्ही मागणी करणार आहोत.

अध्यक्ष महोदय, सिंधुदूर्ग येथे झालेल्या घटनेच्या पार्श्वभूमीवर सभागृहाचे एकमत होते की, जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. आमदार मांडवामध्ये बसलेले असताना पोलीस अधीक्षकांनी त्यांना बेदम मारहाण केलेली आहे त्यामुळे त्यांना तत्काळ निलंबीत करण्याची सभागृहाची मागणी होती परंतु याबाबत कोणतीही कारवाई झालेली नाही. राज्य सरकारने याबाबत निवेदन करण्यासाठी 15 दिवसांचा वेळ घेतला आहे. शेवटी पुन्हा क्लिन चीट

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे पाटील.....

देऊन अधिकाऱ्यांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न केलेला दिसत आहे. लोकप्रतिनिधींचा पदोपदी अवमान करून मारहाण करण्यापर्यंत प्रशासनाची मजल जात आहे. लोकप्रतिनिधींनी कसे वागायचे ? बेफाम झालेल्या प्रशासनाला लगाम घालण्यापेक्षा त्यांना पाठीशी घातले जात आहे असे सिंधुदूर्गच्या प्रकरणातून दिसून येत आहे. काल सन्माननीय सदस्य डॉ.सुनील देशमुख यांच्या प्रकरणात आपण हक्कभंग दाखल करून घेतला आहे. मी पक्षीय राजकारणाचा उल्लेख करीत नाही. तरी पण त्यांच्या प्रकरणामध्ये हक्कभंग दाखल होतो, येथे मात्र आमदारांना मारहाण होते. सन्माननीय सदस्य श्री.नितेश राणे यांच्याबाबत घडलेल्या घटनेची शासन चौकशी करीत आहे. पण जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांच्यावर कारवाई करण्याबाबत आम्ही मागणी केली होती. आम्ही राज्याला काय संदेश देऊ इच्छितो ? येथे सोलापूरचे पालकमंत्री बसलेले आहेत, आम्ही तेच उदाहरण पुन्हा पुन्हा देतो. सोलापूर, उस्मानाबादसह आपणास किती उदाहरणे द्यायची ? सिंधुदूर्गच्या प्रकरणात आमची अपेक्षा होती की, या सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन पोलीस अधीक्षकांना निलंबित केले पाहिजे होते. या प्रकरणात जिल्हाधिकारी यांची तडकाफडकी बदली करून त्यांच्यावर कारवाई करण्याची गरज होती. पण दुर्दैवाने शासन पुन्हा अशा अधिकाऱ्यांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न करीत आहे. आमची अजूनही मागणी आहे की, ताबडतोब या दोन्ही अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहीजे.

श्री.गुलाबराव पाटील : अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते यांनी सन्माननीय सदस्य श्री.बच्चू कडू यांच्याबाबत सांगितले आहे. श्री.बच्चू कडू हे त्या उप सचिवांकडे का गेले होते ही तपासणी सरकारने केलेली नाही. आपण सेवा हमी कायदा आणलेला आहे. त्या कायद्यांतर्गत सर्वांनी काम केले पाहिजे हे नियम सर्वांना लागू केले आहेत. दोन वर्षापासून आमदार एका उप सचिवाकडे फिरतो पण त्याचे काम होत नाही. ही घटना घडल्यानंतर आपण त्यांच्यावर पोलीस कारवाई केली हे मान्य आहे. पण ही घटना घडण्याचे मुळ कारण काय आहे ?

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.बच्चू कडू हे तिसऱ्यांदा या सभागृहात निवडून आलेले आहेत. ते कोणत्या पक्षाचा आहे हे आम्हाला माहिती नाही. पण आमदार तेथे गेल्यानंतरही

.....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गुलाबराव पाटील.....

त्याचे काम होत नसेल व त्यांच्यावर गुन्हा दाखल होत असेल तर हे योग्य नाही. त्यांना अटक करण्यासाठी 500 पोलीस येतात, ते अतिरेकी आहे का ? तुम्ही त्यांना अटक करण्यासाठी येथे 500 पोलीस घेऊन येता. उद्या आमदार एखाद्या नागरिकाची तक्रार घेऊन गेला व दोन वर्षे फिरल्यानंतर त्याचे काम होत नसेल तर व 500 पोलीस एका आमदाराला अटक करण्यासाठी येत असतील तर आमदार राहण्यात काय उपयोग आहे ? आम्ही सामुहिक राजीनामे दिलेले परवडतील. ही काय परिस्थिती आहे ? एकीकडे जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकामार्फत आमदारांना मारहाण केली जाते पण त्यांच्यावर कारवाई केली जात नाही. एकीकडे एक आमदार गरिबाची तक्रार घेऊन जाते. ही तक्रार कोणाची होती ? याच खात्यामध्ये नोकरी करणाऱ्या माणसाची ती तक्रार होती. ती त्या आमदाराच्या भावाची तक्रार नव्हती. आमदार जबाबदारीने तेथे काही काम घेऊन गेले होते. आता म्हटले जाते की, त्यांच्यावर ॲट्रासिटीचा गुन्हा दाखल करा. त्यांनी ॲट्रासिटी होण्यासारखे काय केले ? पोलीस सांगतात की, तक्रारकर्त्याने ॲट्रासिटीचे कागद दिले तर सोमवारी त्यांच्यावर ॲट्रासिटीचा गुन्हा दाखल करू आम्ही याकरिता निवडून आलो आहे का ?

अध्यक्ष महोदय, आपण पीठासीन अधिकारी म्हणून त्या खुर्चीवर बसलेला आहात, आपणाकडून आम्हाला न्याय हवा आहे. जो भारत माता की जय म्हणणार नाही त्यांच्या संरक्षणासाठी चार पोलीस दिले जातात, तो लाडका आहे का ? एखाद्या आमदाराने न्याय मागण्याकरिता तक्रार केली तर तुम्ही 500 पोलीस त्याला जेलमध्ये टाकण्याकरिता पाठविता. ही कोणती परिस्थिती आहे ? आपण आमदारांचे खच्चीकरण करीत आहात. अधिकाऱ्याला माजविण्याचा हा प्रकार आहे. असेच चालत राहिले तर कोणीच कोणाचे ऐकणार नाही. तहसिलदार आमदाराचे तालुक्यात ऐकणार नाही. हे काय चालले आहे ? हे काय माझ्यासाठी मी बोलत नाही. आमदाराची गरीमा राखण्याकरिता आपण काही तरी निर्देश द्यावेत, अशी विनंती आहे. बच्च कडू यांच्या बाबतीत जसा तुम्ही कायद्याने त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे, पण त्या अधिकाऱ्याने सेवा हमी कायदा लागू असतानासुध्दा काम केलेले नाही. आज आपण प्रशासनाला निर्देश द्यावेत की, त्या अधिकाऱ्यावरसुध्दा गुन्हा दाखल केला गेला पाहिजे ही आमदारांची मागणी आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, आपल्या सभागृहातील एका सदस्याला काल अटक झ ाली आहे याबाबत सन्माननीय सदस्य श्री.गुलाबराव पाटील यांनी उल्लेख केलेला आहे. दुसरी बाजू सांगतो की, मंत्रालय व राज्यातील कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदालन केलेले आहे. या प्रकरणामध्ये राज्य सरकारने सांगितले की, मुख्य सचिवांच्या प्रमुखतेखाली आम्ही त्याची चौकशी करु काल एफआयआर नोंदविला आहे व सन्माननीय सदस्य श्री.बच्चू कडू यांना अटक झालेली आहे.

अध्यक्ष महोदय, आता नक्की चौकशी कोण करणार, याबाबत राज्य सरकारची भूमिका काय? हे आजच्या आज सभागृहाला कळाले पाहिजे. या सभागृहाच्या प्रत्येक सदस्याही ही भावना आहे की, राज्य सरकार यामध्ये कोणती भूमिका घेणार आहे ? माननीय महसूलमंत्री सभागृहात उपस्थित आहेत किंवा माननीय मुख्यमंत्री यांनी आजचा दिवस संपण्यापूर्वी तत्काळ निवेदन करावे. किंबहुना येथेच त्यांनी सांगितले पाहिजे. परंतु सरकारची वेगळी पध्दत आम्हाला काल आढळली.

सिंधुदुर्गच्या प्रकरणात सर्व सभागृहाचा उद्रेक झालेला होता. सन्माननीय सदस्य श्री.वैभव नाईक व श्री.नितेश राणे यांच्यावर तेथे कारवाई झाली. त्याबाबत काही निवेदन सभागृहात सादर करण्याबाबत ठरले होते. माझी विनंती आहे की, आपण सरकारला सांगावे की, अशी निवेदने करताना कधी तरी रात्री हळून येऊन निवेदन केले जाते. सायंकाळी 5 वाजेपर्यत सभागृहाचे सर्व सदस्य हजर असताना निवेदन केले तर बरे होईल. नाही तर आज सदस्य येथे आल्यानंतर त्यांना कळणार की काल कोणते निवेदन केले होते.

यानंतर एच-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील......

काल काय निवेदन केले होते ? काल रोजी रात्री 8.30 वाजता माननीय महसूल मंत्री महोदयांनी सभागृहामध्ये सिंधुदूर्ग येथील आंदोलनासंदर्भातील निवेदन केले होते. सिंधुदूर्ग येथील घटनेमध्ये आमदारांना जी वागणूक दिली गेली, त्या संदर्भात शासनाने कोणतीही कारवाई करण्याचे टाळलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितेश राणे आणि सन्माननीय सदस्य श्री.वैभव नाईक यांना या घटनेदरम्यान पोलीस यांच्याकडून जी ट्रीटमेंट दिली गेली, त्याबाबतीत निवेदनामध्ये केवळ सन्माननीय सदस्य श्री.नितेश राणे यांच्याबाबत उल्लेख केलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.वैभव नाईक यांना दिलेल्या ट्रीटमेंटबाबत कुठेही उल्लेख यामध्ये केलेला नाही. या घटनेनंतर त्या भागामध्ये जी कारवाई झाली, त्याचे शासनाने समर्थन निवेदनात केलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.वैभव नाईक हे सिंधुदूर्ग येथील आंदोलनामध्ये बसून असतांनाही डीएसपीने त्यांना हकलवून देण्याचा व मारहाण करण्याचा प्रयत्न केल्याचे रेकॉर्डला आहे. रेकॉर्डला जर एखाद्या जिल्हयाचा एस.पी.आमदारांना ओळखून लाठीचार्ज करण्याची भिती दाखवत असेल,तिकडून हुटआऊट करीत असेल याबाबत सभागृहामध्ये न्याय मागितला असता चौकशीकरिता समिती नेमण्याबाबत सांगितले गेले. या चौकशी समितीचा अहवाला आल्यावर त्या प्रकाराचे समर्थन करण्याचे काम सरकार करीत असेल तर हे सरकार कोणाच्या दबावाखाली काम करीत आहे, हेच मला कळत नाही. सन्माननीय सदस्य श्री.गणपत गायकवाड यांनी राजीनामा दिलेला आहे. सरकारला याबाबत उत्तर द्यायला वेळ मिळाला नाही. विधिमंडळाच्या सदस्यांवर काही आरोप झाले. त्यांच्याकडून काही रिकव्हरी झाली, त्याच्यावर त्यांना आक्षेप होता. याबाबतची केस कोर्टात गेली. कोर्टात केस गेल्यानंतर त्यांचे म्हणणे काय आहे, हे विचारले जाते. त्यानंतर विधानसभा सदस्यांना सांगावे लागते की, आता ही केस कोर्टात गेली, आता तुम्हाला माझे म्हणणे सांगून काही उपयोग नाही. सरकार बधीर झालेले आहे. सरकारला कोणत्याही विधिमंडळाच्या सदस्यांचे महाराष्ट्रातील सामान्य नागरिकांच्या समस्यांच्या बाबतीत देणेघेणे दिसत नाही. सरकारने उप सचिव आणि सन्माननीय सदस्य श्री.बच्चु कडू यांच्यामध्ये जे प्रकरण घडले त्याबाबत काय भूमिका घेतलेली आहे हे आजच्या आज सभागृहाला कळले पाहिजे. एका बाजूने एफआयआर दाखल केला एका विधिमंडळ सदस्यांना अटक झालेली आहे.

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील.....

दुस-या बाजूने माननीय मुख्यमंत्री यांनी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली या घटनेची चौकशी करायचे ठरविलेले आहे. आता सरकार याबाबत कोणाची बाजू घेणार हे सभागृहाला कळले पाहिजे. कालचे निवेदन आम्हाला मान्य नाही याबाबत योग्य ती कारवाई झाल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही. एवढेच मला सांगावयाचे आहे.

श्री.अनिल गोटे : अध्यक्ष महोदय, सभागृहाचे कामकाज हे प्रथा,परंपरा व नियमाने चालत असते. त्याचप्रमाणे सरकारचेही कामकाज हे नियम,प्रथा व परंपरेनुसारच चालत असते. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील आणि सन्माननीय सदस्य श्री.गुलाबराव पाटील यांनी खूप छान भाषण केलेले आहे. मी त्यांच्या मताशी 100 टक्के सहमत आहे. पण गेल्या पाच वर्षातील अनुभव काय आहे ? सन्माननीय सदस्य श्री.हर्षवर्धन जाधव ज्यावेळी मनसे पक्षात होते. त्यावेळी त्यांना बेशुध्द पडेपर्यंत मारहाण झाली होती. ते लालकाळे झाले होते. त्यांना सहा महिने रुग्णालयात राहावे लागले होते.

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करतात. )

श्री.अनिल गोटे : आता ऐकून घ्यावे, ऐकायची तयारी ठेवा. त्यावेळी काय केले यांनी ? त्या अधिका-याला संरक्षण दिलेले आहे.

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य आमदाराबाबत बोलत आहेत. आमदाराबाबत ऐकून घ्यावयाचे नाही का ? आता ऐकावयाचे नाही का ?

श्री.अनिल गोटे : हे आता आव आणत आहेत. यांनी त्यावेळी आमदारांवरजे अत्याचार केले, त्या बाबत सर्वप्रथम सभागृहामध्ये माफी मागा पहिले तुम्ही माफी मागा या सभागृहामध्ये जे घडले, आमदारांवर अत्याचार केले त्याबाबत माफी मागावी. यांनी माफी मागावी. तुम्ही माफी मागितली तरच कामकाज होईल. केवळ युतीचे सरकार सत्तेत आले म्हणून त्यांना बदनाम करण्याचा हा डाव आहे. त्यावेळी कुठे गेला होता त्यांचा धर्म ? त्यावेळी देखील हे बोलायचे ना !

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करतात. )

**अध्यक्ष :** यापूर्वी आपल्या सर्वांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले आता त्यांचेही म्हणणे सर्वांनी शांतपणे ऐकून घ्यावे.

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अनिल गोटे : अध्यक्ष महोदय, मी खरे सांगत आहे. खरे सांगितलेले चालत नाही यांना ! खरे बोलले तर सख्ख्या आईलाही दु:ख होते. तत्कालीन मनसेचे आमदार श्री.हर्षवर्धन जाधव यांना बेशुध्द पडेपर्यंत मारहाण झाली होती. त्यांना सहा महिने हॉस्पिटलमध्ये राहावे लागले होते. त्यावेळी त्यांनी रडून सांगितले होते. तरीही तत्कालीन मुख्यमंत्री आणि गृहमंत्री यांना पाझ ार फुटला नाही. आणि आता हे आमदारांवर प्रेम दाखवित आहेत. हे तर मगरमच्छ के आँसू आहेत. याबाबत योग्य तो निर्णय करावा. शासनाने याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा. जो नियम आधीच्या सरकारमध्ये होता, आताही तोच लागू करावा.

( दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, सभागृहामध्ये हे विषयांतर चालू आहे. सभागृहामध्ये आता सिंधुदूर्ग येथील घटनबाबतचे निवेदन आणि सन्माननीय सदस्य श्री.बच्चु कडू यांच्याबाबत विषय चालू आहे. असे असताना सन्माननीय सदस्य वेगळा विषय मांडून विषयांतर करीत आहेत. सन्माननीय सदस्य श्री.बच्चु कडू यांना अटक करण्याकरिता 500 पोलीस येतात. त्यांनी असा काय गुन्हा केला होता ! याची चौकशी चालू आहे. शासनाने यामध्ये चौकशी करण्याची भूमिका दाखविलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील म्हणत आहेत की, सरकारची याबाबत काय भूमिका आहे ? एका बाजूला अधिकारी व कर्मचारी मोठया संख्येने संपावर जात आहेत, दुस-या बाजूला आमदारांना अटक होत आहे. यामध्ये निश्चित सरकारची काय भूमिका आहे ? हे सभागृहाला कळले पाहिजे. सिंधुदूर्ग येथील घटनेमध्ये आमदारांना मारहाण झाली होती. शासनाने याबाबत काल रोजी निवेदनात काय उल्लेख केलेला आहे ? सन्माननीय सदस्य श्री.हर्षवर्धन जाधव यांच्यासंदर्भात जे घडले होते, त्यावेळी तत्कालीन सरकारने संबंधित अधिका-यांना ताबडतोब निलंबित केले गेले होते. आमदारावर जो अन्याय होत आहे, त्याबाबत सरकार आमदारांना संरक्षण देत नाही, हे योग्य नाही. या संदर्भात तत्काळ जिल्हाधिकारी, एस.पी. यांच्याविरुध्द शासनाने तत्काळ योग्य ती कारवाई करुन आमदारांना संरक्षण द्यावे, ही आमची मागणी आहे. असे असताना सन्माननीय सदस्य श्री.अनिल गोटे हे विषयांतर करीत आहेत.

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गुलाबराव पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हर्षवर्धन जाधव यांना मारहाण झाली, त्याबद्दल तत्कालीन सरकारने काहीच कारवाई केली नाही म्हणून ते आज तिकडे बसलेले आहेत. म्हणून आता आमदारांनी मार खायचा का ? सन्माननीय सदस्य श्री.बच्चु कडू यांनी एका अधिका-याच्या विरोधात आंदोलन केले. त्या विरोधात 25 हजार अधिकारी-कर्मचारी संपावर उतरलेले आहेत. काय अधिकार आहे यांना संपावर उतरण्याचा ? काय केले सरकारने ? मार्च एण्डिंगची कामे चालू आहेत. सरकार म्हणून हे करण्याची जबाबदारी कोणाची आहे ? जो सेवा हमी कायद्याचे उल्लंघन करतो, त्या उप सचिवाकरिता मंत्रालयातील अधिकारी-कर्मचारी मार्च एण्डिंगकरिता रस्त्यावर उतरतात. एका आमदाराला अटक करण्याकरिता 500 पोलीस येतात. उद्या आमच्यावरही अशी वेळ येईल. यावर शासनाची भूमिका काय आहे, हे आज आम्हाला कळले पाहिजे. यावर कडक कारवाई करण्यात यावी. सन्माननीय सदस्य श्री.हर्षवर्धन जाधव यांच्याबाबत जे झाले, आता ते मिटलेले आहे.

आय-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गुलाबराव पाटील.........
आपल्याला त्यांच्यासारखे करावयाचे नाही. सन्माननीय सदस्य श्री. अनिल गोटे यांना तेलगी आठवत आहे की नाही ?

**अध्यक्ष** : सन्माननीय सदस्य सर्वश्री. गुलाबराव पाटील, अनिल गोटे यांनी खाली बसावे.

श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. बच्चू कडू यांच्या संदर्भातील घटना घडलेली आहे. आपण सर्वजण शांत झाला तर मला या प्रकरणी बोलणे शक्य होणार आहे. लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांनी घटनेच्या चौकटीत राहून आपली वर्तणुक केली पाहिजे, असे अपेक्षित आहे. अधिकाऱ्यांनी लोकप्रतिनिधींबरोबर सौजन्यानी वागले पाहिजे...(अडथळा)... सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांची 100 प्रकरणे आहेत. माननीय अध्यक्षांनी प्रकरणे बाहेर काढू नये अशी आम्हाला सूचना दिलेली आहे. सन्माननीय सदस्यांची प्रकरणे म्हणजे सरकारची प्रकरणे बाहेर काढू नका अशी आम्हाला सूचना केलेली आहे. मी सन्माननीय सदस्यांच्या व्यक्तीगत प्रकरणांबद्दल बोलत नाही.

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, आज अधिकारी मुजोर होत चालले आहेत, त्याचे काय ? आता सर्व लोकप्रतिनिधींनी तुमच, माझ असे बोलणे थांबविण्याची वेळ आता आलेली आहे.

**अध्यक्ष** : सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी तशा प्रकारची पुन्हा पुन्हा आठवण काढून सभागृहाला माहिती देऊ नये.

श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, अधिकाऱ्यांनी लोकप्रतिनिधींबरोबर सौजन्यानी वागले पाहिजे अशा प्रकारचे आदेश सरकारने वारंवार निर्गमित केलेले आहेत. अशा प्रकारे निर्गमित केलेल्या आदेशाचे पालन होते किंवा कसे हा एक वादाचा विषय आहे.

अध्यक्ष महोदय, परवाच्या दिवशी सन्माननीय सदस्य श्री. बच्चू कडू यांच्या संदर्भातील एक घटना घडलेली आहे. राज्य शासनाने सदर घटनेच्या संदर्भात मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती केलेली आहे. राज्य शासनाने सदर घटनेच्या अनुषंगाने मुख्य सचिवांना डिटेल माहिती घेण्याबाबत सूचना केलेली आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी व्यक्तीगत फिर्याद दाखल केलेली असल्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. बच्चू कडू यांना अटक झालेली आहे. सन्माननीय सदस्य

......2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे.........

श्री. बच्चू कडू यांना 500 पोलीस अटक करण्यासाठी आले नव्हते....(गोंधळ)....ज्यावेळी सन्माननीय सदस्यांना पोलीस घेऊन जात होते, त्यावेळी मी त्या ठिकाणी उपस्थित होतो. हवे असल्यास कोणताही सन्माननीय सदस्य पत्रकार किंवा दूरचित्रवाहीनीच्या प्रतिनिधींना विचारु शकतो. संबंधित पत्रकारांनी सदर घटनेच्या संदर्भात आपली प्रतिक्रीया काय आहे अशी विचारणा केली असता मी त्यांना सदर घटनेची माहिती घेतल्यानंतरच प्रतिक्रीया देणे शक्य होणार आहे, असे सांगितले होते. मी त्या घटनेचा स्वतः साक्षीदार आहे.

अध्यक्ष महोदय, राज्यामध्ये अधिकारी आणि लोकप्रतिनिधींच्या वर्तणुकीच्या संदर्भात नव्याने चर्चा उपस्थित झालेली आहे. सदर घटनेच्या संदर्भात मुख्य सचिवांकडून माहिती येणार आहे. प्रत्येकाची वागण्याची चौकट ठरलेली असते. अधिकाऱ्याने काम केले नाही म्हणून अशा अधिकाऱ्यांवर हात उचलायचा किंवा कसे हे लोकप्रतिनिधींना ठरवावे लागणार आहे. एखाद्या अधिकाऱ्यांनी काम केले नाही तर अशा अधिकाऱ्याच्या विरोधात किती कठोर कारवाई करायची हे ठरविण्याचा अधिकार सरकार किंवा प्रशासनाला आहे. अधिकाऱ्याची चूक असेल तर अशा अधिकाऱ्याच्या विरोधात निश्चितपणे कारवाई केली जाणार आहे. अधिकाऱ्यांनी लोकप्रतिनिधींना सौजन्याची वागणुक देण्यासंबंधी शासनाकडून निश्चितपणे काळजी घेतली जाणार आहे. लोकप्रतिनिधी विरुध्द प्रशासन असा वाद योग्य नाही. प्रशासनातील 10 ते 20 टक्के अधिकारी मुजोरपणे वागत आहेत. माननीय मुख्यमंत्री या घटनेची माहिती घेणार आहे. विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांकडून आज निवेदन करावे असे सांगितले जात आहे. सन्माननीय सदस्य श्री. नितेश राणे यांच्या संदर्भातील जी घटना घडली त्यासंदर्भात देखील आजच्या आज निवेदन करावे असे मला सांगितले होते. निवेदन आजच्या आज करायचे म्हटले तर रात्रीच्या 12.00 वाजेपर्यंतची वेळ असते. निवेदन केव्हा करायचे हा सरकारचा अधिकार आहे. सदर घटना गंभीर आहे.

**अध्यक्ष** : माननीय महसूल मंत्र्यांनी रात्रीच्या 12.00 वाजेपर्यंत निवेदन न करता सभागृहाचे कामकाज संपण्यापूर्वी निवेदन केले जाईल असे सांगण्याची गरज आहे.

.......3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, प्रशासनातील अधिकारी आणि लोकप्रतिनिधींचा आदर हा राखलाच पाहिजे. दोघांनी कामे करीत असताना संयम आणि आचारसंहिता ठेवण्याची आवश्यकता आहे. सदर घटना लक्षात घेता राज्यापुढे असे प्रकार भविष्यात होऊ नये आणि लोकप्रतिनिधींना टोकाची भूमिका घेऊ नये, अधिकाऱ्यांनी देखील उध्दटपणे वागू नये, यासंदर्भात शासनाकडून एक आचारसंहिता ठरविली जाणार आहे. सदर घटनेच्या अनुषंगाने माननीय मुख्यमंत्री सविस्तर निवेदन करणार आहे. लोकप्रतिनिधींना सौजन्याची वागणुक देणे आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने शासनाकडून योग्य ती पावले उचलली जाणार आहेत.

श्री. चंद्रदीप नरके : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. बच्चू कडू यांच्या घडलेल्या घटनेच्या संदर्भातील लोकप्रतिनिधींच्या काय भावना आहेत, त्या मी या ठिकाणी व्यक्त करणार आहेत.

अध्यक्ष महोदय, अधिकाऱ्यांना वारंवार मारहाण का होते याचा देखील प्रशासनाने विचार करण्याची गरज आहे. एखादा लोकप्रतिनिधी हा 3 लाख लोकांचे प्रतिनिधीत्व करीत असतो. तो लोकांमधून निवडून येतो. लोकप्रतिनिधींना मतदारसंघातील प्रत्येकाची कामे करावी लागतात, त्यामुळे त्यांच्या भावना तीव्र असतात. मतदारसंघातील संबंधितांची कामे पूर्ण करण्यासाठी लोकप्रतिनिधींना मंत्रालयात वारंवार खेपे घालावे लागतात. एखादे काम दोन दोन वर्षे होत नसेल तर अशा वेळी लोकप्रतिनिधींच्या भावना तीव्र होतात. सचिव, उप सचिव, तहसीलदार, प्रांत, कक्ष अधिकारी हे जर आमदारांना किंमत देत नसतील तर अशा वेळी लोकप्रतिनिधींच्या भावना तीव्र होतात. आमदार रात्री अपरात्री लोकांची कामे करीत असतो. रात्रीच्या 1 वाजता मतदारसंघातील लोकांचा फोन आला तरी त्याच्या मदतीसाठी लोकप्रतिनिधींना जावे लागते. आज कामकाजाच्या धावपळीमुळे सभागृहातील प्रत्येक सन्माननीय सदस्यांना उच्च रक्तदाबाचा त्रास सुरु झालेला आहे. मतदारसंघातील लोकांची कामे करीत असताना लोकप्रतिनिधींना पुरेशी झोप मिळत नाही. एखाद्या तहसीलदाराने काम केले नाही तर मतदारसंघातील जनता लोकप्रतिनिधींना तहसीलदार विचारत नसेल तर तुम्ही आमदार म्हणून कशाला काम करता असे विचारित असते. सभागृहातील मंत्री, राज्यमंत्री आणि ज्येष्ठ सन्माननीय सदस्यांच्या मतदारसंघातील कामे त्वरित होतात. परंतु, जे सन्माननीय सदस्य नवनियुक्त आहेत किंवा अधिक क्षमतेने न बोलणाऱ्या सन्माननीय सदस्यांनी चूक

......4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रदीप नरके.......

केलेली आहे काय ? अधिकारी लोकप्रतिनिधींशी उध्दटपणे वागत असतील तर प्रशासनाने आतापर्यंत संबंधित अधिकाऱ्यांच्या विरोधात कोणकोणत्या कारवाया केलेल्या आहेत ? आजपर्यंत किती तहसीलदारांच्या विरोधात हक्कभंग दाखल झालेले आहेत ?

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. सुजित मिणचेकर यांनी संबंधित तहसीलदाराच्या संदर्भातील माहिती दिलेली आहे. संबंधित तहसीलदारांकडून वारंवार लोकप्रतिनिधीचा अपमान केला जात आहे. अशा तहसीलदाराची बदल मुख्यमंत्री महोदयांनी केली. संबंधित तहसीलदारांनी मॅटमध्ये जाऊन आपली बदली थांबविली आणि आनंदाच्या भरात त्याने त्यावेळी फटाके फोडले होते. अशा वेळी आमदारांचा अपमान होत नाही काय ? अशा प्रकारच्या घटना वारंवार का घडतात याचा देखील शासनाने विचार करण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. क्षितीज ठाकूर सभागृहातील कामकाजासाठी येत असताना वाहतुक पोलीस निरीक्षक श्री. सचिन सूर्यवंशी हे त्यांच्याशी कसे वागले हे सर्वांनी पाहिलेले आहे. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. क्षितीज ठाकुर यांनी वाहतुक पोलीस निरीक्षक श्री. सचिन सूर्यवंशीच्या विरोधात हक्कभंग सभागृहात मांडला होता. त्यावेळी वाहतुक पोलीस निरीक्षक श्री. सचिन सूर्यवंशी गॅलरीमधून सन्माननीय सदस्य श्री. क्षितीज ठाकुर यांना खुन्नस देत असल्याचे सर्वांनी पाहिले होते. अशा वेळी सन्माननीय सदस्यांच्या भावना तीव्र झालेल्या होत्या. प्रत्येक सन्माननीय सदस्य संयम ठेवत असतो. परंतु, अधिकाऱ्यांनी देखील तेवढाच संयम ठेवला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री. वैभव नाईक, नितेश राणे यांच्यावर जिल्हाधिकारी यांच्यासमोर संबंधित पोलीस अधीक्षकांनी हल्ला केला होता. संबंधित पोलीस अधीक्षकांच्या विरोधात कोणती कारवाई केली ? लोकप्रतिनिधींवर अशा प्रकारचे वारंवार हल्ले होत असल्यामुळे त्यांचा संयम तुटत चालला आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या घटना घडत आहेत.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. बच्चू कडू हे वैयक्तिक कामासाठी गेले नव्हते. मतदारसंघातील लोकांची कामे व्हावीत म्हणून ते सबंधित अधिकाऱ्यांच्या कॅबिनमध्ये बसले होते. अशा प्रकारच्या घटना वारंवार घडत आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

J-1........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रदीप नरके.......

या घटना वारंवार घडतात त्यामुळे याच्या मुळाशी जाणे आवश्यक आहे. अशा प्रकारच्या घटना घडू नयेत त्याकरिता आपण कोणता निर्णय घेणार आहात? कायदा व सुव्यवस्था अशा पध्दतीने कोणी हातात घेऊ नये, हे आम्हाला मान्य आहे. कायदा हातात कधी घेतला जातो, या सर्व बाबींचा विचार करुन मुख्यमंत्री महोदय आमदारांना काय संरक्षण देणार आहेत, त्यांची काय भूमिका आहे?

**अध्यक्ष** : मंत्री महोदय नस्ती लवकरात लवकर निकाली काढण्याच्या दृष्टीने सर्वसामान्य जनतेची, सन्माननीय आमदारांची ओरड आहे म्हणून नस्तींचा निपटारा लवकर करण्यासाठी अधिकाधिक कडक कायदा करता आला तर ते कृपया आपण बघावे.

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महाराज, आपण नव्याने सुधारणा केली आहे. दप्तर दिरंगाईसाठी मुदत ठरवून दिलेली आहे. किती दिवसाच्या आत नस्ती पुढे गेली पाहिजे आणि कधी परत आली पाहिजे, यासंबंधी सरकारचा कायदा आहे. जे अधिकारी याचे पालन करीत नसतील त्यांच्याविरुध्द कारवाई करण्याकरिता सन्माननीय सदस्यांच्या काही योग्य सूचना असतील तर निश्चितपणे त्यांचा समावेश करु . मुख्यमंत्री महोदय आज या प्रकरणी निवेदन करणार आहे त्यामुळे हा प्रश्न येथेच थांबविण्यात यावा. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पोलीस अधिक्षकांना रजेवर पाठविले आणि त्यांची चौकशी सुरु केली आहे. आवश्यकता असेल तर सन्माननीय गटनेत्यांच्या समवेत चर्चा करु आणि त्यातून काही निर्णय काढू.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महाराज, आपण काही भावना व्यक्त केल्या, त्यावर महसूल मंत्री महोदयांनी उत्तर दिले. परंतु याच सरकारने एक नवीन सर्क्युलर काढले आहे की, तहसीलदार किंवा अन्य कोठल्याही शासकीय अधिकाऱ्यांनी आमदारांनी बोलाविलेल्या बैठकीला जाऊ नये.

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महाराज, सदरचा फतवा आम्ही काढलेला नसून मागील सरकारने काढलेला आहे. मी विरोधी पक्षनेता असताना विरोधी पक्षनेत्यांच्या बैठकीला शासकीय अधिकाऱ्यांनी जाऊ नये, असा फतवा मागील सरकारने काढला होता, त्यावेळी मी सभागृह बंद पाडले होते. विरोधी पक्षाच्या बैठकीला कोणी जाऊ नये अन्यथा त्यांचेवर कारवाई करण्यात येईल, असे लेखी परिपत्रक मागील सरकारने काढलेले आहे. जे परिपत्रक आपण काढले होते तेच पुढे

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे....

चालू ठेवले आहे.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितपणे बोलत उभे असतात)

**अध्यक्ष :** मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देतो की, आपले म्हणणे सभागृहाने ऐकून घेतले आहे. यावर मुख्यमंत्री महोदय निवेदन करणार आहे, असे महसूल मंत्री महोदयांनी सांगितले आहे.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महाराज, सन्माननीय महसूल मंत्री यामध्ये काय सुधारणा करणार आहेत, ते सुचवावे....(अडथळा)....

**अध्यक्ष** : सभागृहात गोंधळसदृश परिस्थिती असल्यामुळे मला सभागृहाचे कामकाज करणे शक्य नाही त्यामुळे मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक सकाळी 11 वाजून 33 मिनिटांनी 10 मिनिटांकरिता स्थगित झाली.)

------------

यानंतर K-1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( स्थगितीनंतर )**

**( अध्यक्षस्थानी तालिका सभाध्यक्ष श्री. सुभाष साबणे )**

( सभागृहात दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळेस घोषणा देतात.)

**तालिका सभाध्यक्ष ( श्री. सुभाष साबणे ) :** अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्याने मी सभागृहाची बैठक 12.00 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक 11 वाजून 43 मिनिटांनी दुपारच्या 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

...............

L-1/....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगिती नंतर)**

**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष)**

(अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून घोषणा देत असतात)

**तालिका सभाध्यक्ष (श्री. सुभाष साबणे)** : अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 10 मिनिटाकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक 12.00 वाजता 10 मिनिटाकरिता स्थगित झाली)

---*---

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(अध्यक्षस्थानी माननीय अध्यक्ष)**

**पृ.शी.:** महाराष्ट्र शासन व टाटा ट्रस्ट यांच्यातील सामंजस्य कराराबाबत.

**मु.शी.:** महाराष्ट्र शासन व टाटा ट्रस्ट यांच्यातील सामंजस्य करारा संबंधी माननीय मुख्यमंत्र्यांचे निवेदन.

श्री.देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 47 अन्वये पुढील निवेदन करतो :-

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

--------------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, श्री.रतन टाटा हे सदनातील प्रेक्षक गॅलरीमध्ये या सामंजस्य कराराच्या निवेदनाप्रसंगी उपस्थित आहेत, त्याबद्दल मी सदनाती सर्व सन्माननीय सदस्यांवतीने त्यांचे स्वागत करतो.

-----------

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

.

**पृ.शी./मु.शी.:** सदस्यांच्या अटकेसंबंधी घोषणा.

**अध्यक्ष :** मला वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मरीन ड्राईव्ह, पोलीस ठाणे, मुंबई यांचेकडून कळविण्यात आले आहे की, सन्माननीय विधानसभा सदस्य श्री.बच्चू कडू यांना मरीन ड्राईव्ह, पोलीस ठाणे, मुंबई येथील गुन्हा रजिस्टर क्रमांक 108/2016 अंतर्गत भारतीय दंड विधानाच्या कलम 332, 353, 504, 34 अन्वये दिनांक 30 मार्च, 2016 रोजी मरीन ड्राईव्ह, पोलीस ठाणे, मुंबई येथे 21 वाजून 10 मिनिटांनी अटक करण्यात आली आहे.

-----------

....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**शासन परिपत्रकामध्ये सुधारणा करणे बाबत**

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी तुमच्या सरकारच्या काळात नव्हे तर आमच्या सरकारच्या काळात परिपत्रक काढण्यात आले, असे सांगितले आहे. रेकॉर्डवर चुकीची माहिती राहू नये, याकरिता मी खुलासा करीत आहे. शासनाने दिनांक 11 मार्च, 2016 रोजी एक परिपत्रक काढले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करुन अथवा त्यांना भेटीसाठी बोलावून व त्यांचेशी विचारविनिमय करुन त्यांना सूचना वजा आदेश देण्याचे अधिकार मंत्र्यांचा दर्जा देण्यात आलेल्या विधानसभा व विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते, इत्यादी अशासकीय सदस्यांना नाहीत. त्यामुळे असे अशासकीय सदस्य/ संसद सदस्य / विधानमंडळ सदस्य यांनी आयोजित केलेल्या बैठका किंवा दौरे यांना शासकीय अधिकाऱ्यांनी उपस्थित राहणे अपेक्षित नाही."

अध्यक्ष महोदय, याप्रकरणी मला वाद करावयाचा नाही. माझे म्हणणे एवढेच आहे की, विधिमंडळ सदस्यांनी कोणतीही बैठक बोलाविल्यानंतर त्या बैठकीस संबंधित अधिकाऱ्यांनी उपस्थित रहावे. याकरिता सदरहू परिपत्रकामध्ये सुधारणा करण्यात येईल काय ?

श्री.ग.आ.देशमुख : अध्यक्ष महोदय, पूर्वीच्या सरकारने हे परिपत्रक काढले त्यावेळी माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे हे विरोधी पक्ष नेते होते. त्यावेळी श्री.खडसे साहेबांनी नियम 57 अन्वये नोटीस देऊन सभागृह तहकूब करावे, असे मत त्यावेळी त्यांनी मांडले होते. आता ते सत्ताधारी पक्षामध्ये गेल्यानंतर त्यांच्या या विषयीच्या मतामध्ये फरक पडला आहे काय ? सदरहू प्रकरणी त्यावेळी त्यांनी विरोध करुन सभागृहाचे हक्क, सन्माननीय सदस्यांचे हक्क याबाबत भाषण केले होते, ते त्यांना आठवत असेल, मलाही आठवते. विरोधी बाकावरुन सत्ताधारी बाकावर गेल्यानंतर सभागृहातील सन्माननीय सदस्यांच्या हक्कासंदर्भातील श्री.खडसे साहेबांच्या मतामध्ये फरक झाला आहे काय, याचा त्यांनी खुलासा करावा.

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.ग.आ.देशमुख हे या सदनाचे ज्येष्ठ सदस्य आहेत. ते अधिक वेळा विधानसभेवर निवडून आले आहेत. मी बोलण्यासाठी उभा राहिल्यानंतर ते बोलण्यासाठी उभे राहिले. त्यामुळे मला माझे मत मांडता आले नाही.

...5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे......

सन्माननीय सदस्यांनी अर्धेच परिपत्रक वाचले आहे, त्यापुढे मला वाचून दाखववावयाचे आहे. त्यांनी ते पूर्ण वाचून दाखविले असते तर बरे झाले असते. परंतू त्यांनी ते परिपत्रक अर्धवट वाचले व त्यावर सन्माननीय सदस्य श्री.ग.आ.देशमुख यांनी आपले मत मांडले.

अध्यक्ष महोदय, शासन परिपत्र, सामान्य प्रशासन विभाग दिनांक 1 ऑगस्ट 1992, दिनांक 26 सप्टेंबर, 2002, दिनांक 25 ऑगस्ट, 2010 व दिनांक 10 मे, 2011 ही शासन परिपत्रके अधिक्रमित करुन दिनांक 11 मार्च, 2016 रोजी परिपत्रक काढण्यात आले आहे. अधिक्रमित केलेल्या या चार परिपत्रकामध्ये विरोधी पक्ष नेते किंवा सन्माननीय सदस्य यांच्या बैठकांना उपस्थित राहिल्यास त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. किंबहुना अशा परिस्थितीत विरोधी पक्ष नेते त्यांची भेट घेतली तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. अशा प्रकारचे आदेश चार वेळा मागील सरकारने काढले होते. आमदार व विरोधी पक्ष नेते यांना अधिकारी भेटले तरी त्यांच्यावर कारवाई करु, अशा स्वरुपाचे सदरहू आदेश होते. त्यामुळे या विषयावर मी विरोधी पक्षात असताना दिवसभर सभागृहाचे कामकाज बंद पाडले होते.

यानंतर N-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे......

विरोधी पक्षनेता पद हे घटनात्मक दर्जा असलेले पद आहे. आणि या पदाला घटनात्मक दर्जा असताना त्याला भेटूच नये. अगदी मलाही असाच अनुभव आला आहे की, ज्यावेळी मी जिल्हाधिकारी यांच्याकडे जायचो त्यावेळी जिल्हाधिकारी यांनी मला भेटायला यायची अपेक्षाच नव्हती. कारण आपले परिपत्रक होते की, जिल्हाधिकाऱ्यांनी भेटायला जाऊच नये. त्यामुळे जिल्हाधिकारी किंवा कोणताही अधिकारी मला भेटायला येत नव्हता. कै. मुंडे साहेबांना भेटायला येत नव्हता, तर आम्ही स्वतःहून त्यांना भेटायला जायचो. आम्ही ज्यावेळी भेटायला जायचो त्यावेळी आमचा सुध्दा अनुभव असाच होता की, ते उठून सुध्दा उभे राहत नव्हते. कारण आम्ही विरोधी पक्षनेते होतो. आपले परिपत्रक असतानाही ते मला कधीही सोडायला आले नाहीत. त्यामुळे आपण म्हणता त्याप्रमाणे आमच्या विचारांमध्ये परिवर्तन झालेले आहे. सन्माननीय सदस्यांनी अर्धे वाचन केले. पण पुढचे जे वाचायचे राहिले ते मी वाचून दाखवितो.

"शासनाच्या मंत्र्यांना संबंधित प्रशासकीय कामावर देखभाल करायची किंवा संबंधित अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करुन तसे त्यांना भेटीसाठी बोलावून त्यांच्याशी विचार विनिमय करुन त्यांना सूचना वजा आदेश देण्याचे अधिकार आहेत. तथापि, असे मंत्र्यांचे अधिकार देण्यात न आलेल्या विधानसभा व विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते इ. अशासकीय सदस्यांना नाहीत. त्यामुळे अशासकीय सदस्य, विधानमंडळ सदस्य, संसद सदस्य यांनी आयोजित केलेल्या बैठका किंवा दौरे यावेळी शासकीय अधिकाऱ्यांनी उपस्थित राहणे अपेक्षित नाही." इथपर्यंत बरोबर आहे. त्यांनी वाचले त्यापैकी प्रशासकीय अधिकार नाहीत ही बाब बरोबर आहे. तथापि, जनतेच्या हिताचे प्रश्न तसेच सार्वजनिक कामे यांचा निपटारा होण्याच्या दृष्टीने अडचणी येऊ नयेत यासाठी जिल्ह्यातील संसद सदस्य तसेच विधानमंडळ सदस्य त्यांच्या मतदार संघातील प्रलंबित कामांचा तातडीने निपटारा होण्यासाठी बैठक आयोजित करण्यास इच्छूक आहेत, म्हणजे आपण जर आपल्या मतदार संघातील प्रश्न सोडविण्याच इच्छूक असाल तर प्रलंबित कामांची यादी मागवावी. तसेच प्रत्येक सदस्याकडून संबंधित जिल्हाधिकारी यांनी प्रलंबित कामांची यादी मागवित असताना दर महिन्यातील एक दिवस निश्चित करुन संबंधित शासकीय अधिकाऱ्यांसमवेत जिल्हाधिकारी यांनी

2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे......

स्वत: जाऊन सर्व लोकप्रतिनिधींसमवेत बैठक आयोजित करावी. सदर बैठकीत माननीय संसद सदस्य, माननीय विधानमंडळ सदस्य यांना सुध्दा आमंत्रित करण्यात यावे. सर्व मंत्रालयीन विभागांना सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख, कार्यालयीन प्रमुख यांच्या निदर्शनास सदर निर्देश आणण्यात यावेत. या ठिकाणी आपल्याला सर्व प्रश्नांची तड लावावयाची असेल तर स्वत: जिल्हाधिकारी यांनी जावे. जिल्हाधिकारी यांनी सर्व अधिकाऱ्यांना सोबत घ्यावे आणि तो विरोधी पक्षाचा आमदार असला तरी आणि सत्ताधारी पक्षाचा असला तरीही. अशी बैठक आमदाराच्या घरी होणार नाही याची काळजी घ्यावी. आपल्या काळात हेही नव्हते. माझे विरोधी पक्षनेता पदाच्या काळात किती हाल झाले ते माझे मलाच माहिती. आम्हाला तर त्यावेळी अक्षरश: हाकलून देत होते. मी तर या मताचा आहे की, आपण यामध्ये अजूनही दुरुस्ती करु. तसे करण्याची माझी तयारी आहे. आमदार किंवा लोकप्रतिनिधी हा कोणत्या पक्षाचा आहे अशी तुलना न करता त्याला प्रतिष्ठा प्राप्त झाली पाहिजे या दृष्टीने आणखी काही सुधारणा करण्याचे प्रस्ताव असले तर राज्य सरकार हे अधिवेशन संपण्यापूर्वी आदेश काढेल आणि त्यानुसार सुविधा देण्यात येतील. मागे इतकी वर्षे विरोधी पक्ष म्हणून आम्ही जे अनुभवलेले आहे तो अनुभव आपल्याला येऊ नये याची काळजी हे सरकार घेईल. म्हणून या संदर्भात गटनेत्यांची बैठक घेऊन त्यांच्या ज्या सूचना येतील त्यांचा विचार करुन नवीन आदेश आपण हे अधिवेशन संपण्याच्या आत निर्गमित करु.

श्री. अजित पवार : अध्यक्ष महोदय, या ठिकाणी राज्याचे मुख्यमंत्री आहेत. महसूल मंत्र्यांनी या ठिकाणी आता जे सांगितले आहे त्याबद्दल एक गोष्ट मी आपल्या लक्षात आणून देतो आहे. आता आपण गटनेत्यांनी बैठक घेणार आहात त्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे. पुणे जिल्ह्याचे उदाहरण विचारात घेता पुणे जिल्ह्यातून आम्ही 21 विधानसभा सदस्य निवडून येतो. राज्यसभा आणि लोकसभेचे मिळून जवळपास 6 खासदार आहेत. जवळपास 7 सदस्य विधान परिषदेचे आहेत. म्हणजे एकूण 35 लोकप्रतिनिधी आहेत. म्हणजे जिल्हाधिकाऱ्यांनी महिन्यातून एकदा बैठक घ्यावयाची म्हटले तर त्यांना 30 दिवसांपेक्षा अधिक दिवस त्यांना बैठकाच घ्याव्या लागतील. त्यामुळे यामध्ये बदल करुन तालुक्याच्या ठिकाणी त्या त्या तालुक्याच्या आमदाराला,

3.......

श्री. अजित पवार......

तेथील बीडीओ, तहसिलदार आणि संबंधित अधिकारी अशा पध्दतीने मार्ग निघाला तर बरे होईल.

श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अजित पवार यांनी जी सूचना केली आहे त्या संदर्भात आम्ही हा जी.आर. काढताना केला होता. पण अशा स्वरुपाचे अधिकार ज्या ज्या ठिकाणी आमदार समन्वय समितीचे अध्यक्ष आहेत त्या ठिकाणी त्यांना दिलेलेच आहेत. जर समन्वय समितीचे आपण आमदार म्हणून अध्यक्ष असाल तर को-ऑर्डीनेशन समिती तालुक्यातील सर्व अधिकाऱ्यांना बोलावू शकते. समन्वय समितीला त्या तालुक्यात जे अधिकारी एमएसईबीचे डेप्युटी इंजिनिअर असो वा अन्य कोणतेही अधिकारी असो अशा सर्व खात्याच्या अधिकाऱ्यांना बोलावून बैठक घेण्याचा अधिकार आजही आहे. आपल्याला यामध्ये त्रुटी वाटत असल्यास आपण नव्याने आदेश काढू की, आमदारांनी तालुक्याला बैठक बोलाविल्यानंतर सर्व तालुक्याच्या अधिकाऱ्यांनी त्या बैठकीला उपस्थित राहिले पाहिजे. जो अधिकारी योग्य कारणाशिवाय उपस्थित राहणार नाही त्याच्यावर कारवाई करण्याचेही आपण त्या आदेशामध्ये नमूद करु. आमदारांनी बोलाविल्यानंतर समन्वय समितीच्या बैठकीमध्ये सर्व अधिकाऱ्यांनी उपस्थित राहणे अनिवार्य करण्यात येईल.

श्री. दिलीप वळसे पाटील : अध्यक्ष महोदय, या परिपत्रकाच्या संदर्भात आता बरीचशी चर्चा झालेली आहे. सन्माननीय मुख्यमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. हे परिपत्रक सामान्य प्रशासन विभागाने मुख्य सचिवांच्या स्वाक्षरीने काढलेले आहे. आता या सभागृहामध्ये चर्चा झाल्यानंतर तोच मुद्दा मी निदर्शनास आणून देत होतो की, आता नुकताच आपण एक निर्णय जलयुक्त शिवार योजनेच्या संदर्भात केला आहे आणि त्या समितीचे तालुक्याचे अध्यक्ष आपण स्थानिक आमदारांना केलेले आहे. यासंबंधीचा जी.आर. आमच्यापर्यंत पोहोचला नाही. ठीक आहे, जी.आर. निघाला आहे. दुसरे म्हणजे तालुक्याच्या ठिकाणी समन्वय समिती आहे. त्या समन्वय समितीच्या संदर्भात आपण याठिकाणी खुलासा केलेला आहे. त्यामुळे काही समितीच्या बाबतीत आमदार पदसिध्द अध्यक्ष म्हणून शासनाने पूर्वीच्या जी.आर.मध्ये अजून तरी कोणताही बदल केलेला नाही. आता आपण सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक मुख्य सचिवांच्या स्वाक्षरीने जे काढलेले आहे ते जर एखाद्या अधिकाऱ्याच्या दप्तरी असले तर कदाचित तो समन्वय समितीच्या बैठकीला येणार नाही

4.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिलीप वळसे-पाटील.....
किंवा त्यांच्या म्हणण्यानुसार बैठका आयोजित करणार नाही. त्यामुळे या परिपत्रकामध्ये आपल्याला सुधारणा करावीच लागेल. त्यामुळे आपण यासंबंधी गटनेत्यांच्या बरोबर बैठक घेऊन सुधारीत आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता आहे अशी माझी विनंती आहे.

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, सन्माननीय मुख्यमंत्री आणि ज्येष्ठ मंत्री एकनाथराव खडसे साहेब सुध्दा आहेत. आमदारांच्या अधिकारांबद्दल आणि हक्कांबद्दल अतिशय सकारात्मक भूमिका घेत आहेत. मला आपल्या एक बाब निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, सर्वसाधारणपणे अधिकारी किंवा आमदारांमध्ये मतभेद झाले किंवा खटके उडाले तर दोन कलमे सातत्याने लावली जातात. त्यामध्ये एक 353 क्रमांकाचे कलम आणि दुसरे ॲट्रासिटीचे कलम लावले जाते. आपल्याकडे पोलिसांना नेमप्लेट असते. काही अधिकाऱ्यांच्या गळ्यामध्ये बॅच असतो. पण त्याच्यावर कोणाचीही जात नसते. जात नमूद नसल्यामुळे समोर जर मतभेद झाले तर आणि साधारणपणे अधिकाऱ्याची तीन वर्षाने बदली होत असते. त्यामुळे आपण सर्रास त्याच्यावर ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यास परवानगी देतो त्याचा खूप वाईट परिणाम होतो. एखाद्याने गुन्हा केला असेल आणि तसा तो वागला असेल तर त्याच्यावर गुन्हा जरुर व्हावा. पण तो अधिकारी कोणत्या जातीचा आहे हे कोणत्याही माणसाला माहिती नसते. त्यामुळे सर्रास ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल होतो. म्हणून असा गुन्हा दाखल होऊ नये याचा विचार व्हावा.

**अध्यक्ष :** गटनेत्यांच्या बैठकीत यावर चर्चा करण्यात यावी.

--------

O-1.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पु.शी. मु.शी.** : औचित्याचे मुद्दे

श्री.भिमराव तापकीर : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

अध्यक्ष महोदय, पुणे शहरात विविध प्रकारच्या केबल आणि वाहिन्या टाकण्यासाठी खाजगी कंपन्यांनी जवळपास 30 ते 40 किमी रस्त्याचे बेकायदा खोदाई करण्याचे काम सुरु केलेले आहे. पुणे महानगरपालिकेचे पदाधिकारी यांच्या निदर्शनास येऊन सुध्दा कुठल्याही प्रकारची कारवाई करण्यात येत नाही. पुणे शहरात मोठ्या प्रमाणात रस्ते तयार करण्यात येत असतात. रस्ते तयार करुन सहा महिने झाले नसतानाही त्याठिकाणी पुन्हा खोदकाम सुरु करण्यात येते. जनतेचे पैसे नाहक वाया जात असतात. परंतु खोदाई करीत असताना कोणत्याही कंपनीवर कारवाई करण्यात येत नाही. याठिकाणी रिलायन्स, एअरटेल, महावितरण या खाजगी कंपन्यांकडून रस्त्यांची फार मोठ्या प्रमाणात खोदाई करण्यात येते. खोदाई करीत असताना त्याठिकाणी कोणत्याही प्रकारची खबरदारी घेण्यात येत नाही. खोदाई करीत असताना सूचना फलक लावणे, सुरक्षितता न घेणे, बॅरीगेट न लावणे अशा वेळेस त्याठिकाणी अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. खोदकाम करीत असताना जलवाहिन्या फुटण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात दिसून येत असते. परंतु आयुक्त जाणिवपूर्वक दुर्लक्ष करीत असतात. हे औचित्याच्या मुद्दयाद्वारे निदर्शनास आणून देत आहे.

---------

......2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**स्थगन प्रस्तावाबाबत**

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, आपण एकदम औचित्यांच्या मुद्दयावर गेलात. स्थगन प्रस्तावाच्या सूचनेवर याठिकाणी चर्चा झाली. माननीय मुख्यमंत्री याठिकाणी उपस्थित आहेत. राज्यात गेल्या काही दिवसांपासून एका भारतीय जनता पक्षाच्या महिला सदस्या श्रीमती मैथिली जावकर यांनी चार दिवसांपूर्वी पत्र दिले ते बाहेर लिक झाले. काल शेवटी सदर महिलेला एफआयआर दाखल करावा लागला. गणेश पांडे विरुध्द एफआयआर दाखल झालेला आहे परंतु त्याला अद्यापही अटक झालेली दिसत नाही. दोघेही टेलिव्हीजनवर सांगतात की आमचा मुख्यमंत्री महोदयांवर विश्वास आहे. आमची त्यांच्याशी जवळीक आहे आणि त्या दोघांचाही तुमच्यावर विश्वास आहे. दुर्दम्य विश्वास कुणाचा सार्थ ठरवायचा याचा अजून निकाल लागलेला नाही. त्यामुळे गणेश पांडे यांना अद्याप अटक झालेली नाही. सदर महिलेने एक पत्र लिहिलेले आहे. पत्रामध्ये जे उल्लेख करण्यात आले आहेत त्यात अनेक वाक्य आक्षेपार्ह आहेत. राज्याच्या मंत्री मंडळातील एका मंत्री महोदयांचा यात उल्लेख आहे. असे करीत असताना अतिशय गंभीर स्वरूपाचे आरोप महिला करीत आहे आणि ती महिला मराठी आहे. त्या मराठीपणाबद्दलही त्यांनी काही आक्षेप काढलेले आहेत. या सगळ्या गोष्टी बघितल्या तर ही अतिशय गंभीर बाब आहे आणि त्यामुळे पिडित महिलेचे लिखाण पक्षाचे अध्यक्ष डॉ.आशिष शेलार यांना देण्यात आलेले आहे. त्यानंतर 4 दिवस काहीही झाले नाही. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी महिला समितीकडे ते सोपविले.

अध्यक्ष महोदय, असे असताना आता शेवटी त्या महिलेला न्याय मिळणार नाही असे वाटले म्हणून पिडीत महिलेने मला माझे बोलणे पूर्ण करु द्या. माझा म्हणणे मांडण्याचा अधिकार आहे. त्याना दंगा करु द्या, पण माझे म्हणणे ऐकून घ्या. पिडीत महिलेला आपले म्हणणे मांडण्याचा अधिकार होता. सदर महिलेने शेवटी कंटाळून काल नाईलाजास्तव एफआयआर दाखल केलेला आहे. एफआयआर नोंदवनू आज 24 तास झाले तरी आपल्या प्रिय गणेश पांडेंना समजूत म्हणून पदावरुन काढले ठीक आहे. पण भारतीय जनता पक्षाच्या एका पदाधिकारी असणाऱ्याला मथुरेला जाऊन महिलांची छेडछाड करणाऱ्या माणसाला अजूनही आपल्या गृह खात्याच्या पोलीस

......2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील......

अधिकाऱ्यांनी अटक केलेली नाही. त्यामुळे समाजात भयगंडाची भावना पसरलेली आहे. सम्माननीय सदस्य श्री राज पुरोहित जी, आपकी पार्टी में क्या क्या है वह बताने के लिए मुझे कम्पलशन मत कीजिए. मैं बताना नहीं चाहता हूं. उस खत में जो लिखा है वह पढ़कर बताया तो और तकलीफ हो जाएगी. मैं खत नहीं पढ़ रहा हूं.

अध्यक्ष महोदय, माझी एवढीच विनंती आहे की, स्थगन प्रस्ताव मी दिलेला आहे त्यावर चर्चा करावी अशी आमची अपेक्षा असली तरी किमान त्याबाबतीत गणेश पांडेंना अटक करुन माननीय मुख्यमंत्री महोदयांनी आज दिवसभरात कोणती कारवाई केली याचे निवेदन क्रिकेटची मॅच सुरु होण्याआधी वेळेत करावे असे आदेश आपण त्यांना द्यावेत.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, याठिकाणी संबंधित महिलेने ज्यावेळी श्री.आशिष शेलार यांच्याकडे केली तेव्हा पक्षाने काय कारवाई करायची ती केली. त्यानंतर स्वत: सन्माननीय सदस्य श्री.आशिष शेलार यांनी त्यांना विनंती केली की, यासंदर्भात तुम्ही पोलीसात गुन्हा दाखल करा पण सदर महिलेने गुन्हा नोंदविण्यास नकार दिला. याबाबत त्यांनी कालच मुलाखतीमध्ये सांगितले. मला पक्षाचे सन्माननीय सदस्य श्री. आशिष शेलार यांनी पोलीसात गुन्हा दाखल करण्यास सांगितले पण मला गुन्हा दाखल करायचा नाही असा निर्णय घेतला होता. आता ऐकून घ्या. तुमच्या पक्षाचे आमदार श्री.वाघ यांना बलात्काराच्या गुन्ह्यामध्ये अटक झाली होती, त्यांचे काय केले. या सभागृहामध्ये एक-एक सांगू का? (अडथळा.......)

अध्यक्ष महोदय, कमीत कमी बोलताना नैतिकता ठेवा. जसे तिकडून येईल ना तसेच इकडून येईल लक्षात ठेवा. यासंदर्भात सदर महिलेने तक्रार न करता देखील या गोष्टींचे गांभिर्य लक्षात घेऊन राज्य सरकारने हे प्रकरण महिला आयोगाकडे पाठविले. कारण त्यांच्या तक्रारीशिवाय पोलीस चौकशी करता येत नव्हती म्हणून त्यांना पाठविले आणि महिला आयोगाला सांगितले की, तुम्ही त्याठिकाणी तक्रार नोंदवा. पण काल संबंधित महिला तयार झाल्या आणि त्यांनी तक्रार नोंदविली. तक्रारीवर जी काही कारवाई करायची ती पोलीस करतील, कुणालाही पाठीशी घालण्याचे कारण नाही. कुठलाही गुन्हा असो त्या गुन्ह्यामध्ये जो गुन्हेगार असेल त्याला शिक्षा होईल. यावर कारण नसताना केवळ राजकारण करायचे ही प्रथा योग्य नाही.

........4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, मुंबईमध्ये लागोपाठ दोन महिन्यांमध्ये 80 मुली विकृत वासनेच्या शिकार झालेल्या आहेत. अशा घटना मुंबईमध्ये सातत्याने घडत आहेत. मानखुर्द, पवई, शिवाजी नगर याठिकाणी एका पाठोपाठ एक अशा घटना घडत असताना पोलिसांकडून कोणत्याही प्रकारची कारवाई होत नाही. चार वर्षाच्या चिमुरड्या मुलीवर अत्याचार झाल्याच्या घटना समोर येत आहेत. पोलीस यामध्ये हतबल झालेले आहेत. अशा विकृत मनोवृत्तीच्या लोकांवर तातडीने कारवाई करण्याची गरज आहे. विशेषकरुन मुलींवर जे अत्याचार होत आहेत. काल मानखुर्द येथे चार वर्षाच्या मुलीवर अत्याचार झालेला आहे. याबाबतीत राज्य सरकारने तातडीने मुंबईच्या जनतेला आश्वासित करण्याची गरज आहे. म्हणून स्थगन प्रस्तावाच्या निमित्ताने हा मुद्दा उपस्थित केलेला आहे. मघाशी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी स्पष्टीकरण दिले त्यावरुन माझी एवढीच विनंती आहे की, आपण कारवाई करण्याचे मान्य केले, एफआयआर होईल, कायदेशीर कारवाई काय करायची ती करण्यात येईल.

P-1.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे पाटील .............

मुख्यमंत्री महोदयांनी मघाशी मुद्याबाबत स्पष्टीकरण दिले आहे. आपण कारवाई करण्याचे मान्य केले आहे. एफ.आय.आर. होईल, जी कायदेशिर व्हायची ती कारवाई होईल. परंतु मथुरेला जी घटना घडलेली आहे. त्याचे सी.सी.टी.व्ही. फुटेज आहेत ते ताबडतोब ताब्यात घ्यावेत. गेली चार दिवस सर्व प्रसार माध्यम, इलेट्रॉनिक मिडीया असेल, प्रेस मिडीया असेल या प्रकरणामध्ये अतिशय संवेदनशिल राहून सारखी चर्चा घडवित आहेत. आम्ही सुध्दा चर्चा घडवलेली आहे. माध्यमानी चर्चा घडवलेली आहे. हा प्रश्न गंभीर होत चाललेला आहे. राज्य सरकारच्या एकूण कार्यपध्दतीवर यामुळे प्रश्न चिन्ह उपस्थित झालेले आहेत. म्हणून तातडीने एफ.आय.आर. दाखल झाल्यानंतर श्री.गणेश पांडे यांना तातडीने अटक होण्याची आवश्यकता आहे. ही आमची मागणी आहे. दुस-या मुद्याबाबत सुध्दा विशेष लक्ष घालण्याची गरज आहे.

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, या संदर्भामध्ये स्थगन प्रस्तावावर चर्चा सुरु आहे. खरे म्हणजे वित्तीय मागण्या ज्या दिवशी असतात त्या दिवशी स्थगन प्रस्तावावर चर्चा होत नाही, असे आधी माननीय श्री.दिलीप वळसे-पाटील आम्हाला बोलू सुध्दा देत नव्हते. वित्तीय चर्चा आहे. स्थगन नाही, दालनात नाकारले ही नव्याने पध्दत आपल्या सभागृहात सुरु झाली का ? एवढीच आपल्या माध्यमातून मला माहिती हवी आहे.

**अध्यक्ष :** नव्याने पध्दत सुरु झाली नसली तरी साधारणत: विरोधी पक्ष नेते विनंती करतात तेव्हा त्यांना थोडीशी संधी देतो. ठीक आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, मी पॉईंट ऑफ प्रोसिजरच्या मुद्यावर बोलण्यासाठी उभा आहे. या सभागृहाचे जे कामकाज चालते, ते नियमाप्रमाणे, प्रथा, परंपरे प्रमाणे कामकाज चालते. सभागृहाच्या अध्यक्ष स्थानावर बसलेली कुठलीही व्यक्ती, अध्यक्ष असतील, तालिका सभाध्यक्ष असतील, कोणीही असतील त्यांनी त्या-त्या वेळेला दिलेले निर्णय हे या सभागृहाचे निर्णय आहेत. हे रिपोर्ट झालेले निर्णय असतात. त्यामुळे पुर्वीच्या निर्णयांचा दाखला द्यायचा असेल तर तो दाखला देता येतो. परंतु मी गेल्या काही दिवस या सभागृहमध्ये बघतो आहे. काही गोष्टींचा येथून त्या पदाचा सन्मान

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप वळसे-पाटील........

राखण्याच्या दृष्टीकोनातून प्रतिवाद करता येत नाही. तो प्रतिवाद केला तर ते सभागृहाच्या प्रतिष्ठेच्या दृष्टीने चांगल नाही. शेवटी या सगळया इन्स्टीटयुशन आहेत. चिफ इन्स्टीटयुशन असतील, विरोधी पक्ष नेते असतील, स्पीकर असतील या सर्व इन्स्टीटयुशन आहेत त्यांचा मान ठेवलाच पाहिजे. एखाद्या वेळेला काय निर्णय दिले, काय निर्णय नाही दिले, प्रत्येक वेळी त्याचे नाव घेऊन उल्लेख करायला लागलो आणि प्रत्येक वेळेला रेकॉर्डवर ठेवायला लागलो, प्रत्येक गोष्टीचा प्रतिवाद करता येऊ शकतो. परंतु तो प्रतिवाद करायचा कि नाही कराचा याचे मार्गदर्शन आपण एकदा आम्हाला, सभागृहाला करा. त्याच्यामुळे एक व्यवस्था तयार होईल. उदाहरणादाखल सांगायचे म्हटले तर कालच एका हक्क भंग प्रस्तावाच्या निमित्ताने सन्माननीय सदस्यांनी भावना मांडल्या. संपूर्ण सभागृह उभे राहिले होते. सभागृह उभे राहील्यानंतर त्यामध्ये माझी अशी भावना होती की, सभागृहाच्या भावना समजून घेऊन तो हक्क भंग दाखल करुन घ्यावा. माननीय श्री.सुधीर मुनगंटीवार उभे राहीले, गेल्या पाच वर्षात असे झाले का ते मला सांगा. पाच वर्षामध्ये झाले की नाही झाले हा मुद्दा महत्वाचा नाही. कारण सभागृहाचे जे प्रेसिडेन्ट आहेत ते या विधानसभेची स्थापना 1937 सालामध्ये झाली. तेव्हा पासूनचे प्रेसिडेन्ट त्या ठिकाणी आहेत. मी अतिशय नम्रतापूर्वक नियम 284 कडे लक्ष वेधू इच्छितो, 284 मध्ये अध्यक्षांना अंतिम अधिकार आहेतच. प्रेसिडेंन्ट असो की नसो याच्या संदर्भात अध्यक्षांना अंतिम अधिकार आहेत. ते दाखल करुन घेण्याच्या संदर्भातील अधिकार आहेत.

माननीय श्री.एकनाथराव खडसे साहेब माझी आपल्याला विनंती आहे की, आपण येथे राजकारण करता येथे ते ठिक आहे. तुमच्या काळात काय झाले आमच्या काळात काय झाले, माझ्या घरात काय झाले, तुझ्या घरात काय झाले, असे आपण जे इतर वेळेला करतो, निदान अध्यक्षांचे पद तरी प्रत्येक वेळी क्वेश्चनमध्ये आणण्याची गरज आहे असे वाटत नाही. माननीय श्री.खडसे साहेब मी आता बोलतो आहे. माझ्यानंतर तुम्ही बोला. I am not making any kind of allegations on you. हे सर्व मी तुम्हाला अतिशय नम्रतापूर्वक सांगतो की, बाकीच्या गोष्टीमध्ये एका बाजूला म्हणतो

......3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप वळसे पाटील.......

लोकप्रतिनिधींवर अन्याय होतो. एका बाजूला आम्ही म्हणतो असे होते, तसे होते, आम्ही लोकप्रतिनिधी एकमेकाचे कपडे या ठिकाणी काढायला लागलो, जर आम्ही एकमेकांची अब्रु या ठिकाणी काढायला लागलो बाहेर जाऊन आपल्या बद्दल फार कोणी आदर व्यक्त करेल, फार चांगली वागणूक देईल असे मानायचे काही कारण नाही. दिड वर्षामध्ये पूर्वीच्या सरकारने काय केले असेल ज्यावेळेला आपलेसुध्दा 1995 ते 1999 च्या काळामध्ये सरकार होते. त्यावेळेला घेतलेले निर्णय आहेत. प्रत्येक निर्णयाची चर्चा होऊ शकते. तुमच्या काळातील निर्णय, आमच्या काळातील निर्णय, याची प्रत्येकाची चर्चा होऊ शकते. मुद्दा एवढाच आहे की, रेकॉर्ड काढून सभागृहाच्या समोर ठेवा नुसते गट नेतेच नाही तर श्री.नाथा भाऊ बोलल्याच्या नंतर श्री.सुधीर भाऊ बोलायचे, त्यांच्या नंतर श्री.बापट साहेब बोलायचे सर्वांचा एकदा कस निघाला की, हळूच आताचे मुख्यमंत्री महोदय बोलायचे ठिक आहे. आपण काय बोलायचे, कसे बोलायचे याच्यावर चर्चा करीत नाही.

अध्यक्ष महोदय, आपण बाकीच्या सन्मानीय सदस्यांना एवढा वेळ देता, मला सांगा नाही तर मी मागच्या खुर्चीवर जाऊन बसतो.

**अध्यक्ष :** मी तुम्हाला बसायला सांगत नाही. परंतु थोडक्यात आटपा असे म्हणतो. तुम्ही प्रतिवादासंबंधी बोललात.

श्री.दिलीप वळसे पाटील : अध्यक्ष महोदय, मी पॉईंट ऑफ प्रोसिजरवर आहे. माझे मत एवढच आहे की, या सभागृहामध्ये संदर्भ देत असताना एखाद्या व्यक्तिचा संदर्भ देण्याऐवजी तुम्ही तत्कालीन अध्यक्ष म्हटल तर चालू शकत, तुम्ही सभागृहाचे प्रेसिडेन्ट म्हटले तर चालू शकते. तुम्ही असे म्हणू शकता. प्रत्येक वेळेला डिफेन्ड करणे बरोबर नाही. नाव घेऊ नये. नाव घेतले तर चुकीचे काही नाही. त्याबद्दल काही हरकत नाही. मी केव्हा चुकीचे वागलो नाही. एकदा नाथाभाऊ रुसले होते. नाथा भाऊ आणि माझे भांडण झाले होते. मी अध्यक्ष असताना आम्ही रोज एकत्र जेवायचो, त्या दिवशी नाथाभाऊ जेवायला आले नाहीत. त्यामुळे मी जेवलो नाही. नाथाभाऊ येईपर्यंत मी जेवलो नाही. नाथाभाऊ आणि श्री.बापट साहेब आल्यानंतरच त्या दिवशी आम्ही जेवण

.....4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप वळसे पाटील.....

केले. इतकी चांगली भावना विरोधी पक्ष नेत्यांच्या बद्दल ठेवली. हे श्री.बापट साहेबांनी एका पुण्याच्या एका जाहीर सभेत सांगितले. तुम्हाला याबाबत खात्री करायची असेल तर श्री.बापट साहेबांनकडून करुन घ्या. त्याच्यामुळे इतकी चांगली भावना एकमेकांबद्दल असताना आपण असे करु नका. माझी आपल्याला विनंती आहे की, शेवटी सभागृहाची प्रतिष्ठा, हे सभागृह खूप उत्तुंग व्यक्तींनी पाहिलेले आहे. उत्तुंग व्यक्तिनी चालविलेले आहे. खूप महत्वाचे कायदे या सभागृहामध्ये झालेले आहेत. अन फॉरच्युनेटली गेल्या काही दिवसांमध्ये मी येथे बघतो आहे, ते पाहून खूप समाधान वाटते असे नाही. त्यासाठी फार साधे शब्द वापरतो. सुधारणा करण्याच्या दृष्टीकोनातून अध्यक्ष महोदय आपणच पुढाकार घ्यावा.

अध्यक्ष महोदय, मुद्दाम आपल्याही लक्षात आणून देऊ इच्छितो की, ज्यावेळेला येथे श्री.क्षितीज ठाकूरची केस झाली. त्यावेळेला पूर्ण पोलीस दल एका बाजूला, पूर्ण सरकार एका बाजूला, पूर्ण विधानसभा एका बाजूला असे झालेले होते. त्यावेळेला विधानसभेचा अध्यक्ष म्हणून मी पोलीस दलाची क्षमा मागितली. अधिका-यांची क्षमा मागितली. महाराष्ट्राची क्षमा मागितली. त्यामधून ते प्रकरण शांत झाले. कधी कधी विस्फोट होईल की काय ? आपण सुध्दा असे विस्फोट व्हायला जर त्या ठिकाणी बुस्टप केले. शेवटी याच्यातून तुम्हाला मार्ग काढावा लागेल. अधिकारी आणि लोकप्रतिनिधी अलग अलग जाऊ शकत नाही. राजकीय भूमीका म्हणून, व्यक्तिगत हेवेदावे म्हणून आपण या ठिकाणी मांडायला लागलो तर ते बरोबर नाही.

अध्यक्ष महोदय, मी आपल्याला विनंती करेन, आपण याच्यामध्ये पुढाकार घ्या, सर्वांना ज्याचा त्याला न्याय देण्याचा प्रयत्न करा. यापुढे या सभागृहामध्ये असे होऊ नये असा प्रयत्न आपल्याकडून झाला तर आम्हाला सगळयांना आनंद वाटेल असा मुद्दा मी या पॉईंट ऑफ प्रोसिजरच्या माध्यमातून आपल्यासमोर मांडतो.

**अध्यक्ष :** निश्चितपणे तसा प्रयत्न करु. कुठलाही प्रतिवाद करु नये, परंतु एखादी अशी नम्रपणे आठवण करुन द्यायला हरकत नाही.

Q-1.........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**अध्यक्ष** : निश्चितपणे तसा प्रयत्न करण्यात येईल. सदस्यांनी प्रतिवाद करु नये. पण मागील घटनेची नम्रपणे अशी आठवण करुन देण्यास हरकत नाही.

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिलीप वळसे पाटील यांचे नाव घेण्यामध्ये माझा वाईट हेतू नव्हता. माझे 30 वर्षाचे उभे आयुष्य या सभागृहात गेलेले आहे. मी विरोधी पक्षात लढत आलो. सत्ताधारी पक्षाचे फार कमी अनुभव आमच्या वाटयास आले. त्यावेळी मनामध्ये साठलेले अनुभव या माध्यमातून व्यक्त होतात. कोणाचे नाव घेऊन या प्रथा व परंपरा सांगण्याचा माझा हेतू नव्हता. सभागृहाचे कामकाज नियमाने चालते. नियमात तरतूद आहे की, जेव्हा वित्तीय बाबींवर चर्चा होते तेव्हा शक्यतो आपणास स्थगन प्रस्ताव मांडता येत नाहीत व घेतले जात नाही. या नियमाचा अनुभव गेल्या अनेक वर्षापासून मला आलेला आहे. ज्यावेळी पुरवणी मागण्या किंवा अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा असेल तेव्हा एखादा दुसरा अपवाद वगळला तर स्थगन प्रस्ताव दालनामध्येच नाकारले जात होते. अलिकडे रोजच स्थगन प्रस्तावावर चर्चा होते. 5-6 दिवसापासून सभागृहात तर रोजच बजेटचे काम चालू आहे. मी त्यांना मार्गदर्शन मागितले, मी त्यांना दुसरे काही विचारले नाही. हवे तर रेकॉर्ड तपासा. मी त्यांना मार्गदर्शन मागितले की, वित्तीय चर्चा असताना स्थगन प्रस्तावावर निदान चर्चा तरी होते का ? त्या वेळी आम्ही उभा राहिलो की, पीठासीन अधिकारी म्हणायचे आज वित्तीय चर्चा आहे, आज स्थगन प्रस्ताव होणार नाहीत व मी हे प्रस्ताव दालनामध्ये नाकारले आहेत. त्यावेळी आम्ही शांत बसायचो. तसा काही हेतू त्यामध्ये नव्हता. हे सर्वांनाच माहिती आहे की, सन्माननीय सदस्य श्री.दिलीप वळसे पाटील, कै.आर.आर. पाटील असे आम्ही एकत्र जेवल्याशिवाय आमचा दिवस कधी गेला नाही.

अध्यक्ष महोदय, या सभागृहात नियमाने व प्रथा परंपरेने कामकाज चालावे म्हणून दोन्ही बाजूच्या सदस्यांकडून सहकार्याची अपेक्षा आहे. अनेकदा अतिरेकाने दोन्ही बाजूकडून बोलले जाते. तेव्हा श्री.दिलीप वळसे पाटील हे अध्यक्ष असताना बोलवायचे, बसवायचे व त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करायचे. असे अनेक प्रश्न त्या कालखंडात नुसते बैठकीमध्येच सुटलेले आहेत. त्यावर सभागृहात चर्चा करण्याची आवश्यकता भासली नाही. सभागृहात जेव्हा मांडायचे तेव्हा आपण मांडू, पण बरेचसे प्रश्न दालनामध्ये सुटू शकतात. मी दोन्ही बाजूकडून अपेक्षा व्यक्त करतो की, असे प्रश्न आपण दालनामध्ये सोडविण्याचा प्रयत्न करू. .....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** औचित्याचे मुद्दे

**अध्यक्ष** : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

श्री.बबनराव शिंदे : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. शासनाने दिनांक 15 मार्च 2016 रोजी सोलापूर जिल्हयातील 1144 गावांपैकी 1038 गावे 50 पैशापेक्षा कमी आणेवारी असल्यामुळे दुष्काळग्रस्त यादीत समावेश केलेला आहे. मात्र माळशिरस तालुक्यातील 112 गावांपैकी 78 गावे समाविष्ट केली असून त्यामध्ये माढा मतदारसंघातील भिमा नदीकाठची 11 गावे 50 पैसेपेक्षा जास्त आणेवारी असल्यामुळे दुष्काळग्रस्त यादीत समाविष्ट केली नसल्याने या गावातील दुष्काळग्रस्त लोकांनी तीव्र असंतोष व्यक्त केलेला आहे. या दुष्काळग्रस्त 11 गावांचा समावेश या यादीमध्ये करण्यासाठी मागणी केली आहे. याबाबत माननीय मुख्यमंत्री, माननीय महसूल मंत्री यांना समक्ष भेटून निवेदन दिलेले आहे. त्यांनी फेरसर्व्हे करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिलेल्या आहेत. परंतु अद्यापपर्यंत त्या गावांची आणेवारी दुरूस्त होऊन आलेली नाही. तसेच गेल्या 8 महिन्यात ज्या वेळी भिमा नदीत पाणी सोडण्यात आले होते, तेव्हा सोलापूर जिल्हयातील भिमा नदीकाठावरील गावांचा विद्युत पुरवठा बंद करण्यात आलेला होता. दक्षिण बाजूला माढा, पंढरपूर या गावांची आणेवारी 50 टक्केपेक्षा कमी लागलेली आहे. माळसिरस तालुक्यातील 11 गावची आणेवारी जास्त लागलेली आहे. माझी विनंती आहे की, फेरसर्व्हे करुन यादीतून वगळलेल्या गावांचा पुन्हा समावेश करावा.

-----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुरेश गोरे : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. पुणे जिल्हयातील खेड, आंबेगाव, जुन्नर या तालुक्यामध्ये आदिवासींकरिता पडकई योजना राबविली जाते. केंद्र शासनाकडून कृषी व आदिवासी विभागाकडून ही योजना राबविताना आदिवासी शेतकरी दारिद्रय रेषखालील असावा अशी अट आहे. आदिवासी विभागाने कृषी विभागाकडे 6 कोटी 17 लाख रुपयांचा निधी वर्ग केलेला आहे पण तो अद्यापपर्यंत खर्च झालेला नाही. कारण केंद्राच्या अटीमुळे सर्व आदिवासींना याचा लाभ घेता येत नाही. कामे पूर्ण झालेली आहेत. अजूनही काही प्रस्ताव पडून आहेत. या सर्वांना मंजूरी मिळण्यासाठी राज्य शासनाने केंद्र सरकारकडे ही अट शिथील करण्याबाबत किंवा रद्द करण्याबाबत शिफारस करावी अशी मी विनंती करतो.

-----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संग्राम थोपटे : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. भोर तालुक्यामध्ये भोर नगरपरिषदेने भोरेश्वर औद्योगिक वसाहत या संस्थेस 1982 साली 34 हजार रुपये वार्षिक भाडेपट्टयाने जागा औद्योगिकीकरणासाठी दिलेली आहे. पण सदर संस्थेने जागेचे भाडे 11 लाख 48 हजार 110 थकबाकी अद्यापही नगरपरिषदेकडे जमा केलेली नाही. म्हणून आरक्षण क्रमांक 32 मधील 35 एकर जागा नगरपालिकेने आपल्या ताब्यामध्ये घेतलेली आहे. एमआयडीसीकडे ही जागा हस्तांतरीत करण्यासाठी भोर नगरपरिषदेने ठराव क्रमांक 108 अन्वये मान्यता दिलेली आहे. या जागेची किंमत 3 कोटी 70 लाख रुपये असून ती देण्याचा ठराव प्रधान सचिव (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखालील दिनांक 8.12.2008 च्या 53 व्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीत मंजूर करण्यात आला. तत्कालीन मुख्यमंत्री यांनी देखील त्यावेळी निवेदन केले होते. परंतु अद्यापही हा प्रस्ताव नगरविकास विभागाकडे प्रलंबित आहे. मी माननीय मुख्यमंत्री व शासनाला विनंती करु इच्छितो की, शासनाकडे प्रलंबित असलेला हा प्रस्ताव तातडीने निकाली काढून तेथे एमआयडीसी मंजूर करावी. जेणेकरुन हा प्रस्ताव औचित्याच्या मुद्दयाला धरुन असल्यामुळे मी येथे मांडला आहे.

-----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शिवाजीराव नाईक : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. शासनाची फसगत झाल्याचे उदाहरण मी सांगत आहे. माझ्या शिराळा मतदारसंघातील वाळवा तालुक्यातील सुरुर गावामध्ये श्री.अप्पासाहेब रामचंद्र पाटील व चार भावांची एक वडीलोपार्जीत विहीर होती. चार भाऊ ही विहीर वापरत होते. गट क्रमांक 677/1 अशी विहीरीची नोंद 7/12 उताऱ्यावर आहे. सदर विहीर एकत्रित वापरात असताना दिनांक 11 जून 1996 रोजी अप्पासाहेब हा मोठा भाऊ असल्यामुळे त्याच्या नावावर वीज कनेक्शन घेतले होते. त्या विहीरीचा वापर चारही भाऊ करीत होते. परंतु नंतर त्यामध्ये खोटे प्रतिज्ञापत्र केले. अप्पासाहेब यांनी ही विहीर आमची नाही, आमच्याकडे विद्युत कनेक्शन नाही असे खोटे कागदपत्रे तयार करुन दिनांक 8.6.1998 रोजी त्यांनी जवाहर विहीर मंजूर करुन घेतली. ही विहीर आपलीच जवाहर विहीर आहे अशा पध्दतीने स्वतःची वेगळी नोंद करुन आता चारही भावांना ते पाणी घेऊ देत नाही. या प्रकरणी संबंधित भावांनी तहसिलदार व गटविकास अधिकारी यांच्याकडे तक्रार केलेली आहे. तथापि अद्यापही त्यांच्याकडून चौकशी होत नाही. यामध्ये ज्या शासकीय अधिकाऱ्यांनी याच विहीरीस मंजूरी दाखवून अनुदान लाटलेले आहे. तलाठयाने साधी विहीर ऐवजी जवाहर विहीर अशी नोंद करुन अप्पासाहेबाच्या नावावर हे प्रकरण केलेले आहे. त्यामुळे या चारही भावाचा या विहीरीवर समान हक्क व्हावा, ज्या अधिकाऱ्यांनी ही गफलत केलेली आहे, ज्या तलाठयाने चुकीची नोंद घातली आहे, त्यांची चौकशी होऊन कारवाई व्हावी अशी मी विनंती करतो.

----

यानंतर आर -1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

अध्यक्ष महोदय, दिनांक 22 फेब्रुवारी,2016 रोजी अंगणवाडी कर्मचा-यांचा देशव्यापी संपात राज्यातील अंगणवाडी कर्मचा-यांनी सहभाग घेतलेला असणे, अंगणवाडी कर्मचा-यांच्या मानधनात वाढ व इतर मागण्यांसाठी केंद्रीय अर्थसंकल्पात 25 हजार कोटींची तरतूद करण्याचे आश्वासन माननीय मंत्री, वित्त,भारत सरकार यांनी देऊनही सदर आश्वासनाची पुर्ती न झाल्याने राज्यातील अंगणवाडी सेविका व कर्मचा-यांचे प्रत्येक जिल्हयात आंदोलन सुरु असणे. रत्नागिरी जिल्हयात दिनांक 11 मार्च, 2016 रोजी हजारो अंगणवाडी सेविका व कर्मचा-यांनी जिल्हा परिषदेवर धडक मोर्चा काढून आंदोलन केलेले असणे, अत्यंत खडतर परिस्थितीत कार्यरत असणा-या अंगणवाडी सेविका व कर्मचा-यांच्या मनात आश्वासनपूर्ती होत नसल्याने शासनाविषयी असलेली नाराजीची भावना लक्षात घेता त्यांच्या मागण्या मान्य करण्यासाठी शासनाने तत्काळ ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष भोईर : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

अध्यक्ष महोदय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामध्ये कल्याण तालुक्यातील 27 गावे दि 01 जून, 2015 पासून समाविष्ट करण्यात आले आहे. सदर 27 गावांमधील मौजे भाल व भोपर गावांचा समावेश आहे. महानगरपालिकेच्या विकास आराखडयामध्ये मौले भाल येथील 250 एकर जागा तसेच भोपर येथील 90 एकर जागेवर डंपिंगचे आरक्षण दाखविण्यात आले आहे. त्यामुळे सदर दोन्ही गावांमधील नागरिकांच्या मनामध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. कल्याण तालुक्यामध्ये नेवाळी येथील विमानतळाकरिता या परिसरात जागा आरक्षित केल्यामुळे भाल गावचा शेतकरी पूर्णपणे भूमिहीन झाला आहे. तसेच एमएमआरडीए च्या माध्यमातून रिंगरूट प्रकल्पाकरिता 100 एकर जागा आरक्षित करण्यात आल्याने भोपर गावातील शेतक-यांची मोठया प्रमाणात जागा रिंगरूट प्रकल्प, डेडीकेटेड फ्रेट कॉरिडोर तसेच डंपिंगकरिता आरक्षित होत असल्याने शेतक-यांवर बेरोजगार व भूमिहीन होण्याची वेळ आलेली आहे. त्यामुळे मौजे भाल व मौजे भोपर गावातील शेतक-यांनी डंपिंगकरिता विरोध दर्शविल आहे. तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक 27 ऑगस्ट,2015 रोजी डंपिंग ग्राऊंड हटविण्याची मागणी केलेली आहे. परंतु सदर मागणीकडे दुर्लक्ष करुन धोरणांमध्ये फेरबदल करण्यात आलेले नाही. त्याकरिता 27 गावातील कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी धोरण निश्चित करणे व मौजे भाल व भोपर गावातील डंपिंग ग्राऊंडचे आरक्षण हटविण्याबाबत कार्यवाही करण्याकरिता मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास विनंती करीत आहे.

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नितेश राणे : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई महानगरपालिकेने मुंबईतील वृत्तपत्र विक्रेत्यांना पदपथावर व्यवसाय करण्यासाठी स्टॉल उभारण्यासाठी परवानगी द्यावी अशी मुंबई विक्रेता संघटनेची मागणी असून त्यासाठी मुंबई विक्रेत्या संघटनेच्या पदाधिका-यांनी दिनांक 15 मार्च,2016 रोजी आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका अजोय मेहता यांची भेट घेऊन ठाणे महापालिकेच्या धर्तीवर मुंबई महानगरपालिकेनेही मुंबईतील वृततपत्र विक्रेत्यांना पदपथावर स्टॉल ठेवण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी केलेली आहे. मुंबई शहराच्या सौंदर्यात भर पडण्याच्या दृष्टीने व स्मार्ट सिटी सर्व संस्थांना आराखडा एक सारखा बनविण्यात येईल पदपथ्ांवर कमीत कमी जागेत हे स्टॉल लावण्यात येतील जेणेकरुन नागरिकांना किंवा वाहतुकीला याचा त्रास होणार नाही. स्टॉलवर फक्त वृत्तपत्र कंपनीची जाहिरात लावण्यात येईल यातून महापालिकेला महसूल उपलब्ध होईल, असे मुद्देही वृत्तपत्र विक्रेत्यांच्या शिष्टमंडळाने आयुक्तांसमोर मांडले असता याबाबत नव्यने धोरण करण्यात येत असून याचा आपण विचार करु असे आश्वासन आयुक्तांनी शिष्ट मंडळाला दिलेले आहे. वृत्तपत्र विक्रेते हे फेरीवाले नसून अत्यावश्यक सेवेत मोडणारे आहेत. मुंबईत गटई कामगार, आरेअपंग, माथाडी,झुणका भाकर, चर्मकार अशा इतर घटकांना विशिष्ट श्रेणीत उपलब्ध करुन त्यांच्या व्यवसायाला सरकारडून सोयीसुविधा देऊन संरक्षण दिले गेलेले आहे. त्याच धर्तीवर राज्य शासनाने वृत्तपत्र विक्रेत्यांना पदपथावर स्टॉल ठेवण्याकरिता सरकारकडून सोईसुविधा देऊन संरक्षण द्यावे, असा माझा औचित्याचा मुद्दा आहे.

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

....4

श्री.सुधाकर भालेराव: अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीसाठी 13 टक्के आरक्षण असलैल्या 59 जातींपैकी मातंग समाज सर्वांगीण विकासापासून वंचित राहिल्याने अनुसूचित जातीतील प्रमुख जाती अृबृकृड करुन जात व पोटजातींना एकत्रित करुन या जातीस असलेल्या 13 टक्के आरक्षणातूनच वेगळे आरक्षण दिल्यास मातंग समाजाचा सामाजिक विकास घडवून येण्यास मदत होईल त्यासाठी मातंग समाजाने वेळोवेळी शासनाकडे मागणी करुन विकास घडवून येण्यास मदत होईल त्यासाठी मातंग समाजाने वेळोवेळी शासनाकडे मागणी करुनही याकडे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने कार्यवाही करण्याकरिता मी हा औचित्याचा मुद्दा मांडलेला आहे. तसेच, मला याबाबत आणखी एक मुद्दा मांडावयाचा आहे. माननीय सामाजिक न्याय मंत्री महोदयांनी माननीय मुख्यमंत्री यांच्यासमवेत एक बैठक बोलवावी.

.....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष पाटील : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

अध्यक्ष महोदय, राज्यातील मच्छिमारांवर जाचक अटी लावल्या जात आहेत. शासनाने इन्शोरन्स काढण्यासंदर्भात दिनांक 5 ऑगस्ट,2014 रोजी एक जी.आर. काढलेला आहे. रायगड जिल्हयातील मच्छिमार हे युनायटेड इन्शोरन्स कंपनीकडून विमा उतरवित होते. आता या जी.आर.नुसार शासकीय विमा कंपनीकडूनच विमा उतरविणे सक्तीचे करण्यात आलेले आहे. शासकीय विमा कंपनीचे कार्यालय आमच्या जिल्हयात नाही. मच्छिमारांना ते सोयीचे नाही. शासनाने हा जो जी.आर.काढलेला आहे, तो तत्काळ रद्द करावा. एवढेच मला या औचित्याच्या मुद्दयाच्या माध्यमातून सांगावयाचे आहे.

....6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.ज्ञानराज चौगुले : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

अध्यक्ष महोदय, उस्मानाबाद जिल्हयातील सध्याची दुष्काळी परिस्थिती आणि चारा व पाणी टंचाई यामुळे शासनाने जनावरांसाठी चारा छावण्या मंजूर केलेल्या असून या अनुषंगाने कृषी उत्पन्न बाजार समिती, उमरगा या संस्थेला दिनांक 14 .01.2016 रोजी चा
ा छावणी सुरु करण्यास मान्यता देण्यात आली व 16.1.2016 रोजी बाजार समितीच्या आवारात चारा छावणी सुरु करण्यात आली होती. सदर ठिकाणी आजमितीला लहान मोठी मिळून सुमारे 450 जनावरे दाखल झालेली असून त्यांना निवारा, चारा व पाणी उपलब्ध करुन देणे, पशुखाद्य देणे, कडबाकुट्टी व इतर साहित्य, विद्युत पुरवठा, कर्मचारी व मजूर यांचा पगार करणे व इतर असे एकूण 15 लक्ष रुपये इतका खर्च छावणी चालकांकडून झालेला आहे. या अनुषंगाने सदर छावणी चालकाद्वारे दिनांक 18 फेब्रुवारी,2016 व दिनांक 11 मार्च,2016 रोजी अनुक्रमे 7,55,120 रुपये व 6,24,024 रुपये असे एकूण 17,79,707 रुपये चारा छावणी अनुदान मिळणेबाबतचा प्रस्ताव तहसील कार्यालयात सादर केला होता. परंतु सदर छावणीत 500 पेक्षा कमी जनावरे असल्याची अट सांगून सदर छावणी अनुदानास पात्र नसल्याचे शासनाद्वारे सांगितले जात असून विशेषतः उस्मानाबाद जिल्हयाच्या शेजारील इतर दुष्काळग्रस्त जिल्हयातील केवळ 250 जनावरे असलैलया छावण्यांना अनुदानास पात्र ठेवण्यात येत आहे. प्रशासनाच्या या दुटप्पी धोरणामुळे जिल्हयातील अनेक ठिकाणी आवश्यकता असूनही छावण्या सुरु करण्यास गैरसोय निर्माण होत असून अनेक छावणी चालकांना आर्थिक नुकसानीस सामोरे जावे लागत आहे. छावण्यास मंजूरी देतांना शासनासोबत कराव्या लागलेल्या करारामुळे सदर छावण्या बंद केल्यास छावणीचालकांवर गुन्हा दाखल होण्याची शक्यता असल्यामुळे केवळ या भितीमुळे सदर छावण्या सुरु आहेत. यामुळे सदर छावणीमधील जनावरांवर उपासमारीची वेळ आलेली असून परिणामी परिसरातील शेतक-यांना तीव्र असंतोष पसरलेला आहे. किमान 250 जनावरे असणा-या छावण्यांना अनुदानास पात्र ठरविणेबाबत मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

....एस-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. राहुल कुल : अध्यक्ष महोदय, मी खालील सार्वजनिक महत्वाच्या व निकडीच्या विषयावर औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या दौंड विधानसभा मतदारसंघात सामाजिक न्याय विभागाचे एकही शासकीय वसतीगृह आणि एकही निवासी शाळा नाही. त्यामुळे तालुक्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना दौंड तालुक्याच्या बाहेर शिक्षणासाठी जावे लागत आहे. बाहेरगावी अशा विद्यार्थ्यांना राहण्याचा खर्च परवडत नाही. त्यामुळे अनेक विद्यार्थी शिक्षण घेण्याचे सोडून देत आहेत.

अध्यक्ष महोदय, माझ्या दौंड विधानसभा मतदारसंघात शासकीय वसतीगृह व निवासी शाळा होण्याबाबत मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाकडे मागणी करीत आहे.

-------

......2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. संजीवरेड्डी बोदकुरवार : अध्यक्ष महोदय, मी खालील सार्वजनिक महत्वाच्या व निकडीच्या विषयावर औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

अध्यक्ष महोदय, राज्य शासनाने 1 एप्रिल, 2015 पासून चंद्रपूर जिल्ह्यामध्ये दारुबंदी असल्यामुळे तेथील जनता वणी तालुक्यात दारु पिण्याकरिता जात आहे. त्यामुळे अपघातामध्ये दर महिन्याला 15 ते 20 लोकांचे मृत्यू होत आहे. तसेच अपघातांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. दारु तस्करीचे प्रमाण वाढलेले आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील लोकांची दारु पिण्याची गर्दी पाहून वणी तालुक्यातील तरुणांची दारुच्या व्यसनाकडे ओढ वाढत चालली आहे. वणी तालुक्यातील तरुणांची दारु पिण्यासाठी वाढती संख्या लक्षात घेता महिलांमध्ये संतप्त प्रतिक्रीया उमटू लागल्या आहेत. परिणामी त्याचा उद्रेक होऊन कोणताही अनुचित प्रकार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. चंद्रपूर जिल्ह्यात दारुबंदी आहे. तशीच दारुबंदी यवतमाळ जिल्ह्यामध्ये करण्याची आवश्यकता आहे. याकरिता शासनाने तातडीने निर्णय घेऊन पुढील कार्यवाही करावी, अशी माझी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाकडे मागणी आहे.

-------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. मनोहर भोईर : अध्यक्ष महोदय, मी खालील सार्वजनिक महत्वाच्या व निकडीच्या विषयावर औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

अध्यक्ष महोदय, रायगड जिल्ह्यातील उरण यंथे महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाच्या गॅस टर्बन पॉवर स्टेशन येथे दिनांक 19 मार्च, 2016 रोजी अचानक शॉर्ट सर्किट ने आग लागल्याने ऑन ड्युटी असलेले दोन कामगार 50 ते 60 टक्के भाजले आहेत. या कामगारांना ऐरोली बर्न हॉस्पिटल येथे उपचाराकरिता दाखल केले आहे. यापूर्वी 2 ते 3 वर्षापूर्वी तेथेच आग लागल्याने 4 कामगारांचा भाजून मृत्यू झाला होता. तसेच गेल्या वर्षी पॉवर प्लॅन्ट जनरेट जळून खाक झाल्याची घटना घडली आहे. अशा प्रकारे अनेक वेळा या पॉवर स्टेशनमध्ये आग लागल्याच्या घटना घडलेल्या आहेत. भविष्यात अशा घटना होऊ नये आणि त्या रोखण्याकरिता ठोस उपाययोजना कराव्यात, अशी माझी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाकडे मागणी आहे.

-------

......4.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. विरेंद्र जगताप : अध्यक्ष महोदय, मी खालील सार्वजनिक महत्वाच्या व निकडीच्या विषयावर औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

अध्यक्ष महोदय, अमरावती जिल्ह्यातील नांदगाव खांडेश्वर येथील दलित वस्तीतील लेंडी नाला व बेगनाल्याचे खोलीकरण व संरक्षक भिंतीच्या कामासाठी 2 कोटी रुपये देण्याबाबत माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांनी दिनांक 27 जानेवारी, 2016 रोजी जाहीर आश्वासन दिले होते. या अनुषंगाने प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग अमरावती यांनी दिनांक 26-02-2016 रोजीच्या पत्रान्वये 1 कोटी 15 लाख 52 हजार 500 रुपयांचे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी शासनाकडे सादर केलेले आहे. सदरहू कामास अद्यापही मान्यता मिळाली नाही. माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांनी आश्वासन देऊनही काम होत नसल्यामुळे स्थानिक जनतेच्या मनात असंतोष निर्माण झालेला आहे. सदर प्रस्तावास निधीसह प्रशासकीय मंजुरी मिळण्याकरिता मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाचे लक्ष वेधत आहे.

-------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती दिपीका चव्हाण : अध्यक्ष महोदय, मी खालील सार्वजनिक महत्वाच्या व निकडीच्या विषयावर औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या बागलाण तालुक्यातील आरंम, मोसम, हत्ती व कान्हेरी या नद्या अधिसूचित केलेल्या आहेत. सततच्या दुष्काळामुळे तेथील शेतकरी आर्थिक कोंडीत सापडलेला आहे. परिणामी शेतकऱ्यांच्या आत्महत्येमध्ये वाढ झालेली आहे. या संकटावर मात करण्यासाठी शेतकऱ्यांनी आरम, मोसम, हत्ती व कान्हेरी या नद्यांवर भूमिगत कॉंक्रीट बंधारे बांधण्यासाठी लोकप्रतिनिधीमार्फत जलसंधारण विभागाकडे मागणी केलेली आहे. या मागणीकडे शासनाने दुर्लक्ष केलेले आहे. बागलाण तालुक्यातील भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता भूगर्भातील पाण्याची पातळी खालावलेली आहे. त्यामुळे सिंचनाबरोबर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झालेला आहे. भूगर्भातील पाण्याच्या पातळीमध्ये वाढ होण्यासाठी नैसर्गिक परिस्थितीनुसार साखळी पध्दतीने भूमिगत बंधारे, कॉंक्रीट बंधाऱ्यामुळे भूपृष्ठावर कोणताही पाणीसाठा न होता भूजल पातळीत वाढ होऊन सटाणा, मुंजवाड, सोमपूर, आसखेडा, द्याने, उत्राणे, अंबासन, औंदाणे, तरसाळी, चौधाने, वटार, बंधाणे, विंचूरे, वनोली, केरसाने, विरगाव अशा गावांमध्ये अप्रत्यक्ष सिंचन होणार असल्यामुळे पिण्याचा पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे. त्यामुळे अधिसूचित नदीच्या सिंचनावर व अस्तित्वातील बंधाऱ्याच्या पाणी वापरावर तसेच सिंचन प्रणालीवर कोणताही परिणाम होणार नाही. या माध्यमातून शासनाचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन होणार नाही. त्यामुळे शासनाने दुष्काळ प्रवण असलेल्या बागलाण तालुक्यातील आरम, मोसम, हत्ती व कान्हेरी नद्यांवर भूमिगत कॉंक्रीट बंधारे बांधण्यासाठी मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाकडे मागणी आहे.

-------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

......6....

श्री. नितेश राणे : अध्यक्ष महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. आज मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर सायंकाळी 7 वाजून 30 मिनिटांनी भारत विरुध्द न्युझिलन्ड असा क्रिकेटचा सामना होणार आहे.

अध्यक्ष महोदय, सन 1974 मध्ये एमसीए आणि राज्य शासनामध्ये एक करार झालेला होता. राज्यशासनाने 1974 मध्ये एमसीएला काही बेनिफिट दिले आहेत. त्यामुळे एमसीए कोणतीही आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामना असेल तर त्यावेळी 250 तिकीटे राज्य शासनाला देणार आहेत. आजच्या क्रिकेट सामन्याच्या अनुषंगाने एमसीएने राज्य शासनाकडे 250 तिकीटे सुपूर्द करावयाची होती. यासंदर्भात 250 पासेस मुख्य सचिवांकडे आलेले आहेत काय अशी विचारणा केल्यानंतर त्यांनी आम्हाला सांगितले की, अशा प्रकारे कोणतेही पासेस मिळाले नाहीत. सभागृहात ज्येष्ठ मंत्री उपस्थित आहेत. मी त्यांना विचारु इच्छितो की, 250 पासेस कोणाला दिलेले आहेत ? सन्माननीय सदस्यांना पासेस मिळाले नाहीत. हे 250 पासेस कोणी नेलेले आहेत, याची माननीय अध्यक्षांनी आम्हाला माहिती देण्याची गरज आहे.

**अध्यक्ष** : 250 पासेस विधिमंळातील सन्माननीय सदस्यांकरिता होते की, सरकारसाठी होते ? एमसीए आणि राज्य शासनामध्ये कोणता करार झालेला आहे, तो मी तपासून घेणार आहे.

......7.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** औचित्याचे मुद्दे

( पुढे सुरु....

श्री. शंभुराज देसाई : अध्यक्ष महोदय, मी खालील सार्वजनिक महत्वाच्या व निकडीच्या विषयावर औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील तारळी धरणाचे काम झालेले आहे. सद्यःस्थितीत कॅनॉलचे काम सुरु आहे. कॅनॉलच्या माध्यमातून तालुक्यातील पाणी बाहेर नेले जाणार आहे. परिणामी या कॅनॉलच्या कामाला स्थानिक लोकांचा प्रचंड विरोध आहे. माननीय जलसंपदा राज्यमंत्री आणि आमच्या जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. विजय शिवतारे यांनी प्रत्यक्ष घटनास्थळाची पाहणी केलेली आहे. त्यावेळी त्यांनी स्थानिक जनतेला 6 महिन्यामध्ये उर्वरित क्षेत्राला पाणी देण्यासंदर्भातील प्रस्ताव राज्य शासन आणि कृष्णा खोरे विकास महामंडळाकडे सादर केला जाईल असे आश्वासन दिले होते. सद्यःस्थितीत असा कोणताही प्रस्ताव सादर झालेला नाही. कॅनालचे काम सुरु असताना त्यामधून उत्खनन झालेले आहे. संबंधित कार्यकारी अभियंता आणि ठेकेदार यांच्या संगनमताने कमी रॉयल्टी भरुन संबधित ठेकेदार गौण खनिज घेऊन जात आहे. यासंदर्भात मी लेखी पत्र दिलेले आहे. त्या अनुषंगाने मला उत्तर देण्यात आले होते. मला देण्यात आलेल्या उत्तरात भरलेली रॉयल्टी आणि उचलण्यात आलेल्या गौण खनिजामध्ये खूप मोठी तफावत असल्याचे माझ्या निदर्शनास आले होते.

अध्यक्ष महोदय, माननीय अध्यक्षांच्या माध्यमातून मी शासनाला अशी विनंती करीत आहे की, संबंधित ठेकेदाराने शासनाची रॉयल्टी बुडवून जास्त प्रमाणात उत्खनन करुन गौण खनिज घेतलेले आहे. या ठेकेदारास संबंधित कार्यकारी अभियंत्यांनी मदत केलेली आहे. त्यामुळे दोघांवर शासनाने तत्काळ कारवाई करावी, अशी माझी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाकडे मागणी आहे.

-------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राजेश क्षीरसागर : अध्यक्ष महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर आहे. कोल्हापूर महानगरपालिकेच्या हद्दीत विनापरवाना वाणिज्य व औद्योगिक कारणामुळे ....

**अध्यक्ष** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, हा पॉईंट ऑर्डर होऊ शकत नाही. आता सभागृहात जे कामकाज चालू आहे, त्यामध्ये काही त्रुटी असल्यास त्या आपण निदर्शनास आणून देऊ शकता.

आता लक्षवेधी सूचना क्रमांक 1 चर्चेला घेण्यात येईल.

T-1........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : विदर्भातील शेतकऱ्यांना सूक्ष्म सिंचन योजनेचा लाभ मिळावा याकरिता ठिबक आणि तुषार संचाचे गेल्या तीन वर्षापासून 87 कोटी रूपयांचे अनुदान न मिळणे

**मु. शी.** : विदर्भातील शेतकऱ्यांना सूक्ष्म सिंचन योजनेचा लाभ मिळावा याकरिता ठिबक आणि तुषार संचाचे गेल्या तीन वर्षापासून 87 कोटी रूपयांचे अनुदान न मिळणे या संबंधी डॉ.संजय रायमुलकर, सर्वश्री राहूल बोंद्रे, हर्षवर्धन सपकाळ, डॉ.संजय कुटे, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. राहूल बोंद्रे (चिखली) : अध्यक्ष महाराज, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"विदर्भातील शेतकऱ्यांना सूक्ष्म सिंचन योजनेचा लाभ मिळावा याकरिता विदर्भ सिंचन विकास कार्यक्रम सुरु करण्यात येणे, बुलडाणा जिल्ह्यातील २८१८० शेतकऱ्यांचे ठिबक आणि तुषार संचाचे गेल्या तीन वर्षापासूनचे ८७ कोटी रूपये अनुदान अद्याप मिळाले नसल्याची बाब माहे मार्च,२०१६ दरम्यान निदर्शनास आलेली असणे, सतत तीन वर्षांपासून जिल्ह्यामध्ये दुष्काळ पडत असून अशा परिस्थितीत शासन शेतकऱ्यांचे अनुदान देत नसणे, या अनुदानासाठी ३ वर्षांपासून वाट पहावी लागत असणे, या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांनी अगोदर पूर्ण रक्कम देऊन संच विकत घेतल्यानंतर अनुदानासाठी प्रस्ताव सादर करण्याच्या योजनेतील नव्या अटीमुळेही शेतकरी कर्जबाजारी होणे, ठिबक आणि तुषार संचाचे थकीत अनुदान ८७ कोटी हे व्यापारी व उद्योजकांना देत असल्याचे सांगत सदर अनुदान देण्यास नकार देणे, परंतु सदर अनुदानाची रक्कम ही प्रत्यक्ष शेतकऱ्यांनाच देणे आवश्यक असल्याचे उघडकीस येणे, या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी नागपूर येथील सन २०१५च्या हिवाळी अधिवेशनात केलेले ठिय्या आंदोलन, तसेच अनुदानाचे ८७ कोटी रुपये मिळावेत या मागणीचे मा.मुख्यमंत्री यांना निवेदन देऊनही शासनाने कोणतीच कार्यवाही न केल्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष,

...2



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राहूल बोंद्रे...

त्यामुळे अनेक शेतकऱ्यांची आत्महत्या करण्याची होत असलेली मानसिकता, यामुळे येथील शेतकऱ्यांचे ठिबक आणि तुषार संचाचे शासनाने कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे अनुदान देण्याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. एकनाथराव खडसे ( महसूल मंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**अध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

-------------------

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राहूल बोंद्रे : अध्यक्ष महाराज, बुलडाणा जिल्ह्यातील 28 हजार शेतकऱ्यांना न्याय मिळण्याच्यादृष्टीने ही लक्षवेधी सूचना आपण स्वीकृत केली त्याबद्दल मी मनापासून आपले आभार व्यक्त करतो. बुलडाणा जिल्ह्यातील 28 हजार शेतकऱ्यांचे 87 कोटी रुपयांचे ठिबक आणि तुषार सिंचनाचे अनुदान मिळाले नाही. मंत्री महोदयांनी या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात असे म्हटले आहे की, पूर्व संमती न घेतल्यामुळे या शेतकऱ्यांना अनुदान दिले नाही. माझी "पूर्व संमती" या शब्दावरच हरकत आहे. एखाद्या आर्थिक वर्षामध्ये जर कोणी अर्ज केला असेल आणि त्या वर्षाच्या सुरुवातीला मान्यता दिली तर ती पूर्व संमती आहे. सन 2015-2016 या आर्थिक वर्षात 17995 शेतकऱ्यांनी ठिबक आणि तुषार सिंचनासाठी अर्ज केले. त्यानी एप्रिल, मे, जून महिन्यापर्यंत शासनाच्या पूर्व संमतीची वाट पाहिली परंतु ती मिळाली नाही. त्यानंतर त्या शेतकऱ्यांनी संच विकत घेतले आणि आपल्या शेतात बसविले. या अर्जांना पूर्व संमती आता 10 मार्च पासून मिळायला सुरुवात झाली. आज या आर्थिक वर्षाचा शेवटचा दिवस 31 मार्च आहे. सन 2015-2016 मध्ये 17 हजार अर्ज पूर्व संमतीसाठी आले होते, त्यापैकी 1500 अर्जांना फक्त पूर्व संमती दिली. सन 2011 ते 2013 या कालावधीतील ज्या शेतकऱ्यांनी अर्ज केले त्या सर्वांना पूर्व संमती मिळाली म्हणून शेतकऱ्यांनी हे गृहित धरले की, यावर्षी ती पूर्व संमती मिळणार आहे. 28 हजार शेतकऱ्यांनी ठिबक आणि तुषार सिंचनासाठी अर्ज केले होते, त्यांना वर्षाच्या शेवटी पूर्व संमती दिली. ज्या शेतकऱ्यांनी या वर्षामध्ये अर्ज केले आणि त्यांना वर्षाच्या सुरुवातीला पाच, आठ महिन्यापर्यंत पूर्व संमती मिळाली नव्हती म्हणून त्यांनी संच विकत घेतले आणि आपल्या शेतामध्ये बसविले. यावर्षी शेतकऱ्यांना समर्पित केलेला हा अर्थसंकल्प असल्यामुळे ज्या शेतकऱ्यांनी पूर्व संमती घेतली नाही त्यांना विशेष बाब म्हणून शासन अनुदान देणार आहे काय? या लक्षवेधी सूचनेच्या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "सन 2014-2015 मध्ये जे अनुदान आले होते ते त्या आर्थिक वर्षातील शेतकऱ्यांना न देता, ज्यांनी सन 2013-2014 मध्ये पूर्व संमती घेतली नसताना अनुदान ज्या अधिकाऱ्यांनी वितरित केले आहे," त्यांचेवर आपण काय कारवाई करणार आहात?

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महाराज, ठिबक आणि तुषार सिंचन पध्दती काही वर्षापूर्वी राज्य सरकारने आखून दिलेली आहे. यापूर्वी सन 2013 पर्यंत अशा स्वरुपाच्या अर्जांना मंजुरी मिळण्याअगोदर ठिबकच्या कंपन्या परस्पर ठिबक सिंचनाचे संच शेतात बसवित होते, त्यानंतर

..4



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राहूल बोंद्रे...

त्याला मान्यता मिळत असे. त्यानंतर पंचायत समितीमार्फत शासनाकडे बिल सादर केल्यानंतर पंचायत समितीकडे ते पैसे येत असत आणि परस्पर ते कंपन्यांना दिले जात होते. त्यानंतर कंपन्यामध्ये भ्रष्टाचार होत असल्याचे लक्षात आल्यानंतर अनेकवेळा ठिबक संच बसविले नसताना पैसे दिले गेले. अनेकवेळा ठिबक सिंचन दुसऱ्याच्या नावावर आणि तिसऱ्याच व्यक्तिच्या नावावर अनुदान दिले गेले. अशी मोठ्या प्रमाणावर उदाहरणे लक्षात आल्यामुळे राज्य सरकारने त्यावेळी ही सिस्टीम बदलण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर सरकारने ऑन लाईन अर्ज मागविण्याची पध्दत सुरु केली. यासाठी नोकरी करणारा, मजूर, आमदार कोणीही अर्ज करु शकतो, त्यासाठी कोणतेही बंधन नाही. ऑन लाईन अर्ज केल्यानंतर त्या अर्जाची छाननी करणे, कागदपत्रे नीट आहेत की नाही ते तपासणे, ते नियमात बसते की नाही हे पाहणे, छाननी झाल्यानंतर स्थळ निरीक्षण करणे, अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष त्या शेतावर जाऊन पाहणी करणे, शेती नसताना सुध्दा अर्ज करण्याची मुभा आहे, प्रत्यक्ष शेती आहे की नाही, सिंचनाची व्यवस्था आहे की नाही, तेथे कोठल्या विहिरीवरुन, कॅनॉलवरुन पाणी घेणार आहे ही सर्व माहिती संबधित अधिकारी घेईल. यासाठी दोन हेक्टर जमिनीची अट आहे. त्यानंतर तसा अहवाल पंचायत समितीकडे सादर केल्यानंतर जो कोटा दिलेला आहे, त्या अंतर्गत पंचायत समिती मान्यता देते. पंचायत समिती, जिल्हा परिषद किंवा कृषी विभाग यांनी मान्यता दिलेली आह, अशा मान्यताप्राप्त प्रस्तावांनाच फक्त अनुदान दिले जाते. ज्याला शासनाने मान्यता दिलेली आहे असे एकही प्रकरण थांबणार नाही. सन 2013 पासून ते सन 2015 पर्यंत या तीन वर्षामध्ये मागील सरकारने अनुदान दिलेले नव्हते. ते अनुदान थकलेले होते, त्यामुळे आपले सरकार आल्यानंतर मागील तीन वर्षाचे अनुदान 750 कोटी रुपये आम्हाला द्यावे लागले. आता नवीन प्रक्रिया सुरु करावयाची असून ती उशिरा सुरु झालेली आहे. राज्य सरकारने ज्याला पूर्व मान्यता दिलेली आहे असे एकही प्रकरण अनुदनाविना राहणार नाही, परंतु ज्याला सरकारने मान्यता दिलेली नाही, कोणत्याही स्टेजला मान्यता दिलेली नाही, फक्त अर्ज आले आणि कंपनीने परस्पर सिंचनाचे संच बसविले तो कंपनी आणि शेतकरी यांच्यामधील व्यवहार आहे. सरकारच्या मान्यतेने तो व्यवहार झालेला नाही त्यामुळे ते शेतकरी अनुदानास पात्र ठरत नाहीत.

...5



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हरिष पिंपळे : अध्यक्ष महाराज, विदर्भातील बुलडाणा जिल्हा हा आत्महत्याग्रस्त जिल्हा आहे. शेतकऱ्याला पाणी कमी असल्यामुळे ठिबक सिंचन, तुषार सिंचन करणे आवश्यक आहे. आपल्या सरकारने हे वर्ष शेतकऱ्यांना समर्पित केलेले आहे. सरकारने यामध्ये पारदर्शकता आणण्यासाठी ऑन लाईन पध्दतीने अर्ज मागाविण्यास सुरुवात केली. सन 2014 ते 2016 या कालावधीत तुषार सिंचन आणि ठिबक सिंचनासाठी शेतकऱ्यांनी कर्ज काढून, बायकोचे सोने गहाण ठेवून हे संच शेतात लावलेले आहेत. ज्या शेतकऱ्यांनी तुषार सिंचन, ठिबक सिंचन कंपन्यांकडून घेतले असेल त्यांना विशेष बाब म्हणून अनुदान देऊन त्या शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे काम शासन करणार आहे काय, याबाबत कृपया मंत्री महोदय खुलासा करतील काय ?

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महाराज, विदर्भ, मराठवाडा आणि खानदेश असा प्रश्न नाही. हा भावनात्मक प्रश्न नाही. ज्याला आम्ही मान्यताच दिलेली नाही अशी प्रकरणे केवळ विदर्भातच आहेत असे नाही तर राज्यभरामध्ये अशी प्रकरणे आहेत. मान्यता न घेता परस्पर संच विकत घेऊन कोणी बसविले असतील आणि तो विदर्भावर अन्याय होतो असे म्हणत असाल तर ते संयुक्तिक नाही.

**( अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.योगेश सागर)**

यानंतर U-1.... ..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे ....

राज्य सरकारची भूमिका स्पष्ट आहे. ज्यांना सरकारने मान्यता दिलेली आहे, त्यांना द्यावेच लागणार आहे आणि ते दिलेही आहेत. मागच्या सन 2013 पासूनचे राहिलेले पैसेही आपण आता दिलेले आहेत. आपण जे म्हणत आहात त्यासाठी सरकारला आणखी जवळपास हजार कोटी रुपये लागणार आहेत. ज्याला मान्यता दिली नाही, अशासाठी हजार कोटी रुपये लागणार आहेत. तुमचे अनुदान थकलेले होते असे साडेसातशे कोटी रुपये आम्ही दिलेले आहेत. पूर्वीचे राहिलेले साडेसातशे कोटी रुपये द्यायचे ? प्रत्यक्षात 3 वर्षांपूर्वी ठिंबक संच बसविले असतील तर, कंपनीचेच भले होणार आहे ते पैसे काही शेतकऱ्याला मिळणार नाहीत. तरीही सन्माननीय सदस्य श्री. हरिष पिंपळे यांनी केलेल्या मागणीचा सहानुभूतीने विचार करू. किती मदत देता येईल याबाबत सांगावयाचे झाले तर, त्यांनी प्रत्यक्षात संच बसविले आहेत की नाहीत याची खात्री करावी लागेल. कारण अनेकदा कंपन्यांनी संच बसविल्याचे दाखविले आहेत, परंतु प्रत्यक्षात ते बसविलेलेच नाहीत. त्यामुळे काही ठिकाणी नाही तर कित्येक ठिकाणी आम्ही फौजदारी गुन्हे दाखल केलेले आहेत. यामध्ये कंपनीच्या प्रतिनिधींसहीत ज्यांनी ठिंबक सिंचन संच बसविण्याबाबत फसवणूक केली, अशांवर एफआयआर दाखल करण्याची उदाहरणे आता वर्षभरातही कमी नाहीत. त्यामुळे फसवणूक करुन जर कोणी सरकारचे अनुदान लाटत असेल तर, त्या संदर्भात कारवाई तर केलीच जाईल. त्याच बरोबर त्यांनी खरोखर संच बसविले आहेत की नाहीत, ते शासनाच्या निकषात बसत आहेत की नाहीत याबाबत सरकार आणखी माहिती घेईल. जर त्यांनी ते नियमात बसवून केले असतील तर पुढे या संदर्भात किती अनुदान, कशारितीने द्यायचे याचा सहानुभूतीने विचार करता येईल.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदय सांगत आहेत ती गोष्ट बरोबर आहे की, पूर्वीचे गैरव्यवहार रोखण्यासाठी आपण ही ऑनलाईन व्यवस्था केली. मी मंत्री असतानाच्या काळात हे केले आहे. त्यावेळेस आपण थेट शेतकऱ्याच्या खात्यात ही रक्कम जमा करणे, ऑनलाईन अर्ज स्वीकारणे, ज्यामुळे गैरव्यवहार थांबतील असे निर्णय केले होते. आपण फिल्डवर 100 टक्के व्हेरिफिकेशन केले होते. त्यामध्ये या गोष्टी काही ठिकाणी आढळल्या होत्या की, ठिंबक सिंचनाचे संच नव्हते तसेच कमी क्षेत्र दाखवून अनुदान घेण्याचे प्रकार घडले होते. यामध्ये आपण काही कंपन्यांवर व डिलरवर कारवाईही केली. मंत्री महोदयांना माहीत आहे की,

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील ....

त्यांच्या जिल्ह्यातील कंपनीवरही कारवाई झाली असती परंतु, केवळ त्या कंपनीचा अनुभव वगैरे गोष्टी लक्षात घेता आपण ती कारवाई त्यावेळेस थांबविली होती.

अध्यक्ष महोदय, ठिंबक सिंचनाचे, तुषार सिंचनाचे संच बसविणे हा शेतकऱ्यांच्या दृष्टीने जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. दुष्काळाची लागोपाठ 3-4 वर्षांची परिस्थिती आहे. यापूर्वीच्या अनेक वर्षांची पध्दत आहे की, आपण पुढच्या वर्षी मागच्या वर्षाचे अनुदान द्यायचो. मंत्री महोदयांकडे एवढीच मागणी आहे की, खास बाब म्हणून याबाबत 100 टक्के व्हेरिफिकेशन करावे. योग्य ती मान्यता घेतली नसेल तर, क्रॉसव्हेरिफिकशन करावे. ज्या शेतकऱ्यांनी ठिंबक सिंचनाचे संच, तुषार सिंचनाचे संच बसविले असतील त्याची माहिती घ्यावी. या सर्व प्रकारची चौकशी करावी, आमचा चौकशी करण्यास विरोध नाही. परंतु, शेतकऱ्यांची संच बसविले असतील, तर त्यांना अनुदान देणार आहात काय ?

अध्यक्ष महोदय, गेल्या 3-4 वर्षांपासून दुष्काळाची तीव्रता खूप आहे, शेतकऱ्यांचे उत्पन्नाचे स्त्रोत संपलेले आहेत. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. हरिष पिंपळे यांनी सांगितल्याप्रमाणे शेतकऱ्यांनी दागिने गहाण ठेवून किंवा सावकारांकडून कर्ज घेऊन वगैरे हे संच बसविले असतील तर त्याने राज्याच्या तसेच स्वतःच्या शेती उत्पादनात भर घातलेली आहे. त्यामुळे राज्य सरकाने याबाबतीत एक विशेष बाब म्हणून 100 टक्के चौकशी करावी, व्हेरिफिकेशन करावे व त्यानंतर अनुदान देण्याबाबत विचार करावा, आपण तो करणार आहात काय ?

श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, मी मघाशीच सांगितले आहे की, सरकारची परवानगी घ्यायचीच नाही, सरकारने मान्यता दिलेली नाही, कंपन्यांनी परस्पर उद्योगधंदे करायचे, परस्पर नफा कमवायचा आणि 3 वर्षांनंतर सरकारला पैसे देण्यास सांगायचे, हे कितपत योग्य आहे ? सन 2013, सन 2014 व सन 2015 या कालखंडातील साडेसातशे कोटी रुपयांचे राहिलेले अनुदान आम्ही आता दिले आहे. हा प्रश्न केवळ विदर्भापुरता नाही तर, राज्यभरामध्ये आहे. कंपन्या काय करतात, तर कोणाला ठिंबक पाहिजे आहे, त्याची माहिती घेत राहतात. ज्यांना ठिंबक पाहिजे आहे त्यांच्याकडून फॉर्म भरून घेतात. कंपन्या अगोदर ठिंबक टाकून देतात आणि नंतर अधिकाऱ्याला भेटून सांगतात की, आमचा प्रस्ताव घे, आम्ही एकत्र गठ्ठा करतो, वरच्या

..3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे ....

अधिकाऱ्यांकडे जातो, तेथून तो मंजूर करुन आणतो, ही पध्दत होती. आता आपण त्या पध्दतीस आळा घातला आहे, ते बंद केले. आता ऑनलाईन अर्ज आल्यानंतर ऑनलाईन पैसे जमा होतात. कंपन्यांच्या नावाने आपण पैसा देत नाही. पूर्वी कंपन्यांना सर्व पैसा जात होता. जेवढा पैसा आला ते करोडो रुपये कंपन्यांच्या खात्यावर जमा केले. सरकार ते बंद केले असे फक्त म्हणायचे. ते म्हणायचे याला मान्यता आहे, एवढे पैसे सबसिडी देणे याला अनुज्ञेय आहे. कंपनीने ते दिले असल्यामुळे ते पैसे कंपनीच्या खात्यावर जमा केले जायचे किंवा शेतकरी त्या कंपनीला द्यायचा. आता यामध्ये गैरव्यवहार होतो, संच बसविले नसताना पैसे दिले जातात, अनुज्ञेय क्षेत्र नसताना पैसा दिला गेला असे आढळल्याने आपण पूर्वसंमतीची अट घातली. हा पैसा जो मंजूर होतो तो आरटीएसद्वारे सरळ त्याच्या खात्यावर जमा करण्याची प्रक्रिया सुरु केली. त्यामुळे आता कंपन्यांना पैसे मिळतच नाहीत. त्यांना जे करोडो रुपये मिळत होते, त्याला प्रतिबंध बसला परत ती पध्दत सुरु करण्यासारखा हा प्रकार होईल. आम्ही संमती दिली नाही, आम्ही काही केले नाही तरी हजार कोटी रुपये द्या, त्यामुळे राज्य सरकारला हे ठरवावे लागेल की, अशा अनियमितता नियमित करीत असताना आपण पूर्वीचेच असे उद्योग राज्यात परत सुरु करायचे काय ? परत त्या कंपन्यांना संरक्षण द्यायचे काय ? मी शेतकऱ्यांच्या बाजूने आहे परंतु, हा पैसा सरळ कंपन्यांना जाणार आहे. यापुढे असा जरी सरकारने विचार केला तरी मी ही बाब तपासून घेईन, योग्य असेल त्या त्या प्रकरणाच्या संदर्भात आवश्यकता असेल तर सरकार अनुदान देण्याच्या बाजूनेही राहील. पुढे जर अनुदान द्यायचे असेल तर ते शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केले जाईल ते कंपनीला दिले जाणार नाही, याचीही काळजी सरकार घेईल.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, काही शेतकऱ्यांनी एप्रिल, मे, जून महिन्यामध्ये ऑनलाईन अर्ज केला परंतु, त्यांना पूर्वसंमती मिळाली नाही. आपण अंतिमतः मार्च महिन्यामध्ये त्याला पूर्वसंमती देण्यासंदर्भात निर्णय घेतला. 6 ते 8 महिने पूर्वसंमती घेण्यासाठी त्या जिल्ह्याकडून, खात्याकडून किंवा संबंधित अधिकाऱ्यांच्या पातळीवर विलंब झाला असेल मात्र शेतकऱ्यांनी ऑनलाईन अर्ज केलेले आहेत. 6 ते 8 महिने पूर्वसंमती घेण्यासाठी शेतकरी कसा

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील ....

काय थांबणार ? शेवटी परिस्थिती गंभीर आहे. आपल्याला कल्पना आहे की, शेतकरी काही थांबणार नाही. तो संच बसविणार. परंतु, त्या शेतकऱ्यांनी ऑनलाईन अर्ज केले आहेत, किमान त्यांच्या बाबतीत तरी आपण विचार करणार काय ?

श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, ऑनलाईन अर्ज करणाऱ्यांची संख्या पावणेदोन लाखाच्या आसपास आहे. त्यांना अनुदान द्या असे सांगितले तर, या ऑनलाईन अर्ज करणाऱ्या पावणेदोन लाख शेतकऱ्यांना ते देणे शक्य नाही. मी सांगितले आहे की, ज्यांनी खरोखर संच बसविले असतील, त्याची आम्ही तपासणी करु. त्यामध्ये सरकारला जर योग्य वाटले तर कारण शेवटी हजार कोटी रुपयांचा प्रश्न आहे. हजार कोटी रुपये देण्यासही हरकत नाही, मान्यता असेल तर शेतकऱ्यांचा तो अधिकार आहे, त्याला ते दिले पाहिजेत. मात्र मान्यता नसताना, काहीही नसताना, आम्ही कोणत्याही कागदाला मान्यता दिली नाही, स्वीकारले नाही, आमचा अधिकारी गेला नाही, तुम्ही संच बसविला आहे की नाही हे माहीत नाही असे असताना त्याला पैसे द्या, असे म्हणणे नियमाला धरुन होणार नाही. यासाठी आम्ही खात्री करु. विचार जरुर करु. शेतकरी आहे, त्याला मदत केली पाहिजे हा विचार जरुर करता येईल. परंतु, संपूर्णतः खात्री केल्याशिवाय आणि त्या खात्रीमध्ये ते खरोखरच परिस्थितीमध्ये बसत असेल तर राज्य सरकार याचा जरुर सहानुभूतीने विचार करील.

डॉ. शशिकांत खेडेकर : अध्यक्ष महोदय, सूक्ष्म सिंचन संच बसविण्यासाठी सन 2013-2014 मध्ये 6005 शेतकऱ्यांच्या अर्जांना संमती होती. त्यांना शासनाकडून 1850 कोटी रुपये अनुदान देणे अपेक्षित होते. ते त्यांना न देता सन 2014-2015 मध्ये 20.14 कोटी रुपयांचे मंजूर अनुदान देण्यात आले. सन 2013-2014 मधील मंजूर अनुदान 1850 कोटी रुपये हे शासनाकडे देणे आहे काय ?

अध्यक्ष महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या लेखी निवेदनामध्ये असे नमूद केले आहे की, सन 2013-2014 मध्ये संमती दिलेल्या पात्र अर्जांची संख्या 6005 आहे, त्यांना 1850 कोटी रुपये देणे होते. परंतु, ते न देता सन 2014-2015 मध्ये 19.56 कोटी रुपये सन 2013-2014 मधल्या शेतकऱ्यांना देण्यात आले.

V-1/-...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. शशिकांत खेडेकर.....

असे असताना 2013-2014 मधील 18.50 कोटी रुपयांचे अनुदान कुठे गेले. हे देणे बाकी आहे काय, असा माझा प्रश्न आहे. हे देणे असेल तर आमच्या उर्वरित शेतकऱ्यांचे, ज्या शेतकऱ्यांनी खरोखरच एखाद्या दुकानातून संच विकत घेतला असेल, त्याची पावती त्या शेतकऱ्याने दिली, तर त्याचा आम्ही निश्चितपणे विचार करु, असे आपण सांगितले. असे करणार असाल तर किती दिवसामध्ये करणार आहात, असा माझा आपल्या मार्फत मंत्री महोदयांना प्रश्न आहे.

श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, मी मघाशीच सांगितले की, ती संख्या संमती दिलेल्यांची आहे. ज्याला संमती दिलेली आले, त्यांच्यापैकी कोणाचेही पैसे बाकी ठेवलेले नाही. असे कोणी राहिले असेल तर त्याला 24 तासाच्या आत पैसे देण्याची व्यवस्था करण्यात येईल. ज्याला संमतीच नाही, मान्यताच नाही, त्याने विचारले देखील नाही. परस्पर बाजारात जाऊन एखादी वस्तु घेऊन बसविण्यात आली. आता एका वर्षानंतर नव्हेतर तीन वर्षानंतर सरकारला म्हणत आहे की, आम्ही ते बसविले असून आम्हाला अनुदान द्यावे. या दृष्टीने योग्य होणार नाही. तरीही मी मघाशी सांगितले. या संदर्भात खात्री करण्यात येईल. तीन वर्षापूर्वी बसविलेल्या संचाबाबत आज सांगणे, त्याबाबत सरकारला माहीत नाही, त्याची मान्यता नाही, आमचे अधिकारी कुठे गेले नाही, त्या ठिकाणी विहीर होती किंवा कसे हे माहीत नाही आणि त्याला पैसे द्यायचे. त्यामुळे मी सांगू इच्छितो की, खात्री केल्याशिवाय हे केले जाणार नाही. सहानुभुतीने नक्की विचार करण्यात येईल. आवश्यकता असल्यास पॉझीटीव्ह व योग्य निर्णय घेण्यात येईल. त्यांचे अनुदान देण्यासाठी प्रयत्न केला जाईल.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांची बॉडी लँगवेज हा निधी देण्याची मला तरी दिसत नाही. त्यांची भाषा पॉझीटीव्ह आहे. आपण मागेल त्याला शेततळे देणार आहात. ऑन लाईन अर्ज करणाऱ्या प्रत्येकाला न्याय देण्याची आपली भावना आहे. मी मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छितो. आपण का पैसे दिलेले नाही...(अडथळा)...ही शेतकऱ्यांच्या संदर्भातील चर्चा असून तुम्ही आणि आम्ही हा विषय नाही. 2014-2015 मधील प्राप्त अर्जांपैकी बुलडाणा जिल्ह्यात कोणत्याही अर्जास निधी अभावी संमती देण्यात आली नाही. अर्ज करणाऱ्यांनी अर्ज केले. केवळ शासनाकडे निधी नसल्यामुळे आपण त्यांना संमती दिली नाही.

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील.....

अध्यक्ष महोदय, आज दुष्काळ आहे. मराठवाड्याच्या सर्व भागामध्ये दुष्काळ आहे. सन्माननीय सदस्य श्री. राहूल बोंद्रे यांच्या बुलडाणा जिल्ह्यातील सर्व भागामध्ये दुष्काळ आहे, तसेच अमरावतीला दुष्काळ आहे. या सर्व भागामध्ये दुष्काळ आहे. सद्या मी सर्व महाराष्ट्राचा विषय घेत नाही. परंतु जेथे पाणी नाही, हे सिद्ध झालेले आहे. तसेच 50 पैशापेक्षा कमी आणेवारी आहे, त्या ठिकाणी यापूर्वी आलेल्या अर्जाचा तातडीने निपटारा केला पाहीजे. आपण याची खात्री करावी. ज्या ठिकाणी संच असेल व त्याचे बीलेही असेल, असे दोन्हीही व्हेरीफाय करावे. आमच्या सरकारवर शेतकऱ्यांचा एवढा दुर्दम्य विश्वास होता की, आपण संच बसविले की, सरकार पैसे देणार, अशी त्यांना खात्री होती. याबाबत खात्री करावी. ज्या ठिकाणी 50 पैशापेक्षा कमी आणेवारी आहे, त्या ठिकाणी किमान येणाऱ्या मे महिन्याच्या आत तातडीने पैसे देण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे काय, तसेच राहिलेल्या निधीची टप्प्याटप्प्याने खात्री करुन उर्वरित पैसे देखील ऑगस्ट महिन्याच्या आधी देण्यात येईल काय, असे माझे आपल्या मार्फत मंत्री महोदयांना प्रश्न आहे.

श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांचा मी अत्यंत आभारी आहे. ते यासाठी की, त्यांनी अत्यंत आस्थेने व तळमळीने शेतकऱ्यांचा प्रश्न या ठिकाणी मांडला. मी त्यांच्या लक्षात हेही आणून देतो की, ते त्या कालखंडात अर्थमंत्री होते. हा या वर्षीचा प्रश्न नाही...(अडथळा)...ठीक आहे. आपण सरकारमध्ये होतात. हा प्रश्न 2012-2013 मधील आहे. 2012-2013, 2013-2014, 2014-2015 या तीन वर्षातील हा प्रश्न आहे. आपण आता जेवढी आस्था दाखविली ती त्यावेळी दाखविली असती तर कदाचित मला उत्तर देण्याची वेळ आली नसती. मी वारंवार सांगत आहे. तुमच्या काळातील तीन वर्षामधील पहिले पैसे म्हणजेच ज्याला संमती दिलेली आहे, परंतु 2012-2013, 2013-2014, 2014-2015 मधील पैसे दिलेच नव्हते. रुपयाही दिला नव्हता. ते पैसे आपण मागील महिन्यात दिले. म्हणजेच आपण मागील देणे आता दिले. तुमच्या काळातील संमती दिलेले पैसे तीन वर्षात झीरो, झीरो आले. शेतकऱ्यांना मागील तीन वर्षात ठिबकचा एक रुपयासुद्धा दिला गेला नव्हता, तो पैसा आपण आता दिला...(अडथळा)...दिले असतील तर किंवा चुकीची माहिती असेल तर आपण माझ्यावर हक्कभंग आणावा. ते पैसे आम्ही आता दिले. संमती असलेले पैसे आम्ही लगेच दिले. मागील तीन वर्षाचे व

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे.....

आताचेही दिले. त्यामुळे मी वारंवार सांगत आहे की, यासंदर्भात खात्री करण्यात येईल. ही बाब नियमात नाही. याला कुठलाही आधार नाही, यामधून कंपन्यांचेच भले होणार आहे, हे माझ्या लक्षात येते. कंपन्यावाले मला भेटले.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. शेतकऱ्यांनी कर्ज काढून संच बसविलेले आहेत. त्यांनी कंपन्यांना पैसे दिलेले आहेत. त्यामुळे माझी मंत्री महोदयांना विनंती आहे...(अडथळा)...आम्ही नाही दिले म्हणून तर इकडे बसलो आहे. परंतु तुम्हाला इकडे येण्याची इच्छा जास्त दिसत आहे. त्यामुळे तुम्ही देखील पैसे देत नाही. असेच करीत राहीले तर साईड पलटायला वेळ लागणार नाही. यामध्ये कंपन्यांचे भले होणार नाही. आपण कंपन्यांच्या अकाऊंटवर पैसे ट्रान्सफर करावेत. कंपन्यांना पैसे द्यावे, असे सन्माननीय सदस्य श्री. राहूल बोंद्रे व इतर कोणीही सदस्य म्हणत नाही. संच बसविलेल्या शेतकऱ्यांच्याच खात्यावर पैसे ट्रान्सफर करण्यात यावे.

श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांच्या तत्कालीन सरकारने तीन वर्षात दमडी दिली नसली तरी, तुम्ही रुपया दिला नाही, नवा पैसा दिला नाही, शुन्य रुपये दिले तरी, या शेतकऱ्यांना कशी मदत करता येईल, हे तपासून नक्की कार्यवाही केली जाईल...(अडथळा)... तुम्ही निश्चिंत रहावे. मला अनेक कंपन्यांनी विनंती केली की, काही करा खडसे साहेब पण आमचे पैसे काढून द्या. हा पैसा द्यायचा असेल तर शेतकऱ्यांच्या थेट खात्यामध्ये जमा करता येईल.

(काही सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

**तालिका सभाध्यक्ष :** लक्षवेधीत नाव असणे हे ठीक आहे. परंतु आपले नेते हात वर करतात तेव्हा त्यांना थांबविता येत नाही. नेत्यांनी एक प्रश्न विचारल्यानंतर त्यावर पुन्हा उप प्रश्न तयार होतो व तेव्हा पुन्हा उप प्रश्नावर बोलण्याची संधी द्यावी लागते. कोणीही सदस्य असले तरी गट नेत्यांनी हात वर केल्यास त्यांना संधी द्यावी लागते.

श्री. हर्षवर्धन सपकाळ : अध्यक्ष महोदय, हा आमच्या जिल्ह्यातील स्पेसिफिक विषय आहे. जिल्ह्याच्या अनुषंगाने अधिकची माहिती पटलावर ठेवायची इच्छा आहे. स्पेसिफिक बाबीवर गट नेते बोलले, त्याबद्दल आमचे काही म्हणणे नाही.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभाध्यक्ष** : तुमच्या नेत्यांनी प्रश्न विचारल्यानंतर आपण तसे करायला पाहीजे. ही लक्षवेधी 1 वाजून 20 मिनिटांनी सुरु झाली होती. आता 1 वाजून 48 मिनिटे झालेले आहेत. या लक्षवेधीला 28 मिनिटे झाली आहेत. मी मंत्री महोदयांना विनंती करतो की, या लक्षवेधीमध्ये सन्माननीय सदस्य श्री. हर्षवर्धन सपकाळ व डॉ. संजय कुटे या दोन सदस्यांची नावे राहिली असून त्यांच्या प्रश्नांचे उत्तर देण्यात यावे. मी सन्माननीय सदस्य श्री. हर्षवर्धन सपकाळ यांना सांगू इच्छितो की, आपले प्रश्न असल्यास आम्हाला प्रश्न विचारण्याची संधी द्यावी, अशी आपण आपल्या सन्माननीय गट नेत्यांनी विनंती करावी.

...W/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हर्षवर्धन सपकाळ : अध्यक्ष महोदय, आपण मला लक्षवेधीवर प्रश्न विचारण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

अध्यक्ष महोदय, कृषी मंत्री महोदय दरवर्षी शिस्त लावण्याचा प्रयत्न करतात त्याबद्दल प्रथम मी त्यांचे अभिनंदन करतो. ठिबक व तुषार संचाचे अनुदान माहे मार्च मध्ये वितरीत करण्यात येते त्यासंदर्भात शिस्त लावून ते वेळेत वितरीत करण्यात येईल काय ? बुलडाण जिल्ह्यातील 28,106 शेतकऱ्यांनी ठिबक संच लावून अनुदानाची मागणी केली असून त्यांना निधी अभावी अनुदान देणे शासनाला शक्य झाले नव्हते ते अनुदान वितरीत करण्यात येईल काय, मदत व पुनर्वसन मंत्री महोदय आत्महत्याग्रस्त जिल्ह्याला, कृषी मंत्री महोदय शेतकऱ्यांना, पालक मंत्री पाल्यांना व बुलडाणा जिल्ह्याचे जावई बुलडाणा जिल्ह्यील कास्तकारांना अनुदान देणार का ?

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, सदरहू प्रकरणी ज्या प्रस्तावांना मान्यता प्राप्त झाली होती त्या 100 टक्के प्रस्तावांचे अनुदान देण्यात आले आहे. त्यांच्या पैकी कोणास अनुदान देण्याचे राहून गेले असेल तर ती बाब आपण लक्षात आणून द्यावी, त्यांना 24 तासांच्या आत अनुदान देण्यात येईल. पूर्वीच्या पध्दतीनुसार मार्च महिन्याच्या शेवटी अनुदान देण्यात येत होते. परंतु यापुढे याप्रकरणी ऑन लाईन व आरटीएस पध्दतीने अनुदान देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पूर्वी मार्च महिन्यात अनुदान देण्यापूर्वी संच बसविण्यात येत होते व त्यानंतर संबंधित कंपनीस पैसे देण्यात येत होते. आता असे न करता वर्षभरात संबंधित व्यक्ती केव्हाही अनुदानासाठी पात्र झाला व त्याच्याकडून संच बसविण्याचा दाखला प्राप्त झाल्या तर त्याला उपलब्ध निधीनुसार अनुदान देण्याच्या सूचना देण्यात येतील.

अध्यक्ष महोदय, सिंचनाचे तीन प्रकार होते. सिंचनाचे एवढेच प्रकार नसून या व्यतिरिक्त आदिवासी, बिगर आदिवासी, अनुसूचित जाती यांच्या अनुदानाच्या फरकाच्या रकमा आहेत. विदर्भ सिंचन विकास कार्यक्रमांतर्गतचे अनुदान मागील कालखंडात केंद्र शासनाकडून प्राप्त झाले नव्हते त्यामुळे ते देण्यात आले नाही. माननीय मोदी साहेबांचे सरकार आल्यानंतर सदरहू अनुदान एकरमी प्राप्त झाल्यामुळे ते एकरकमी देणे शक्य झाले. यापुढे राज्य सरकारकडून देण्यात येणारे

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे......

अनुदान मार्च महिन्याच्या आत देण्याची व्यवस्था करण्यात येईल. याप्रकरणी मी सांगितले होते की, नियमात बसत नसले तरी मी स्वतः लक्ष घालून खात्री करीन व पात्र लाभार्थींना अनुदान देण्यासंदर्भात सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात येईल.

डॉ.संजय कुटे : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री श्री.नाथाभाऊ यांनी लक्षवेधीला सकारात्मक उत्तर दिले आहे. मी एक बाब त्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छित आहे. त्यांनी मागील 5-7 वर्षातील ठिबक सिंचन संदर्भातील रेकॉर्ड तपासले तर काही वर्षापूर्वी बारामती तालुक्यात एका महिन्यात 200 कोटी रुपयांचे ठिबक सिंचनचे प्रस्ताव मान्य केले होते. त्यावेळी ठिबक सिंचनचे तेवढे टार्गेट नव्हते. राज्यातील इतर जिल्ह्यामध्ये त्यावेळी सदर योजनेचा निधी खर्च झाला नव्हता व त्यामुळे तो शेवटच्या क्षणी बारामती तालुक्यातील शेतकऱ्यांच्या ठिबक सिंचनाच्या प्रस्तावांना मंजूरी देऊन खर्च करण्यात आला.

अध्यक्ष महोदय, ठिबक सिंचन ही चांगली योजना आहे कारण शेतकऱ्यांना कमी पाण्यामध्ये चांगले पीक घेता येते. मला माहिती आहे जेवढे टार्गेट बुलडाणा जिल्ह्यासाठी दिले होते तेवढे पैसे दिले हे मला मान्य आहे. बुलडाणा जिल्हा आत्महत्याग्रस्त जिल्हा आहे, तेथे पाण्याची टंचाई आहे, दुष्काळग्रस्त जिल्हा आहे तेथे सिंचनाच्या कोणतीही व्यवस्था नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी पाण्याची कमतरता असल्याने स्वतःहून ठिबक सिंचनाचा पर्याय निवडला. या लोकांनी चांगल्या भावनेने हा पर्याय स्वीकारला व ते लोक टार्गेटच्या बाहेरचे होते, हे मला माहिती आहे. आपल्या जिल्ह्यात आत्महत्या होऊ नये याकरिता त्या शेतकऱ्यांनी ठिबक सिंचनाचा प्रयोग केला होता. त्यामुळे योजनेसाठी टार्गेट पेक्षा अधिक लोकांनी अर्ज केले असतील तरी ..... आपण कंपन्यांना पैसे देतो किंवा ते त्यांना मिळतील... आपण त्याचे व्हेरीफिकेशन करावे. कंपन्यांच्या नावावर किंवा कंपन्याचा त्या पैशाशी कुठेच संबंध नाही, याबाबतचे व्हेरीफिकेशन शासनाने करावे. ज्या शेतकऱ्यांनी तीन वर्षापूर्वी ठिबक सिंचन केले त्याचे स्पॉट व्हेरीफिकेशन करावे. कृषी मंत्री महोदय बुलडाणा जिल्ह्याचे पालक मंत्री असल्याने त्यांनी सहानुभूतीपूर्वक विचार करुन ठिबक सिंचन केलेल्या लोकांच्या प्रस्तावावरील अनुदान द्यावे. कारण त्या शेतकऱ्यांनी चांगले काम केले आहे. ज्या

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.संजय कुटे......

शेतकऱ्यांनी ठिबक सिंचन केले नसेल त्यांना अनुदान देऊ नका. परंतु ज्या शेतकऱ्यांनी ठिबक सिंचन केले आहे त्यांना अनुदान दिले पाहिजे, अशी माझी विनंती आहे. याप्रकरणी शासन सदरहू अनुदान देणार आहे काय ?

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, डॉ.संजय कुटे यांनी ठिबक सिंचनाबाबतचा प्रश्न नव्याने विचारला आहे. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सर्व सूचनांचा विचार करण्यात येईल. त्यांनी केलेल्या सूचनांसंदर्भात आवश्यकता भासली तर पुन्हा माहिती घेण्यात येईल. त्यासंदर्भात तपासणी करु व त्यांनी सांगितल्याप्रमाणे त्या योग्य असतील तर त्यांना खात्रीपूर्वक कशी मदत करता येईल, कोणत्या रितीने करता येईल, याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात येईल. बारामती किंवा सोलापूर येथील काही प्रकरणे नियबाह्य झाले त्यामुळे फौजदारी कारवाई करावी लागली होती याची मला माहिती आहे, असे होऊ नये याची काळजी शासनाकडून घेण्यात येईल.

----------

....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : सिडकोने अनधिकृत ठरविलेल्या प्रकल्पग्रस्तांच्या घरांचे सर्वेक्षण करुन त्यांच्यावर झालेला अन्याय दूर करणे बाबत.

**मु.शी.** : सिडकोने अनधिकृत ठरविलेल्या प्रकल्पग्रस्तांच्या घरांचे सर्वेक्षण करुन त्यांच्यावर झालेला अन्याय दूर करणे यासंबंधी श्रीमती मंदा म्हात्रे व श्री.संदीप नाईक वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) : अध्यक्ष महाराज, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"सिडकोने अनधिकृत ठरविलेल्या प्रकल्पग्रस्तांच्या २० हजार घरे अधिकृत करुन घेण्याबाबत तसेच गावठाणापासून २०० मीटर हद्दीतील घरांना मान्यता देण्यासंदर्भात मा.मुख्यमंत्री महोदयांनी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये निर्देश दिले असणे, परंतु सदर निर्देशाची अंमलबजावणी सिडको व संबंधित प्रशासनाकडून करण्यात न येणे, सिडकोने अनधिकृत घरांची सर्वेक्षण न करता प्रकल्पग्रस्तांवर कारवाई करण्यात आली असणे, यामुळे प्रकल्पग्रस्तांवर अन्याय करण्यात येणे, सदर प्रकल्पग्रस्तांच्या २० हजार घरांचे सर्वेक्षण करुन व मूळ गावठाणापासूनची २०० मीटरची हद्द तसेच सिटी सर्व्हे करण्याबाबतचा आदेश देवून त्यासंदर्भात नोटिफिकेशन किंवा जीआर काढून प्रकल्पग्रस्तांवर झालेला अन्याय दूर करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.देवेंद्र फडणवीस ( मुख्यमंत्री ) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष (श्री.योगेश सागर)**: निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( **प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे ) ...5



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती मंदा म्हात्रे : अध्यक्ष महोदय, मला ही लक्षवेधी मांडण्याची संधी दिली त्याबद्दल मी तमाम प्रकल्पग्रस्त आणि भूमिपुत्रांच्यावतीने आपले मनापासून धन्यवाद व्यक्त करते. मुंबईतील गर्दी कमी करण्यासाठी नवी मुंबईसाठी ठाणे जिल्ह्यातील बेलापूर पट्टा व रायगड जिल्ह्यातील पनवेल, उरण या तालुक्यातील 95 गावातील सर्व जमिनी संपादीत केल्या आहेत. नवी मुंबईमधील अनेक शेतकऱ्यांनी व भूमिपुत्रांनी आपल्या पिकत्या जमिनी सिडकोला प्रशासनाला दिल्या.

अध्यक्ष महोदय, प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी बांधलेली घरे नियमित करावी म्हणून मी प्रत्येक वेळी सन 2004 ते 2010 या कालावधीत वरिष्ठ सभागृहात लक्षवेधी उपस्थित केली होती. याप्रकरणी तत्कालीन मंत्री महोदयांनी अनेक वेळा अनेक उत्तरे दिली आहेत. सन 2010 मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख साहेबांनी सदरहू प्रकल्पग्रस्तांची घरे नियमित करण्याचा आदेश काढला होता. त्यानंतर सन 2014 मध्ये आपले सर्वांचे लाडके व दूरदृष्टी असलेले मुख्यमंत्री महोदय यांना प्रकल्पग्रस्त भेटले होते. त्यावेळी त्यांनी त्यांच्या समस्या ऐकून घेतल्या होत्या. त्यानंतर त्यांनी सभागृहामध्ये सन 2014 मध्ये निवेदन केले की, सदरहू प्रकल्पस्तांची 20 हजार घरे नियमीत करण्यात येतील. परंतु आम्हाला असा प्रश्न पडला की, सदरहू 20 हजार प्रकल्पग्रस्तांची घरे नेमकी कोणत्या ठिकणची आहेत ? सिडकोने साडे बारा टक्क्याच्या जमिनीचे वाटप व्यवस्थित केले असते तर या प्रकल्पग्रस्तांनी कधीच गरजेपोटी घरे बांधली नसती. सिडकोमध्ये एम.डी. श्री.संजय भाटीया व सह संचालक श्रीमती राधा यांनी पदभार घेतल्यानंतर साडेबारा टक्क्यांचे वाटप मोठ्या प्रमाणात व व्यवस्थितरित्या सुरु झाले. परंतु त्यापूर्वीच सदर भागातील भूमिपुत्रांनी गरजेपोटी घरे बांाली होती.

अध्यक्ष महोदय, या लक्षवेधीला देण्यात आलेल्या उत्तराशी मी सहमत नाही. लक्षवेधीच्या उत्तरामध्ये दिलेले आहे की, गरजेपोटी बांधलेल्या घरांना 4 एफएसआय देऊन कस्टलमध्ये त्याचे नियोजन करु. गावागावामध्ये पूर्वीपासून लोक दाटीवाटीने राहत आहेत. गाव म्हटल्यानंतर त्याचे चित्र आपल्या डोळ्यासमोर येते. गावात गल्ली असते, रस्ते नसतात, आग लागली तर ती विझवण्याकरिता तेथे कोणती गाडी जाऊ शकत नाही. अशा प्रकारचे गाववाल्यांचे मूळ गाव असते. परंतु आज या गाववाल्यांची दुरावस्था झालेली आहे.

...6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती मंदा म्हात्रे....

अध्यक्ष महोदय, पूर्वीच्या मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, सन 2007 पर्यंतची घरे कायम करण्यात यावी, विद्यमान मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, सन 2012 पर्यंतची 20 हजार घरे कायम करा. परंतु 20 हजार घरे कोणती आहेत, याबाबत आम्हाला संभ्रम आहे त्यांची यादी शासन जाहीर करणार का, सिटी सर्वे कधीपर्यंत करण्यात येईल ? गावठाणची हद्द 200 मीटर दिली होती ती अद्यापही आम्हाला माहीत नाही, आम्ही 500 मीटर हद्दीच्या पुढे निघून गेलो आहोत. गावठाण घरांचा सिटी सर्वे होत नाही तोपर्यंत गावठाणातील घरांवर कारवाई करण्यात येऊ नये. माझी स्वतःची दोन घरे असून ती मी बांधू शकत नाही. कारण महानगरपालिका ती घरे बांधण्यासाठी परवानगी देत नाही, आमची घरे पडायला झाली आहेत. या लक्षवेधी संदर्भात मुख्यमंत्री महोदयांनी उत्तर द्यावे, अशी माझी विनंती आहे.

यानंतर X-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी वारंवार या सभागृहामध्ये हा विषय मांडलेला आहे. मागच्या काळात त्यांच्या पाठपुराव्यामुळे आणि आग्रहामुळे राज्य सरकारने हा निर्णय घेतला की, ही जी घरे आहेत ती आपण कायम करावयाची. त्या संदर्भात आपण धोरणात्मक निर्णय मान्य केल्यानंतर माननीय उच्च न्यायालयाने आपल्याला असे सांगितले की, जोपर्यंत इम्पॅक्ट असेसमेंट आपण करीत नाही तोपर्यंत अशा प्रकारचा निर्णय आपल्याला घेता येणार नाही. मग याचे इम्पॅक्ट असेसमेंटचे काम आपण सुरू केले. साधारणपणे 15 दिवसांमध्ये हे इम्पॅक्ट असेसमेंटचा रेकॉर्ड आपल्याकडे प्राप्त होईल. त्यानंतर आपल्याला या संदर्भात जी.आर. काढता येईल आणि तो काढताना आपल्याला माननीय उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणावा लागेल. कारण त्यांनी आपल्याला सांगितले आहे की, जो निर्णय आपण घेऊ तो त्यांच्या निदर्शनास आणून द्यावा लागेल. त्यानुसार आपण जो जी.आर. काढू तो त्यांच्या निदर्शनास आणून देऊ. यातील दुसरा महत्वाचा मुद्दा बाऊंडरीच्या संदर्भात आहे. साधारणपणे सिडकोने ती बाऊंडरी निश्चित केलेली आहे. पण ती केवळ सिडकोने निश्चित करुन चालणार नाही तर त्या ठिकाणी जे गावातील आणि गावठाणातील लोक आहेत त्या रहिवाशांशी चर्चा करुन ती निश्चित करावी लागेल. अन्यथा तो डिस्पुट सॉल्व होऊ शकणार नाही. म्हणून सिडकोला आपण तसे निदेश दिलेले आहे. हा जी.आर. निघाल्याबरोबर किंवा निघताना ज्यावेळी आपण हायकोर्टासमोर जाऊ त्यावेळी आपण त्या त्या गावकरी मंडळींशी चर्चा करुन बाऊंडरीच्या संदर्भात जी हद्द ठरविली आहे, त्या हद्दीच्या संदर्भातील त्यांचे आक्षेप, दावे, हरकती किंवा सूचना त्या सिडको निश्चितपणे विचारात घेईल हेही सिडकोला आपण सांगितले आहे. त्याचबरोबर या ठिकाणचा सर्व्हे देखील करण्याची आवश्यकता आहे. मागच्या काळात सर्व्हे करण्याचा प्रयत्न केला तर लोकांनी तो सर्व्हे करु दिला नाही. मला असे वाटते की, त्याचे कारण म्हणजे सर्व्हे करायला आले की, लोकांना असे वाटत असेल की, आमची घरेच पाडणार आहेत. सिडकोला आपण सांगितल्याप्रमाणे सिडको आता सर्व्हेची एजन्सी निश्चित करुन ठेवणार आहे. जी.आर. निघाल्याबरोबर आणि बाऊंडरीचा निर्णय झाल्याबरोबर हा सर्व्हे सुरू केला जाईल आणि त्या सर्व्हेप्रमाणे पुढील उचित कार्यवाही केली जाईल.

2.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. संदिप नाईक : अध्यक्ष महोदय, हीच लक्षवेधी सूचना मी विचारली होती आणि आता यामध्ये माझे नाव आपण समाविष्ट केल्याबद्दल मी आपले आभार मानतो. या निवेदनामध्ये सिडको अखत्यारीतील 31 डिसेंबर 2012 अखेरपर्यंतची घरे यावर कारवाई करण्यात येत आहे असे म्हटले आहे, हे असत्य आहे. कारण 2002 च्या घरांवर देखील कारवाई केलेली आहे. त्याची माहिती माझ्यासोबत सध्या उपलब्ध आहे. यावर माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, 31 डिसेंबर 2012 नंतरच्या अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यासंबंधी शासनाने निर्णय अथवा काही परिपत्रक काढले आहे काय, आणि तसे असल्यास त्यासाठी पात्र, अपात्र आणि गावठाणांची हद्द निश्चित केली आहे काय, जर तसे नसेल तर त्याची व्याख्या स्पष्ट नसल्यामुळे आता ग्रामस्थांवर होणारी अन्यायकारक कारवाई आपण थांबविणार आहात काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, यासंबंधी शासनाने कार्यवाहीचे आदेश दिलेले नाहीत तर ते माननीय उच्च न्यायालयाने दिलेले आहेत. आपण हा विषय समजून घ्यावा की, या संदर्भातील कार्यवाहीचे आदेश माननीय उच्च न्यायालयाने दिलेले आहेत. आता आपण 2012 पर्यंतचा निर्णय घेण्याची घोषणा केल्यानंतर माननीय उच्च न्यायालयाला सांगितले की, आम्ही आता अशा प्रकारचा निर्णय घेत असल्यामुळे आम्ही आता ही कारवाई करणार नाही. त्यानंतर माननीय उच्च न्यायालयाने आपल्याला सांगितले की, ठीक आहे, आता आपण सन 2012 पर्यंतचे नियमित करीत आहात. पण त्याच्या पुढील कालावधीचे नियमित करता येणार नाहीत. 2012 नंतरच्यांवर आपण कारवाई केली पाहिजे आणि म्हणून माननीय उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार कारवाई करावयाची असेल तर ती 2012 नंतरच्या वर होईल. 2012 च्या आधीच्या वर कारवाई केली जाणार नाही. सिडकोला पुन्हा एकदा निदेश देण्यात येतील की, आपण जी कट-ऑफ डेट फायनल केली आहे आणि माननीय उच्च न्यायालयाने जी सांगितलेली आहे त्याच्या आधीच्या कोणावरही कारवाई करु नये, हे स्पष्टपणे सांगण्यात येईल.

श्री. प्रशांत ठाकूर : अध्यक्ष महोदय, गरजेपोटी बांधलेल्या घरांचा विषय ठाणे जिल्ह्यातील नव्या मुंबईतील घरांच्या बाबतीत महत्वाचा आहे. तितकाच तो रायगड जिल्ह्यातील पनवेल आणि उरण तालुक्यांच्या बाबतीत आहे. गरजेपोटी बांधलेल्या घरांच्या बाबतीत उत्तर देत असताना माननीय मुख्यमंत्र्यांनी क्लस्टर डेव्हलपमेंटच्या माध्यमातून हा प्रश्न सोडविण्याचे सुतोवाच केलेले

3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रशांत ठाकूर..

आहे. या बाबतीत सिडकोचा प्रस्ताव हा मूळात अपूर्ण आहे. हा प्रस्ताव अपूर्ण असल्यामुळे यामध्ये बऱ्याचशा सुधारणा तेथील प्रकल्पग्रस्त नेत्यांनी सूचविल्या आहेत. खरे तर गरजेपोटी बांधलेल्या घरांचा संबंध सिडकोने जे विकसित साडेबारा टक्केचे भूखंड शेतकऱ्यांना द्यावयाचे होते त्याच्याशी जोडला आहे. त्यामुळे अशा अनेक गरजेपोटी बांधलेल्या घरांचे आज बांधकामे पाडली जात नसतील तर लोक त्या ठिकाणी घाबरून आहेत की, आमचे विकसित भूखंड आम्हाला सिडकोकडून मिळणारे आहेत ते कापले जातील. यापूर्वी मोठ्या संख्येने ते कापले गेले आहेत. अशा कापल्या गेलेल्या प्लॉटची संख्या ही शासनाला माहिती आहे काय आणि त्या बाबतीत शासन नेमके कोणते धोरण स्वीकारणार आहे. माझा दुसरा प्रश्न असा आहे की, नव्या मुंबई एसईझेडला द्यावयाच्या जमिनीमध्ये ज्यावेळी साडेबारा टक्क्यांचे विकसित भूखंड द्यावयाचे होते त्यापैकी बरेचशे क्षेत्र वजा झाले आणि त्यामुळे सिडकोला आपले धोरण बदलावे लागले आहे काय ? तिसरा प्रश्न असा आहे की, या सर्वांचा एकत्रित विचार करुन, न्यायालयाचा निर्णय येईल, पण त्यानंतर प्रकल्पग्रस्तांच्या प्रतिनिधींशी चर्चा करुन सर्वंकष असे धोरण शासन आणणार आहे काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. प्रशांत ठाकूर यांनी जो प्रश्न या ठिकाणी विचारला आहे त्या बाबतीत खरे म्हणजे या लक्षवेधीचा स्कोप लिमिटेड आहे. पण आपण तो थोडा वाढविला आहे. पण तरी देखील आपण मांडलेला प्रश्न महत्वाचा असल्यामुळे या संबंधीचा निर्णय संबंधित सर्व लोकप्रतिनिधींशी चर्चा करुन निर्णय घेऊ एवढेच मी आज सांगतो.

श्री. शशिकांत शिंदे : अध्यक्ष महोदय, मी माननीय मुख्यमंत्र्यांना धन्यवाद देतो की, इललिगल स्ट्रक्चरच्या बाबतीत ज्या लोकांवर अन्याय होतो त्या लोकांना न्याय देण्याच्या बाबतीत त्यांनी भूमिका घेतली आहे. सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक विचारले होते की, आज त्या ठिकाणी जी अशांततेची भावना आहे की, आपले स्ट्रक्चर कधीही पाडतील. 2012 पर्यंतची स्ट्रक्चर्स नियमित करण्यासंबंधीचा आपण निर्णय घेतलेला आहे. पण 2012 नंतरची बांधकामे पाडण्याबाबत निर्णय आहे. परंतु आताही सिडको तशीच कारवाई करीत आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, शासन त्यानुसार सूचना करेन. यासंबंधी माझी विनंती अशी आहे की, यासंबंधीचे निकष आणि सर्व्हेचे काम पूर्ण होईपर्यंत आपण सिडकोला कुठलीही बांधकामे पाडू नयेत असे आदेश करणार

4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शशिकांत शिंदे......

आहात काय, कारण हायकोर्टाचा आदेश ज्याप्रमाणे ठाणे, मिरा भाईंदरला आणि सगळीकडे हायकोर्टाचे आदेश होते. पण आपण शासन म्हणून हायकोर्टाच्या आदेशाच्या बाबतीत पर्याय काढण्यासंबंधी ही बांधकामे नियमित करण्याचा निर्णय घेत आहोत. त्यामुळे भविष्यकाळामध्ये शासनाचा निर्णय जोपर्यंत व्यवस्थित होत नाही, सर्व्हेक्षण होत नाही तोपर्यंत कुठल्याही बांधकामावर कारवाई होणार नाही अशा प्रकारचे आदेश निर्गमित करणार आहात काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, 31 डिसेंबर 2012 पूर्वीच्या कुठल्याही बांधकामावर कारवाई करण्याचा प्रश्नच आता उद्‌भवत नाही. प्रश्न नंतरच्या बांधकामासंबंधीचा आहे. त्या संदर्भात आपल्याला देखील माहिती आहे की, माननीय उच्च न्यायालय कडक आहे. हायकोर्टाने तर सर्वच काढण्यास सांगितले होते. पण शेवटी क्रॉम्प्रोमाईज करुन आता 31 डिसेंबर 2012 वर आले आहे. त्यामुळे मी आपल्याला एवढे आश्वस्त करतो की, यापूर्वीची जी अशांतता आहे ती आपण ठेवू देणार नाही. सिडकोला आजच निर्देश देण्यात येतील की, त्यांनी 31 डिसेंबर 2012 पूर्वीच्या कोणत्याही बांधकामावर कारवाई करु नये.

--------

Y-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : सांगली जिल्ह्यातील श्रीनाथ देवस्थानाच्या जमिनीचे बनावट कागदपत्रे तयार करुन सदर जमीन हडप करणे

**मु.शी.** : सांगली जिल्ह्यातील श्रीनाथ देवस्थानाच्या जमिनीचे बनावट कागदपत्रे तयार करुन सदर जमीन हडप करणे यासंबंधी सर्वश्री हनुमंत डोळस, शशिकांत शिंदे, दिपक चव्हाण,बाळासाहेब पाटील, भारत भालके, जयंत पाटील, अनिल बाबर, जितेंद्र आव्हाड, सुरेश लाड, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. हनुमंत डोळस ( माळशिरस ) : अध्यक्ष महोदय, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"दिघंची ता.आटपाडी जि.सांगली येथील श्री नाथ देवस्थानाच्या जमिनीचे बनावट कागदपत्रे तयार करून सुमारे 31 एकर जमिनीवर प्लॉट पाडून त्याची बेकायदेशीरपणे विक्री सुरू असणे, याबाबत ही बाब तेथील ग्रामस्थांनी सहाय्यक धर्मदाय आयुक्त, सांगली यांचेकडे माहे जानेवारी 2016 मध्ये तक्रार करुनही संबंधितांविरूध्द कारवाई न झाल्यामुळे तेथील नागरीकांत असंतोष पसरणे, देवस्थानाची ही जमिन स्वातंत्र्यपूर्व काळापासून देवस्थानच्या देखभालीसाठी नित्यपूजा व उपजिविकेसाठी डवरी समाजाला देण्यात येणे, देवस्थानच्या जमिनीबाबतच्या कोणत्याही व्यवहारासाठी संबंधित सहधर्मदाय आयुक्तांची परवानगी घेणे कायद्याने बंधनकारक असताना श्रीनाथ देवस्थानच्या जमिनीचे प्लॉट करून त्याची अवैध विक्री करणाऱ्यांविरूध्द कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबात शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.देवेंद्र फडणवीस ( मुख्यमंत्री ) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**अध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( **प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे )

.........2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. हनुमंत डोळस : अध्यक्ष महोदय, सांगली जिल्ह्यातील आटपाडी तालुक्यातील दिघंची येथील श्रीनाथ देवस्थानच्या जमिनीचे हे प्रकरण आहे. गावाच्या गावठाणाच्या बाजूला परंपरेने नागदेवस्थानचे पूजारी व गोसावी यांना देवाची पूजा व व्यवस्था बघण्यासाठी ही जमीन दिलेली आहे. काही दिवसांपूर्वी या जमिनीपैकी 31 एकर जमीन बनावट कागदपत्रे बनवून आणि प्रांताच्या खोट्या सह्या करुन ही जमीन हडपली आणि त्याचे प्लॉट तयार करुन 70 ते 75 टक्के प्लॉट विकेले गेलेले आहेत. निवेदनात म्हटले आहे त्याप्रमाणे ग्रामस्थांनी अनेक वेळा विरोध व तक्रारी केलेल्या आहेत. मुख्यमंत्री महोदयांना दिनांक 29.4.2015 ला निवेदन दिलेले आहे. धर्मादाय आयुक्त मुंबई यांना दिनांक 19.9.2015 रोजी निवेदन दिले. धर्मादाय आयुक्त सांगली यांना निवेदन दिलेले असेल तर त्यांची याठिकाणी उत्तरे आलेली आहेत. गावठाणावर अतिक्रमण करणाऱ्या लोकांना शासन अडवणार काय? दिघंची येथील श्रीनाथ देवस्थानच्या जमिनीचे बनावट कागदपत्रे बनवून सुमारे 31 एकर जमिनीवर प्लॉट पाडून त्याची बेकायदेशीर विक्री केली हे खरे आहे काय? सहायक धर्मादाय आयुक्त, सांगली व सह धर्मादाय आयुक्त, सोलापूर व धर्मादाय आयुक्त, मुंबई यांच्याकडे वारंवार तक्रारी केल्या हे खरे आहे काय? श्रीनाथ देवस्थानच्या लोकांनी धर्मादाय आयुक्त सांगली, सोलापूर व मुंबई यांच्याकडे बनावट कागदपत्रे तयार करुन शिक्का व नकला याबाबत माहिती मागितली असता जाणिवपूर्वक माहिती दिली जात नाही हे खरे आहे काय? यासंबंधी पोलिसांकडे तक्रार नोंदविण्यात आली आहे काय? असल्यास केव्हा व कोणत्या प्रकारची कारवाई करण्यात आली.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी वस्तुस्थिती याठिकाणी मांडली आहे ती बऱ्याच प्रमाणात खरी आहे. याचा सखोल अभ्यास केल्यानंतर असे लक्षात आले की, दिनांक 5.5.2008 साली ढिसाळ घाईने आणि योग्य पध्दतीचा अवलंब न करता केवळ एक अर्ज याठिकाणी दिसतो आहे. सदर अर्जावर तेव्हाच्या सह धर्मादाय आयुक्तांनी परवानगी दिलेली आहे. त्या व्यतिरिक्त कुठलीही कागदपत्रे उपलब्ध नाहीत. यामुळे हे लक्षात येते की, यामध्ये काहीतरी बनावटपणा किंवा अनियमितता झालेली आहे. ही क्वॉसाय-ज्युडिशिअल ॲथॉरिटी आहे. यामध्ये राज्य सरकारला थेट कारवाईचा अधिकार नाही. प्रत्यक्ष धर्मादाय आयुक्तांना अशा सूचना दिलेल्या आहेत की त्यांनी स्वत: याची चौकशी केली पाहिजे. प्रायमाफेसी केस याठिकाणी दिसत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस......

आहे. ज्युडिशिअल निर्णय त्यांनी ताबडतोब दिला पाहिजे. त्याच सोबत जी काही विक्री झालेली आहे त्यामध्ये कायद्याची तरतूद सुस्पष्ट आहे. धर्मादाय आयुक्तांनी निर्णय दिला की सन 2008 ची एन्ट्री ही चुकीची आहे, योग्य प्रकारे केलेली नाही तर हा संपूर्ण व्यवहार व्हॉईड ॲब इनिशिव्ह होतो. कायद्याच्या दृष्टीने हा व्यवहार होऊ शकत नाही अशाप्रकारची परिस्थिती तयार होते. या सर्व जमिनी पुन्हा रिस्टोअर होतील त्याप्रकारचे निदेश हे धर्मादाय आयुक्तांना देण्यात आले.

श्री. दिपक चव्हाण : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हनुमंत डोळस यांनी सांगितले की, 29.4.2015 रोजी मुंबई धर्मादाय आयुक्तांकडे अर्ज केला. त्यानंतर दिनांक 21.12.2015 ला सांगली धर्मादाय आयुक्त यांच्याकडे अर्ज केला. कोणत्याही प्रकारची तक्रार धर्मादाय आयुक्त सांगली विभाग यांच्या कार्यालय अभिलेख्यांमध्ये नाही. अर्ज करुन सुध्दा कागदपत्रे मिळत नाहीत याबाबत फौजदारी कारवाई करण्यात येणार काय?

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, अर्ज करुन चालत नाही ही क्वॉसाय-ज्युडिशिअल ॲथॉरिटी आहे. क्वॉसाय-ज्युडिशिअल ॲथॉरिटीमध्ये अपिलमध्ये जावे लागते. सन 2008 साठी सन 2015 मध्ये अपिल केले तरी त्याला अनेक वेळा लिमिटेशन असतात. बऱ्याच वेळा माहिती नसते की यामध्ये अपिल केले पाहिजे. त्यामुळे शासकीय कारभाराप्रमाणे अर्ज देत जातो की अनियमितता झाली आहे. हा सर्व प्रकार गंभीर असल्यामुळे सन 2008 मध्ये झालेली एन्ट्री ही चुकीची दिसते आहे. गहाण झालेल्या कागदपत्रांबाबत फौजदारी गुन्हा दाखल करण्यास काही हरकत नाही. त्यापूर्वी धर्मादाय आयुक्तांनी यावर निर्णय करायला पाहिजे आणि तो निर्णय करण्याची प्रक्रिया सुरु झालेली आहे. सदर निर्णय दिल्यानंतर याप्रकारची फौजदारी कारवाई करण्याची जी आवश्यकता आहे ती केली जाईल.

श्री.राजेश क्षीरसागर : अध्यक्ष महोदय, सांगली येथील श्रीनाथ देवस्थानाच्या भ्रष्टाचाराचा विषय चालू आहे. जुलै महिन्याच्या अधिवेशनामध्ये पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीची माझी एक लक्षवेधी होती. सीआडीचे एसआयटी नेमण्याचे जाहीर केले होते. आजतागायत एसआयटीने काय केले, त्याचा अहवाल आलेला आहे काय? कोणावर कारवाई झालेली आहे आणि कोणावर झालेली नाही. ती कधी होणार आहे याबाबत मी माननीय मुख्यमंत्र्यांना प्रश्न विचारु इच्छितो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, खरे म्हणजे या प्रश्नामध्ये हे नाही. हा पूर्णपणे स्वतंत्र प्रश्न आहे. यासंदर्भातील सीडीआयडी चौकशी सुरु झालेली आहे. टीमचे गठन करुन चौकशी वेगाने सुरु आहे. याठिकाणी जे अधिकारी होते ते आता वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये काम करीत आहेत. या सर्वांनी अनियमितता केली असे नाही. त्या-त्या काळातील अनियमिततेबाबत त्यांच्याकडून माहिती किंवा मत घेणे हे सर्व सीआयडीला करावे लागते म्हणून त्याला उशिर लागत आहे. उचित कालावधीत चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्यात येईल.

श्री.शशिकांत शिंदे : अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तरात आणि या उत्तरात थोडीशी तफावत आहे. मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले बऱ्याच अंशी तक्रारींमध्ये तथ्य आहे. धर्मादाय आयुक्तांना सांगेपर्यंत त्याठिकाणी 35 एकराची गुंठेवारी करुन त्याचे प्लॉट पाडून विक्रीचा व्यवसाय चालू असल्याचा आक्षेप हा खरा तक्रारीतील गाभा आहे. ही सर्व चौकशी पूर्ण होईपर्यंत हे जे वाटप किंवा बेकायदेशीरपणे जमिनीची विक्री चालू आहे त्याला तात्काळ स्थगिती देणार आहात काय? आणि यासंदर्भामध्ये चौकशी करुन दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करणार आहात काय?

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, खरे म्हणजे ही सर्व एन्ट्री केलेली आहे ही सन 2008 मध्ये केलेली आहे आणि त्यानंतर त्याची विक्री केलेली असल्याने त्याठिकाणी फारशी जमीन शिल्लक नाही.

Z-1......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस.......

सेक्शन 69 (a) ट्रस्ट ॲक्ट त्याच्या अंतर्गत ते रिव्हीजन याच्या संदर्भात करतील. दरम्यानच्या काळात काही जमिन शिल्लक असेल तर ती होऊ नये म्हणून निश्चित निदेश देऊ, जे काही शासनाला करणे शक्य आहे ते करायला सांगून यापुढे जर काही शिल्लक असेल तर तीची विक्री होऊ नये म्हणून सांगू. त्याचे जे रिझंम्शन आहे ते मात्र चारिटी कमिशनच्या निर्णयानंतर आपल्याला करता येईल.

श्री.अनिल गोटे : अध्यक्ष महोदय, मला माहित आहे की, या लक्षवेधीचा स्कोप फार लिमिटेड आहे. पण राज्यामध्ये जे भूखंड माफीया माजलेले आहेत. याच्याबद्दल माननीय मुख्यमंत्री महोदयांचे लक्ष वेधणार आहे. पालघर या आदिवासी जिल्हयामध्ये तलासरी या तालुक्यामध्ये 150 एकर जमिन मृत मालकांच्या खोटे फोटो दाखवून, खोटी रजिस्ट्री करुन भूखंड माफीयांनी या जमिनी विक्री करुन टाकलेल्या आहेत. हे लोक स्तलांतरीत झालेले आहेत. कोणी मुंबईला गेले, पुण्याला गेले नोकरीच्या निमित्ताने गेले त्यांच्या सगळयांच्या या जमिनी आहेत. माझ्याकडे जी कागदपत्रे आलेली आहेत. त्यामध्ये प्रांत, तहसिलदार, मंडळ निरीक्षक, तलाठी, नोंदणी रजिस्ट्रार या सर्वांनी संगणमत करुन हया 150 एकर जमिनीची विक्री केलेली आहे. यामध्ये खोटे फोटो दाखविले, हे जे घडलेले आहे. भूखंड माफीयांच्याविरुध्द नुसते एका ठिकाणी नाही तर देवस्थानाबद्दल नाही, महाराष्ट्रामध्ये अशी जी प्रकरणे बाहेर येतील त्या अधिका-यांसकट त्या व्यवहार करणा-यांविरुध्द आपण मोका सारखी कटोर कारवाई करणार का ?

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, या लक्षवेधीचा स्कोप जरी लिमिटेड असला तरी सन्माननीय श्री.गोटे साहेबांचा स्कोप अनलिमिटेड आहे. त्याच्यामुळे तो कुठेही पनवेल, पालघरपर्यंत पोहचला असला तरी मी त्यांना थोडस अश्वस्त करतो. सन्माननीय श्री.अनिल गोटे यांनी जो मुद्दा निदर्शनास आणला आहे. त्याची कागदपत्रे, किंवा त्याची तक्रार केली तर जरुर त्याच्यावर कारवाई करण्यात येईल. अशा प्रकारची जेवढी प्रकरणे असतील भूखंड माफीयांच्या संदर्भातील ज्या ज्या ठिकाणी अधिका-यांचे संगणमत किंवा इतर कोणाचे संगणमत असू दे, अशा तक्रारी प्राप्त झाल्यानंतर त्याच्यावर कारवाई केली जाईल. आता अस्तित्वात असलेले जे कायदे आहेत. त्यातील कडक कायदे लावता येतील ते सर्व कायदे त्याला लागू केले जातील.

......2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हनुमंत डोळस : अध्यक्ष महोदय, ही देवस्थानची 31 एकर जमीन आहे. श्रीनाथ देवस्थानची हडप केलेली जमीन ती त्या ट्रस्टला परत देणार का ? व ती कधी देणार ? राज्यात अशाच प्रकारच्या, याच प्रवृत्तीने किती देवस्थानच्या जमिनी खरेदी करण्यात आल्या आहेत. त्या कोणी खरेदी केल्या ?

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, मी सांगितले की, त्याच्यामध्ये धर्मदाय आयुक्त ते रिव्हीजन ॲप्लीकेशन करतील. त्यांनी निर्णय दिल्यानंतर आता ॲपरंटली त्यांचे निर्णय प्रिएम्ट करु शकत नाही. ॲपरंटली असे दिसते आहे की, तो निर्णय काय होणार आहे. जर देवस्थानच्या बाजूने निर्णय आला तर ती जमिन तातडीने त्यांना परत मिळेल. त्याबाबत काही करण्याची गरज राहणार नाही. त्या सर्व रजिस्ट्रया अवैध ठरतील. देवस्थानाचे नाव त्याच्यावर चढेल. राज्यभरात अशा प्रकारच्या किती घटना आहेत. त्याची माहिती अद्याप तरी उपलब्ध नाही. परंतु सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, अशा प्रकारच्या घटना असतील तर निदर्शनास आणून द्या. त्या सर्वांवर कारवाई होईल.

....3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : अशासकीय विधयके आणि ठराव समितीचा अहवाल सादर करणे व संमत करणे.

श्री.सुरेश हाळवणकर (समिती सदस्य) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला सादर करतो.

अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयक आणि ठराव समितीचे दुसरे प्रतिवृत्त सादर करतो. शुक्रवार, दिनांक 1 एप्रिल, 2016 रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमांकात दाखविण्यात येणा-या शासकीय विधेयकांना द्यायचा वेळ ठरविणा-या समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण अडीच तासाचा वेळ उपलब्ध आहे. विधानसभेकडे पुर:स्थापनार्थ एकूण तीन अशासकीय विधेयकांना एकूण 10 मिनिटांचा वेळ देण्यात यावा. उर्वरित 140 मिनिटांचा वेळ पुढील प्रमाणे विचारात असलेल्या अशासकीय विधेयकांना देण्यात यावा.

सन 2015 ची विधानसभा विधेयक क्रमांक 45 महाराष्ट्र नगरपरिषदा,नगर पंचायती औद्योगिक नागरी सुधारणा विधेयक, 2015 श्री.सुरेश हाळवणकर, वि.स.स. सदस्य यांचे 35 मिनिटांपेक्षा जास्त नाही. सन 2015 चे विधानसभा विधेयक क्रमांक 69, महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त सुधारणा विधेयक, 2015 श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे 35 मिनिटांपेक्षा जास्त नाही. सन 2015 चे विधानसभा विधेयक क्रमांक 67, मुंबई महानगरपालिका दुसरी सुधारणा विधेयक, 2015 श्री.आशिष शेलार, वि.स.स. यांचे 35 मिनिटांपेक्षा जास्त नाही. सन 2015 चे विधानसभा विधेयक क्रमांक 25 महाराष्ट्र दुकाने आस्थापना सुधारणा विधेयक, 2015 श्री.अमिन पटेल यांचे 35 मिनिटांपेक्षा जास्त नाही. यापैकी कोणत्याही विधेयकाचा वेळ वाचल्यास तो पुढील क्रमांच्या विधेयकांना देण्यात यावा अशी समितीने शिफारस केली आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे दुसरे प्रतिवृत्त सभागृहास सादर झाले आहे.

श्री.सुरेश हाळवणकर (समिती सदस्य ) : अध्यक्ष महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे दुसरे प्रतिवृत्त सभागृहाला संमत आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

-----------

.....4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी. :** अनुदानाकरिता मागण्या

**मु. शी. :** सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील अनुदानाकरिता मागण्या :

1. वित्त विभाग
2. अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
3. नियाजन विभाग
4. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग

**तालिका सभाध्यक्ष** : आता वित्त विभाग, जलसंपदा विभाग, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, नियोजन विभाग आणि पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग या विभागाच्या मागण्या म्हणजे मागणी क्रमांक जी-1, जी-2, जी-4, जी-5, जी-6, जी-7, जी-8, जी-10, आय-2,आय-3,आय-4,आय-5,आय-7, एम-1, एम-2, एम-3, एम-4, एम-5, एम-6, ओ-1, ओ-2, ओ-3, ओ-4, ओ-6, ओ-7, ओ-8, ओ-9, ओ-14, ओ-15, ओ-16, ओ-17, ओ-18, ओ-19, ओ-20, ओ-21, ओ-22, ओ-23, ओ-24, ओ-25, ओ-26, ओ-27, ओ-28, ओ-29, ओ-30, ओ-31, ओ-32, ओ-33, ओ-34, ओ-35, ओ-36, ओ-37, ओ-38, ओ-39, ओ-40, ओ-41, ओ-42, ओ-43, ओ-44, ओ-45, ओ-46, ओ-47, ओ-48, ओ-49, ओ-10, ओ-11, ओ-12, ओ-13, ओ-14, ओ-15, ओ-16, ओ-17, ओ-18, ओ-19, ओ-20, ओ-21, ओ-22, ओ-23, ओ-24, ओ-25, ओ-26, ओ-27, ओ-28, ओ-29, ओ-30, ओ-31, ओ-32, ओ-33, ओ-34, ओ-35, ओ-36, ओ-37, ओ-38, ओ-39, ओ-40, ओ-41, ओ-42, ओ-43, ओ-44, ओ-45, ओ-46, ओ-47, ओ-48, ओ-49, झेडडी-1, झेडडी-2, झेडडी-3, झेडडी-4, झेडडी-5, झेडडी-6 चर्चेला घेण्यात येतील. या मागण्यांचा तपशील कार्यक्रमपत्रिके बरोबर वितरित केला आहे.

( प्रेस : सोबत जोडलले मागण्यासंबंधीचे जोडपत्र छापावे )

............

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभाध्यक्ष** : आता वित्त विभाग, जलसंपदा विभाग, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, नियोजन विभाग आणि पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग या विभागाच्या अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा होईल. विभागांच्या मागण्यांचा तपशील कार्यक्रमपत्रिकेसोबत जोडला आहे. विभागांच्या स्वीकृत कपात सूचनांची यादी सदस्यांना टपालखणाद्वारे ( पिजन होल ) वितरित करण्यात आली आहे. कपात सूचना न मांडता मान्य करण्यात आलेल्या कपात सूचनांची उत्तरे माननीय मंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने तीस दिवसांच्या कालावधीत सदस्यांना पाठविण्याची प्रथा जुलै, 2010 पासून मान्य झाली असल्यामुळे, आता कोणीही कपात सूचना मांडणार नाही, असे मी गृहीत धरतो.

या चर्चेसाठी तीन तास वेळ देण्यात येईल. या तीन तासापैकी सत्तारुढ पक्षास संबंधित मंत्र्यांच्या उत्तरासह निम्मा वेळ व विरोधी पक्षास निम्मा वेळ देण्यात येईल. सदस्य वेळेचे बंधन पाळून मला सहकार्य करतील, अशी मी अपेक्षा करतो. आता चर्चेला सुरुवात होईल. सन्माननीय सदस्यांनी आता चर्चेला सुरुवात करावी.

........6/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गोपालदास अग्रवाल ( गोंदिया ) : अध्यक्ष महोदय, वित्त व नियोजन, अन्न व नागरी पुरवठा, जलसंपदा, पर्यटन व सांस्कृतिक कार्य या सर्व विभागाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी सुरुवात करत असताना विशेषतः वित्त व नियोजन मंत्री महोदय उपस्थित आहेत. राज्याच्या उत्पन्नाचे स्त्रोत मर्यादित होत असताना खर्चाचे स्त्रोत मात्र सातत्याने वाढत आहेत. त्यातून महसूली तूट व वित्तीय तूटीने आर्थिक नियोजनाची दिशा सुध्दा भरकटत आहे असे चित्र राज्यासमोर उपस्थित झालेले आहे. राज्यावर वाढता कर्जाचा बोजा, वित्तीय तुट, महसूली जमेमध्ये वाढती कमी आणि वाढता खर्च, निधी अभावी सिंचन प्रकल्पाची रखडलेली कामे हे सर्व राज्याच्या नियोजनाच्या समोर मोठे आव्हान आहे. राज्याच्या उत्पानाचे स्त्रोत वाढविण्याकरिता धाडस माननीय वित्त मंत्री दाखवू शकले नाहीत. हे सुध्दा सत्य आहे. कोणत्याही नवीन सरकारला पहिला, दुसरा आणि तिसरा अर्थसंकल्प हे सरकारचे मुल्यमापन, वर्षाचा अर्थसंकल्प होतो.

AA-1.........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गोपालदास अग्रवाल .....

या दोन वर्षात सरकारने कठोर पावले उचलावीत. महसूली जमा करुन जनतेच्या अपेक्षा उंचावण्याचा प्रयत्न केला आहे पण माननीय अर्थमंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी दुसरा अर्थसंकल्प मांडून ही संधी गमावली आहे असे मला म्हणावेसे वाटते. यापुढील वर्ष सरकारसाठी अधिक आव्हानाचे राहणार आहे असे चित्र उपस्थित झालेले आहे. राजकोषीय तुट तब्बल 37 हजार कोटीवर गेलेली आहे. वेतन व पेन्शनवर 94 हजार कोटीच्या वर खर्च होत आहे. खर्चाच्या व्याजापोटी आपणास 28 हजार 220 कोटी रुपये या वर्षी द्यावे लागणार आहेत. महसूली जमेच्या अर्ध्याहून अधिक रक्कम पेन्शन, व्याज व राजकोषीय तुट यावर खर्च होणार आहे. सरकारकडे विकास कामासाठी फक्त 11.45 टक्के इतकाच निधी शिल्लक आहे. वास्तविक हा निधी 20 ते 22 टक्के असायला पाहिजे. अर्थसंकल्पातून राज्याच्या विकासाची दिशा स्पष्ट होत नाही. राज्य विकासाकडे वाटचाल करीत आहे असे काही दिसत नाही. व्यापाऱ्यांच्या दबावाखाली एलबीटी रद्द करुन सरकारने दरवर्षी 60 हजार कोटीचा बोजा अंगावर घेतलेला आहे. टोलमाफीच्या मुद्दयावर सरकार सत्तेवर आलेले आहे. यामुळे पुढील 15-20 वर्षे सरकारला हजारो कोटी रुपये देणी द्यावी लागणार आहेत. महसुल विस्ताराच्या नवनवीन संधी शोधण्यात राज्य सरकारला अपयश आलेले आहे. महाराष्ट्राचा आर्थिक विकास योजनेचा आराखडा दिवसेंदिवस संकुचित होत चाललेला आहे. आपल्या शेजारच्या आंध्रप्रदेश, तेलंगणा, गुजरात राज्यात प्लॅन विकासाच्या खर्चाचा आकडा प्रगत महाराष्ट्रापेक्षा मोठा आहे. याबाबत विचार करण्याची वेळ आपल्यावर आलेली आहे. कर्जावरील व्याज भरणा करण्याकरिता 29 हजार कोटी रुपये खर्च अपेक्षीत आहे. टक्केवारी पाहिली तर एकूण महसुली जमामधून वेतनावर 36.30 टक्के खर्च होणार आहे. पेन्शनवर 11.04 टक्के खर्च होणार आहे. व्याजावर 12.78 टक्के खर्च होणार आहे. एकूण 1 कोटी 132 हजार 531 कोटी रुपये या तीन बाबींकरिता राज्य सरकारला खर्च करावे लागणार आहेत. एका बाजूला विक्रीकराची राशी आपणास जास्त मिळेल. या सरकारने 2 लाख 20 हजार कोटी अर्थसंकल्पात महसुली जमा दाखविलेली आहे. हे सर्व आलबेल होईल तेव्हा होईल. मला वाटते की, 3600 कोटीच्या तुटीचा अर्थसंकल्पात आणखी भर पडणार आहे. आपणास अनेक खर्च अनिवार्य आहेत. अंगणवाडीचे

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गोपालदास अग्रवाल .....

मानधन द्यावेच लागणार आहे पण त्याची प्रोव्हीजन केलेली नाही. अंगणवाडयांना पोषण आहाराकरिता 50 टक्के निधी आपणास द्यावा लागणार आहे त्याचीही तरतूद केलेली नाही. 3600 कोटी तुटीचा अर्थसंकल्प कोठे जाणार आहे ? तो 10 हजार कोटी पेक्षा जास्त तुट दाखविली जाणार आहे. ही परिस्थिती मला या चर्चेतून जनतेसमोर आणावयाची आहे.

अध्यक्ष महोदय, शासकीय कर्मचाऱ्यांचे निवृत्ती वेतन व पेन्शन यावर 1 लाख कोटीच्या वर खर्च आता होत आहे. सातवा वेतन आयोग लागला तर याकरिता सव्वालाख कोटी रूपये लागणार आहेत. ही आपल्या राज्यासाठी चिंतेची बाब आहे. अर्थसंकल्पीय भाषणात राज्यावर असणाऱ्या कर्जाची चर्चा देखील करण्यात आलेली नाही. आघाडी सरकारच्या काळात रोजच रडगाणे चालू होते, युती शासनाच्या आता दीड वर्षाच्या काळात किती कर्ज राज्यावर काढलेले आहे हे जनतेला सांगावे लागणार आहे. आज दिनांक 31.3.2016 रोजी हा कर्जाचा डोंगर 3 लक्ष 20 हजार कोटी एवढा पोहोचलेला आहे. पुढील वर्षी ही राशी 3 लक्ष 56 हजार कोटीवर पोहोचणार आहे. एका बाजूला कर्जबाजारी राज्य होत असताना आपण अनेक योजना अर्थसंकल्पाच्या मागण्यातून आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. पण राज्यामध्ये नवीन भांडवल निमितीची शक्यता मावळलेली आहे. कारण विकासाचा दर 8 टक्के दाखविला आहे तो कोणत्याही निकषामध्ये बसत नाही. हा सर्व आकडयांचा खेळ आहे. मागील वर्षी 47479 कोटी प्लॅन व एस्टीमेट होते. पण सुधारीत प्लॅन 40 हजार 844 कोटीचा झालेला आहे. यावर्षी 57 हजार कोटीचे आपले प्लॅन व एस्टीमेट आहे. हा प्लॅन किती होणार, किती कट लावणार आहे ? हे सर्व निकष मंत्री महोदयांना सांगावेत.

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य श्री. गोपालदास अग्रवाल यांनी काल सांगितले होते की, जेवढी नावे येतील व जेवढा वेळ असेल तो सर्वांना वाटून देण्यात यावा. त्याप्रमाणे कॉंग्रेस पक्षाकडून 13 नावे आलेली असून या पक्षाला 39 मिनिटे वेळ येत आहे. याप्रमाणे आपणास 3 मिनिटे बोलता येईल. तुम्ही म्हणत असाल तर तुमच्या पक्षाचा 39 मिनिटे वेळ तुम्हालाच देतो. तुमचे वेळचे नियोजन कसे करायचे ते सांगा. ही बाब मी तुमच्या लक्षात आणून देत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गोपालदास अग्रवाल : अध्यक्ष महोदय, आपण उपस्थित केलेला विषय मी काल बोललो होते, ते मला मान्य आहे. माझा मुद्दा असा आहे की, समोरचे लोक बोलतात तेव्हा तोंड पाहून त्यांना वेळ देऊ नका. येथे सर्व सदस्य समान आहेत. जी व्यथा माझी आहे तीच व्यथा तिकडे तुमचीसुध्दा आहे. हे तुम्ही लक्षात ठेवा. तुमच्या आमच्या सर्वांसाठी मी बोललो होतो, त्यामुळे मला 3 मिनिटांचे बंधन टाकले तर उद्यापासून कोणालाही बोलू देऊ नका. मी माझे भाषण येथेच संपवायला तयार आहे. मला या अधिवेशनात बोलण्याकरिता फक्त एकच वेळा संधी मिळत आहे. बाकीच्या वेळी आम्ही मागे बसतो. म्हणून मी तुमच्या निर्णयाला पूर्णपणे मान्य करतो.

अध्यक्ष महोदय, माननीय राज्यपालांच्या निदेशाप्रमाणे विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्राला नियतव्ययाचे वाटप केले जाते. आज 31 मार्च 2016 तारीख आहे. माननीय राज्यपालांच्या निदेशाप्रमाणे आपणाकडून सर्व वाटप झाले आहे का, याचा अहवाल माननीय मंत्री महोदयांनी अधिवेशन संपण्यापूर्वी आम्हाला दिला पाहिजे अशी मी मागणी करतो.

अध्यक्ष महोदय, वेटमध्ये 0.5 टक्के वाढ करण्यात आलेली आहे. 5 टक्केचा वेट 5.5 टक्के केलेला आहे. त्यामुळे दैनंदीन गरजेच्या वस्तू निश्चित महाग होणार आहेत. जीएसटीचा निधी मोठया प्रमाणात मिळावा म्हणून वेटमध्ये वाढ करण्याचा प्रयत्न राज्य सरकारकडून झालेला आहे.

यानंतर BB-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गोपालदास अग्रवाल.....

दुचाकी व तीनचाकी वाहनांवरील कर वाढविण्यात आलेला आहे. मार्बल आणि ग्रॅनाईटवरील एन्ट्री टॅक्स वाढविण्यात आलेला आहे. काही ठिकाणी अनेक टॅक्स कमी करण्यात आलेला आहे. " कभ खुषी कभी गम " ठीक आहे. असे असताना यातून एकूण उत्पन्न 2500 कोटी रूपयांच्या वर वाढलेले नाही. एका बाजूला विकासाला चालना देण्याकरिता जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून 7300 कोटी रूपयांचा निधी देण्यात आलेला आहे. राज्य शासनाच्या माध्यमातून वित्तीय योजनेंतर्गत 49 हजार कोटी रूपयांच्या वरील प्लान मंजूर करण्यात आलेला आहे. हे सर्व नियोजन आश्वासन तंतोतंत दिल्याप्रमाणे होणार आहे का ? माननीय वित्तमंत्री यांनी म्हटले होते की, 7700 कोटी रूपये सिंचनाचे मी दिले नाही तर पुढील अर्थसंकल्प मंजूर करणार नाही. यामुळे आता आमची अपेक्षा अशी राहणार आहे की, या अर्थसंकल्पातील संपूर्ण तंतोतंत 57 हजार कोटी रूपये जनतेला उपलब्ध करुन देण्यात येतील.

अध्यक्ष महोदय, आपण आणि मी लोकलेखा समितीमध्ये एकत्र काम करीत असतो. हे काम करीत असतांना माझा अनुभव असा आहे की, प्रत्येक विभागामध्ये वित्तीय सल्लागार नेमणे आवश्यक आहे. मंत्रालयामधील अनेक विभागांमध्ये वित्तीय सल्लागाराच्या अभावामुळे आर्थिक अनुशासन दिसत नाही. अनेक विभागांमध्ये पार्किंग झोनचा वापर केला जात आहे. ज्या योजनांमध्ये खर्च होणार नाही, अशा योजनांमध्ये पैसे ठेवले जातात. खर्च न झालेला अखर्चित निधी ऐनवेळी इतर ठिकाणी वर्ग केला जातो. याप्रमाणे निधीसंदर्भात पार्किंग झोनची व्यवस्था निदान माननीय अर्थमंत्री आपल्या राजवटीत आपलेच सरकार असताना होणे अपेक्षित नाही.

अध्यक्ष महोदय, वित्त व नियोजन विभागासंदर्भात बोलतांना मला एक मुद्दा मांडावयाचा आहे. माननीय वित्तमंत्री आपण या बाजूला असताना आमदार फंड वाढविण्याकरिता संघर्ष करीत होते. त्यावेळीही आम्ही आमदार फंड वाढविण्यासंदर्भात तुमच्याच बाजूने होतो. आता तर तिजोरी व चाबीही तुमच्याचकडे आहे. माननीय वित्तमंत्री यांचे एक पत्र आले आहे, त्यांनी म्हटले आहे की, आमदार फंडासंदर्भातील काही सुधारणा व सूचना असतील तर त्या कळवाव्यात. याबाबत माझी सूचना अशी राहील की, ज्याप्रमाणे खासदान निधी लॅप्स होत नाही,

श्री.गोपालदास अग्रवाल.....

त्याचप्रमाणे आमदार निधीही लॅप्स होता कामा नये. आमदार फंड त्यांच्या कार्यकाळामध्ये लॅप्स न होता कॅरी फॉरवर्ड करण्यात यावा. आम्हाला आमदार म्हणून सामाजिक जीवनामध्ये काम करीत असताना देवस्थानाच्या बांधकामाकरिता व सार्वजनिक ट्रस्टला आमदार फंडातून निधी देण्याकरिता परवानगी देण्यात यावी.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामध्ये 2000 वर्षापूर्वीचे एक शिवमंदिर आहे. या देवस्थानाला अद्यापहि क वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा आहे. या तीर्थक्षेत्राला अ वर्ग देवस्थानचा दर्जा मिळाला पाहिजे, ही विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, मार्च महिन्यानंतर जून महिन्यानंतरही ऑनलाईन रिकन्सिलिएशन होत नाही. जोपर्यंत मार्चनंतरही जून महिन्यापर्यंत ऑनलाईन रिकन्सिलिएशन होत नाही तोपर्यंत ही अनियमितता अशीच राहणार आहे. नियोजनाच्या नावाखाली पैसे दिले जातात आणि ते अखिर्चित राहतात. अखर्चित निधी सरेंडर करावा लागतो.

अध्यक्ष महोदय, अ वर्ग महानगरपालिकांमध्ये वित्तीय सल्लागार व ऑडिटर नसल्यामुळे मोठमोठे आर्थिक गैरव्यवहार होत असतात. माननीय वित्तमंत्री यांनी अ वर्ग महानगरपालिकांना वित्तीय सल्लागार व ऑडिटर्स देण्यासंदर्भात योजना राबविणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, जलसंपदा विभागासंदर्भात बोलतांना खूप दुःखाने बोलावेसे वाटते की, मागील 16 महिन्यांपासून या विभागाचा कारभार कसा चालू आहे ? विदर्भावर सातत्याने अन्याय का होत आहे ? मागच्या सरकारच्या काळामध्ये एखाद्या मंत्री महोदयांनी सांगितले की, पंधरा वर्षाच्या काळामध्ये 70 हजार कोटी रुपये सिंचनाकरिता खर्च झाले पण सिंचनात वाढ झाली नाही. तर त्याचा राजकीय मुद्दा बनवून 70,000 कोटी रुपये खर्च झाले, भ्रष्टाचार झाला, सिंचन क्षेत्रात वाढ झाली नाही. आता मी माननीय पाटबंधारे मंत्री यांना विचारतो की, मागील 16 महिन्यांमध्ये 10,000 कोटी रुपये खर्च झाले किती सिंचन झाले ? किती कामे झाली ? जुनी बिले काढून तंतोतंत पैसे देण्यात आले होते. यामध्ये केवळ जुनी बिले काढून दिली गेली. नवीन काम केलेले दिसले नाही. 7700 कोटी रुपयांचा कोणता वापर झाला ? जुन्या देणग्या दिल्या की, कामेही झाली ?

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गोपालदास अग्रवाल.....

दुष्काळाच्या चटक्यात सिंचनावरील तरतूद वाढविली नाही. तेलंगणा व आंध्र प्रदेश या राज्यांमध्ये मोठया प्रमाणावर सिंचनाकरिता पैसे उपलब्ध आहेत. यावर्षी 7272 कोटी रुपयांवरुन 7850 कोटी रुपयांपर्यंत सिंचनाकरित तरतूद केलेली आहे. या दोन्ही तरतुदीमध्ये केवळ 578 कोटी रुपयांचा फरक आहे.

सीसी-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गोपालदास अग्रवाल..........

अध्यक्ष महोदय, आज राज्यात दुष्काळी परिस्थिती असताना सिंचनावर आवश्यक तेवढी तरतूद केल्याचे दिसून येत नाही. शेजारच्या तेलंगना आणि आंध्रप्रदेशमध्ये सिंचनासाठी भरीव अशी तरतूद केलेली आहे. मागिल वर्षात 7272 कोटी रुपये आणि यावर्षी 7850 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. यावर्षी सिंचनासाठी फक्त 578 कोटी रुपये वाढवून मिळाले आहेत. दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे अनेक जिल्ह्यांमध्ये टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे. राज्य शासनाने आपले राज्य टँकरमुक्त करण्यासाठी सिंचनावर आवश्यक तेवढी तरतूद करण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, विदर्भातील चार जिल्ह्यांमध्ये 2 लाख 14 हजार हेक्टरचा अनुशेष आहे. माझ्याकडे महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचा अहवाल आहे. सदर अहवालामध्ये नागपूर विभागाचा 1 लक्ष 87 हजार हेक्टर एवढा अनुशेष आहे, असे नमूद केलेले आहे. तसेच अमरावती विभागाचा 9 लक्ष 97 हजार हेक्टरचा अनुशेष असल्याचे नमूद केलेले आहे. एका बाजूला पंतप्रधान कृषी सिंचन योजना, एआयबी योजना राबविली जात आहे. गोसीखुर्दचा राष्ट्रीय प्रकल्प राबविला जात आहे. आज भारतीय जनता पार्टीचे सरकार दिल्ली आणि महाराष्ट्रात आहे. राज्य शासनाने 1600 कोटी रुपयांची मागणी केलेली होती. परंतु, सन 2014-2015 मध्ये फक्त 32 कोटी आणि सन 2015-2016 मध्ये 230 कोटी रुपये राज्य शासनाला प्राप्त झालेले आहेत. आज 31 मार्च, 2016 हा आर्थिक वर्षाचा शेवटचा दिवस आहे. माननीय वित्तमंत्र्यांनी बेंबळा प्रकल्पासाठी एआयबीपी योजनेच्या माध्यमातून 68 कोटी रुपये राज्य शासनाला मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. माननीय महसूलमंत्री श्री. एकनाथराव खडसे नेहमी सांगत असतात की, मंत्रिमंडळातील काही मंत्र्यांचे दिल्लीत थोडेसे वजन कमी आहे. मागिल वर्षीचा पैसा सरदार सरोवरासाठी खर्च केलेला आहे. राज्य शासनाने पंतप्रधान कृषी सिंचन योजनेंतर्गत निधी मिळविण्यासाठी आवश्यक तो प्रयत्न केलेला नाही. परिणामी राज्य शासनाचे सिंचनासाठी मोठे नुकसान झालेले आहे.

अध्यक्ष महोदय, एकेकाळी गोंदिया जिल्ह्यासाठी 50 कोटी रुपये मिळत होते. आता मात्र गोंदिया जिल्ह्यातीज मेजर प्रोजेक्ट पूर्ण करण्यासाठी केवळ 50 लाख आणि मायनगर प्रोजेक्टसाठी 20 लाख रुपयांचा निधी मिळत असून, ती बाब आमच्यावर अन्याय केल्यासारखी आहे.

.......2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गोपालदास अग्रवाल..........

अध्यक्ष महोदय, माननीय पीठासीन अधिकाऱ्यांनी जलसंपदा विभागावर बोलण्यासाठी मला अजून 10 मिनिटांचा अवधी द्यावा, अशी विनंती करीत आहे. सिंचनासाठी 7888 कोटी रुपयांची आवश्यकता लागणार आहे. आतापर्यंत 10700 कोटी रुपये खर्च करुनसुध्दा सिंचनामध्ये म्हणावी तशी वाढ झालेली नाही.

अध्यक्ष महोदय, राज्यपाल महोदयांच्या निकषानुसार कृष्णा खोरे आणि व्हीआयडीसीच्या माध्यमातून निधी देण्यात आलेला होता. नागपूर विभागातील मध्यम प्रकल्पांसाठी 53 कोटी रुपये, अमरावती विभागातील प्रकल्पांसाठी 350 कोटी रुपये आणि मेजर प्रोजेक्टला 643 कोटी रुपये दिले आहेत. एआयबीपी योजनेंतर्गत निधीचे नियोजन केले होते. आज आवश्यक ते प्रकल्प पूर्ण करण्यासाठी निधी मिळणार नाही, अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे.

अध्यक्ष महोदय, विदर्भात अनेक प्रकल्पांची कामे सुरु आहेत. परंतु, पर्यावरण विभागाने विदर्भातील 40 प्रकल्पांवर बंधने घातलेली आहेत. तसेच एसीबीच्या माध्यमातून 91 प्रकल्पांची चौकशी सुरु केलेली आहे. एक प्रकारे विदर्भातील प्रकल्प थांबविण्याचा प्रयत्न केला जात आहे. एमडब्ल्युआरएमधील त्रुटींमुळे 18 प्रकल्प थांबविण्यात आले आहेत. आज केवळ विदर्भात किंवा गोसीखुर्द प्रकल्पात भ्रष्टाचार सुरु आहे काय ? सिंचनामध्ये ज्या ठिकाणी भ्रष्टाचार झालेला आहे, अशा ठिकाणची कामे थांबविली पाहिजेत.

अध्यक्ष महोदय, दिनांक 17-12-2015 रोजी गोसीखुर्द प्रकल्पाच्या संदर्भात सचिवांच्या समितीने एसीबीच्या माध्यमातून चौकशी केली जात आहे. अशा ठिकाणची कामे तत्काळ थांबविण्याबाबतचा निर्णय दिलेला आहे. अशा प्रकारे कामे रद्द करण्याचा अधिकार सचिवांच्या समितीला दिला तर भविष्यात अशा प्रकल्पांची किंमत आणि लिटिगेशन वाढणार आहे. त्यामुळे त्यावर तोडगा कसा काढणार असा माझा प्रश्न आहे. कोणताही निर्णय घेण्यापूर्वी सखोल विचाविनिमय करण्याची आवश्यकता आहे.

.......3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गोपालदास अग्रवाल..........

अध्यक्ष महोदय, विदर्भातील सिंचनकामासाठी निधीचे वाटप केले होते. 1 हजार कोटी रुपये गोसीखुर्द प्रकल्पासाठी दिले होते. विदर्भातील 4 जिल्ह्यासाठी 750 कोटी रुपये देण्यात आले आहेत. माननीय वित्तमंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार यांना चंद्रपूर जिल्ह्यासाठी आवश्यक तेवढा निधी देता आला नाही, हेच खरे दु:ख आहे. आज विदर्भातील चार पैकी तीन सन्माननीय सदस्य हे सत्ताधारी पक्षात काम करीत आहेत. अशा जिल्ह्यात आवश्यक तो निधी दिलेला नाही.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील रजेकावकाटी योजना ही माननीय मुख्यमंत्र्यांनी टॉप प्रॉयरीटवर घेतलेली आहे. सदरहू प्रकल्प आजमितीस 80 टक्के पूर्ण झालेला आहे. परंतु, उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी आवश्यक तो निधी दिलेला नाही. या प्रकल्पासाठी आणखी 15 कोटी रुपयांची आवश्यकता आहे, हे मी माननीय वित्तमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देत आहे.

अध्यक्ष महोदय, टेडवसयुनी हा प्रकल्प देखील 75 टक्के पूर्ण झालेला आहे. या प्रकल्पासाठी आणखी 15 कोटी रुपयांची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, 1981 पासून सुरु असेलेल्या पिनके प्रकल्पाला यावर्षी 10 लाख रुपयांचा निधी दिला तर ते काम पुन्हा नव्या जोमाने सुरु होण्यास मदत होणार आहे. परंतु, या प्रकल्पासाठी शासनाने केवळ 10 हजार रुपयांचा निधी दिलेला आहे. अशा प्रकारची भूतो न भविष्यती अशी अन्यायकारक परिस्थिती अर्थसंकल्पामध्ये केलेली असल्यामुळे आमच्यावर अन्याय झालेला आहे.

अध्यक्ष महोदय, डांगोरली इंटर इस्टेट प्रोजेक्ट याचबरोबर नवेगाव देवरी, उपसा सिंचन योजनांच्या संदर्भात मुख्यमंत्री महोदयांनी राज्यपाल महोदयांकडे शिफारस केलेली होती. यामध्ये काही अटी टाकण्यात आलेल्या आहेत. त्याला सेल्फवर टाकण्याची गरज आहे. अशी देखील मी या ठिकाणी विनंती करीत आहे.

अध्यक्ष महोदय, सभागृहात माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री श्री. गिरीश बापट उपस्थित आहेत. अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत 14 जिल्हाला एक रुपयांमध्ये ज्वारी, दोन रुपयांमध्ये गहु आणि तीन रुपयांमध्ये तांदुळ दिले जाणार आहे.

**( अध्यक्षस्थानी माननीय अध्यक्ष )**

DD-1……

**(अध्यक्षस्थानी माननीय अध्यक्ष)**

श्री.गोपालदास अग्रवाल....

सन्माननीय मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार साहेब गोंदिया, भंडारा, गडचिरोली आणि चंद्रपूर या जिल्ह्यांतील दरडोई उत्पन्न काय आहे? राज्यामधील गडचिरोली जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न शेवटून दुसऱ्या क्रमांकावर आहे. त्यामुळे आपण या चारही जिल्ह्यांचा विचार करावा. केवळ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या म्हणून त्या भागाकडे जास्त लक्ष देणे, हे संयुक्तिक नाही. जे लोक स्वतः मरायला बाहेर निघाले आहेत, त्या नक्षलवादी जिल्ह्याचा शासनाने विचार केला पाहिजे.

अध्यक्ष महाराज, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये भातासाठी गोदामे बांधण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी देण्याचे अभिवचन दिलेले आहे. आमच्या जिल्ह्यामध्ये भात ठेवून हजारो कोटी रुपयांचे नुकसान होते. आदिवासी विभागामध्ये आपण गोदामे बांधण्याचे काम करावे. गोंदिया आणि गडचिरोली जिल्ह्यात राईस मिल मालकांनी 300 कोटी रुपयांचा अपहार केलेला आहे. जेव्हा हे सरकार सत्तेवर आले तेव्हा त्या व्यापाऱ्यांवर त्वरित कारवाई व्हावी, अशी मी मागणी केली होती.

अध्यक्ष महाराज, सिंचनासाठी या राज्यातील विदर्भ, मराठवाडा या क्षेत्राला केवळ दहा लाख रुपयांचे अनुदान दिलेले आहे. विदर्भातील सिंचन प्रकल्पामध्ये पाणी भरपूर आहे, परंतु निधी नाही. ते प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शासनाने निधी दिला पाहिजे. सन्माननीय आमदारांचा निधी वाढविला पाहिजे. तेलंगणा, मध्यप्रदेश या राज्यातील आमदारांचे भत्ते, त्यांच्या बाकी सोई सुविधांचा विचार केला जातो, परंतु आपले राज्य मात्र त्या बाबतीत गप्प आहे. याचाही शासनाने विचार करावा. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

-----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री.गोपालदास अग्रवाल आपण काल पाईंट ऑफ ऑर्डरसंबंधीचा मुद्दा उपस्थित केला होता. पहिले वक्ते जास्त वेळ बोलतात त्यामुळे आम्हाला वेळत मिळत नाही, असे आपण म्हणाला होता. आपल्या पक्षासाठी 39 मिनिटे वेळ होता, त्यापैकी आपण 34 मिनिटे भाषण केले आहे. उर्वरित पाच मिनिटांमध्ये बाकीच्या सन्माननीय सदस्यांना बोलावे लागणार आहे.

श्री.गोपालदास अग्रवाल : अध्यक्ष महाराज, आपण आता जे सांगितले ते मी मान्य करतो, परंतु ही प्रथा आपण पाळत असाल तर आपले वारंवार स्वागत आहे. आपण ही प्रथा अंमलात आणावी, अशी मी आपणास विनंती करतो.

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.ग.आ. देशमुख (सांगोला) : अध्यक्ष महाराज, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील या पाच महत्वाच्या विभागाच्या मागण्यांवर या सभागृहात चर्चा होत आहे. जलसंपदा या विभागावर माझे विचार मी या ठिकाणी मांडणार आहे. या विभागासाठी सन 2016-2017 मध्ये 7857 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. माननीय वित्त मंत्र्यांनी जो शब्द दिलेला होता, तो त्यांनी पाळला. फार भरीव तरतूद केलेली आहे असे आपल्याला म्हणता येणार नाही. सन 2015-2016 पेक्षा सन 2016-2017 मध्ये 500 कोटी रुपयांची वाढ केलेली आहे. आपल्या राज्याची सिंचनाची परिस्थिती पाहिली तर या देशामध्ये आपल्या राज्याचा 28 वा क्रमांक लागतो. छत्तीसगड राज्य सोडले तर आपले राज्य शेवटच्या क्रमांकावर आहे. छत्तीसगड राज्य आपल्या राज्यापुढे गेले नाही म्हणून मी माननीय वित्त मंत्र्यांना धन्यवाद देतो.

अध्यक्ष महाराज, माननीय जलसंपदा मंत्र्यांनी या राज्यामधील सिंचनाची टक्केवारी दिलेली नाही. या राज्यात सिंचन किती आहे, याची माहिती विभागाकडे उपलबध नसेल तर हा विभाग किती गंभीर आहे, याची आपल्याला कल्पना येते. तीन वर्षापूर्वी या ठिकाणी मीच हा प्रश्न उपस्थित केला होता. सन 2001 ते सन 2011 पर्यंत या दहा वर्षाच्या कालावधीत या राज्यामध्ये 22 हजार कोटी रुपये खर्च करुन एक टक्के इरिगेशन वाढले होते. गेल्या दीड वर्षाच्या काळामध्ये त्याबाबतीत समाधानकारक उत्तर दिलेले आहे असे नाही. तत्कालीन जलसंपदा मंत्र्यांनी उत्तर दिले होते की, या राज्याची सरासरी सिंचनाची टक्केवारी 18 टक्क्यांवरुन 23 टक्क्यावर गेलेली आहे. पाच टक्के वाढ झालेली आहे. पिण्यासाठीचे पाणी उद्योगांसाठी वापरले जाते. धरणाच्या पाणीसाठ्यांमध्ये वाढ झालेली आहे, परंतु सिंचनात मात्र वाढ झालेली नाही, असे उत्तर त्यावेळी दिले होते. या राज्यात एक तृत्यांश भाग दुष्काळी भाग असून 30 टक्के जनता दुष्काळामध्ये होरपळत आहे. या राज्यातील शेतीचे सकल उत्पन्न पाहिले तर एकूण उत्पन्नापैकी 10 टक्के उत्पन्न हे शेतीतून मिळते. या दहा टक्के उत्पन्नावर या राज्यातील 55 टक्के जनता शेतीवर अवलंबून आहे. या उत्पन्नावर त्यांचा उदरनिर्वाह चालतो. शेतीचे उत्पन्न गेल्या दोन, तीन वर्षामधे आलेल्या दुष्काळी परिस्थितीमध्ये अजिबात वाढले नाही.

अध्यक्ष महाराज, बाराव्या पंचवार्षिक योजनेचे हे शेवटचे वर्ष आहे. या पंचवार्षिक योजनेत

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.ग.आ. देशमुख....

शेतीच्या विकासाचा दर चार टक्के ठरविलेला होता. तो चार टक्के दर सोडून आता विकासाचा दर या दोन वर्षाच्या कालावधीमध्ये मायनस झालेला आहे. अशा परिस्थितीमध्ये ग्रामीण भागातील, मजूर, शेतकरी, शेतीवर अवलंबून असलेली जनता ही त्या दहा टक्के उत्पन्नावर जगत असेल तरी देखील देशाच्या तुलनेत ग्रामीण भागातील महाराष्ट्रातील उत्पन्न दिवसेंदिवस कमी होत आहे.

यानंतर EE-1 ..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. ग.आ. देशमुख ....
महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील उत्पन्न पाहिले तर, ते दिवसेंदिवस कमी होत आहे. ग्रामीण भागात बेकारी व दारिद्र्य वाढत आहे. त्यावर उपाय करायचा झाला, शेतीचे उत्पादन वाढवायचे झाले तर, सिंचनाखेरिज आपल्याला पर्याय नाही. आपण सिंचनाचे प्रमाण 18 किंवा 23 टक्के धरले तरी, मघाशी सांगितल्याप्रमाणे सिंचनाच्या बाबतीत आपण शेवटच्या टप्प्यावर आहोत.

अध्यक्ष महोदय, दुष्काळी भाग असल्याने आज अशी परिस्थिती आहे की, मोठ्या व मध्यम प्रकल्पांचे सर्व पाणी पिण्याकरिता ठेवलेले आहे. हे प्रकल्प कोरडे पडल्यामुळे उद्योगधंदे बंद होत आहेत. शहरी भागातील जनता स्थलांतर करीत आहे, याची चर्चा सभागृहात झालेली आहे त्यामुळे मी त्याची पुनरावृत्ती करणार नाही.

अध्यक्ष महोदय, वित्त मंत्री महोदयांनी दिलेल्या माहितीप्रमाणे आंध्र प्रदेशचे दोन भाग होऊन दोन राज्य झाली. त्यातील तेलंगण या राज्याने सन 2016-2017 मध्ये 26,625 कोटी रूपये पाटबंधारे विभागात सिंचनाकरिता तरतूद केलेली आहे. ते छोटे राज्य जर एवढी तरतूद करीत असेल तर आपण 7800 कोटी रूपयांवर समाधान मानायचे आणि ते गेल्यावर्षीपेक्षा जास्त असल्याचा दावा करायचा, असे असेल तर याबाबत आपणच निर्णय घ्यावा.

अध्यक्ष महोदय, आंध्र प्रदेशनेसुध्दा 7335 कोटी रूपयांची तरतूद केलेली आहे. तेलंगण राज्याने 26,625 कोटी रूपयांची तरतूद केलेली आहे. आपल्या शेजारच्या राज्यांतील परिस्थिती पाहिली तर आंध्र प्रदेशची एकत्रित राज्य असताना सिंचनाची टक्केवारी 45 टक्के होती. आपण याबाबत विचार केला पाहिजे. आपल्या अंदाजपत्रकामध्ये कर्ज काढा, त्याकरिता निधी उभा करा, आणखी काही उपाययोजना करा. या राज्यात आपण आतापर्यंत 75 हजार कोटी रूपये सिंचनावर खर्च केलेले आहेत. विदर्भातील, मराठवाड्यातील प्रकल्प अर्धवट राहिलेले आहेत. पश्चिम महाराष्ट्रातील प्रकल्प तर पुढे सरकतच नाहीत, अशी परिस्थिती आहे. अशा परिस्थितीत मी एवढेच सांगणार आहे की, आपण जोपर्यंत सिंचनाची टक्केवारी वाढवणार नाही, तोपर्यंत या राज्यातील ग्रामीण भागाची, तेथील शेतीची अवस्था सुधारणार नाही.

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. ग.आ. देशमुख ....

अध्यक्ष महोदय, पश्चिम महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर दुष्काळी भाग आहे. कृष्णा पाणी तंटा लवादाचे सर्व पाणी अडविण्याच्या निमित्ताने टेंभू ही उपसा जलसिंचन योजना 20 वर्षांपूर्वी सुरु केली गेली. म्हैसाळची योजनाही सुरु केली. दोन वर्षांपूर्वी याच टेंभू योजनेकरिता 140 कोटी रुपयांची तरतूद केली होती. गेल्या वर्षी त्याकरिता 87 कोटी रुपयांची तरतूद केली गेली. सन 2016-2017 मध्ये त्याकरिता 83 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. टेंभू योजनेबाबत सांगावयाचे झाले तर जेव्हा ही योजना सुरु केली होती, त्यावेळेस 1996 सालामध्ये ही योजना 1416 कोटी रुपयांची होती. आज या योजनेचा खर्च 4800 कोटी रुपयांवर गेलेला आहे. वाढीव दर वगळता या योजनेचे काम काही पुढे सरकत नाही. म्हैसाळची योजना तशीच रखडत पडलेली आहे. ती योजना एआयबीपीमध्ये घेऊनही त्यामध्ये फारसा काही फरक पडला, अशी परिस्थिती नाही.

अध्यक्ष महोदय, एआयबीपीबाबत सांगावयाचे झाले तर, पश्चिम महाराष्ट्रातील एकही प्रकल्प एआयबीपीमध्ये घेतलेला नाही. माननीय अर्थ मंत्र्यांनी सांगितले की, केंद्र सरकारचे सन 2016-2017 मध्ये दरवर्षी दिले जातात त्यापेक्षा 24 हजार कोटी रुपये जास्त अनुदान मिळणार आहे. त्यांनी हे सांगितले नाही की, पूर्वीचे जे नियोजन आयोग होते, त्यांच्या निरनिराळ्या 147 केंद्रीय योजना राज्यात होत्या. आता त्या कमी करुन त्यांची संख्या 66 वर आणलेली आहे. त्याचप्रमाणे या योजनेला 100 टक्के अनुदान मिळत होते त्याचे प्रमाण कमी होऊन ते 60:40 असे केलेले आहे. 147 योजना पूर्वी केंद्रीय योजना म्हणून या राज्यात राबविल्या जात होत्या, त्या आता 66 वर आलेल्या असल्याने त्याचा राज्यातील योजनांवर किती परिणाम होणार आहे, एकूण खर्चाच्या बाबतीत त्याचा काय परिणाम होणार आहे, हे सांगितले तर अधिक बरे होईल.

अध्यक्ष महोदय, टेंभू योजनेतील पाण्याचे दर हे प्रवाही सिंचनापेक्षा दसपटीने जास्त आहेत. आता टेंभूचे पाणी 14 महिन्यांपूर्वी सांगोला विधानसभा मतदारसंघातील 10-12 गावांमध्ये आलेले आहे. तेथील शेतकऱ्यांनी प्रवाही सिंचनापेक्षा 10 पट रक्कम भरुन ते पाणी घेतलेले आहे. जलसंपदा मंत्री महोदयांनी सांगितले की, 1 कोटी रुपये भरल्याशिवाय तुम्हाला पाणी मिळणार नाही. तेथील शेतकऱ्यांनी 1 कोटी रुपये जमवून दिले. परंतु, पाणी ज्या प्रमाणात मिळाले पाहिजे, त्या प्रमाणात मिळत नाही, याची चौकशी झाली पाहिजे.

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. ग.आ. देशमुख ....

अध्यक्ष महोदय, सन 2005 मध्ये या सभागृहाने कायदा केला. पाण्याचे समान वाटप, त्याच प्रमाणे पाण्याचे दर ठरविण्याचे अधिकार त्या कायद्यातील कलम 11 अन्वये जलसंपदा प्राधिकरणाला दिलेले आहेत. या प्राधिकरणाने सरकारकडे एक प्रस्ताव पाठविलेला आहे. कलम 11 अन्वये या राज्यातील प्रवाही सिंचनाचे, उपसा सिंचनाचे दर ठरविण्याचे अधिकार त्या प्राधिकरणाकडे आहेत, ते सरकारकडे राहिलेले नाहीत. असे असताना कालपरवा चर्चा करताना माननीय जलसंपदा मंत्र्यांनी सांगितले की, जो प्रस्ताव पाठविलेला आहे, वित्त विभाग त्याची छाननी करीत आहे. माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, नियोजन विभाग त्याची छाननी करीत आहे. परंतु, छाननी करण्याचा त्यांना अधिकार नाही. त्यांचे मत किंवा सूचना असेल, परंतु या सभागृहाने कायद्याने तो अधिकार जलसंपदा प्राधिकरणाकडे दिलेला आहे. त्या कायद्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. सिंचनाच्या दराची अंमलबजावणी केली पाहिजे, अशी मी मागणी करु इच्छितो.

अध्यक्ष महोदय, मघाशी सांगितल्याप्रमाणे एआयबीपीखाली टेंभू हा प्रकल्प घ्यावा, अशाप्रकारची मागणी सातत्याने होत आहे. हा प्रकल्प का घेतला गेला नाही, याचाही खुलासा करण्याची गरज आहे. आता एआयबीपी राहिलेले नसल्याने निदान सन 2016-2017 या आर्थिक वर्षात तरी, टेंभूचा समावेश आता आलेल्या नवीन योजनेत करण्यात यावा, अशी मी विनंती करु इच्छितो.

FF-1/-...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. ग. आ. देशमुख.....

अध्यक्ष महोदय, गोसीखुर्द हा राष्ट्रीय प्रकल्प आहे. त्यावर 7 हजार 800 कोटी रुपयांपैकी 1 हजार कोटी रुपये ठेवलेले आहेत. ही चांगली बाब आहे. हे करीत असताना राज्यपाल महोदयांना पत्र पाठवून, मंत्रिमंडळाचा ठराव करुन ते 1 हजार कोटी रुपये अनुशेषातून वगळण्यात आलेले आहेत. पहिल्यांदा असे होत आहे. त्यामुळे याचाही खुलासा करण्यात यावा.

अध्यक्ष महोदय, या सभागृहामध्ये अनेक वेळेस मागणी केली. दुष्काळी भागातील प्रकल्पावर एआयबीपीमधून पैसे दिले असतील तर ते अनुशेषातून वगळण्यात यावे, अशी मागणी कधीही झाली नाही. गोसीखुर्द हा राष्ट्रीय प्रकल्प असून तो झाला पाहीजे. विदर्भातील व मराठवाड्यातील सर्व प्रकल्प झाले पाहीजे. परंतु या वर्षी हे केलेले आहे, त्यामुळे दुष्काळी भागावर अन्याय झालेला आहे.

अध्यक्ष महोदय, दराच्या बाबतीत विचार होण्याची गरज आहे आणि पुरवणी मागण्यांच्या वेळेस टेंभू आणि म्हैसाळ या प्रकल्पाकरिता अधिकचा निधी देऊन त्या दुष्काळी भागातील योजना कशा पूर्णत्वास जातील, याचा विचार करावा.

अध्यक्ष महोदय, अन्न व नागरी पुरवठा या बाबीवर मी बोलणार आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना आपल्या राज्यामध्ये सुरु झाली. त्यामध्ये ज्या कुटुंबाचे उत्पन्न 44 हजार रुपये आहे, त्या कुटुंबाचा त्यामध्ये समावेश झालेला आहे. येथे आताच मागणी केली गेली आहे. मराठवाडा आणि विदर्भातील 14 जिल्ह्यांमध्ये पांढरे कार्डधारक सोडून म्हणजेच ज्या कुटुंबाचे उत्त्पन्न 1 लाख रुपयापेक्षा जास्त आहे, अशी कुटुंबे सोडून इतर सर्व कुटुंबांना दुष्काळाच्या काळापुरती का असेना अन्न सुरक्षा योजना लागू करावी, तसेच ज्या ठिकाणी 50 पैशाच्या आत आणेवारी आहे, तेथे ही योजना लागू करावी, अशी मी मागणी करतो.

अध्यक्ष महोदय, राहिलेली सर्व केशरी कार्ड अन्न सुरक्षा योजनेमध्ये सामील झाली, त्याबद्दल काही तक्रार नाही. परंतु त्यांना ऑक्टोबर महिन्यापर्यंत रास्त धान्य दुकानातून जे धान्य मिळत होते, म्हणजेच 9 रुपये 50 पैसे किलोने गहू व 10 रुपये 50 पैसे किलोने तांदूळ मिळत होते. ऑक्टोबर पासून सोलापूर जिल्ह्यामध्ये असे धान्य देण्याचे बंद झालेले आहे. पूर्वीच्या पद्धतीने धान्य देणे पुन्हा सुरु करावे, अशी मी मागणी करतो.

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. ग. आ. देशमुख.....

अध्यक्ष महोदय, माझ्याकडे पश्चिम महाराष्ट्रातील आकडेवारी आहे. प्रत्येक प्रकल्पावर विशेषतः सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येक पाटबंधारे प्रकल्पावर दोन वर्षापूर्वी जी रक्कम मिळत होती, तिची टक्केवारी निम्म्यावर आणलेली आहे. हा दुष्काळी भागातील जनतेवर अन्याय आहे. त्याबाबतीत पुरवणी मागण्यामध्ये विचार करण्यात यावा, अशी मी मागणी करु इच्छितो.

अध्यक्ष महोदय, कृष्णा पाणी टंचाई लवादाने 2013 साली दुसरा निवाडा दिलेला आहे. त्या दुसऱ्या निवाड्याला आंध्र प्रदेश आणि कर्नाटक या राज्याच्या तुलनेत महाराष्ट्राला 88 टीएमसी पाणी जास्त मिळालेले आहे. त्याला आक्षेप घेतलेला आहे. त्याला सर्वोच्च न्यायालयाने स्टे दिलेला आहे. हा स्टे उठविण्याच्या दृष्टीने त्वरीत प्रयत्न करावे, अशी मी मागणी करतो. आपण मला बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल मी आपले आभार मानतो. तसेच माझे दुसरे सहकारी बोलण्याचे राहिले असून त्यांना देखील काही वेळ द्यावा, अशी मी विनंती करतो. धन्यवाद.

---*---

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. अनिल बोंडे (मोर्शी) : अध्यक्ष महोदय, मी सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यावरील जलसंपदा विभागावर चर्चा करण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, विदर्भावर आतापर्यंत म्हणजेच मागील काळात जो अन्याय झाला तो सिंचनाच्या बाबतीतच अन्याय झालेला आहे. त्यामुळे विदर्भाची प्रगती खुंटली. याचे कारण म्हणजे विदर्भ हा शाश्वत पावसाचा प्रदेश आहे. विदर्भामध्ये नद्या भरपूर प्रमाणात होत्या, परंतु नद्यातील पाण्याचे योग्य नियोजन झाले नाही. त्यामुळे नागपूर विभाग असो की, अमरावती विभाग असो तेथील शेतकरी कोरडवाहू राहिला. आजच्या आत्महत्त्येचे मूळ कारण म्हणजे विदर्भातील नद्यांतील पाण्याचे नियोजन झाले नाही, विदर्भातील सिंचनाचा अनुशेष राहिला. तसेच विदर्भातील प्रत्येक माणूस सर्वात जास्त संवेदनशील असेल तर विदर्भातील पाण्याच्या नियोजनाच्या बाबतीत आहे. त्यामुळे 2007 मध्ये जेव्हा आत्महत्त्यांच्या बाबतीत परिणामकारक उपाययोजना करण्याकरिता विदर्भात सर्वेक्षणाअंती अनेक प्रकल्प सुरु झाले आणि त्यानंतर विदर्भ सिंचन महामंडळाच्या माध्यमातून कार्यान्वित होत असताना दुर्दैव असे आहे की, अजून पर्यंत ते प्रकल्प पूर्ण झाले नाही. काही ठिकाणी जलसाठा निश्चितपणे निर्माण झाला, परंतु शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पाणी गेले नाही. आजही तीच परिस्थिती आहे. विदर्भातील प्रत्येक शेतकऱ्याने भारतीय जनता पक्षाच्या सरकारला मतदान केले. आता त्यांची ही अपेक्षा आहे की, विदर्भातील सर्व सिंचनाचे प्रकल्प पूर्ण झाले पाहीजे. परंतु सद्याची परिस्थिती अशी आहे की, या निवडणुकीच्या अगोदर जी परिस्थिती होती...(अडथळा)...आदरणीय मंत्री श्री. गिरीष बापट हेही विदर्भातील आहेत. मी त्यांना विनंती करतो की, विदर्भातील सर्व आमदारांच्या भावना माननीय जलसंपदा मंत्र्यांपर्यंत पोचवाव्यात.

अध्यक्ष महोदय, निश्चितपणे विदर्भातील सिंचनाचा प्रश्न अतिशय गंभीर असून तो गंभीरतेने घ्यावा लागणार आहे. मागील पाच वर्षाच्या काळामध्ये आता मुख्यमंत्री असलेले माननीय श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वामध्ये आम्ही वारंवार माननीय राज्यपालांकडे गेलो होतो. त्यावेळी आमच्यासोबत सन्माननीय सदस्य प्रा. विरेंद्र जगताप हे देखील होते. राज्यपाल महोदयांनी तीन वर्षापर्यंत निर्देश दिले होते आणि वारंवार खंत व्यक्त केली होती. विदर्भामध्ये विदर्भ सिंचन महामंडळाला दिलेला पैसा खर्च होत नाही, ही सर्वात महत्त्वाची खंत राज्यपाल महोदयांनी वारंवार व्यक्त केली होती. दुर्दैवाने आजही असे म्हणावे लागते की...(अडथळा)...यामध्ये शेमचा प्रश्न नाही.

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. अनिल बोंडे...

याची कारणे देखील पहाणे आवश्यक आहे. विदर्भ सिंचन महामंडळाचे यावर्षी, आतापर्यंत मार्चचे 2 हजार 729 कोटी रुपये अखर्चित आहेत.

...GG/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(**अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष डॉ.सतीश पाटील**)

डॉ.अनिल बोंडे...

राज्यपाल महोदयांनी निर्देश दिले होते की, विदर्भ सिंचन महामंडळाचा निधी का खर्च होत नाही यासंदर्भात विभागीय आयुक्तांनी दर 3 महिन्यांची आढावा बैठक घ्यावी. निधी खर्च न होण्यामागे अनेक कारणे आहेत. महामंडळाचा कर्मचारी वर्ग व अभियंता वर्ग कमी आहे. झुडपी जंगलाची अडचण आहे. वन विभागाचे क्लिअरन्सेस नाहीत. पुनर्वसनाचे प्रश्न निर्माण झालेले आहेत. हे सर्व प्रश्न आजही सुटलेले नाहीत. विदर्भ सिंचन महामंडळाकडे पैसे उपलब्ध असताना विदर्भातील लोक पाण्यासाठी आसूसलेले आहेत. पैसे उपलब्ध असतानाही विदर्भातील प्रकल्प पूर्ण होत नाहीत. यामध्ये एक ॲडिशन झालेले आहे की, विदर्भातील सर्व प्रकल्पासंदर्भात ॲन्टी करप्शन ब्यूरोने चौकशा सुरु केल्या आहेत. विदर्भात या प्रकल्पावर काम करणाऱ्या अनेक अभियंत्यावर ॲन्टी करप्शन ब्यूरोच्या केसेस लागत आहेत. ज्यांनी पाप केले असेल त्यांनी ते भरलेच पाहिजे. परंतु विदर्भातील प्रकल्पामुळे लाभान्वीत होणाऱ्या माणसाचे म्हणणे आहे की, त्या चोरांना जेलमध्ये टाकण्याबाबत दुमत नाही परंतु आमचा प्रकल्प पूर्ण झाला पाहिजे. प्रकल्पाच्या माध्यमातून त्यांच्याशेतापर्यंत पाणी आले पाहिजे, अशी त्यांची व सर्वांची भावना आहे.

अध्यक्ष महोदय, जलसंपदा मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, विदर्भ सिंचन महामंडळाचा 2,729 कोटी रुपये निधी आज 31 मार्चपर्यंत अखर्चित आहे. महामंडळाकडे पैसे उपलब्ध आहेत परंतु दुर्दैवाने विदर्भातील अभियंते किंवा कंत्राटदार प्रकल्पांचे काम करण्यास तयार नाहीत, याच्या मुळाशी जाणे आवश्यक आहे. याकरिता विदर्भ सिंचन विकास महामंडळाचा रिव्ह्यू घेण्यात यावा, अशी माझी जलसंपदा मंत्री महोदयाना विनंती आहे. महामंडळाचे पैसे का खर्च होत नाहीत. भ्रष्टाचारामुळे विदर्भातील प्रकल्प बंद आहेत, असे आपण सांगितले तर ते उत्तर लोकांना पटणे कठीण जाणार आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदार संघातील पंढरी, बेंबळी, जटांजली, चांदस, पवणी, चारगट, पाथ या प्रकल्पांची कामे 75 ते 95 टक्क्यापेक्षा अधिक पूर्ण झालेली आहेत. या प्रकल्पाच्या माध्यमातून जलसाठा ताबडतोब निर्माण होऊ शकतो. परंतु घोडे कोठे अडले, हे समजण्यास मार्ग नाही. हे घोडे सरळ चालले पाहिजे कारण लोक आमच्या अंगावर येत आहेत. त्यामुळे हे प्रकल्प पूर्ण करण्यात यावेत, अशी माझी जलसंपदा मंत्री महोदयांना विनंती आहे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.अनिल बोंडे...

अध्यक्ष महोदय, सदर प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पाणी पोहोचले पाहिजे. प्रकल्पात केवळ जलसाठा करणे, याला अर्थ राहणार नाही. आताही अप्पर वर्धा धरणाच्या शेवटपर्यंतच्या कमांड भागामध्ये कालवे गेले नाहीत, लोअर वर्धाची देखील तीच परिस्थिती आहे. जे प्रकल्प पूर्ण झालेले आहेत त्यांच्या कालव्यांच्या कामांना सुरुवात झाली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, विदर्भातील अनेक ठिकाणचे प्रकल्प वरच्या भागात व कमांड क्षेत्र खालच्या भागात आहे. त्यामुळे लोक कालव्यांना विरोध करतात. कालव्याला लायनींग असले तर जमीन खराब होते. त्यामुळे लोकांची मागणी आहे की, ग्रॅव्हीटीने पाण्याचे सिंचन करण्यात यावे. या प्रकारचा प्रयोग अनेक देशामध्ये करण्यात आला आहे. आमच्याकडील काही पाणलोट संस्थांनी काही प्रकल्पावर ग्रॅव्हीटीवर आधारीत प्रवाही सिंचन केले आहे. काही ठिकणी कालव्याच्या ऐवजी प्रवाही सिंचन करता येणे शक्य आहे. परंतु याबाबतीतील सर्व संकल्प चित्र दिलेले असताना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येत नाही. सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाली नाही तर पुढील 3-4 महिन्यामध्ये सदरहू काम पूर्ण होणार नाही.

अध्यक्ष महोदय, प्रकल्पांच्या माध्यमातून जलसाठा निर्माण होईल परंतु शेवटच्या माणसापर्यंत पाणी पोहोचणार नाही. जे प्रकल्प पूर्ण झालेले आहेत किंवा जुन्या काळातील आहेत त्यामधील लाभक्षेत्र विकासाची कामे करणे आवश्यक आहे. शेतकऱ्याकडून आपण पाणी पट्टी घेतो, पाणी पट्टी घेतल्यानंतर ती त्या भागात खर्च होणे आवश्यक आहे. विदर्भामध्ये घेतलेली पाणी पट्टी विदर्भात खर्च करण्यात आली नाही, हे मी पुराव्यानिशी सांगू शकतो. लाभक्षेत्र विकासामध्ये कालवे, कालव्याचे लायनिंग, मायनर पाटचाऱ्या, दुरुस्ती यांच्या ऐवजी पाईपलाईनने लोकांना प्रकल्प हवा असेल तर लाभक्षेत्र विकासाच्या माध्यमातून तो करुन देणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, शेतदरी नावाचा मध्यम प्रकल्प असून तो सन 1982 साली करण्यात आला आहे. या प्रकल्पाचे कालवे फुटलेले असून हा प्रकल्प उंचावर आहे. या भागातील लोक सातत्याने पाईप लाईनने सिंचन सुविधा उपलब्ध करुन द्या, अशी मागणी करीत आहेत. पाईप लाईनने पाणी उपलब्ध करुन दिले तर ते 100 टक्के वापरता येते व त्यामुळे जमीन चोपत नाही. जमीन चोपन होणे हॉर्टिकल्चरसाठी अतिशय नुकसानकारक आहे.

डॉ.अनिल बोंडे...

अध्यक्ष महोदय, जलसंपदाच्या परिसरामध्ये अनेक शेतकऱ्यांची जमीन संपादन करण्यात आली आहे. या संपादनामुळे प्रकल्पग्रस्त झालेल्यांचे प्रश्न अद्याप प्रलंबित असल्याने याप्रकरणी विचार करणे आवश्यक आहे. आता ज्यांचे पुनर्वसन करावयाचे आहे ते करताना प्रकल्पग्रस्तांसाठी जो नवीन कायदा लागू केला आहे त्यानुसार करणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, प्रकल्पाकरिता अनेक ठिकाणी अधिकचे भूसंपादन करण्यात आले आहे परंतु त्या जमिनीचा वापर करण्यात येत नाही. या जमिनीचा वापर इतर प्रकल्पाकरिता विशेषतः पर्यटनाकरिता करणे आवश्यक आहे. तलावाच्या ठिकाणी पर्यटन झाले तर त्या गावातील स्थानिक लोकांना चांगल्या प्रकारचा रोजगार उपलब्ध होऊ शकतो. अशा जमिनी महसूल किंवा पर्यटन विभागाकडे वर्ग केल्या तर मला वाटते की, या भागातील लोकांचे जीवनमान उंचावेल.

अध्यक्ष महोदय, प्रकल्पाच्या किंवा कालव्याच्या काठावरील सोलर विद्युत निर्मितीचा प्रस्ताव अनेक दिवसापूर्वी मंत्री महोदयांकडे पाठविण्यात आला आहे. विदर्भात सोलर विद्युत निर्मिती चांगल्या प्रकारे होऊ शकते कारण या भागात तापमान व प्रकाश वर्षभर भरपूर असतो. त्यामुळे प्रकल्पांच्या उर्वरित जमिनीवर सोलर निर्मिती करण्यात आली तर अतिशय चांगल्या तऱ्हेने विद्युत निर्मिती होऊ शकते.

अध्यक्ष महोदय, पर्यटन हा महत्वाचा विषय असल्याने त्यावर मी थोडेसे बोलू इच्छितो. पर्यटन पॉलिसी, 2016 राज्य सरकारने आणली आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, महाराष्ट्र राज्य हे फॉरेन टुरिस्टच्या अराईव्हलमध्ये आघाडीचे राज्य आहे. आपल्या राज्यात डोमेस्टिक टुरिस्ट व्हिजीटचे प्रमाण 7.2 टक्के आहे. राज्यातील बेरोजगारी दूर करण्यासाठी पर्यटनाशिवाय दुसरा चांगला व्यवसाय नाही, असे माझे मत आहे. आपल्या राज्याची भौगोलिक स्थिती अशी आहे की, हे राज्य केरळ सारखे देखील आहे व मध्य प्रदेश सारखे देखील आहे. केरळ सारखा विस्तीर्ण समुद्र किनारा आपल्या राज्याला लाभला आहे. तसेच, मध्य प्रदेश सारखी वन संपदा आपल्या राज्यात आहे. राज्यात कृषी पर्यटन होऊ शकते. आदिवासींची वस्ती राज्यात चांगल्या प्रमाणात आहे. अनेक दुर्गम किल्ले आहेत. थंड हवेची ठिकाणे आहेत. अनेक टायगर प्रोजेक्ट राज्यात आहेत. राज्यात रिलिजिअस टुरिझमचे प्रमाण जास्त आहे.

यानंतर HH-1......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. अनिल बोंडे.......

आज विदर्भामध्ये शोध घेतला तर महानुभावाची काशी म्हटले गेलेले रिध्दपूर हे विदर्भामध्ये आहे. ज्या ठिकाणी देशोदेशीचे आणि परदेशातील धार्मिक व टुरिस्ट लोक सातत्याने येतात. जे केरळ आणि मध्यप्रदेशामध्ये पर्यटनाचे ब्रॅन्डींग झाले आहे ते दुर्दैवाने आजपर्यंत महाराष्ट्राचे पर्यटनाचे ब्रॅन्डींग झालेले नाही. या दोन्ही राज्यांच्या पर्यटनाच्या पॉलिसी पाहिल्या तर ही राज्ये महाराष्ट्रापेक्षा पर्यटनामध्ये किती तरी पुढे गेलेली आहेत. केरळमध्ये असलेला समुद्र किनारा तेथील प्रत्येक पर्यटकाला तो सुरक्षित वाटतो. पण महाराष्ट्रामध्ये मुरुड जजिंरा या समुद्र किनारी पुण्यामधील विद्यार्थी सहलीला गेले असता त्यापैकी 13 मुल-मुली मरण पावले आहेत. शिक्षण खात्याने जी.आर. काढला की अशा धोक्याच्या ठिकाणी मुलांना घेऊन जाऊ नये. केरळने काय केले तर त्या ठिकाणी लाईफ सेव्हींग इनिशिएटीव्ह हे पर्यटनासोबत जोडले. यापेक्षा महत्वाचे असे की, केरळच्या संपूर्ण समुद्र किनाऱ्यावर लाईफ सेव्हींग व्हॉल्युंटीअर्स, लाईफ गार्ड सर्व्हीसेस सुरू केल्या आहेत.

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्यांनी आता शेवटचा मुद्दा घ्यावा. कारण आणखी बऱ्याच सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे.

डॉ. अनिल बोंडे : अध्यक्ष महोदय, पर्यटनाची संकल्पना आपण जनमाणसापर्यंत रुजविला तर महाराष्ट्र पर्यटनाच्या दृष्टीने एवढा संपन्न आहे की, विदर्भात व्याघ्र पर्यटन होऊ शकते. त्याच्या बाजूला पेंचमध्ये असलेले कर्माझरीमध्ये लोक जातात. ताडोबा आणि मेळघाटचे चांगले ब्रॅन्डींग केले तर त्याच्यापेक्षा दुसरे कोणतेही टायगर रिझर्व्ह ठिकाण असणार नाही. आपल्याकडे कोकणाला लाभलेला एवढा मोठा समुद्र किनारा आहे. कोकणामध्ये तारकर्लीसारखे अत्यंत चांगले पर्यटन स्थळ आहे. या ठिकाणी केरळसारखे पर्यटन निश्चितपणे होऊ शकते. एका मेळघाटाचे जंगल पाहण्याकरिता बाहेरच्या देशातील टुरिस्ट येतात. या मेळघाटमध्ये गाविलगड नावाचा किल्ला असून त्या किल्ल्याची पाहणी करण्याकरिता तर अभ्यासक लोक त्या ठिकाणी मुक्काम करतात. मेळघाटमध्ये एवढ्या मोठ्या औषधी वनस्पती आहेत की, त्या औषधी वनस्पतींचा शोध घेण्याकरिता लोक येत असतात. परंतु त्या मेळघाटचे ब्रॅन्डींग होऊ शकले नाही. मेळघाटचे ब्रॅन्डींग होऊन तेथील आदिवासी युवकाला गाईड म्हणून जॉब मिळेल. तेथील कला आणि जे आदिवासी नृत्य

2......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. अनिल बोंडे.......

आहे, त्या नृत्याला वेगळा नावलौकिक प्राप्त होईल. म्हणून माझी विनंती आहे की, केरळ आणि मध्यप्रदेशाच्या पॉलिसीचा अभ्यास करुन महाराष्ट्रातील काही पर्यटन स्थळांचे ब्रॅन्डींग होणे आवश्यक आहे, एवढी सूचना करुन मी थांबतो. धन्यवाद. जयहिंद, जय विदर्भ.

--------

3.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती सुमनताई पाटील (तासगाव) : अध्यक्ष महोदय, जलसंपदा विभागाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभी आहे. माझ्या मतदार संघातील तासगाव कवळे महांकाळ मतदार संघातील एकूण 93 गावांचा समावेश टेंभू उपसा सिंचन योजनेमध्ये आहे. त्यामध्ये तासगांव तालुक्यातील 48 गावांमधील 10 हजार 703 हेक्टर क्षेत्र व कवठे महांकाळ तालुक्यातील 45 गावातील 10 हजार 942 हेक्टर क्षेत्राचा समावेश आहे. टेंभू अंतर्गत इतर उपसा सिंचन योजना आहेत. त्यामध्ये टेंभू टप्पा 1 बी ते आरफळ कालवा उपसा सिंचन योजना यामध्ये तीन पंपांनी पाणी उपसा करुन ते आरफळ कालव्यामध्ये टाकले जाते, हे जवळ जवळ काम पूर्ण आहे. टेंभू अंतर्गत दुसरी उपसा सिंचन योजना म्हणजे विसापूर उपसा सिंचन योजना यामध्ये तासगाव तालुक्यातील गावांना पाणी देण्याचे नियोजन आहे. शेतीला पाणी वितरण व्यवस्था बंद पाईप लाईनमधून करणेची आहे. परंतु ही कामे निधी अभावी थांबलेली आहेत. टेंभू अंतर्गत तिसरा उपसा सिंचन योजना म्हणजे पुणदी उपसा सिंचन योजना यामध्ये सुध्दा तासगांव तालुक्यातील गावांना पाणी देण्याचे नियोजन आहे. शेतीला पाणी वितरण व्यवस्था बंद पाईप लाईनमधून करण्याची आहे. परंतु ही कामे सुध्दा निधी अभावी थांबलेली आहे. टेंभू अंतर्गत चौथी व महत्वाची उपसा सिंचन योजना म्हणजे कवठे महांकाळ कालव्यावर असलेली घाटनांद्रे तिसंगी उपसा सिंचन योजना यामध्ये कवळे महांकाळ तालुक्यातील घाटमाथ्यावरील गावांना पाणी देण्याचे नियोजन आहे. परंतु निधी अभावी या योजनेचे सर्वेक्षण झालेले नाही. ते ताबडतोब सुरू करावे, अशी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, तासगाव तालुक्यातील पूर्ण दुष्काळी असणारी 8 गावे आहेत. जी कोणत्याही योजनेमध्ये समाविष्ट नाहीत. त्यामध्ये वायफळे, बिरणवाडी, यमगरवाडी, जरंडी, दहिवडी, सिध्देवाडी, सावळज, डोंगरसोनी ही गावे आहेत. तरी या गावांचा समावेश टेंभूमध्ये करुन कायम दुष्काळी गावांना पाणी देण्याची व्यवस्था करावी, ही विनंती. सध्याच्या परिस्थितीत जनता दुष्काळाने होरपळत असून त्यांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. आठ दिवसातून एकदा पिण्याचे पाणी मिळत आहे.

अध्यक्ष महोदय, मला आपल्यामार्फत या सरकारला सांगावेसे वाटते की, या दुष्काळी जनतेसाठी खरोखरच काय करावेसे वाटत असेल तर वरील अपुऱ्या योजनांसाठी निधी देऊन सदरची कामे लवकरात लवकर पूर्ण करावीत. म्हणजे या भागातील लोकांचा दुष्काळ कायमचा संपून जाईल. धन्यवाद.

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रकाश आबिटकर (राधानगरी) : अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पाच्या अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे. सन्माननीय अर्थमंत्र्यांनी ज्या पध्दतीने अर्थसंकल्प सादर केला आणि अर्थसंकल्प सादर केल्यानंतर या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून ज्या पध्दतीच्या भावना आणि भूमिका त्यांनी आपल्या भाषणातून मांडल्या. त्या भावनेनंतर सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांनी त्यांना टाळ्यांच्या कडकडाटात त्यांना प्रतिसाद दिला आहे. या टाळ्यांच्या कडकडाटामध्ये ज्या पध्दतीची भूमिका त्यांनी एरिगेशनच्या 7800 कोटी रुपयांच्या मागण्यांना मंजूरी दिल्याचे सांगितले, त्यानंतर मात्र आमच्या अपेक्षा खूप वाढल्या. या 7800 कोटी रुपयांच्या निधीमधून आम्ही ज्या ज्या प्रकल्पांची मागणी करतो ते प्रकल्प मार्गी लागतील आणि प्रकल्प मार्गी लागल्यानंतर आम्ही वार्षिक बजेटमधून काय आणले तर निश्चितपणे ठोस असे काही मिळेल अशी अपेक्षा होती. बजेट बूक बघितल्यानंतर मात्र आमचा भ्रमनिरास झाला. सन्माननीय जलसंपदा मंत्री श्री. गिरीश महाजन यांच्याकडे वर्षभरापासून सातत्याने मागणी करतो, त्यासंबंधी मंत्री महोदय होय, होय असे सांगतात आणि हासताततही खूप छान. पण प्रत्यक्ष कृतीमध्ये मात्र दुर्भिक्ष्य आहे. प्रत्यक्षात आता आमच्यावर रडायची वेळ आलेली आहे. या सर्व मागण्या पाहिल्यानंतर असे दिसते की, विदर्भ, मराठवाड्यातील सर्व प्रकल्पांसाठी तरतूद आणि पश्चिम महाराष्ट्रातील प्रकल्पांसाठीची झालेली तरतूद बघितल्यानंतर मी विभागाच्या सचिवांकडे गेलो आणि त्यांना विचारणा केली की, आपण असे नेमके का केले. पश्चिम महाराष्ट्रातील सर्व प्रकल्पांना आपण निधीपासून वंचित ठेवणार आहात काय असेही विचारले. या निधीच्या तरतूदीसंबंधीचा विषय अतिशय गंभीर आहे. 7800 कोटी रुपयांची जी तरतूद आहे, त्यामधील काही प्रकल्प हे एआयबीपीच्या अंतर्गत असल्यामुळे ते आपल्याला कम्प्लसरी घ्यावेच लागतात आणि त्यामध्ये सुमारे अडीच ते तीन कोटी रुपये आपल्याला द्यावे लागतात. माननीय राज्यपालांच्या अनुशेषांतर्गत जे प्रकल्प येतात त्यांच्यासाठी तरतूद आपण केली आहे. पश्चिम महाराष्ट्रात जे प्रकल्प वर्षानुवर्षे रखडत पडले असून त्यांचा डीपीआर सातत्याने वाढत आहे. परंतु तरी सुध्दा शासनाने या प्रकल्पांसाठी निधी खर्च करण्यासाठी निर्णय घेतला नाही. त्यामुळे खरोखर गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. दुष्काळसदृश्य परिस्थिती आहे आणि या दुष्काळसदृश्य परिस्थितीत निधी देण्यासाठी पुढे आलो नाही तर नेमके या विकासाच्या बाबतीत काय करणार आहोत. जलसंधारणाचे हे सर्वात महत्वाचे असे प्रकल्प आहेत. आज

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

5.....

श्री. प्रकाश आबिटकर.....

माझ्याकडील धामणीचा प्रकल्प आहे. या धामणीच्या प्रकल्पामध्ये ज्या पध्दतीने आम्ही मंडळींनी सन्माननीय मुख्यमंत्र्यांच्या मान्यतेने सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा तेथील तमाम लोकांना दिलेला आहे. पण अद्याप या बाबतीत कोणतीच कार्यवाही झालेली नाही. दुसरा प्रकल्प माझ्या सर्पनाल्यासंबंधीचा आहे की, जो प्रकल्प मुख्यमंत्र्यांचा खास वॉररुममधील आहे, त्यासाठी निधीची तरतूद अत्यंत अपुरी आहे. दूधगंगा काळमवाडीचा प्रकल्प आहे की, जो आंतरराज्यीय प्रकल्प आहे.

II-1.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश आबिटकर..........

ज्या पध्दतीने पाण्याचे दुर्भिक्ष जाणवते आहे. कर्नाटक सरकार सुध्दा कोल्हापूर जिल्ह्याच्या पाठोपाठ पाण्यासाठी सातत्याने मागणी करीत आहे. हे पाणी त्यांच्यापर्यंत जायचे असेल तर कॅनॉल दुरूस्त व्हायला पाहिजेत. कॅनॉलची दुरूस्ती चांगली झाली तर पाण्याचा वापर योग्यप्रकारे होईल. पाण्याचा वापर चुकीच्या पध्दतीने केल्यामुळे त्याचे दुर्भिक्ष जाणवते ते होणार नाही. अत्यंत आवश्यक असा हा प्रकल्प आहे. ज्या मागण्यासांठी आम्ही पोटतिडकीने बोलतो त्याला बजेटच लावणार नसाल तर याच्यासारखे दुसरे दुर्दैव नाही. इरिगेशनचा सर्वात महत्वाचा कळंबवाडी, धामणी, नांगरवाडी, सर्पनाल्याचा प्रकल्प असेल, कोणत्याच प्रकल्पाला भविष्यात दिशा देईल अशा पध्दतीचे चित्र दिसत नाही. जलसंपदा मंत्री महोदयांनी ठोसपणे सांगितले तर खऱ्याअर्थाने आम्हाला त्यांच्या कडून अपेक्षा राहतील. आम्हाला परवा एका मोर्चाला सामोरे जावे लागले. हजारो लोकांच्या मोर्चासमोर आम्ही सांगितले की, सुधारित प्रशासकीय मान्यता येणाऱ्या बजेटमध्ये धामणीला देऊ आणि तुमच्या समोर येऊ. परंतु अद्याप याबाबतची कुठलीच भूमिका घेतली नाही. जलसंपदा मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, कोणत्याही परिस्थितीमध्ये या परिसरातील सर्व प्रकल्पांबाबत वर्षभरामध्ये काय केले तर याचे उत्तर शुन्य आहे. माझ्या मतदारसंघातील केटीवेअर दुरूस्तीसाठी 10 कोटी रुपये फक्त गेल्या वर्षभरामध्ये मिळालेले आहेत. याच्या पलिकडे एक रूपया सुध्दा मिळालेला नाही. या परिस्थितीमध्ये जर पैसे उपलब्ध झाले नाही तर आमच्या लोकांची होणारी परवड थांबणार नाही आणि यासाठी आपण काय करणार आहात याचे महत्वपूर्ण अशा पध्दतीने जलसंपदा मंत्री महोदयांनी उत्तर देणे अपेक्षित आहे. या बजेटमध्ये ठोस आश्वासन दिल्याशिवाय आम्ही श्वस्त बसणार नाही.

अध्यक्ष महोदय, जलविद्युत प्रकल्पांची परिस्थिती बघितली. शासनाचे अभिनंदन करायला पाहिजे का पूर्वीच्या लोकांचा निषेध करायला पाहिजे हे मला कळत नाही. शासनाचे 37 आणि खाजगी 25 असे एकूण प्रकल्प आपल्याकडे आहेत. 3 हजार 336 मेगावॅटची वीज निर्मिती याठिकाणी करण्यात येते. या सर्व मेगावॅटमधून वीज निर्मिती करीत असताना शासनाचे प्रकल्प बंद पडत आहेत आणि प्रकल्पांना प्रोत्साहित केले जात आहे. वेगवेगळ्या पध्दतीने प्रकल्प उभे

........2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश आबिटकर..........

करण्याच्या दृष्टीकोनातून गेल्या 40-50 वर्षामध्ये या सर्व प्रक्रियेमध्ये साडेतीन हजार मेगावॅटची वीज निर्मिती झाली. त्यात सुध्दा 25 खाजगी प्रकल्प आहेत. हायड्रो प्रोजेक्ट सुध्दा खाजगी लोकांनी सुरु केलेले आहेत. या चर्चेच्या माध्यमातून मी सन्माननीय मंत्री श्री.गिरीष महाजन यांना विचारु इच्छितो की, यापूर्वी लक्षवेधी, विनंती सर्व करुन झाले. शासनाचे काही हायड्रो प्रोजेक्ट बंद आहेत. या हायड्रो प्रोजेक्टमध्ये करार आणि गुंतवणूक करुन शासनाला अडकवून ठेवलेले आहे. एका बाजूला वीज निर्मिती होत नाही आणि दुसऱ्या बाजूला नवीन कोणी काम करायला आले तर त्याला सुध्दा काम करु दिले जात नाही. वीजेच्या संकटावर मात करायची असेल तर प्रकल्प तयार केलेले असतील आणि प्रत्यक्ष कारवाई केलेली नाही अशा प्रकारचे 40 ते 50 प्रकल्प माझ्या मतदारसंघात आहेत. कोल्हापूर, सांगली, सातारा याठिकाणचे ॲग्रीमेंट आले आणि प्रत्यक्षात कार्यवाही झाली नाही. या कार्यवाहीला कोणत्याही परिस्थितीमध्ये तात्काळ रद्द करुन नवीन हायड्रो प्रकल्पाला चालना देण्यासाठी निर्णय घेणे अपेक्षित आहे. अशा पध्दतीचा निर्णय झाला तरच या जलविद्युत प्रकल्पाला आर्थाजनाचे वीज निर्मितीचे काम होईल. शासनाचे जावई असल्यासारखी काही लोकांनी लुट केली होती त्याला सुध्दा ब्रेक लावण्याच्या दृष्टीकोनातून पुढे गेले पाहिजे आणि हा निर्णय घेतला पाहिजे अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, नियोजन विभागाच्या मागण्यांबाबत सुध्दा बोलणार आहे. डोंगरी विकासासाठी सातत्याने दीड वर्षापासून आम्ही भांडत आहोत. डोंगरी विकासाचे 90 तालुके आहेत. मागच्या वेळेस नियम 293 अन्वये चर्चा लावली होती. आदरणीय वित्त मंत्री महोदयांनी आम्हाला आश्वासित केले होते आणि एक बैठक सुध्दा घेण्यात आली. पण कृती मात्र शुन्य आहे. 90 कोटी रुपये एका तालुक्याला देत आहात त्याऐवजी प्रत्येक ठिकाणाला 2, 5 कोटी रुपये देण्यात यावेत. ज्या पध्दतीची आम्ही भूमिका मांडली त्या भूमिकेचा विचार सरकारला नसेल तर त्या भूमिकेच्या बाबतीत सरकारची भूमिका काय आहे हाच प्रश्न पडलेला आहे. डोंगरी भागाच्या विकासाबाबत अर्थमंत्री महोदयांनी बैठक घेऊन सांगितले आणि प्रत्यक्षात त्यावर अजून काहीही कार्यवाही झालेली नाही. हा केवळ 90 तालुक्यांचा प्रश्न नाही तर ज्या ठिकाणी प्रचंड पाऊस पडतो. सातत्याने

......3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश आबिटकर..........

रस्त्यांची अत्यंत वाईट अवस्था असते. यासर्व परिस्थितीवर मात करण्यासाठी डोंगरी विकास निधी वाढविला पाहिजे. यासाठी सन्माननीय वित्त मंत्र्यांनी आश्वासित केले पाहिजे आणि 5 कोटी रूपयांची मदत केली पाहिजे अशाप्रकारची भूमिका सर्वांनी मांडलेली आहे.

अध्यक्ष महोदय, आणखी दोन मुद्दे याठिकाणी मांडणार आहे. डीपीडीसीमध्ये सातत्याने आम्ही काम करीत आहोत. डीपीडीसीमध्ये भौगोलिक रस्त्यांच्या प्रमाणामध्ये निधी दिला पाहिजे अशी मागणी करीत आहे. त्याठिकाणचे पालक मंत्री आपआपले रस्त्यांचे निकष ठरवित आहेत. कोणत्याही परिस्थितीमध्ये त्यापलीकडे जाऊन काम करण्यास तयार नाहीत. याबाबत वेगवेगळ्या बैठका होऊन चर्चाही झाली. अद्यापपर्यंत डीपीडीसीचे रस्ते भौगोलिक क्षेत्राप्रमाणे व्हावेत याबाबत कोणताही निर्णय झालेला नाही. एकूण 2 लाख 43 हजार रस्त्यांपैकी 75 टक्के रस्ते हे ग्रामीण भागातील रस्ते आहेत. मुख्यमंत्री सडक योजना आणली. परंतु याचे निकष आणि दिलेला निधी, त्यापध्दतीचा कालावधी हे बघितले तर अजून किती वर्षे ग्रामीण रस्त्यांना न्याय देणार नाही ही परिस्थिती आहे. अशी परिस्थिती असेल तर आपण नेमके काय करणार आहोत आणि कशा पध्दतीने विकास करणार आहोत यासाठी आदरणीय अर्थमंत्री महोदयांनी आश्वासित करावे अशा पध्दतीची भूमिका मी मांडतो. जरा बेल वाजवायचे थांबवा अशी मी माननीय अध्यक्षांना विनंती करतो. कारण मी पहिला वक्ता शिवसेनेचा आहे आणि आपण जर असे करणार असाल तर मी भाषणच थांबवणार नाही अशी मी आपणास विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, सभागृहातील पहिल्या बोलणाऱ्या वक्त्याला आणि शेवटी बोलणाऱ्या वक्त्याला सारखाच वेळ द्यायला पाहिजे. नसेल तर शेवटचा वक्ता असेल त्याला आधी बोलायला द्या. जे सिनिअर असतील त्यांनी शेवटी बोलावे आणि मार्गदर्शन करावे. आम्ही जे निवडून आलो ते लोकांच्या भूमिका आणि भावना सभागृहामध्ये मांडण्यासाठी आलो आहोत. या सर्व डीपीडीसीच्या माध्यमातून सातत्याने एक जीआर काढण्याबाबत सन्माननीय सदस्य श्री.दिपक केसरकरांकडे चर्चा झाली. त्यांनी तो जीआर पुढे नेला. आदरणीय श्रीमती पंकजाताई मुंडे यांनी सुध्दा तो जीआर मुख्यमंत्री महोदयांकडे नेला. परंतु अद्याप त्यावर कारवाई झालेली नाही. भौगोलिक परिस्थिती

......4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश आबिटकर..........

आणि भौगोलिक क्षेत्राप्रमाणे जीआर झाला तर मिळणारे पैसे हे समप्रमाणात वितरीत केले जातील आणि आज सुध्दा एक रुपया असेल किंवा एक कोटी रुपये असतील ते सुध्दा जिल्ह्याच्या ठिकाणी देण्यात यावे. एकूणच निधी कमी मिळतो. विकासाची तफावत कमी करण्यासाठी आणि राज्याच्या धोरणात्मक विकासासाठी अत्यंत महत्वपूर्ण अशा पध्दतीचा निर्णय घेण्याच्या दृष्टीने नियोजन विभागाने पुढे यावे अशा पध्दतीची मी विनंती करतो. या सर्व विनंती बरोबर कोअर आणि नॉनकोअर सेक्टर घेतले. कोअर सेक्टरमध्ये नॉनरस्ते घेतल्यामुळे आम्हाला अधिकाधिक पैसे मिळतील. राज्यातील आराखड्यातील डीपीडीसीतील पैसे मिळत आहेत ते पैसे वाढविले तरच आम्हा सर्वांना अधिक न्याय मिळू शकेल. याबाबतीतील निर्णय घेण्यासाठी सन्माननीय अर्थमंत्री महोदयांनी एक पाऊल पुढे टाकावे अशा पध्दतीची मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, मघाशी काही सन्माननीय सदस्यांनी आमदार फंडाची भूमिका मांडली. दोन कोटी रुपयांमध्ये संपूर्ण मतदारसंघाची विकासाची कामे पूर्ण होत नाहीत. त्यासाठी 5 कोटी रुपयांचा विकास निधी करण्यात यावा अशा प्रकारची भूमिका मांडली. या भूमिकेला संपूर्ण सभागृहाची संमती आहे. या भूमिकेबरोबर संपूर्ण सभागृहात आणि त्याच्याही पलीकडे जाऊन आमदार फंडाची रक्कम 5 कोटी रुपये करावी अशाप्रकारची मागणी आहे त्याला सभागृहाच्या 288 सभासदांची संमती असणार आहे. परंतु माझी विनंती त्याच्या पलीकडे आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रकाश आबिटकर......

काल दिल्लीच्या विधानसभेमध्ये 400 टक्के पगार वाढ झाली. गोव्यामध्ये सुध्दा आमदारांना पगारामध्ये वाढ दिली. काही ठिकाणी आमदार, खासदारांचे पगार हे आक्षेपार्ह मुद्दे होत आहेत. वॉटस् ॲप वर एक नवीन फॅशन आली आहे. राजकारणामध्ये लोकप्रतिनिधी हा अत्यंत बदनाम पध्दतीचा माणूस अशा पध्दतीची प्रतिमा तयार झाली आहे. हे सर्व कशामुळे होते आहे. आमचे उत्पन्नाचे स्त्रोत आम्हाला कळत नाहीत. आम्ही प्रचंड खर्च करतो आहोत असे चित्र तयार होते आहे. या सर्वाचा परिणाम म्हणून भविष्य काळामध्ये राजकारणी बदनाम व्हायचा नसेल तर राजकारण्याला सुध्दा आर्थिक सुरक्षितता दिली पाहिजे. आर्थिक सुरक्षितता देण्याच्या दृष्टीकोनातून ज्या कालावधीमध्ये तो इथे आहे. त्यामध्ये त्याला किमान वेतन, किमान भत्ते, त्याच्या सर्व सुखसुविधा ज्या त्याला आवश्यक आहेत. त्याला अनावश्यक सुखसुविधांची गरज नाही. एक आय.एस. ऑफिसर, एक तहसिलदार, एखादा साधा क्लार्क सुध्दा खूप चांगल्या पध्दतीने जगतो आहे. त्याला त्याच्या आयुष्यामध्ये सुरक्षितता मिळते. त्याला सुरक्षित अशा पध्दतीची नोकरी आहे. आवश्यक असणारे मानधन मिळते आहे. आमच्या आमदाराला सकाळी 7.00 वाजल्यापासून रात्री 1.00 वाजता सुध्दा झोप लागत नाही. अशा प्रसंग परिस्थितीत सगळीकडे फिरायचे असते. आपल्या कुटूंबाकडे सुध्दा लक्ष देता नाही. सन्माननीय सदस्य श्री.साबणे साहेब हे करित असताना घरातील शिव्या कशासाठी खायच्या ? घरी असे म्हटले जाते की, घराकडे बघत नाही गावाकडेच फिरत राहतो. गाव ओरडते कशासाठी ? गाव म्हणते हे आपलेच घर भरायला लागले आहेत. दोन्हीकडून बदनाम झालेल्या लोकप्रतिनिधीला जर का सुरक्षितता दिली तर भविष्य काळातील राजकारण सुधारेल या दृष्टीकोनातून ठोस निर्णय घेण्याच्या दृष्टीकोनातून जर आपण गेलो तर एक क्रांतीकारक निर्णय घेऊ.

अध्यक्ष महोदय, कालच्या दिवसामध्ये ग्रामविकास विभागावरील चर्चा सुरु होत्या. मला ग्रामविकास विभागावर बोलायचे होते. त्या चर्चेतील एकच मुद्दा असा होता की, ग्रामपंचायतीच्या सदस्यांचे महिन्याला मानधन 400/- रुपये आहे. संजय गांधीची पेन्शन सुध्दा तुम्ही 1000/- रुपये केली. तो ग्रामपंचायत सदस्य असेल तर त्याला जर अधिक सुरक्षितता मिळाली पाहिजे. मी पंचायत

......2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश आबिटकर.....

समितीमध्ये काम केले आहे, जिल्हा परिषदेमध्ये काम केले आहे. अनेक अनुभव मला आले आहेत. शिक्षकाचे काम करणारा पाचव्या आणि सहाव्या वेतन आयोगातील शिक्षक आमच्याकडे येतो. त्याची बदली करताना अत्यंत वाईट पध्दतीने त्याच्या पगाराकडे पाहिले जाते. अशा प्रकारे आमचा लोकप्रतिनिधी दुर्लक्षित असतो. या सर्वात माननीय अर्थमंत्र्यांनी दोन गोष्टी आश्वासित केल्या तर महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये चांगल्या पध्दतीचे काम करणारी नवीन पीढी पुढे जाईल. ख-या अर्थाने राजकारणात सुस्थिरता आणाण्याच्या दृष्टीकोनातून पुढे जाऊ. अशा पध्दतीची भूमिका मांडतो आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : आता सभागृहामध्ये माननीय अर्थमंत्री आले आहेत म्हणून आल्याला आणखी एक मिनिट बोलण्यासाठी देतो. आपला शेवटचा मुद्दा पुन्हा सांगावा.

श्री.प्रकाश आबिटकर : आदरणीय श्री.सुधीर भाऊ येथे आले आहेत. ज्यांच्या भाषणातून, कर्तृत्त्वातून आणि नम्रतेतून आम्ही खूप आदर्श घ्यावा असे त्यांचे व्यक्तिमत्व आहे. मी आपल्याला एवढीच विनंती करु इच्छितो, खूप अपेक्षा घेऊन आम्ही काम करतो, त्यावेळेला आम्हाला सुरक्षितता दिली पाहिजे. एखाद्या राजकारण्याला पुढे डेव्हलप करायचे असेल तर त्याला एक्सपोझर व्हिजीट द्यायला पाहिजे. त्याला वेगवेगळया राज्यांमध्ये काय चालले आहे हे कळायला पाहिजे. परदेशात सुध्दा काय चालले आहे ते कळायला पाहिजे. आम्हाला बजेट बूक दिले आहे. ते वाचायचे कसे हे आजसुध्दा आम्हाला माहित नाही. ही वास्तविकता मी सांगितली नाही तर कदाचित मी स्वतःला फसवतो आहे असे होईल. माझी विनंती आहे की, आमदाराला सर्व दृष्टीने सक्षम करायचे असेल तर एका बाजूने त्याच्या मानधनामध्ये, दुस-याबाजूने त्याच्या आर्थिक सुरक्षिततांमध्ये त्याच्या फंडामध्ये, त्याच बरोबर त्याच्या बौध्दीक ज्ञानामध्ये भर घालण्याच्या दृष्टीने निर्णय घेतला तरच आपण अर्थमंत्री झाल्याचे आम्हाला फलित वाटेल अशा पध्दतीचा निर्णय घ्यावा, अशी विनंती करतो. आमदार फंड पाच कोटी रुपयांवर असेल किंवा या सगळया गोष्टी असतील, या सर्वा पाठीमागची भावना आणि भूमिका इतकीच आहे की, चांगले काम करण्यासाठी माणसाला पुढे जाण्यासाठी सुध्दा आपल्या सारख्या भक्कम व चांगल्या पध्दतीच्या माणसाची ताकद लागते, ती ताकद आणि निर्णय द्यावा, अशी विनंती करतो, पुन्हा एकदा आपले आभार मानतो, आपल्या सर्वा मागण्यांचे समर्थन करुन थांबतो. धन्यवाद.

.........

.....3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, माझी पॉईंट ऑफ इनफॉरमेशन आहे. पुरवणी मागण्यांवरील डिमांडवर चर्चा सुरु आहे. त्यानंतर आमच्या विरोधी पक्ष वतीने जो प्रस्ताव दिलेला आहे. तो आज घेऊ शकणार नाही. कारण आज माननीय श्री.बापट साहेबांना मॅच बघायला जायचे आहे. त्यामुळे सायंकाळी 5.00 वाजल्या नंतर तो प्रस्ताव आला तर सन्माननीय सदस्य उपस्थित राहणार नाहीत. माझी विनंती अशी आहे की, डिमांडवर चर्चा सुरु ठेवावी. जो प्रस्ताव आहे तो पाहिजे असेल तर उद्या सकाळी घ्यावा.

श्री. गिरीश बापट : अध्यक्ष महोदय, माझे म्हणणे असे आहे की, आता ही चर्चा चालू ठेवू थोडेसे वेळेचे बंधन घाला ही चर्चा आणि त्याचे उत्तर आज व्हायला पाहिजे ते करु. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील आपला प्रस्ताव सभागृहाच्या मताने उद्या घेऊ.

**तालिका सभाध्यक्ष** : माझी सर्व सन्माननीय गट नेत्यांना विनंती आहे की, आपल्याला चर्चा सांयकाळी 5.00 पर्यंत संपवायची असेल तर आपल्याकडून वक्त्यांची दोन-दोन, तीन-तीन नावे द्यावीत. कारण बोलणा-यांची नावे भरपूर आहेत.

....4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.बाळासाहेब पाटील ( कराड उत्तर ) : अध्यक्ष महोदय, या अनुदानाच्या मागण्यांवर बोलत असताना आज जवळजवळ 5 विभागांच्या मागण्या सर्वांच्या पुढे ठेवल्या आहेत. माननीय वित्त मंत्री या ठिकाणी उपस्थित होते. परंतु ते लगेच निघुन गेले. माननीय वित्त मंत्र्यांनी ब-याच बैठका घेतल्या, बरेच आदेश दिले, बराच पत्र व्यवहार केला जातो आणि असे दाखविले जाते की, आम्ही हे कामकाज करत असताना सर्वांना विश्वासात घेऊन त्या ठिकाणी जातो. अध्यक्ष महोदय, आज आपण पाहिले तर या अखंड महाराष्ट्रामध्ये निधीचे वाटप करीत असताना प्रादेशिक असमतोल त्या ठिकाणी निर्माण झालेला आहे. त्या ठिकाणी बैठकीच्या माध्यमातून आमच्याकडून काही आमची मते मागविली. परंतु त्याचे चित्र या अर्थसंकल्पामध्ये दिसू शकले नाही. माझी या निमित्ताने मंत्री महोदयांना विनंती राहील की, हे काम करीत असताना सदनाच्या अपेक्षा पूर्ण कराव्यात.

अध्यक्ष महोदय, विशेषतः या राज्यामध्ये जे-जे अपूर्ण प्रकल्प आहेत. ते अपुरे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी तेलंगणाप्रमाणे किंवा आंद्र राज्याप्रमाणे निव्वळ वेगळा निधी निर्माण करावा. ज्याच्या माध्यमातून योजना पूर्ण होतील. डोंगरी विभागात जवळजवळ 90 तालुके आहेत. डोंगरी निधीमध्ये वाढ करणे अतिशय गरजेचे आहे. दुसरा एक प्रश्न येथे आहे की, मतदार संघाची पुनर्रचना झाली. त्यानंतर ही दुसरी निवडणूक झाली. यामध्ये अनेक ठिकाणी ग्रामीण भागाचा मतदार संघ लोकसंख्येने मोठा झाला. शहरी भागामध्ये नगरपालिका, महापालिका असते त्यांना निधीच्या बाबतीत कुठलीही अडचण येत नाही. हा निधी देत असताना ग्रामीण भागाला त्याचा अधिकचा वाटा देणे गरजेचे आहे. आणि त्याचे निकष सुध्दा ठरविले पाहिजेत. त्याच पध्दतीने या सर्व मतदार संघाचे नियोजन करीत असताना दोन-दोन, तीन-तीन तालुके एकत्र आले आणि पार्टली भाग आला व त्यातून मतदार संघ तयार झाले. याचे नियोजन करीत असताना एका आमदार महोदयांना चार-चार तहसिलदार, चार-चार बीडीओ या सर्वांसाठी कोऑर्डीनेशन करण्यासाठी एका अधिका-याची नेमणूक करावी लागेल. हा धाडसी निर्णय या सरकारने घ्यावा. अशा प्रकारची विनंती या निमित्ताने करतो. विशेषतः राज्यामध्ये पाहिले तर पर्यटनाला फार मोठा वाव आहे. 720 किलो मीटर लांबीचा समुद्र किनारा आहे. राज्यामध्ये अनेक गड, किल्ले आहेत. ऐतिहासिक वास्तु आहेत. मुंबईमध्ये अजंठा, वेरुळ असेल हे कोकणाच्या काही भागात आहेत. मुंबईला त्या ठिकाणी प्राधान्य असते. कारण तेथे विमान, दळणवळाच्या सुविधा आहेत.

.....5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष महोदय, वाढत्या लोकसंख्येचा विचार करता, तेथे वाहतूकीचे प्रश्न मोठया प्रमाणावर आहेत. विशेतः देवनार येथे दोन वेळा लागलेली आग. या आगीमुळे देशातील या राज्याची बदनामी जगामध्ये होते आहे. म्हणून ही केंद्रे वाढविली पाहिजेत.

KK-1........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.बाळासाहेब पाटील .....

अध्यक्ष महोदय, पर्यटन विभागाबाबत सांगू इच्छितो की, कोकण किनारपट्टीवर गोव्याच्या शेजारी सिंधुदूर्ग जिल्हा आहे. गोव्यासारखीच सर्व परिस्थिती तेथे आहे. त्यामुळे तेथे तारकर्ली हे चांगले केंद्र विकसीत होऊ शकते. गोव्यापेक्षाही अधिकचा वाव तेथे आहे. मध्यंतरी आपण पाहिले की, ताज ग्रूपने तारकर्लीला जागा घेतली व या जागेवर त्यांनी वेळेवर हॉटेल बांधलेले नाही. मला वाटते की, गोव्यातील हॉटेल लॉबीचा येथे दबाव आहे का ? शेवटी आपल्या राज्यात विकास झाला तर मोठया प्रमाणावर पर्यटक येतील. तेथील काही लोकांनी इच्छा व्यक्त केलेली आहे की, गोव्यासारखी सिंधुदूर्गमध्ये मोटारसायकल घेऊन फिरण्याची परवानगी द्यावी. त्याकरिता विरोध झाला आहे. गोव्यामध्ये एक न्याय, सिंधुदूर्गमध्ये वेगळा न्याय आहे. मला वाटते की, हे केले तर येथे चांगल्या प्रकारचे काम होऊ शकेल. जलसंपदा विभागाच्या कामाकरिता अधिकच्या निधीची तरतूद केली पाहिजे. आज राज्यामध्ये शेतकऱ्याला पाण्याचे महत्व लक्षात आलेले आहे. पूर्वी 1-2 किलोमीटरवरून शेतीकरिता पाणी आणले जायचे आता 7-8 किलोमीटरवरून पाणी आणण्यासाठी शेतीवर कर्ज काढले आहे व एरिगेशन केलेले आहे. परंतु जेथे मोठया प्रमाणावर पाणी आहे तेथे शासनाने काही योजना सुरु केलेल्या आहेत पण त्यांची कामे अपूर्ण राहिली आहेत. अलिकडच्या काळात काही प्रश्न निर्माण झाले आहेत. पण त्या भागातील जनतेला आता आशा निर्माण झाली आहे की, त्यांच्या शिवारामध्ये हे पाणी येणार आहे. अशी अपेक्षा असताना हे प्रकल्प रखडले आहेत. हे प्रकल्प प्राधान्याने पूर्ण करणे गरजेचे आहे. त्यामध्ये कोणता विभाग असावा असे मी म्हणणार नाही. शेवटी राज्याला सर्व भागांना घेऊन पुढे जायचे आहे. अपूर्ण असलेले प्रकल्प वेळेवर पूर्ण केले पाहिजेत. बऱ्याच ठिकाणी मागील दोन वर्षांपासून पाऊस पडला नाही. परंतु काही प्रकल्पातून पावसाळयात पाणी ओव्हरफ्लो होऊन नदीला वाहून जाते. पश्चिम महाराष्ट्रातील पाणी वाहून जाताना 100-125 किलोमीटरवर कर्नाटकसारखे राज्य आहे, कर्नाटकमध्ये अलमट्टी धरण बांधलेले आहे. या धरणातील पाणी फुगवटयामुळे 6-7 वर्षे महाराष्ट्रात पुराची बिकट परिस्थिती झाली होती. हे ओव्हरफ्लो पाणी कॅनालच्या माध्यमातून दुष्काळी भागाला दिले पाहिजे. पावसाळा झाल्यावर हिवाळा व उन्हाळयामध्ये शेतकरी पाण्याची मागणी करतात. पाण्याकरिता मोठा संघर्ष

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.बाळासाहेब पाटील .....

होतो. शासन म्हणते की पाणीपट्टी भरावी. सर्वसामान्य जनतेची अपेक्षा असते की, टंचाई निधीतून मदत द्यावी. हे पाणी त्या परिसरात फिरविले तर त्याचा अधिकचा लाभ तेथे होऊ शकेल.

अध्यक्ष महोदय, टेंभू प्रकल्पाचा उल्लेख करताना आवर्जून सांगितले पाहिजे की, तो दुष्काळी भागासाठी आहे. गोपाळ गणेश आगरकर यांच्या गावातून टेंभू प्रकल्पास पाणी उचलले जाते. सुदैवाने तो विभाग माझ्याच मतदारसंघात आहे. तेथून पाणी जात असताना कराड तालुक्यातील वाघेरी, मिरेवाडी, पाचोंदा अशी काही गावे टँकरग्रस्त आहेत. येथील तलावांना पाणी दिले तर त्या परिसरातील लोकांची टँकरमधून मुक्ती होईल. त्याचप्रमाणे खटाव तालुक्यातील मासुंडी, आंबेगाव अशा काही गावाच्या शेजारुन कॅनॉल जातो पण त्यांना लाभ होत नाही. त्याचाही उल्लेख यामध्ये झाला पाहिजे. विशेषतः या भागातील पोटपाटाची सर्व कामे अपूर्ण आहेत. एरिगेशन विभागाचे अधिकारी सांगतात की, हा विषय कडाकडे आहे. पण कडाचे अधिकारी भेटत नाहीत. पोटपाटाची कामे ज्या कंत्राटदारास दिलेली आहेत, ज्यांनी वेळेत कामे पूर्ण केलेली नाही त्यांच्यावर सुध्दा कारवाई केली पाहिजे. लोकांना पाणी मिळेल अशी अपेक्षा आपण दाखविली आहे व त्या पूर्ण होत नाहीत.

अध्यक्ष महोदय, आज येथे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षा विभागाची चर्चाही होत आहे. ज्या गावातील धान्य दुकान आपण रद्द करतो, तेव्हा दुसऱ्या गावाला दिले जाते. त्याचा परिणाम त्या गावातील लोकांवर होतो. ते जातात तेव्हा दुकान बंद असते, उघडे असेल तर सांगितले जाते की, धान्य आलेले नाही. दुकानदार तालुक्याला गेलेला असतो. म्हणून त्या गावामध्ये त्याच ठिकाणी आपण दुकान दिले पाहिजे याचा आपण विचार करावा. सन्माननीय सदस्य श्री.गणपतराव देशमुख व श्री.गोपालदास अग्रवाल यांनी बरेच मुद्दे मांडलेले आहेत. माझी मागणी आहे की, अपूर्ण कामे पूर्ण झाली पाहिजेत. मतदारसंघ हा घटक धरुन नियोजन केले पाहिजे अशी मी सूचना करतो. आपण मला संधी बोलण्याची संधी दिल्याबद्दल आभार मानतो व माझे दोन शब्द संपवितो.

-----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

31-03-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) KK-3

PNG/ MMP/ AKN/ 16:10

श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) : अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे. दिलेला शब्द पाळणारे हे सरकार आहे. सत्तेवर येताना निवडणुकीपूर्वी व्यापाऱ्यांना आश्वासन दिले होते की, एलबीटी रद्द करण्यात येईल. हे शासन सत्तेवर आल्यावर एलबीटी रद्द केलेली आहे. टोलमुक्त महाराष्ट्र करु असा शब्द दिल्याप्रमाणे महाराष्ट्र टोलमुक्त केलेला आहे. मी सकाळी ऐकले की, शेतकऱ्यांचे ठिबकचे पैसे 2012-13 ते 2014-15 पर्यंत या सरकारने देण्याचा प्रयत्न केलेला आहे. हे शेतकऱ्यांचे सरकार असल्यासारखे वाटत आहे. यावर्षी 26 हजार कोटीची तरतूद अर्थसंकल्पात अर्थमंत्री यांनी केलेली आहे. त्यामुळे मी त्यांचे अभिनंदन करतो.

अध्यक्ष महोदय, सोलापूरबाबत मला काही सूचना द्यावयाच्या होत्या. सोलापूर जिल्हा माळढोककरिता आरक्षीत होता. 12 हजार चौरस किलोमीटर क्षेत्र माळढोक पक्ष्यांकरिता आरक्षीत केलेले होते. ते सुध्दा शासनाने मुक्त करुन दिलेले आहे. त्यामुळे सोलापूरमध्ये व्यवसाय वाढीला नक्कीच उत्तेजन येईल असे वाटते. शेतीचे खरेदी विक्री व्यवसाय बंद पडलेले होते, ते नक्की होतील असे वाटते. जलसंपदा मंत्री यांना विनंती आहे की, जलसंपदा विभागाचे अनेक प्रकल्प प्रलंबित आहे. देगाव जोड कालवा अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे. याकरिता निधीची तरतूद करणे गरजेचे आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : मंत्री महोदय श्री.विनोद तावडे यांनी सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेले मुद्दे लिहून घ्यावेत.

श्री.विजयकुमार देशमुख : अध्यक्ष महोदय, शिरापूर उपसा योजना युती सरकारने सुरु केली. मागील 15 वर्षे या योजनेत संथ गती आली. आता थोडे काम राहिलेले आहे. माझी जलसंपदा मंत्री यांना विनंती आहे की, यामध्ये थोडासा हातभार लावावा. कारण माळढोक पक्ष्यांमुळे जी आरक्षित जमीन होती त्यावरील बंधन उठलेले आहे.

यानंतर LL-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष देशमुख......

माननीय जलसंपदा मंत्री यांना विनंती आहे की, याकरिता शासनाने थोडासा हातभार लावला तर हे काम होऊ शकेल. माळढोक पक्षामुळे असलेले आरक्षित जमिनीचे बंधन आता उठलेले आहे. म्हणून आता तातडीने या कामाची सुरुवात होऊन या परिसरातील जवळपास 25,000 एकराला पाणीपुरवठा होऊ शकतो. हिपरगा तलावामुळे सोलापूर शहराला पूर्णवेळ पाणी मिळत होते. संपूर्ण ग्रॅव्हिटीने पाणी मिळत होते. शंभर वर्षानासून या तलावामध्ये गाळ साचल्यामुळे चार महिन्यांपासून लोक सहभागातून या गाळाच्या उपशाचे काम चालू आहे. एक टीएमसी नवीन तलाव करायचे म्हटले की, नवीन तलावाकरिता नवीन साईट मिळत नाही. जमीन संपादित करावी लागेल. या हिपरगा तलावामध्ये जवळ पास दीड टीएमसी गाळ आहे. तो गाळ जर काढला तर सोलापूर शहराला देखील पाणीपुरवठा होऊ शकतो. तसेच, भीमा नदीवरती बॅरेजेस बांधण्यासाठी सर्वेक्षणाकरिता पैसे दिले पाहिजे. ज्या ठिकाणी बॅरेजेस बांधता येतील त्या ठिकाणी बॅरेजेस बांधण्याचा प्रयत्न शासनाने करावा.

अध्यक्ष महोदय, मागील काळात माननीय मुख्यमंत्री सोलापूर येथे आले होते. यावेळेस. सर्वेक्षणाकरिता पैसे उपलब्ध करु देतो, असा माननीय मुख्यमंत्री यांनी शब्द दिला होता. ते सर्वेक्षण केले तर ज्या ठिकाणी आवश्यकता आहे, अशा ठिकाणी बॅरेजेस बांधण्याकरिता निधी उपलब्ध करुन दिला तर बरे होईल.

अध्यक्ष महोदय, सोलापूर शहरामध्ये कॅटरिंग कॉलेजचे बांधकाम 90 टक्के झालेले आहे. ती जागा रेल्वेची असल्यामुळे रेल्वे प्रशासन ती जागा आपल्या ताब्यात देत नाही. या कॉलेजच्या बांधकामावर दहा ते बारा कोटी रुपये खर्च झालेला आहे. संबंधित ठेकेदाराचे पेमेंट राहिल्यामुळे तो पुढील काम करीत नाही. रेल्वे प्रशासन आपल्या नावावर जागा करीत नाही म्हणून ते कॉलेज आपल्या नावावर सुरु होत नाही. शासनाने रेल्वे प्रशासनाशी संपर्क साधून त्वरित ही जागा आपल्या नावावर करुन घेतली तर हे केटरिंग कॉलेज शैक्षणिक वर्षापासून सुरु होईल.

अध्यक्ष महोदय, सोलापूर जिल्हयात माननीय केंद्रीय दळणवळण मंत्री श्री.नितीन गडकरी आणि माननीय मुख्यमंत्री, माननीय बांधकाम मंत्री आले होते. 27,000 कोटी रस्त्याची कामे सोलापूरला दिलेली आहेत.

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष देशमुख......

यामध्ये सोलापूर - विजापूर रस्ता, सोलापूर- कोल्हापूर रस्ता सोलापूर-गुलबर्गा रस्ता असे अनेक रस्ते जोडले जातात. यामुळे सोलापूर एक मध्यवर्ती ठिकाण झालेले आहे.

अध्यक्ष महोदय, सोलापूर येथे विडी कामगार मोठया प्रमाणात आहेत. सोलापूरमध्ये हातमाग कामगार मोठया प्रमाणात आहेत. हे दोन्ही उद्योग आता अडचणीत आलेले आहेत. विडी उद्योग धुम्रपान कायद्यामध्ये समाविष्ट झाल्यामुळे हा उद्योग आता अडचणीत आलेला आहे. सोलापूरच्या आजुबाजूचा विचार केला तर मुख्यमंत्र्यांचे श्रध्दास्थान निरा-नरसिंगपूर, पंढरपूर, ग्रामदैवत सिध्द रामेश्वर, अक्कलकोट स्वामी समर्थ, तुळजापूर ही तीर्थक्षेत्रे आहेत. या परिसरामध्ये वेळापूर लेण्या आहेत. दक्षिण तालुक्यामध्ये उडल हत्तरसिंग लेण्या आहेत. त्यामुळे या भागाला अध्यात्मिक पर्यटन स्थळ म्हणून घोषित करावे, अशी मी माननीय पर्यटन मंत्री यांना विनंती करतो. माननीय मुख्यमंत्री यांनीही यामध्ये लक्ष घालावे. सोलापूर येथील सिध्देश्वर वनविहारातील 700 एकर जमीन शहरामध्ये आहे. या वन विहाराचा विस्तार केला पाहिजे. त्याचा पिकनिक स्पॉट म्हणून वापर केला तर सोलापूरमध्ये पर्यटन उद्योगाला व रोजगाराला संधी मिळू शकते. विडी कामगार व हातमाग कामगार यांच्या हाताला काम मिळू शकते. सोलापूर शहराचा स्मार्ट सिटी योजनेमध्ये समावेश झालेला आहे. या भागामध्ये रोजगार निर्मिती झाली पाहिजे. रोजगार निर्मिती पर्यटन उद्योगाच्या माध्यमातून होते. पर्यटन उद्योगाकरिता प्रसिध्दी आणि प्रचारासाठी मोठा निधी उपलब्ध करुन दिला तर सोलापूर येथे खूप मोठा रोजगार उपलब्ध होऊ शकेल.

अध्यक्ष महोदय, सन 2010 मध्ये तत्कालीन राष्ट्रपती ए.पी.जे.अब्दूल कलाम सोलापूर विज्ञान केंद्राचे उद्‌घाटन केले होते. या विज्ञान केंद्रामध्ये1,00,000 विद्यार्थी वर्षभरात येऊन जातात. त्याच्या देखभालीकरिता महापलिकेला 20,000,00 द्यावयाला सांगितले होते. सन 2010 पासून 2010 पर्यंत महापालिका हे 20 लाख रुपये देत आहे, अजून पूर्ण झाले नाही. गेल्या सहा वर्षापासून तेही दिले जात नाही. कर्मचा-यांना वाढीव पगार नाही. देखभालीचा खर्चही त्यात भागवायचा आहे. दरवर्षी हा खर्च वाढत आहे. हे ग्रामीण भागातील पहिले विज्ञान केंद्र आहे. याकडे शासनाने थोडसे लक्ष द्यावे. हे विज्ञान केंद्र कोणाच्या ताब्यात आहे, हेच मला कळले नव्हते.

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष देशमुख......

आता मला कळले की, हे केंद्र महापालिका 20 लाखात चालवित आहे. याची राज्य शासनाने जबाबदारी घेणे गरजेचे आहे. ग्रामीण भागामध्ये विज्ञान केंद्र झाले तर विद्यार्थी संशोधनाकरिता तयार होतील.

अध्यक्ष महोदय, रेशन दुकान आहे, त्या ठिकाणापासून 4 कि.मी. अंतरावरुन अन्नधान्य आणावे लागते. एका ठिकाणाहून रॉकेल आणि एका ठिकाणाहून अन्नधान्य आणावे लागत आहे. ज्या ठिकाणी गाव आहे, त्याच ठिकाणी हे रेशन दुकाने देण्यात यावीत, ही आग्रहाची विनंती करतो. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-------

....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभाध्यक्ष ( डॉ.सतीश पाटील ):** प्रत्येक पक्षाकडून 3-3 नावे दिली तर प्रत्येक पक्षाला संधी मिळेल.

डॉ.जयप्रकाश मुंदडा : अध्यक्ष महोदय, प्रत्येक सन्माननीय सदस्यांना केवळ मुद्दे मांडण्याची तरी संधी देण्यात यावी.

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांनी केवळ सूचना मांडाव्यात.

श्री.भारत भालके ( पंढरपूर ): अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पीय मागण्यांवर माझे विचार मांडण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पामध्ये सिंचनाकरिता भरपूर निधी मिळेल, अशी अपेक्षा होती. सिंचनाचे क्षेत्र वाढविण्याकरिता व प्रगतीपथावरील प्रकल्प पूर्ण करण्याकरिता अधिक प्रमाणात निधी असण्याची गरज असते. जलसंपदा विभागाच्या बजेटचे बुकलेट पाहता असे आढळून आले की, यामध्ये विभागनिहाय आर्थिक तरतूद करण्यात आलेली आहे. ज्या प्रकल्पांची कामे 80-90 टक्के पूर्ण झालेली आहे, त्या प्रकल्पांकरिता निधी देण्यास अग्रक्रम देण्याबाबत शासनाचे धोरण ठरले होते. त्याप्रमाणे प्रगतीपथावरील प्रकल्पांना निधी प्राप्त झालेला नाही. म्हैसाळ योजनेच्या सहाव्या टप्प्यामध्ये मंगळवेढा व सांगोला येथील काही भाग घेतलेला आहे. दुष्काळी भागातील या योजनेच्या सहाव्या टप्प्याचे काम गेल्या 16-17 वर्षापासून चालू आहे. एआयबीपीमार्फत निधीची तरतूद केलेली आहे. त्यामध्ये 75 टक्के निधी केंद्राचा होता आणि राज्य शासनाचा निधी 25 टक्के इतका प्रस्तावित होता. सन 2014-2015 मध्ये या योजनेकरिता एक रुपयाही निधी मिळाला नव्हता. सन 2015-2016 मध्ये 48 कोटी रुपयांची मागणी केली होती. परंतु त्याकरिता तुटपुंजी रक्कम दिल्यामुळे जत,मंगळवेढा व सांगोल्याच्या काही भागातील जलसेतूची कामे अपूर्ण आहेत. दुष्काळी भागात पिण्याच्या पाण्याकरिता टँकर्स द्यावे लागतात. जनावरांना पिण्याच्या पाण्याकरिता 6-7 कि.मी.भटकंती करावी लागते. त्याचे 90 टक्के काम पूर्ण झालेले आहे. या योजनांबाबत शासनाने निर्णय घेतलेला आहे. या योजनांचा त्यामध्ये समावेश करुन लवकरात लवकर या योजनांकरिता निधी देण्यात यावा. या भागातील प्रकल्प - सेतूची कामे पूर्ण करुन दिलासा देण्याचे काम केले पाहिजे.

31-03-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) LL-5

JN/ AKN/ MMP/ 16:20

श्री.भारत भालके......

अध्यक्ष महोदय, नियतव्यय वाटप करतेवेळी शासनाने जी समिती नेमलेली आहे, ती समिती पुर्णत्वाच्या मार्गावर असलेल्या प्रकल्पांना निधी देण्याकरिता अग्रक्रम देत आहे. आमच्या भागामध्ये एका प्रकल्पाच्या पूर्णत्वाकरिता केवळ 70 कोटी रुपयांची आवश्यकता आहे, त्या प्रकल्पाला तसा निधी दिला गेलेला नाही. शासन आता या 70 कोटी निधीकरिता 4 टप्प्यांचा कालावधी घेणार आहे का? याकरिता अजून किती वर्ष लागतील ? मंगळवेढा तालुक्यामध्ये कायम दुष्काळी भागातील 35 गावांची योजना आहे. त्याकरिता माननीय राज्यपाल महोदयांनी अनुशेषामधून वगळून खास बाब म्हणून मान्यता दिलेली आहे. तत्कालीन मुख्यमंत्री सन्माननीय सदस्य श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी याकरिता प्रशासकीय मान्यता घेऊन टोकन देण्याबाबत प्रस्ताव दिला होता. याकरिता पहिल्या दोन टप्प्यांसाठी परवानगी दिली होती. पहिला टप्पा पूर्ण करण्यासाठी टोकन निधी देणे आवश्यक होते. दिनांक 22 डिसेंबर,2014 रोजी हिवाळी अधिवेशनामध्ये लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून याकरिता विचारणा केली असता माननीय जलसंपदा मंत्री महोदयांनी उत्तर दिले होते. माननीय जलसंपदा मंत्री यांनी याबाबत असे म्हटले होते की, याकरिता सरकार रेग्यूलर बजेटमधून पैसे देईल. सन 2015 च्या व सन 2016 च्या अर्थसंकल्पामध्ये याकरिता टोकनची तरतूद केली गेली नाही. एखाद्या प्रकल्पाकरिता पहिल्या पाच वर्षांमध्ये पहिल्या टप्प्यात निधी दिला नाही तर त्या प्रकल्पाचे अस्तित्व संपून जाईल.

2एम-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. भारत भालके.........

म्हणून त्या कामासाठी टोकनची तरतूद करुन दुष्काळी भागातील जनतेला न्याय देण्याचा प्रयत्न करण्याची गरज आहे. त्यावेळी तेथील जनतेने आंदोलने आणि मोर्चे काढले होते. मतदानावर बहिष्कार टाकलेला होता तर काही लोक कर्नाटक, मुंबई, पुणे किंवा मिळले त्या ठिकाणी जगण्यासाठी गेली होती. त्यामुळे माननीय जलसपंदा आणि माननीय वित्तमंत्र्यांनी पहिला टप्पा पूर्ण करुन त्याचे अस्तित्व टिकविण्यासाठी आवश्यक तेवढा निधी देण्याची गरज आहे. या माध्यमातून तेथील लोकांना आणि जनावरांना पाणी देण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, उजनीच्या उजव्या कालव्यातील अनेक कामे गेल्या 20 वर्षापासून प्रलंबित आहेत. कमी प्रमाणात निधी दिलेला असल्यामुळे शेवटच्या टोकापर्यंत पाणी पोहचलेले नाही. माझ्या मतदारसंघातील मोराळे आणि मरोडे या भागातील योजनांना निधी देण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, राज्य शासनाने नदीचे पुनरूज्जीवन करण्यासाठी काही नवीन योजना हाती घेतलेली आहेत. धोटानाली नदीचे पुनरूज्जीवन करण्यासाठी राज्य शासनाने नवीन योजना हाती घेतलेली आहे. या कामासाठी आवश्यक तेवढा निधी दिला तर दुष्काळी भागातील लोकांना पाणी मिळण्यास मदत होणार आहे. माझ्या मतदारसंघातून जाणाऱ्या धोटानाली नदीचे रुंदीकरण आणि खोलीकरण केले तर पाणीसाठा वाढण्यास मदत होणार आहे.

अध्यक्ष महोदय, सोलापूर जिल्ह्यातील भीमा, माण आणि सिमा नदीसाठी निधी दिलेला आहे. अशा नद्यांवरील बंधाऱ्यांची फुटकी किंवा गळकी दारे बदलून चांगली दारे दिली तर त्या नदीतील पाणी कर्नाटक किंवा आंध्रप्रदेशला जाणार नाही. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यात पाणीसाठा वाढून त्याचा फायदा राज्यातील लोकांना, शेतकऱ्यांना होणार आहे. भीमा, माण आणि सिमा नदीवरील बंधाऱ्याची फुटकी किंवा गळकी दारे बदलण्यासाठी आवश्यक तेवढा निधी द्यावा अशी मी मागणी करीत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

........2....

श्री. भारत भालके.........

अध्यक्ष महोदय, राज्यातील अपूर्ण सिंचनाचे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविले जातात. यासंदर्भात 2270 कोटी रुपयांचा प्रस्ताव पाठविलेला आहे. यामध्ये 105 प्रकल्पांचा समावेश केलेला आहे. यामधील 30 प्रकल्प विदर्भातील तर 40 प्रकल्प मराठवाड्यातील तर 50-60 प्रकल्प पश्चिम महाराष्ट्रातील आहेत. अपूर्ण प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आवश्यक तेवढा निधी देण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे आपला दुष्काळावरील जो खर्च वाया जातो, तो वाया जाणार नाही. राज्यातील अपूर्ण सिंचनाचे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आवश्यक तेवढा निधी द्यावा अशी मागणी करीत आहे.

अध्यक्ष महोदय, मी अन्न सुरक्षा कायद्याच्या संदर्भातील उल्लेख करणार आहे. अन्न सुरक्षा कायदा 14 जिल्ह्यांमध्ये लागू केलेला आहे. ज्या ठिकाणी दुष्काळ जाहीर केलेला आहे किंवा ज्या ठिकाणी 50 पैशांपेक्षा कमी आणेवारी जाहीर केलेली आहे अशा ठिकाणी अन्न सुरक्षा कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली तर गरीब लोकांना त्याचा फायदा होणार आहे.

अध्यक्ष महोदय, पंढरपुर तीर्थक्षेत्राचे ठिकाण म्हणून प्रसिध्द आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी 657 कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात केली जाईल, अशा प्रकारचे आश्वासन आम्हाला दिलेले होते. सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पात पंढरपुर तीर्थक्षेत्रासाठी भरीव तरतूद केलेली असेल असे आम्हाला वाटले होते. परंतु, याबाबत आमची घोर निराशा झालेली आहे. पंढपुरमधील चंद्रभागा नदी प्रदूषण मुक्त करण्यासाठी 20 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. पुणे शहरातील उजनी नदीतील घाण पाणी चंद्रभागा नदीमध्ये येत असते. मग अशा वेळी पुढील 5 वर्षात 20 कोटी रुपये खर्च करुन चंद्रभागा नदी प्रदूषण मुक्त कशी करणार असा माझा प्रश्न आहे. चंद्रभागा नदीमधील पाणी वारकरी, भाविक तोंडात तीर्थ म्हणून घेत असतो. अशा प्रकारे वारकऱ्यांना घाण पाणी पाजण्याचे काम होत असेल तर ते अतिशय चुकीचे होणार आहे. पंढरपुरमधील चंद्रभागा नदी प्रदूषण मुक्त करण्यासाठी भरीव निधीची तरतूद करण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, जलसिंचनासाठी आमच्या मागणीप्रमाणे तरतूद करावी, अशी मागणी करतो आणि वेळे अभावी माझे भाषण या ठिकाणी संपवितो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फेंशन आहे. पुरवणी मागण्यांवरील चर्चेला उत्तर कोण देणार आहेत ? ज्या विभागाच्या मागण्या सुरु आहेत, त्या विभागाचे मंत्री उत्तर देणार आहेत काय ?

**तालिका सभाध्यक्ष ( डॉ. सतिष पाटील )** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, संबंधित विभागाचे मंत्री पुरवणी मागण्यांवरील चर्चेला उत्तर देणार आहेत.

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, सभागृहात फक्त एकच कॅबिनेट मंत्री उपस्थित आहेत. उर्वरित विभागाचे मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत. मग अशा वेळी कशाला चर्चा करायची ?

श्री. विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, आता कॅबिनेटची बैठक सुरु आहे. कॅबिनेटची बैठक संपल्यानंतर संबंधित विभागाचे मंत्री, राज्यमंत्री सभागृहात येणार आहेत.

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य श्री. धैर्यशील पाटील यांनी पुरवणी मागण्यांवरील चर्चेला सुरुवात करावी, अशी माझी त्यांना विनंती आहे.

......4.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धैर्यशील पाटील ( पेण ) : अध्यक्ष महोदय, मी सांस्कृतीक विभागावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी या ठिकाणी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, ज्यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांचा मृत्यू झाला, त्यावेळी त्यांच्या मृत्यूबाबत थोडीशी गोंधळाची परिस्थिती निर्माण झालेली होती. त्या काळात संभाजी राजे सुधागड तालुक्यातील गोराई किल्ल्यावर वास्तव्यास होते. त्यावेळी अष्टप्रदान मंडळातील काही मंडळी संभाजी राजे यांच्याकडे जात होती. त्यावेळी गैरसमजुतीतून अनुचित घटना घडलेली होती. छत्रपती शिवाजी राजांबरोबर अष्टप्रदान मंडळ काम करीत होते. यामधील दोघांना मृत्यूची शिक्षा देण्यात आली होती. अष्टप्रदान मंडळात बाळाजी अहूजी चिटणीस यांना सुधागड तालुक्यातील अहुंढे गावाच्या बाजूला हत्तीच्या पायाखाली टाकून मारण्यात आले. गैर समजुतीतून हा प्रकार घडलेला होता. ही गोष्ट ज्यावेळी संभाजी राजांच्या लक्षात आली, त्यावेळी त्यांना पश्चाताप झाला होता. त्यानंतर त्यांनी त्या ठिकाणी त्यांची समाधी बांधली होती. त्यांचे चिरंजीव खंडोबल्लाळ यांना त्यांच्या वडिलांचे पूर्वीचे पद मानाने देण्यात आले होते. आपल्या वडिलांवर असा प्रसंग आला तरी भविष्यातील प्रत्येक घटनेत खंडोबल्लाळांनी स्वराज्यासाठी प्रामाणिक सेवा केलेली होती. त्यामुळे संभाजी राजांनी त्यांना स्वामिनिष्ट खंडोबल्लाळ असे त्यांचे नामकरण केले होते. छत्रपती संभाजी राजांच्या हातून अशा प्रकारची दुर्दैवी घटना घडलेली होती. असे असताना देखील खंडोबल्लाळ यांनी आपल्या कर्तव्यात कोणतीही कसुर केलेली नाही. मांडवी नदीला ज्यावेळी पूर आलेला होता, त्यावेळी संभाजी राजे पोतुर्गाजांवर बेभानपणे हल्ला करीत होते. त्यावेळी ते मांडवी नदीच्या पूरामध्ये अडकलेले होते. त्यावेळी खंडोबल्लाळ यांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून संभाजी राजांचे प्राण वाचविले होते. लढाईच्या काळात संभाजी राजांची पत्नी शत्रुच्या ताब्यात सापडण्याचा धोका निर्माण झालेला होता. त्यावेळी खंडोबल्लाळ यांनी स्वतःच्या सख्या बहिणीला मेण्यामध्ये बसविले होते. त्यांनी स्वराज्याकरिता आपल्या बहिणीला मृत्यूच्या दारेमध्ये टाकले होते. इतिहासात हा पुरावा आहे. जिंजीच्या वेढ्यातून राजाराम महाराज सुटणे कठीण होऊन बसले होते, त्यावेळी संभाजी राजांचे मोठे मेहुणे यांनी वेढा घातलेला होता. त्यावेळी खंडोबल्लाळ यांनी ऐतिहासिक

.......5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धैर्यशील पाटील.......

भूमिका पार पाडलेली होती. दरोजी शिर्के हे संभाजी राजांचे सख्ये मेहुणे होते. संभाजी राजांच्या लहान भावाच्या सोडवणुकीकरिता गणोजी शिर्केला स्वामिनिष्ट खंडोबल्लाळांनी आपली सर्व संपत्ती त्यांच्या नावे केली होती. खंडोबल्लाळ यांनी त्यावेळी आपली भूमिका योग्यरितीने पार पाडलेली होती.

NN-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धैर्यशील पाटील...

संभाजी राजांनी बालाजी औंजीची समाधी बांधली होती, ती माझ्या मतदारसंघात औंढा या ठिकाणी आहे. चिटणीसांच्या सर्व वंशजांनी आणि आम्ही प्रमुख मंडळींनी तेथे ट्रस्ट स्थापन केला आहे. ज्यांनी स्वतःच्या वडिलांचा मृत्यू या राजकारणातील गेरसमजामुळे होऊन देखील मराठी साम्राज्याची स्वतःची जहागिरदारी त्या राजाच्या मेहुण्याला देऊन ज्याने सेवा केली, अशा मंडळीचा आदर्श आताच्या लोकांच्या समोर असावा म्हणून त्या ऐतिहासिक स्थळामध्ये स्मारक करण्याचे स्थानिक मंडळींनी ठरविले आहे. बालाजी औंजी चिटणीस ट्रस्टने संभाजी राजांनी बांधलेल्या चिटणीसांच्या समाधीचे पुनरूज्जीवन करण्याचा निर्णय घेतला असून सदरचा कार्यक्रम 8 तारखेला होणार आहे. या कार्यक्रमासाठी सिक्कीम राज्याचे माननीय राज्यपाल श्री.पाटील येणार आहेत. त्या ठिकाणची जागा रियल इस्टेटमधील कोठारी नावाच्या एका व्यावसायिकाने घेतलेली आहे. आम्हाला त्या जागेकरिता शासनाकडून पैसे नकोत, आम्हाला त्या ठिकाणी जाण्यासाठी शासनाकडून रस्त्यांसाठी पैशांची आवश्यकता नाही. तेथे जी दोन एकर जागा आहे ती या कारणाकरिता आरक्षित करावी. जो या जागेचा मालक आहे त्याला आम्ही ट्रस्टकडून त्याचा योग्य तो मोबदला देण्यास तयार आहे. मौजे औंढे येथे 88/1 क्षेत्रफळ 97 गुंठे हा त्या जागेचा तपशील आहे.

तालिका सभाध्यक्ष (डॉ.सतीश पाटील) : मंत्री महोदयांनी या स्पॉटची नोंद घ्यावी.

श्री.विनोद तावडे : ठीक आहे.

श्री.धैर्यशील पाटील : अध्यक्ष महाराज, वरील जागेची योग्य ती दखल घेण्यात यावी आणि त्यांचे पैसे त्या मालकाला देऊन त्या जागेचा वापर आरक्षित करावा.

अध्यक्ष महाराज, माझ्या मतदारसंघातील दादर या गावामध्ये भाताचा एक दाणा सुध्दा पिकलेला नाही. ज्या गावात 50 पैशापेक्षा कमी आणेवारी असेल अशा ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारच्या सोई सुविधा शासनाकडून दिल्या जातात. माझ्या त्या गावात गेल्या वीस वर्षात शून्याच्या वर आणेवरी कधी गेलीच नाही म्हणून त्या गावाला अन्न सुरक्षा कायद्याखाली संरक्षण द्यावे, अशी माझी विनंती आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

--------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमित देशमुख (लातूर शहर): अध्यक्ष महाराज, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील वित्त विभाग, जलसंपदा विभाग, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, नियोजन विभाग, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. महाराष्ट्र शासनाने अर्थसंकल्प सादर केला त्यामध्ये 25 हजार कोटी रुपये कृषी क्षेत्रासाठी देऊ केले आहेत. एवढी मोठी रक्कम कृषी विभागाला देऊ केल्यानंतर काही दिवसामध्येच मंत्रालयासमोर मराठवाड्यातील एक तरुण शेतकरी, वय वर्षे-27, श्री.माधव कदम यांनी आत्महत्येचा प्रयत्न केला. त्यात त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. महाराष्ट्र शासनाने 25 हजार कोटी रुपये कृषी विभागासाठी या अर्थसंकल्पात देऊ केले, परंतु हे करण्यामध्ये उशीर झाला की काय, असा प्रश्न उपस्थित होतो. असे चित्र या राज्यामध्ये आपण सर्वांनी पाहिलेले आहे.

अध्यक्ष महाराज, विरोधी पक्षाने राज्यामध्ये अनेकवेळा आंदोलने, विविध जिल्ह्यांमध्ये रास्ता रोको, तसेच दुष्काळी भागातील लोकांच्या भेटी घेतल्या. विरोधी पक्षाने वारंवार सरकारला दुष्काळाची तिव्रता काय आहे, हे समजून सांगण्याचा प्रयत्न केला, पण सरकारने त्याकडे लक्षच दिले नाही. अजूनही या राज्यामध्ये आत्महत्या थांबल्या असे आपल्याला म्हणता येणार नाही. महाराष्ट्र सरकारने एलबीटी कर रद्द केला आणि दुष्काळी कर लागू केला. हा दुष्काळी कर रद्द केला आहे काय की यापुढेही तो लागू राहणार आहे, यावर माननीय वित्त मंत्र्यांनी आपल्या भाषणात खुलासा करावा. दुष्काळी भागामध्ये कोठलाही कर वसूल केला जाणार नाही असे राज्य सरकारकडून वारंवार सांगण्यात येते, परंतु अजूनही शेतकऱ्यांकडून, शेतमजुरांकडून शैक्षणिक कर, रोजगार हमी योजना कर वसूल करण्यात येतो. त्या पावतीची प्रत माझ्या हातामध्ये असून ती पाहण्यासाठी मी आपल्याला देऊ इच्छितो. शासनाने हा कर तातडीने रद्द करावा जेणेकरुन दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने मदत करण्यासारखे होईल.

अध्यक्ष महाराज, मी आता वित्त खात्याच्या मागण्यांवर बोलणार आहे. आमदारांचा निधी वाढविण्याची चर्चा गेल्या अनेक दिवसापासून होत आहे. त्या निधीमधून जवळपास 30 ते 40 टक्के कर स्वरुपात कापले जातात. आमदार निधी आणि तो कर असा एकत्रित आमदार निधी करावा, अशी मी माननीय वित्त मंत्र्यांना विनंती करु इच्छितो. शासनाने टु व्हीलर, थ्री व्हीलरवर कर वाढविण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. या कराचा सर्वसामान्य माणासाला भूर्दंड भरावा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

31-03-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) NN-3

ADB/ MMP/ AKN/ 16:40

श्री.अमित देशमुख...

लागणार आहे. हा वाढविलेला कर मागे घ्यावा, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महाराज, दुष्काळी भागामध्ये शेवटी माननीय हाय कोर्टाला हस्तक्षेप करावा लागला. माननीय हाय कोर्टाने राज्य सरकारवर ताशेरे ओढले आहेत. कोठलेही कारण न सांगता दुष्काळाच्या बाबतीत ज्या उपाययोजना आहेत, त्या तातडीने राज्य सरकारने करायला पाहिजेत. आज लातूर, बीड, उस्मानाबाद या जिल्ह्यांमध्ये पिण्याच्या पाण्याचा टँकरद्वारे पुरवठा करण्यात येत आहे. पाण्याचे दर वाढत चालले आहेत. एक टँकर दोनशे रुपये, तीनशे रुपये, आठशे रुपये, बाराशे रुपयांना मिळत आहे. राज्य सरकारकडून मागील काळात पाण्याचे दर नियंत्रित ठेवण्यासंबंधी कसल्याही सूचना प्रशासनाला दिलेल्या नाहीत, ही बाब मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देत आहे.

अध्यक्ष महाराज, अन्न व नागरी पुरवठा या विभागावर मी माझे मत थोडक्यात मांडणार आहे. आज जीवनावश्यक वस्तूंचे दर वाढत चालले आहेत. गव्हाचा दर 28 ते 38 रुपये किलो, तांदूळ 32 ते 52 रुपये किलो, तूर डाळ 120 रुपये किलो, मूग डाळ 120 रुपये किलो, उडीद डाळ 200 रुपये किलो, साखर 35 ते 40 रुपये किलो, असे अन्नधान्याचे दर आहेत. अशा प्रकारे महागाई आटोक्यात आणण्यासाठी या राज्य सरकारला अपयश आलेले आहे. "घर की मुर्गी दाल बराबर" या म्हणीप्रमाणे तूर डाळ 120 रुपये किलो आणि कोंबडी 120 रुपये किलो याप्रमाणे ही म्हण राज्य सरकारने खरी केली आहे, हे मला या ठिकाणी आवर्जून नमूद करावेसे वाटते. ही महागाई नियंत्रणात न आणल्यामुळे सर्व सामान्य माणसाला आज झळ पोहोचत आहे. यामध्ये खऱ्या अर्थाने मदत करण्याची भावना राज्य सरकारला असायला हवी, परंतु ती आम्हाला बघायला मिळत नाही.

यानंतर OO-1..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अमित देशमुख ....

माननीय श्री. गिरीष बापट साहेबांना मला हे सांगावयाचे आहे की, सर्व दर आपण नियंत्रणात आणावेत ही आग्रहाची विनंती मी करु इच्छितो.

अध्यक्ष महोदय, पर्यटन, सांस्कृतिक विभागाचे मंत्री महोदय, माननीय श्री. विनोद तावडे सभागृहात उपस्थित आहेत, त्यांना मला हे सांगावयाचे आहे की, खरे म्हणजे आपले काम उत्तम चालले आहे. सांस्कृतिक विभागालाही आपण न्याय द्यावा, अशी आग्रहाची व कळकळीची विनंती मी आपल्याला करणार आहे. सांस्कृतिक विभागाचे धोरण काय आहे हे काही आम्हाला समजू शकत नाही. त्यामुळे सांस्कृतिक विभागाचे धोरण काय आहे यावरही आपण आपली भूमिका विशद करावी.

अध्यक्ष महोदय, मराठी चित्रपट, मराठी नाटके यांना प्राईम टाईम देण्याची आवश्यकता आहे. यातही अनेक अडचणी आहेत, या संदर्भातील शासनाची भूमिका स्पष्ट असली पाहिजे. आज मराठी चित्रपट, मराठी नाटकांना अधिक अनुदान देण्याची आवश्यकता आहे. त्या अनुदानात वाढ करण्याची आवश्यकता आहे. गुजरात सरकारची एक अशी योजना आहे की, जी गुजराती नाटके देशात दर्शविली जातात, ज्यांचे देशात प्रयोग होतात त्यांना गुजरात सरकारकडून अनुदान दिले जाते. त्याच धर्तीवर ज्या मराठी नाटकांचे प्रयोग राज्याबाहेर, देशाबाहेर होतील त्यांना राज्य सरकारने त्यांच्या येण्याजाण्याचा, प्रयोग करण्याचा खर्च आहे त्याकरिता अनुदान द्यावे, अशी मी या निमित्ताने मागणी करु इच्छितो.

अध्यक्ष महोदय, मुंबईमध्ये चित्रनगरी आहे. पर्यटनाकरिता चित्रनगरीचा उपयोग याबाबतचे धोरणही आपण करीत आहात, परंतु याला गती देण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते. चित्रपटाच्या तिकीटांवर आपण सर्व्हिस चार्ज देत आहात. मात्र मराठी चित्रपटांना 100 रुपयांचे तिकीट ठेवले तरच तो एक्स्ट्रा सर्व्हिस चार्ज लावता येईल असे शासनाचे धोरण आहे. परंतु, हिंदी, इंग्रजी चित्रपटांना त्याचे बंधन नाही. ते 500 ते 1000 रुपये तिकीट लावू शकतात व तो एक्स्ट्रा सर्व्हिस चार्ज घेऊ शकतात. यामुळे मराठी चित्रपट व्यवसाय करणाऱ्यांना थोडी अडचण येत आहे. हे सुध्दा मला आपल्याला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अमित देशमुख ....

अध्यक्ष महोदय, लातूरला सांस्कृतिक सभागृह मंजूर झाले होते. राज्य सरकारने पैसे दिले होते, परंतु ते पैसे खर्च झाले नाहीत म्हणून राज्य सरकारने ते परत घेतले. मी राज्य सरकारच्या हे लक्षात आणून देऊ इच्छितो की, लातूरमध्ये गेली अनेक वर्षे दुष्काळ आहे. कलेक्टरने बांधकामावर बंदी घातलेली आहे. त्यामुळे कोठलेच बांधकाम करता येत नाही. या बांधकामाची कामे होऊ शकली नाहीत, त्यामुळे ते काम वेळेत झाले नाही, त्यामुळे माननीय श्री. विनोद तावडे जो निधी सांस्कृतिक सभागृहासाठी राज्य शासनाने दिला होता तो लातूर शहर महानगरपालिकेला आपण परत देऊ करावा, ही विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, मी जलसंपदा विभागाबाबत थोडक्यात सांगणार आहे. अनेक सन्माननीय सन्माननीय सदस्यांनी आपले मत व्यक्त केलेले आहे, अनेक कामे रखडलेली आहेत. जलसंपदा विभागांतर्गत ही कामे लवकरात लवकर पूर्ण व्हावीत, अशी महाराष्ट्रातील जनतेची, शेतकऱ्यांची अपेक्षा आहे. जलसंपदा मंत्री महोदयांकडून आम्हाला एवढेच समजून घ्यायचे आहे की, ही कामे कधी संपणार आहेत ? आपण एखाद्या कामाची, एखाद्या धरणाची, तलावाची, बॅरेजची जेव्हा किंमत ठरवितो, तेव्हा ते काम किती वेळेत पूर्ण होणार ती वेळ ठरविण्याचीही वेळ आलेली आहे. गेली अनेक वर्षे ही कामे रखडलेली आहेत. मला असे वाटते की, येणाऱ्या काळात ही कामे वेळेत पूर्ण होतील, या संदर्भातील शासनाची भूमिका त्यांच्याकडून उत्तरामध्ये अपेक्षित आहे.

अध्यक्ष महोदय, लातूरमध्ये दुष्काळ आहे. लातूरला पाणी कोठून आणावे ? काही तरी एक वेगळी कल्पना मांडल्याशिवाय, सह्याद्रीच्या पठारावर पडणारे पावसाचे पाणी जोपर्यंत आपण दुष्काळी भागामध्ये वळवणार नाही, एक महत्त्वाकांक्षी योजना आपण जोपर्यंत आखणार नाही, तोपर्यंत दुष्काळी भागातील जनतेला दिलासा मिळेल असे मला वाटत नाही. मी याबाबत मुख्यमंत्री महोदयांना पत्र लिहिलेले आहे, त्यावर त्यांनी सर्वेक्षण करण्याच्या सूचना केलेल्या आहेत. मुख्यमंत्री महोदय व महाराष्ट्र शासनाला आमची आग्रहाची विनंती आहे की, आपण उत्तरामध्ये यावर काही तरी ठोस कार्यक्रम आपण सांगावा.

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अमित देशमुख ....

अध्यक्ष महोदय, लातूर जिल्ह्यामध्ये मांजरा, रेणा नदीवर अनेक बॅरेजेस उभे राहिले. मांजऱ्याच्या बाबतीत शेतकऱ्यांच्या जमिनीच्या अधिग्रहणाचे जे पैसे आहेत, ते अद्याप द्यायचे बाकी आहेत. रेणा नदीवर अनेक कामे रखडलेली आहेत. रेणा नदीवरील बॅरेजच्या कामाचे पैसेही राज्य शासनाने द्यावीत, तशी तरतूद या अर्थसंकल्पात झालेली दिसत नाही.

अध्यक्ष महोदय, या सर्व मागण्यांचा मी विरोध करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

............

अनेक सन्माननीय सदस्य : अध्यक्ष महोदय, आपण नावे वाचून दाखवावीत.

**तालिका सभाध्यक्ष (डॉ. सतीश पाटील) :** मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, अजून अनेक सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे असल्याने विनंती आहे की, आपण स्पेसिफिक मुद्दे मांडावेत. आता आपण सर्व पक्षाच्या प्रत्येक सन्माननीय सदस्यांना बोलण्याकरिता संधी देत आहोत. आपण सर्व पक्षांना समान संधी देत आहोत. आपण आपले बोलणे 2-2 मिनिटांत संपवले तर सर्वांचे बोलून होईल. माननीय विरोधी पक्ष नेते काँग्रेस पक्षाकडून सर्वात जास्त सन्माननीय सदस्य बोलले आहेत. आपल्याला उत्तर देखील घ्यायचे आहे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, चर्चा 5 वाजता संपेल असे सकाळी चर्चेमध्ये ठरले होते. बऱ्याच सन्माननीय सदस्यांना जायचे आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : आपण चर्चा संपवित नाही. माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, आपण आपले मुद्दे 2-2 मिनिटांत मांडावेत.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, मला असे वाटते की, म.वि.स. नियम 293 अन्वयेचा प्रस्ताव उद्या सकाळी होणार आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपल्या गटनेत्यांकडून माझ्याकडे नावे प्राप्त झालेली आहेत. आपण सर्व सन्माननीय सदस्यांना बोलण्याकरिता संधी देत आहोत. आता सन्माननीय सदस्य श्री. चंद्रदीप नरके यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रदीप नरके ( करवीर ) : अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आभारी आहे. शिवसेनेचे एकच सन्माननीय सदस्य बोललेले असल्याने मला बोलण्याकरिता थोडा वेळ द्यावा, अशी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, जलसंपदा विभागाबाबत मी आपल्याद्वारे मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, या जलसंपदा विभागाकरिता 7800 कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केलेली आहे. मला असे वाटते की, राज्यातील अनुशेष पाहून राज्यपाल महोदयांच्या निकषाप्रमाणे निधीचे वितरण केले जात आहे. विदर्भ, मराठवाड्यामध्ये निधी दिला पाहिजे. परंतु, आज पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळी भागामध्येही निधी वितरित करताना अन्याय होऊ लागला आहे. आपण तालुकानिहाय अनुशेष काढला तर, आज राज्यामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी आणि पश्चिम महाराष्ट्रामध्ये ज्या ठिकाणी प्रकल्प सुरु आहेत, त्यांना निधी मिळणे आवश्यक आहे. कृष्णा खोरे महामंडळाच्या माध्यमातून जे प्रकल्प सुरु आहेत, त्यांना आपण किती निधी दिला, विदर्भ, मराठवाडा, तापी विभागाला किती निधी दिला ? या ठिकाणचा अनुशेष काढताना तालुकानिहाय अनुशेष काढला असता तर पश्चिम महाराष्ट्रात सुरु असणाऱ्या प्रकल्पांकरिता निधीची तरतूद करता आली असती.

PP-1/-...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रदीप नरके.....

अध्यक्ष महोदय, पश्चिम महाराष्ट्रामध्ये सुद्धा अनेक मोठे प्रकल्प व मध्यम प्रकल्प आहेत. दुष्काळी भागात उपसा सिंचन योजना आहेत. जत, सांगली तालुका तसेच आमच्या भागामध्ये धामणी प्रकल्प आहे. अनेक प्रकल्पांना माननीय राज्यपालांच्या निकषामुळे अनेक अडथळे निर्माण झाले असून पाणी अडविले जात नाही. कृष्णा खोरे लवादाप्रमाणे 500 अब्ज घनफुट पाणी अडवायचे होते. या कराराप्रमाणे अडवायच्या पाण्याकरिता निधीची तरतूद झाली आहे काय, हे तपासण्याची आवश्यकता आहे. आमच्या येथील धामणी मध्यम प्रकल्प 3.5 टीएमसीचा आहे. याकरिता देखील सुधारित प्रशासकीय मान्यता दिली नाही. हे प्रकल्प कोणत्या कारणांमुळे अडले. वन विभागाच्या अडचणीमुळे धामणी प्रकल्प अडला आहे. 120 कोटीच्या या प्रकल्पाला 320 कोटी रुपयांची मान्यता 2004-2005 मध्ये झाली. माननीय वित्तमंत्री आणि माननीय जलसंपदा मंत्र्यांनी या ठिकाणी सांगितले की, या प्रकल्पाला सुधारित प्रशासकीय मान्यता लवकर देण्यात येईल. या प्रकल्पाला तांत्रिक सल्लागार समितीने मान्यता दिली. मला वाटते की, हा प्रकल्प तीन सचिवांच्या समितीपुढे अडकलेला आहे. या प्रकल्पास तातडीने मान्यता द्यावी, सुधारित प्रशासकीय मान्यता देऊन या प्रकल्पाला तातडीने निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी मी मागणी करतो.

अध्यक्ष महोदय, जलसंधारण विभागातील प्रकल्पांकरिताचे मापदंड वाढविण्यात आलेले नाही. पश्चिम महाराष्ट्रातील मापदंड वाढविले पाहीजे. प्रकल्पांना निधी देत असताना देखील जे प्रकल्प पुर्णावस्थेकडे आहे, अशा प्रकल्पांना निधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. अनुशेषाच्या नावाखाली असे प्रकल्प बंद करणे, म्हणजे राज्याने गुंतविलेला निधी व्यर्थ जाण्यासारखे आहे किंवा अशा प्रकल्पांना कार्यान्वित करण्याची शासनाची भूमिका असली पाहीजे.

अध्यक्ष महोदय, पर्यटन विभागाच्या माहिती पुस्तिकेमध्ये महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने आतापर्यंत विकसीत केलेल्या पर्यटन स्थळांमध्ये एकूण 41 ठिकाणे आहेत. त्यामध्ये गगनबावडा आणि ज्योतिबा यांचा उल्लेख केलेला आहे. गगनबावडा तालुक्यामध्ये पर्यटनाचा विकास झालेला नाही. अशा पद्धतीने आपण या ठिकाणी जाहीर करणे, ही शासनाच्या वतीने चूक झालेली आहे. मला वाटते गगनबावडा तालुका पर्यटन स्थळ म्हणून जाहीर करावा, कोल्हापूर जिल्हा पर्यटन स्थळ म्हणून जाहीर करावा. आलेल्या प्रस्तावास मान्यता देऊन त्याकरिता निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी माझी मागणी आहे.

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रदीप नरके.....

अध्यक्ष महोदय, मी नियोजन विभागाच्या मागण्यावर थोडे बोलणार आहे. तिर्थक्षेत्र विकास आराखडा, पश्चिम घाट विकास कार्यक्रम, आमदारांचा विकास निधी, डोंगरी विकास निधी आहे. मला या ठिकाणी निश्चितपणे सांगायचे आहे की, जवळपास 90 डोंगरी तालुके आहेत. त्या आमदारांना डोंगरी विकास निधी वाढवून दिला तर त्या भागाचा निश्चितच विकास होणार आहे. या निमित्ताने एवढेच सांगायचे आहे की, डोंगरी विकास निधी 1 कोटी रुपयावरुन 5 कोटी करण्यात यावा. तसेच आमदारांचा विकास निधी 5 कोटी रुपये करावा. असे झाले तर आपल्याला निश्चित चांगले काम करता येईल.

अध्यक्ष महोदय, मी ग्राहक संरक्षणाच्या बाबतीत बोलणार आहे. यामध्ये राज्याला 3 हजार कोटी रुपयांची संभाव्य तूट निदर्शनास आणत आहोत. या ठिकाणी महाराष्ट्रातील आणि मुंबईतील 11 कोटी 35 लाख ग्राहक अडचणीमध्ये आहेत.

**तालिका सभाध्यक्ष :** माझी आपणास विनंती आहे की, आपण थोडक्यात संपवावे. आज मंत्र्यांचा रिप्लाय होणार आहे.

श्री. चंद्रदीप नरके : अध्यक्ष महोदय, आपल्या मंत्रालयामध्ये ग्राहक संरक्षण विभाग आहे. मुंबई ही महाराष्ट्राची आहे. महाराष्ट्रामध्ये एकूण मोबाईल धारकांची संख्या 8 कोटी 13 लाख 46 हजार आहे. त्याचबरोबर मुंबईमधील मोबाईल धारकांची संख्या 3 कोटी...(अडथळा)...

**तालिका सभाध्यक्ष** : आपले बोलणे दोन मिनिटामध्ये संपवावे. अजून सर्व पक्षांच्या सन्माननीय सदस्यांना बोलायचे आहे.

श्री. चंद्रदीप नरके : अध्यक्ष महोदय, 11 कोटी 13 लाख ग्राहकांचे संरक्षण करायचे आहे. त्याकरिता दोन मिनिटाचा वेळ कमी पडणार आहे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्रामध्ये 8 कोटी 13 लाख 46 हजार मोबाईल ग्राहक आहेत. यामध्ये बीएसएनएल कंपनीचे 54 लाख, एअरटेल कंपनीचे 1 कोटी 26 लाख, आयडीया कंपनीचे 2 कोटी 30 लाख, रिलायन्स कंपनीचे 53 लाख 65 हजार, व्होडाफोन कंपनीचे 1 कोटी 80 लाख, युनिनऑर कंपनीचे 79 लाख, टाटा कंपनीचे 63 लाख आणि एअरसेल कंपनीचे 24 लाख ग्राहक आहेत.

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभाध्यक्ष** : माननीय परिवहन मंत्री श्री. दिवाकर रावते हे एक निवेदन करणार आहे. मी सन्माननीय सदस्य श्री. चंद्रदीप नरके यांना विनंती करतो की, आपल्याला बराच वेळ झाला असून आपण आता भाषण संपवावे.

---*---

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी. :** राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सन 2012-2013 च्या कामगार करारास शासनाची मान्यता.

**मु.शी. :** राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सन 2012-2013 च्या कामगार करारास शासनाची मान्यता मिळाल्यासंबंधी माननीय परिवहन मंत्र्यांचे निवेदन.

श्री. दिवाकर रावते (परिवहन मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 47 अन्वये पुढील निवेदन करतो.

( प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे )

---*---

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राहूल मोटे (परांडा) : अध्यक्ष महोदय, कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पाच्या माध्यमातून मराठवाड्याला 25 टीएमसी पाणी मिळाले पाहीजे, ही मराठवाड्यातील शेतकऱ्यांची सर्वात महत्त्वाची मागणी आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून उस्मानाबाद जिल्ह्यातील 85 हजार हेक्टर जमीन ओलिताखाली येणार आहे. बीड जिल्ह्यातील 25 हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. त्यामुळे हा प्रकल्प मराठवाड्यासाठी, उस्मानाबाद जिल्ह्यासाठी आणि बीड जिल्ह्यासाठी अतिशय महत्त्वाचा आहे. या ठिकाणी सीना कोळेगाव धरण माझ्या मतदार संघामध्ये आहे. गेल्या चार वर्षांपासून या धरणामध्ये शुन्य टक्के पाणीसाठा आहे. हे धरण 5 टीएमसीचे असताना त्यामध्ये 4 वर्षांपासून एक थेंब देखील पाणी आलेले नाही. आपण मिडियामध्ये ऐकतो व वर्तमानपत्रामध्ये वाचतो की, अमूक एका धरणाचे 10 टक्के तर अमूक एका धरणाचे 5 टक्के पाणी शिल्लक राहिलेले आहे. परंतु 4 वर्षांपासून आमचे पाणी लाईव्ह स्टॉकमध्येच आलेले नाही. डेड स्टॉकमध्येच आहे. अशी तिव्रता आमच्या मतदार संघामध्ये पहायला मिळते. दुष्काळावर मात करायची असेल तर कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पाच्या अंतर्गत जेऊर टनेलच्या माध्यमातून सिना कोळेगाव धरणामध्ये पाणी आले पाहीजे, ही महत्त्वाची मागणी या चर्चेच्या माध्यमातून करायची आहे...(अडथळा)...

**तालिका अध्यक्ष :** मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, राष्ट्रवादी पक्षाचे दुसरे सदस्य बोलत आहेत. आपण हेतू आरोप करु नये. सन्माननीय सदस्य श्री. राहूल मोटे आपण बोलण्यास सुरुवात करावी.

QQ/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राहूल मोटे : अध्यक्ष महोदय, शासनाच्या माध्यमातून मंत्रालयातील काही सचिवांना उस्मानाबाद येथे पाठविण्यात आले होते. त्यावेळी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी त्यांना काही सूचना करावयाच्या असल्याबाबत विनंती केली असता त्यांनी कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद दिला नाही. उस्मानाबाद व यवतमाळ जिल्ह्यासाठी पॅकेज जाहीर करण्यात आले होते. परंतु त्याची आजपर्यंत अंमजबजावणी झालेली नसून पॅकेजच्यामाध्यमातून 1 रुपयाही खर्च करण्यात आला नाही.

अध्यक्ष महोदय, आमची मागणी होती की, आमच्या भागातील सर्वात महत्वाचे काम पाण्याचे असून त्याकरिता कृष्णा सिंचन प्रकल्पासाठी तरतूद करण्यात यावी. उस्मानाबाद जिल्ह्यासाठी जाहीर करण्यात आलेल्या पॅकेजच्या शासन निर्णयामध्ये प्रकल्पासाठी कोणतीही तरतूद करण्यात आली नाही. राज्याच्या अर्थसंकल्पातही या प्रकल्पासाठी तरतूद करण्यात आली नाही.

अध्यक्ष महोदय, मध्यंतरीच्या काळात पाटबंधारे मंत्री महोदयांनी उस्मानाबाद जिल्ह्यात बैठक आयोजित केली होती. सदरहू बैठकीची वेळ 3 वाजता होती व 2 वाजता आम्हाला बैठक रद्द झाल्याचे कळविण्यात आले. आम्हाला वाटले की, काही कारणानिमित्त बैठक रद्द करण्यात आली असेल. परंतु सायंकाळी 5 वाजता आम्हाला समजले की, मंत्री महोदयांनी आमदारांना न बोलवता भाजपच्या कार्यकर्त्यांना बोलावून बैठक घेतली. आम्हाला वाटले की, विरोधी पक्षाच्या आमदारांना डावलून भाजपच्या कार्यकर्त्यांसमवेत बैठक घेऊन मंत्री महोदय काही तरी मोठी घोषणा करतील. परंतु मंत्री महोदयांनी सदरहू बैठकीनंतर आजपर्यंत 1 रुपया देखील जिल्ह्यातील योजनेसाठी दिलेला नाही. त्यानंतर अधिवेशन सुरु असताना पालक मंत्र्यांच्या माध्यमातून बैठक आयोजित करण्यात आली होती परंतु ती बैठक देखील रद्द करण्यात आली. या सरकारचे नमेके काय सुरु आहे, हे आम्हाला समजून येत नाही.

अध्यक्ष महोदय, सध्या उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये दुष्काळ असल्याने जिल्ह्यातील अधिक्षक अभियंता यांना बैठक लावण्याबाबत आम्ही विनंती केली होती. परंतु ते आम्हाला मागील अडीच महिन्यापासून सांगत आहेत माझ्याकडे मुख्य अभियंता पदाचा अतिरिक्त पदभार आहे. ज्या भागात दुष्काळी परिस्थिती आहे, ज्या भागात त्या अधिकाऱ्याचा मुख्य चार्ज आहे तेथे संबंधित अधिकाऱ्याने लक्ष देणे गरजेचे आहे. औरंगाबाद येथे दोन मुख्य अभियंता उपलब्ध असून उस्मानाबाद येथील



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राहूल मोटे.....

अधिक्षक अभियंता यांच्यापेक्षा ते वरिष्ठ व अनुभवी आहेत. त्यांच्याकडे सदरहू पदाचा अतिरिक्त पदभार देण्याची आवश्यकता आहे. दुष्काळी भागातील अधिक्षक अभियंत्याकडे मुख्य अभियंता पदाचा अतिरिक्त पदभार दिल्यामुळे जिल्ह्याच्या कामासाठी अडचणी निर्माण होणार आहेत.

अध्यक्ष महोदय, आलेश्वर गावातील पुलाचे काम होत नसल्याने आलेश्वर या गावातील लोकांनी निवडणुकीवर बहिष्कार टाकून मतदान केले नाही. सदर गावातील पूलाच्या कामाचे टेंडर काढण्यात आले होते परंतु राज्यात हे सरकार स्थापन झाल्यानंतर पूलाच्या कामाचे टेंडर रद्द करण्यात आले. सदर टेंडर कशामुळे रद्द केले याबाबत मी बोलणार नाही. यापूर्वी जे झाले असेल ते झाले परंतु आता आलेश्वर येथील पुलाचे नवीन टेंडर काढून त्या ठिकाणच्या पूलाचे काम मार्गी लावण्यात यावे, अशी माझी तेथील जनतेच्यावतीने मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदार संघाच्या दृष्टीने कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प महत्वाचा आहे. जेऊर टनेलच्या माध्यमातून मराठवाड्यात पाणी येणार असून त्याकरिता निधीची आवश्यकता आहे. सदर प्रकल्प कृष्णा-भीमा स्थिरीकरणाला लिंकप केला आहे. कोकणातून मराठवाड्यातील उजनी धरणामध्ये पाणी येणार आणि त्यानंतर ते सिना-कोळेगाव प्रकल्पाला मिळणार आहे. भविष्यात हे पाणी मिळणे शक्य नसल्याने याप्रकरणी मी तात्पूरता मार्ग सांगतो की, उजनी धरणातील कर्नाटकमध्ये वाहून जाणारे पाणी आम्हाला देण्यात यावे. या प्रकल्पासाठी निधी दिला तर पुढील 1-2 वर्षामध्ये माझ्या मतदार संघाला पाणी उपलब्ध होऊ शकते. याकरिता 500 कोटी रुपयांच्या टनेलचे टेंडर झाले असून त्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात यावा, अशी माझी सदनाच्या माध्यमातून विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, आमदार आदर्श गाव योजनेसाठी मला महिनाभर अधिकाऱ्यांचे फोन येत होते. या योजनेकरिता मी एका गावाचे नाव दिले होते परंतु आजपर्यंत त्या गावास या योजनेंतर्गत 1 रुपयाचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला नाही. आमदार आदर्श गाव योजना फेल जाऊ नये याकरिता सरकारने या योजनेकरिता जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी माझी विनंती आहे. मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आभारी आहे. धन्यवाद !

----------------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.संजय धोटे (राजूरा) : अध्यक्ष महोदय, सन 2016-17 च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यावर बोलणसाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय वित्त मंत्री श्री.सुधीरभाऊ मुनगंटीवार यांनी कृषी सिंचन योजनेंतर्गत विविध प्रकल्पासाठी 2,078 कोटी रुपये निधीची तरतूद केली आहे. पूर्व विदर्भातील नक्षलग्रस्त जिल्ह्यातील 6,862 मालगुजारी तलावांच्या नुतनीकरणासाठी दिलेला निधी वरदान ठरणार आहे.

अध्यक्ष महोदय, सन 2016-17 च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यावरील चर्चेच्या निमित्ताने मी अजून काही मागण्या मांडू इच्छितो. चंद्रपूर जिल्ह्यातील क्षेत्रामध्ये वर्धा, इराई, झरपट व इतर छोट्या नद्या 30 ते 50 कि.मी. अंतर वाहतात. या नद्यांवर कोठेही बॅरेजेस नाही त्यामुळे या पाण्याचा उपयोग शेतकऱ्यांना सिंचनासाठी होत नाही. त्यामुळे सदरहू नद्यांवर बॅरेजेसकरिता व सिंचनाकरिता विशेष निधीची तरतूद करुन द्यावा व याप्रकरणी जलसिंचन विभागाने नोंद घ्यावी. बॅरेजेसमुळे हजारो हेक्टर सिंचन होऊ शकते. तसेच, या नदीतील पाणी 1-2 कि.मी. अंतरावरील गावातील तलावामध्ये टाकण्यात यावे. कारण गावातील तलावाचे पाट सर्व शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत गेले आहेत. याकरिता देखील निधीची तरतूद करण्यात यावी, अशी माझी नम्र विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, चंद्रपूर जिल्हा हा नक्षली विभाग आहे. या जिल्ह्यातील जीवती या डोंगरी व पहाडी भागातील तालुक्यातील रस्त्यांकरिता विशेष निधीची तरतूद करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, जीवती तालुक्यातील माराई पाटण व जंगू देवी हे आदिवासी लोकांचे ठिकाण आहे. या ठिकाणी दरवर्षी यात्रा भरते. या यात्रेच्या ठिकाणी पर्यटन केंद्र निर्माण केले तर हे स्थळ डोंगरी भागात व उंचावर असल्याने तेथे चांगले पर्यटन स्थळ निर्माण होईल. त्यामुळे याभागातील लोकांना रोजगार मिळेल.

अध्यक्ष महोदय, आमच्या भागातील झाडी बोली व झाडी पट्टीतील नाटके हा सांस्कृतिक कार्यक्रमाचा भाग आहे. हजारो लोक ही नाटके पाहतात. या नाटकांना विशेष अनुदान उपलब्ध करुन दिले तर या नाटकातून काम करणाऱ्या हजारो कलाकारांना रोजगाराचे साधन निर्माण होईल. या मुद्याची सांस्कृतिक विभागाने नोंद घेणे आवश्यक आहे. सांस्कृतिक गंडार व गोंडी नृत्य

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.संजय धोटे......

कला जवळपास बंद पडली आहे. परंतु हजारो आदिवासी कलाकार या सांस्कृतिक कलेच्या आधारावर जीवन जगत होते. हे कार्यक्रम चालविण्यासाठी व या भागातील लोकांच्या विकासाकरिता विशेष निधी व अनुदान उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. धन्यवाद !

-------------

....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.राहूल कुल (दौंड): अध्यक्ष महोदय, अध्यक्ष महोदय, सन 2016-17 च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांना पाठींबा देण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, जलसंपदा विभागासाठी यावर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये 500 कोटी रुपयांची तरतूद वाढविण्यात आली असली तरी ती अपुरी आहे. तसेच, जलसंपदा विभागाने 1 ते 2 वर्षा ऐवजी पुढील 5 वर्षाचा रोडमॅप तयार करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, जलसंपदा विभागामार्फत कोणती धरणे पूर्ण करण्यात आली, कोणती अपूर्ण आहेत याचा अभ्यास करुन कमी खर्चात जास्त पाणी कशा प्रकारे उपलब्ध होईल याचा विचार करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, मी सातत्याने सांगत आहे की, नवीन प्रकल्प उभे करणे दिवसेंदिवस कठीण होणार आहे. पुण्यासारख्या जिल्ह्यातील जमिनी प्रकल्पासाठी संपादीत करणे दिवसेंदिवस कठीण होणार आहे. त्यामुळे असलेल्या प्रकल्पांच्या दुरुस्तीकरिता निधी देण्याची व त्याकरिता वेगळा लेखाशिर्ष निर्माण करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, आपण सातत्याने शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या प्रश्नावर चर्चा करतो व त्यावर उत्तर शोधण्याचा प्रयत्न करीत असतो.

यानंतर RR-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड राहूल कूल.....

अध्यक्ष महोदय, माझी अशी सूचना आहे की, पुढील 5 वर्षामध्ये जलसंपदा विभाग आणि जलसंधारण विभागाला प्राधान्याने निधी देण्याची आवश्यकता आहे. त्या दृष्टीने आपण उत्तरामध्ये उल्लेख करावा. पुणे जिल्ह्यातील उपसा सिंचन योजनेच्या संदर्भात माननीय अर्थमंत्री महोदय पुण्याला आले असताना मी सूचना केली होती की, या योजनेवर हजारो कोटी रुपये खर्च केले. पण आपण त्या पावसाळ्यात वापरत नाही. त्यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा, अशा प्रकारची एक सूचना करतो. इतर दोन सूचना मी करतो की, डीपीडीसीच्या माध्यमातून आपण कामकाज करीत असताना मधल्या काळात न्यायालयाच्या निर्णयामुळे आमदारांचे अधिकार मर्यादित करण्यात आले आहेत. डीपीडीसी कायद्यामध्ये आमदारांच्या अधिकारांचे महत्व रहावे म्हणून त्या कायद्यामध्ये बदल करावा, अशी सूचना करतो. शेवटची सूचना अशी आहे की, माननीय जलसंपदा मंत्र्यांनी सातत्याने सभागृहामध्ये आश्वासन दिलेले आहे की, पुणे शहराच्या आणि जिल्ह्याच्या दृष्टीने महत्वाच्या खडकवासला प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करुन देण्यासाठी सकारात्मक उत्तर दिलेले आहे, त्याची अंमलबजावणी व्हावी, अशा प्रकारची सूचना करतो. पुणे शहराला भामास्खेडचे धरण आणि खडकवासला धरणाचे पाणी उपलब्ध केलेले आहे. आपण उत्तर जरी दिले असले तरी तोच न्याय खासगी असलेल्या मुळशी धरणाला लावावा आणि मुळशी धरणाचे पाणी पुणे शहरासाठी उपलब्ध करावे. जसे शेतीसाठी वळविले आहे तसे भविष्यात मुळशी धरणाचे पाणी पुणे शहरासाठी वळविण्यात यावे अशी सूचना करुन माझे दोन शब्द संपवितो.

**तालिका सभाध्यक्ष** : सर्व सन्माननीय सदस्यांना माझी पुन्हा एकदा विनंती आहे की, मी सर्वांना संधी देतो, पण त्यांनी भाषण न करता फक्त सूचना कराव्यात.

श्री. सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) : अध्यक्ष महोदय, सन 2016-17 वर्षाच्या अर्थसंकल्पिय अनुदानाच्या मागण्यांमध्ये वित्त, जलसंपदा, अन्न व नागरी पुरवठा, नियोजन, पर्यटन व सांस्कृतिक कार्य या विभागांच्या मागण्यांना पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. वित्त विभागाच्या मागण्यांच्या अनुषंगाने मी अर्थमंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छितो की, आपण अर्थसंकल्पाच्या भाग दोन मध्ये काही विषयांच्या करांच्या बाबतीत सवलती दिल्या आणि काहीच्या करामध्ये वाढ केली आहे. यामध्ये सोलापूरी चादर यावर 31 मार्च 2016 पर्यंत सूट होती ती सूट 31 मार्च 2017 पर्यंत

2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुरेश हाळवणकर.....

लागू करीत आपण टेरीटॉवेलवर टॅक्स लावला आहे. त्यामुळे संदिग्धता निर्माण झाली असून टॉवेलसाठी प्रसिध्द असलेल्या सोलापूर शहरामधील उद्योग आता अडचणीत आला आहे. माननीय वित्तमंत्र्यांना माझी विनंती आहे की, यामध्ये आपण लक्ष घालावे. साईजिंग वॉरपिंग उद्योगाला आपण करमाफी घोषित केली आहे. पण ही कर वसुली केव्हाच केली नव्हती. ती पूर्वलक्षी प्रभावाने जर वसूल केली तर भिवंडी, मालेगांव, सोलापूर या सेंटरमध्ये लाखो रूपयांच्या ज्या नोटीसा आल्या आहेत, त्या मागे घेता येतील, अशी मागणी मी आपल्याला करतो. आमदारांच्या स्थानिक विकास निधीच्या बाबतीत मी अर्थमंत्र्यांचे अभिनंदन करेन की, आपण सर्वच आमदारांना त्यांच्या सूचना विचारलेल्या आहेत. त्या संदर्भात आम्ही सर्व लेखी सूचना आपल्याला दिलेल्या आहेत. यासंबंधी प्रामुख्याने जी मागणी आहे ती म्हणजे बरेच ठिकाणी पेव्हींग ब्लॉक्सची मागणी असते. कारण रस्त्यांच्या बाजूला आपण पेव्हींग ब्लॉक देतो. कारण रस्त्यांच्या वाड्या वस्त्यांच्या गल्ल्यांमध्ये कॉंक्रीटचे रस्ते खूप लवकर खराब होतात. पेव्हींग ब्लॉक केले तर ते सुंदरही दिसतात. त्यामुळे ते आमदार निधीमधून करण्यासाठी आपण परवानगी द्यावी. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीमध्ये वाय-फाय कनेक्टिव्हीटी सुविधा पाहिजे असेल तर कॉलेज आणि लायब्ररी आवारामध्ये असण्यासाठी विद्यार्थ्यांची खूप मागणी असते. ती आमदार निधीमधून देण्यासाठी अनुज्ञेय करावी. सुमारे 10-12 लाख रूपयांचा निधी यासाठी लागू शकेल. परवानगी मिळाल्यास मॉडेल म्हणून मी माझ्या मतदार संघात करु इच्छितो सर्वात महत्वाचे असे मी मालकीच्या जागेवर हॉल बांधले तर लोकसंख्येच्या आधारावर अनुज्ञेय ही अट जी आहे ती काढून टाकण्यात यावी. अनेक लोकांची मागणी येते, त्यानुसार आपण काम करावे. या ठिकाणी सन्माननीय जलसंपदा मंत्री आहेत. मी त्यांचे लक्ष वेधू इच्छितो की, इचलकरंजी शहरामध्ये 9 किलोमिटरचा काळा ओढा आहे. याचे 12 एमएलडी पाणी पंचगंगा नदीमध्ये जाते. या पाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी आपण जलसंपदा विभागाकडे एक प्रस्ताव इचलकरंजी नगरपालिकेने सादर केलेला आहे. यासाठी 50 टक्के दरामध्ये आपण मशिनरी दिली तर हा प्रश्न सुटू शकेल. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये चिखोत्रा खोऱ्यांतर्गत जे इस्त्रायलचे मॉडेल आहे त्या बाबतीत आपण समन्यायी वाटपाचा निर्णय केला आहे. त्यासंबंधी मंत्री महोदयांनी

3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुरेश हाळवणकर.....

लवकरात लवकर मिटींग घेऊन ते काम आपण लवकरात लवकर मार्गी लावावे. आणखी एका सूचनेद्वारे मी अन्न व नागरी पुरवठा मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देतो की, इचलकरंजी शहराची 1972 च्या आधारावर लोकसंख्या गृहित धरुन त्या ठिकाणी 500 मेट्रिक टनचे गोडाऊन तयार केले होते, ते आता विचार करता 3 हजार मेट्रिक टनचे करावे. तसेच एक पुरवठा कार्यालय निर्माण करण्याच्या प्रस्तावास मंजूरी द्यावी.

श्री. गिरीश बापट : अध्यक्ष महोदय, आज आपण सभागृहाची बैठक 6.00 वाजता मंत्र्यांच्या उत्तरासह थांबविणार होतो. त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांची सूचना केल्यानुसार विरोधी पक्षाचा नियम 293 चा प्रस्ताव फक्त मांडून ऑनलेग ठेवावा. कारण सर्वांना जायचे आहे. त्यामुळे जे मुद्दे आहेत, ते 5-6, 5-6 मिनिटांमध्ये सन्माननीय सदस्यांनी मांडण्यासाठी आपण सूचना द्याव्यात, अशी माझी विनंती आहे.

श्री. सुरेश हाळवणकर : अध्यक्ष महोदय, या ठिकाणी पर्यटन राज्यमंत्री यांचे नावच राम आहे. त्यामुळे त्यांनी रामलिंगच्या पर्यटनासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी विनंती करतो.

--------

4.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) : अध्यक्ष महोदय, वित्त विभाग, नियोजन विभाग आणि जलसंपदा विभागाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. मी फक्त सूचना करणार आहे. आदरणीय वित्तमंत्री महोदय, जिल्हा वार्षिक योजना तयार करीत असताना आणि राज्याचा निधी जिल्हावार वाटप करीत असताना मनुष्यबळ विकास निर्देशांक, लोकसंख्या आणि त्या जिल्ह्याचे क्षेत्रफळ या तीन प्रमुख बाबींचा विचार करीत असतो. परंतु जिल्ह्यामधून मतदार संघनिहाय निधीचे वाटप होत असताना रस्ते, तिर्थक्षेत्र, लेखाशीर्ष 3054, लेखाशीर्ष 5054, पूर नियंत्रण संरक्षण हे विविध लेखाशीर्ष यामधून तालुकानिहाय किंवा मतदार संघनिहाय करताना पालकमंत्री त्याचे वाटप करताना सत्ताधारी पक्षाकडे झुकते माप देतात. विरोधी पक्षाच्या आमदारांकडे तेवढे झुकते माप नसते. परंतु ज्या अर्थी पुणे जिल्ह्याचा या वर्षीचा जिल्हा वार्षिक योजनेचा आराखडा 450 कोटी रुपयांचा आहे. अमरावती जिल्ह्याचा फक्त 200 कोटी रुपयांचा आहे. याला जे निकष आपण लावतो, तेच तत्व आपण मतदार संघनिहाय लावली तर थोडेसे इकडे तिकडे होईल, परंतु दिनांक 17 डिसेंबर 1014 रोजीचा शासन निर्णय असताना तो विचारात न घेता सरसकट विरोधी पक्षाच्या आमदारांची कत्तल होऊन पालकमंत्री सातत्याने विरोधी पक्षाच्या आमदारांवर अन्याय करतात. यामधून कोर्ट केसेस उद्‌भवू शकतात, म्हणून वित्तमंत्री महोदयांनी सूचना दिल्या पाहिजेत. या संदर्भात अधिक सुस्पष्टता आणली तर बरे होईल. ज्या आधारावर जिल्हा वार्षिक योजना तयार होते, त्याच आधारावर मतदार संघनिहाय आणि तालुकानिहाय निधीचे वाटप केले तर मी आपला आभारी होईल एवढी मी सूचना करतो.

अध्यक्ष महोदय, कोल्हापूरच्या शिवसेनेच्या सन्माननीय सदस्यांनी आता या ठिकाणी मुद्दा उपस्थित करुन तालुकानिहाय निधीचे वाटप करण्याबाबत मागणी केलेली आहे. आदरणीय वित्तमंत्री आणि आदरणीय जलसंपदा मंत्री महोदयांना मी विनंती करताना सांगतो की, घटनेमध्ये नमूद असल्याप्रमाणे विदर्भ जेव्हा संयुक्त महाराष्ट्रात सामिल झाला त्यावेळी या राज्याचे तीनच प्रदेश निश्चित केले होते आणि ते म्हणजे विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र. संयुक्त महाराष्ट्रामध्ये सामिल झाल्यानंतर विदर्भातील 11 जिल्ह्यांचा अनुशेष अद्यापपर्यंत राज्याच्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सरासरीपर्यंत आलेला नाही. सन्माननीय सदस्य डॉ. अनिल बोंडेजी आपण माझ्या या मताशी सहमत आहात. जोपर्यंत विदर्भातील संपूर्ण जिल्हे राज्याच्या सरासरीपर्यंत येत नाहीत तोपर्यंत

5...



प्रा. विरेंद्र जगताप.....

तालुक्यांचा अनुशेष काढण्याचा मुद्दाच उपस्थित होत नाही. त्यामुळे केळकर समितीच्या अहवालावर विदर्भातील संपूर्ण आमदारांनी कडाडून विरोध केला आहे. त्यामुळे जिल्ह्यांचा अनुशेष आधी दूर करा आणि त्यानंतर तालुक्यांवर यावे, अशी मी जलसंपदा मंत्री महोदयांना विनंती करतो. माननीय राज्यपाल महोदयांच्या निर्देशांचे आपण तंतोतंत पालन केले तर दुष्काळी विदर्भ आणि मराठवाड्याला निश्चितपणे न्याय मिळणार आहे. विदर्भ आणि मराठवाड्याच्या संदर्भातील माननीय राज्यपाल महोदयांच्या निर्देशांची अंमलबजावणी होते की नाही हे पाहण्याची जबाबदारी मुख्य सचिवांची आहे, विभागीय आयुक्तांची आहे.

----------

SS-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी. :** बक्षीस पत्रावर देय नोंदणी फी

**मु.शी. :** बक्षीस पत्रावर देय नोंदणी फी संबंधी माननीय महसूल मंत्र्यांचे निवेदन

श्री.एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभा नियम 47 अन्वये पुढील निवेदन करतो :-

( प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे. )

............



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, या निवेदनाच्या अनुषंगाने मला असे सांगावयाचे आहे की, वडिलांची प्रॉपर्टी वारसाहक्काने मुलाच्या किंवा मुलीच्या नावावर होऊ शकते. पण भावाची भावाच्या नावावर होऊ शकत नाही. कारण भावाची जर स्वकष्टाची प्रॉपर्टी असेल तर ती नाही करता येणार. पण वडिलांची स्वकष्टाची प्रॉपर्टी आहे ती मुलाच्या, मुलीच्या, नातवाच्या नावावर आपोआपच करण्यात येते हे आधी होते. त्याला स्टँप माफ करण्यात आलेला आहे आणि रजिस्ट्रेशन फी 30 हजार रूपयांपर्यंत होती ती आता उद्यापासून 200 रूपयांवर आणलेली आहे.

...........

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी. :** वार्षिक बाजार मुल्य दर तक्ते सन 2016-2017 बाबत

**मु.शी. :** वार्षिक बाजार मुल्य दर तक्ते सन 2016-2017 संबंधी माननीय महसूल मंत्र्यांचे निवेदन

श्री.एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 47 अन्वये पुढील निवेदन करतो :-

( प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे. )

............

..4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, या निवेदनाच्या अनुषंगाने मी हे सांगू इच्छितो की, सन 2010 ला सरासरी वाढ 14 टक्के होती, सन 2011 ला 18 टक्के झाली, सन 2013 ला 27 टक्के झाली, सन 2014 ला 22 टक्के झाली. ही 22 टक्क्यांची वाढ जास्त झाल्याने अतिशय घातक आहे. दरवर्षी 22 ते 27 टक्के वाढ होत असल्याने रेडी रेकनर दर वाढले. जमिनीच्या किमती वाढल्या. प्रत्यक्ष जमिनीच्या किमती कमी राहायच्या आणि रेडी रेकनरच्या जास्त राहायच्या अशा स्वरुपाची तक्रार सर्व क्षेत्रातून वारंवार येत होती. त्यातल्या त्यात ग्रामीण क्षेत्रामध्ये अशा स्वरुपाच्या तक्रारी होत्या. शहरी भागामध्ये कधी चढ उतार होत होता. तरीही शहरी भागात 27 टक्के ही वाढ फार मोठ्या प्रमाणात होत होती. आता याचा सर्वंकष विचार करुन मागील 5-6 वर्षातील रेडी रेकनरचा दर आहे त्यात बरीच वाढ झालेली आहे. त्यात आणखी वाढ होऊ नये म्हणून यावर्षी शासन स्तरावर स्थावर व्यवसाय क्षेत्रात असलेली मंदी लक्षात घेऊन लोकप्रतिनिधींनी वारंवार मागणी केली. शहरी भागातील प्रामुख्याने मुंबई, पुणे, नाशिक हा जो कॅरीडोअर आहे यांच्यामधील जमिनीचे जे दर आहेत. यासंदर्भात फार मोठ्या प्रमाणात तक्रारी होत्या. या सर्व तक्रारींच्या संदर्भात राज्य सरकारने चौकशी केली आणि यातून आता नोंदविलेले खरेदी विक्री व्यवहार, स्थानिक चौकशी, राज्यातील दुष्काळी परिस्थिती इत्यादीचा विचार करुन मागील 5-6 वर्षाच्या तुलनेत चालू वर्षी सरासरी माफक वाढ करण्याचे राज्य सरकारने ठरविलेले आहे. दिनांक 1 एप्रिल, 2016 पासून ही महाराष्ट्र राज्यात लागू होईल.

...........

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सरदार तारा सिंह (मुलुंड) : अध्यक्ष महोदय, सन 2016-17 की अनुदानों की मांगों पर बोलने के लिए मैं खड़ा हुआ हूं.

अध्यक्ष महोदय, मैं तीन मुद्दे यहाँ पर उपस्थित करना चाहता हूं. बांद्रा में एक प्रशासकीय इमारत है. मुलुंड से लेकर तो चेम्बूर तक 20 लाख लोग रहते है. यहाँ पर कोई प्रशासकीय इमारत नहीं है. वित्त मंत्री जी से मेरा निवेदन है कि मुलुंड में प्रशासकीय इमारत बनाने के लिए जो निधी लगती है वह दी जानी चाहिए.

अध्यक्ष महोदय, मुलुंड में क्रीडा संकुल बनाने के लिए मैंने 15 लाख रूपये दिए है. मेरा कहना है कि यहाँ पर क्रीडा संकुल शुरु होने के लिए सरकार ने निधी देनी चाहिए.

अध्यक्ष महोदय, नांदेड में गुरुद्वारा है. वहाँ पर 64 करोड़ रूपये दिए गए थे. यह रकम नांदेड के विकास के लिए दी गई थी. यह रकम गुरुद्वारा के लिए नहीं दी गई थी. आप इस विषय पर ध्यान दीजिए. नांदेड के 64 करोड़ रूपये सरकार मांगती है, यह पैसा दिल्ली सरकार ने और आपने दिए है. यह पैसा आप माफ कर कीजिए ऐसी मेरी विनती है. इतना कह कर मैं अपना भाषण पूरा करता हूं, धन्यवाद.

-----------

...6/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शंभूराज देसाई (पाटण) : अध्यक्ष महोदय, वित्त, जलसंपदा, अन्न व नागरी पुरवठा, नियोजन, पर्यटन आणि संसदीय कार्य विभागाच्या अनुदानातील मागण्यांवर विचार मांडण्यासाठी आपल्या अनुमतीने मी उभा आहे. माननीय वित्त मंत्र्यांना माझी विनंती आहे की, सर्व सन्माननीय सदस्यांनी सांगितले त्याप्रमाणे आमदार निधीमध्ये वाढ करण्यात यावी. विशेषत: 100 टक्के डोंगरी तालुके आहेत. या डोंगरी तालुक्यांना दळणवळण, पिण्याच्या पाण्यासाठी अतिशय तुटपूंजा निधी मिळतो. अशा डोंगरी विकास निधीमध्ये 5 कोटी रुपये वाढ करण्यात यावी. जलसंपदा विभागाच्या मागण्यांवर मला बोलायचे आहे. जलसंपदा मंत्री महोदय सुध्दा सभागृहामध्ये उपस्थित आहेत. माझ्या मतदारसंघातील तारळी धरणातील पाण्याचा विषय आहे. तारळी धरणातील पाणी एक्सप्रेस कॅनॉलने माळा मतदारसंघामध्ये जाते. पूर्वीच्या विभागाने केलेले नियोजन चुकीचे झालेले आहे. ज्या परिसरात धरण आहे, ज्या परिसरातील जमिनी पुनर्वसनामध्ये गेलेल्या आहेत तेथील 75 टक्के क्षेत्र जिरायती आहे आणि या धरणातील पाणी बाहेर जात आहे. आपले सहकारी राज्यमंत्री हे आमच्या जिल्ह्याचे पालक मंत्री आहेत त्यांना मी त्याठिकाणी नेले होते. त्यांनी आश्वासन दिले की, सहा महिन्याच्या आत शासन या प्रस्तावाला मान्यता देईल. आता वर्ष होऊन गेलेले आहे अजून प्रस्तावाच याठिकाणी आलेला नाही. माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, त्यांनी या कामामध्ये लक्ष घालावे. जर आमचे पाणी माळा मतदारसंघामध्ये जात असेल तर पाण्यासाठी सुध्दा मोठा संघर्ष होणार आहे. हे पाणी तर आम्ही जाऊ देणारच नाही. त्यामुळे या पाण्याचे नियोजन शासनाने याठिकाणी करावे.

TT-1.........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शंभुराज देसाई ........

विशेषतः 100 टक्के डोंगरी तालुके आहेत. त्या डोंगरी तालुक्यांत दळणवळणाची अतिशय गैर सोय होते. पिण्याच्या पाण्याच्या योजनांना अतिशय तुटपुंजा निधी मिळतो, जे 100 टक्के डोंगरी तालुके आहेत. त्यांच्या डोंगरी विकास निधीमध्ये 5 कोटी प्रमाणे माननीय वित्त मंत्र्यांनी वाढ करावी. आमचे नशिब चांगले आहे की, मी बोलत असताना माननीय वित्त व जलसंपदा मंत्री महोदय सभागृहामध्ये आले आहेत. मी त्यांची वाट बघत होतो. ते कधी समोर येतात आणि त्यांच्या समोर मला कधी बोलायला मिळते.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदार संघातील तारळी धरणाच्या पाण्याचा विषय आहे. हे तारळी धरणातील पाणी एक्सप्रेस कॅनॉलने माढा मतदार संघामध्ये जाते. पूर्वीच्या विभागाने जे नियोजन केले ते चुकीचे झाले आहे. त्या त्या परिसरात धरण आहे, ज्या परिसरातील जमिनी पुनर्वसनाला गेल्या आहेत. तिथले 75 क्षेत्र जिराईत राहते. त्या धरणातील पाणी बाहेर जाते. माननीय राज्यमंत्री आमच्या जिल्हयाचे पालकमंत्री आहेत. त्यांना मी त्या ठिकाणी नेले होते. त्यांना ते सर्व दाखविले आहे. त्यांनी तेथे आश्वासन दिले आहे की, सहा महिन्याच्या आत शासन या प्रस्तावाला मान्यता देईल. आता या गोष्टीला एक वर्ष होऊ गेले. अद्याप प्रस्ताव आलेला नाही. मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, या कामामध्ये लक्ष घालावे, कारण आमचे पाणी माढा मतदार संघामध्ये जात असेल तर पाण्यासाठी मोठा संघर्ष होणार आहे. त्यामुळे हे पाणी आम्हाला मिळाल्याशिवाय जाऊ देणार नाही. त्याचे नियोजन आपण करावे. एक अत्यंत महत्वाची बाब मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणतो आहे. या प्रकल्पाच्या दोन इरिगेशनच्या योजना पूर्वीच्या सरकारने पूर्ण केल्या. स्व.आर.आर. पाटील आणि त्यावेळेचे जलसंपदा मंत्री श्री.शशिकांत शिंदे यांनी माननीय श्री.रामराजे नाईक-निंबाळकर यांनी उद्‌घाटन केले. त्याला दोन वर्षे झाली. अद्याप एक थेंब त्या योजनेच्या पाण्याचा निघालेला नाही. माझी आपल्याकडे विनंती आहे की, एवढी निकृष्ट दर्जाची कामे एक थेंब सुध्दा पाणी निघाले नाही. 40 कोटी रुपये त्या दोन योजनांवर खर्च झाला. ते पूर्ण पैसे वाया गेलेले आहेत. आपण त्याची चौकशी करावी. उत्तरमान प्रकल्पामध्ये पश्चिम क्षेत्रात धरणामध्ये पाणी भरपूर

.....2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शंभुराज देसाई ......

आहे. पण पश्चिमेच्या क्षेत्राला पाणी देण्याचे नियोजन झालेले नाही. त्याचे नियोजन करावे. मोरणा गोरेकर धरणातल्या पाण्याचा कॅनॉल जो जातो आहे. त्या कॅनॉलचे डिझाईन चुकीचे झाले आहे. जेथून बागायत जमिनी सुरु होतात. त्या बागायती जमीनीमधून कॅनॉल न्यायचे डिझाईन केलेले आहे. आपण त्याचे फेर सर्व्हेक्शनाचे आदेश त्या विभागाला दिलेले आहेत. ते फेर सर्व्हेक्शन मागवून कॅनॉलच्या ऐवजी के.टी. बंधाऱ्यातून पाणी उचलून देण्यास खर्च तेवढयाच रक्कमेमध्ये होणार आहे. त्यासाठी जास्त रक्कम लागणार नाही. कॅनॉलच्या ऐवजी फक्त के.टी. बंधाऱ्यातून पाणी उचलून देण्याचे नियोजन मोरणा गोरेकर प्रकल्पाचे करावे.

अध्यक्ष महोदय, न्युकने धरणाचा गेल्या अधिवेशनामध्ये प्रश्न उपस्थित झाला होता, राज्यमंत्री महोदयांनी उत्तर दिले. तो प्रश्न गाजला. त्याची बातमी वर्तमान पत्रात आली की, शिवसेनाच्या आमदाराचा घरचा आहेर पक्षाला. प्रश्नाला उत्तर देताना राज्यमंत्री महोदयांनी सांगितले होते की, या कामामध्ये अनियमितता झालेली आहे. या धरणाचे साडेसात कोटी रुपयाचे काम सुरु झाले. आता पाहिले तर 48 कोटी रुपये खर्च त्या जमिनीला एक इंच पाणी मिळत नाही. पूर्ण निकृष्ट काम झालेले नाही. त्यामुळे न्युकने धरणाची चौकशी करावी. धरण लवकर पूर्ण करावे.

अध्यक्ष महोदय, पुरनियंत्रण हेडमधून कोयना नदीकाटच्या गावांना संरक्षक भिंती बांधण्याचा प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना मंत्री महोदयांनी त्या अधिका-यांना दिल्या होत्या. याप्रमाणे सांगली, कोल्हापूर जिल्हयातील कामांना आघाडी सरकारमधून पुर नियंत्रण हेडमधून संरक्षक भिती बांधण्याचे काम घेतले गेले. आपले स्पष्ट आदेश होते. या पूरनियंत्रण हेडमधून निधी उपलब्ध करुन द्यावा. एक अधिकारी आपल्या विभागातला आहे. त्या अधिका-याने सांगितले की, 10 टक्के लोकवर्गनी भरा असे संगितले. पूरनियंत्रण करण्याची जबाबदारी सरकारची आहे. सांगली, कोल्हापूर जिल्हयामध्ये 100 टक्के सरकारी खर्चाने पुरनियंत्रणाची कामे झाली. 92 सालचा जी.आर. अधिका-याने काढला आणि 10 टक्के लोकवर्गनी भरावी लागेल असे सांगितले आहे. याबाबत आपण आदेश दिलेले आहेत की, पुरनियंत्रण हेडमधून या कामाला बजेटची तरतूद करावी, त्याही कामाची पूर्तता करावी.

.....3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शंभुराज देसाई.......

अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री श्री.गिरीश बापट या ठिकाणी आहेत. त्यांनी नवीन शिस्त यासर्व कार्यप्रणालीमध्ये आणली. ग्रामीण भागात धान्य पुरवठा करताना पारदर्शका होते आहे. परंतु मंत्री महोदय आपल्याला विनंती आहे की, गॅस सिलेंडर ज्याच्या घरामध्ये आहे. त्याला रॉकेल द्यायचे नाही हा आपला निर्णय आहे. शहरी भागापर्यंत आम्हाला तो मान्य आहे. माझा मतदार संघ डोंगरातला, ग्रामीण आहे. तेथे ब-याच वेळा लाईट नसते, संध्याकाळच्या वेळी गॅस बत्त्या किंवा रॉकेलचे दिवे लावावे लागतात. किमान डोंगरी भागातल्या कुटुंबाना किमान एका माणासाला एक लिटर रॉकेल द्यावे.

अध्यक्ष महोदय, माझा शेवटचा मुद्दा आहे, घालवी, वाकली आणि बेरवणच्या धान्य दुकानांच्या तक्रारी पुरवठा विभागाकडे प्रलंबित आहेत. त्या धान्य दुकानांची चौकशी करावी. लोकांना योग्य धान्य मिळेल याची दक्षता घ्यावी. धन्यवाद.

.......

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दत्तात्र्यय भरणे ( इंदापूर ) : अध्यक्ष महोदय, माननीय पर्यटन राज्यमंत्री येथे उपस्थित आहेत. आपल्या सर्वांना माहिती आहे की, मी इंदापूर तालुक्याचे प्रतिनिधीत्व करतो, त्या तालुक्यामध्ये उपजनी बॅक वॉटरचा फुगवटा, गंगावळण, कुंभार गाव ही दोन गावे येतात. या गावामध्ये सर्वांना माहिती आहे की, येथे एक जागृत देवस्थान आहे. गावाच्या ठिकाणी बारामाही परदेशी पक्षी, पक्षी प्रेमी, राज्यातून मोठया प्रमाणात भाविक व पर्यटक येत असतात, परदेशी फेमिंगो सारखे पक्षी त्या ठिकाणी पाहण्यास मिळतात. माझी आपल्या माध्यमातून मंत्री महोदयांना विनंती आहे की, आपण या दोन गावांचा समावेश पर्यटन विभागामध्ये करावा. हा एक आराखडा तयार करावा. त्याचप्रमाणे माझा दुसरा जलसंपदा विभागाबाबत प्रश्न आहे. माझ्या तालुक्यामध्ये वीर धरणातून कॅनॉल जातो. त्याला फार मोठया प्रमाणात गळती होत आहे. त्याची दुरूस्ती होणे गरजेचे आहे. त्यामुळे ती दुरूस्ती करावी, माननीय श्री.सुधीर मुनगंटीवार येथे उपस्थित आहेत. आमदार फंडाचे वाटपासंदर्भात आमदारांना स्वातंत्र्य असावे, एक हजार लोकसंख्येला एक सभागृह ही जी आपली अट आहे. ती शिथिल करावी. अशी मी आपल्या मार्फत मंत्री महोदयांना विनंती करतो.

........

......5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शिवाजीराव नाईक ( शिराळा ) : अध्यक्ष महोदय, सन 2016-17 च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे. मी फक्त मुद्दे मांडणार आहे. माझ्या मतदार संघामध्ये जलसंपदा विभागाच्या माध्यमातून अतिशय आग्रहाची मागणी आहे. माझा पूर्णपणे डोंगरी तालुका आहे. शिराळा हा एकदम डोंगरी तालुका सह्याद्रीच्या कुशीमध्ये वसलेला तालुका आहे. त्यामध्ये वारणा प्रकल्प वारणा नदीवर मोठे धरण झालेले आहे. 34 टी.एम.सी पाणी धरणामध्ये साठवले जाते. परंतु या पाण्याचा उपयोग माझ्या शिराळा विधानसभा मतदार संघासाठी आणि तालुक्यासाठी फारसा होत नाही. नदीकाटापासून अतिशय उंचवटयावर असणारा मोठा भूभाग आहे. त्याला मात्र पाणी मिळत नाही. कॅनॉल जातो तो नदीच्या तीरावरुन जवळून जातो. त्यामुळे वरच्या बाजूच्या क्षेत्राला पाणी देण्यासाठी युतीच्या काळामध्ये खास बाब म्हणून 78 हजार एकराला पाणी देणारी वाकुर्डे उपसा जलसिंचन योजना चालू झाली. त्या योजनेचे भूमीपूजन त्यावेळचे उपमुख्यमंत्री श्री.गोपीनाथ मुंडे आणि माननीय श्री.एकनाथराव खडसे साहेबांनी केले. आता त्याचा पहिला टप्पा पुर्ण झालेला आहे. 10 हजार एकराला पाणी मिळते आहे. परंतु उर्वरित भागाला पैसे मिळत नाहीत म्हणून आज आमची योजना रेंगाळलेली आहे. भाग 1 आणि भाग 2 मध्ये विभागलेली आहे. भाग 1 साठी माननीय श्री.महाजन यांना आग्रहाची विनंती करेन की, त्यांनी मला माझ्या मतदार संघामध्ये या अधिवेशनानंतर सत्वर येते असे आश्वासन दिलेले आहे. माझी त्यांना विनंती आहे की, त्यासाठी लागणारा आवश्यक तो निधी उपलब्ध करुन द्यावा. दुसरी महत्वाची गोष्ट माझ्या मतदार संघासाठी आहे. चांदोली हे मोठे पर्यटन क्षेत्र आहे. अभयारण्य, व्याघ्र प्रकल्प, जलाशय, मोठी धरणे, धबधबे आहेत. त्या ठिकाणी पैठणच्या धरतीवर एक अत्यंत चांगले उद्यान तयार करण्याचा त्या ठिकाणी वाव आहे. पर्यटन मंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांना मी विनंती करेन की, चांदोली पर्यटन केंद्राच्या संदर्भात खास बैठक घ्यावी व निरनिराळया विभागांना पाटबंधारे विभागासह सगळयांची एकत्रित बैठक घेऊन हा प्रकल्प मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी या ठिकाणी विनंती करतो.

........

UU-1.........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री अबु आजमी (मानखुर्द-शिवाजीनगर) : अध्यक्ष महोदय, मैं सन 2016-17 की अनुदानों की मांगों पर बोलने के लिए खड़ा हुआ हूं.

अध्यक्ष महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभाग के बारे में कहना चाहता हूं कि मानखुर्द-शिवाजीनगर में ई-44 शिधावाटप कार्यालय में कर्मचारियों की कमी है. केवल 30 प्रतिशत ही कर्मचारी वहाँ है. यह गरीब इलाका है, स्लम का एरिया है. यहाँ ज्यादा राशन कार्ड की जरूरत पड़ती है. राशन कार्ड में नाम दर्ज करना, नाम निकालना, अन्य कामों में कई महीने लगते है, इस बारे में जल्द से जल्द कार्यवाही की जानी चाहिए. जो खराब गेहूँ था उसको वहाँ से उठवा लिया है. लेकिन फिर से गेहूँ, चावल, दाल वहाँ पर बहुत खराब क्वॉलिटी का आ रहा है. इस ओर ध्यान दिया जाए.

अध्यक्ष महोदय, पूना के खड़की के राशन के मालिक श्री रामकुमार अग्रवाल के खिलाफ बहुत शिकायतें आयी है. दुकान नंबर एफ-32 है. ये ब्लॅकमार्केटींग का काम करते है, ये और इनके भाई श्री बाबुभय्या अग्रवाल, दुकान नंबर एफ-49, इन लोगों ने एपीएल और बीपीएल का राशन कार्ड बनवाकर, बीपीएल का कार्ड खुद अपने पास रख लिया है. वे पूरा राशन लेकर ब्लैक कर रहे है.इन पर बहुत सारे केसेस भी हुए है. लेकिन वहाँ पर कर्मचारियों की मिलीभगत से आज भी काम चालू है. इस ओर ध्यान दिया जाना चाहिए.

अध्यक्ष महोदय, पर्यटन विभाग के बारे में कहना चाहूंगा कि 280 करोड़ 44 लाख 99 हजार रुपये की रकम बतायी गई है. ये रकम 6 तीर्थस्थलों पर खर्च हो गई है. मायनॉरिटी का जो टूरिजम है, हाजीअली, मगदूम बाबा की दरगाह ऐसे बहुत सारे मुकाम है, इनको एक रुपया भी नहीं दिया गया है. इस ओर ध्यान दिया जाए. इतना कह कर मैं अपना भाषण पूरा करता हूं, धन्यवाद.

------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दीपक चव्हाण (फलटण) : अध्यक्ष महोदय, 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे. मागील सरकारच्या काळात माननीय राज्यपालांच्या निदेशाप्रमाणे जलसंपदा विभागात 2000 पासून राज्यामध्ये समतोल विकासाचे काम सुरु होते. परंतु युती सरकार आल्यानंतर निर्णय घेतला आहे की, ज्या प्रकल्पाची कामे 15 टक्क्यापर्यंत झालेली आहेत, ती सर्व कामे थांबवावीत. कारण 70 टक्क्याच्या पुढील काम झालेले प्रकल्प पूर्ण करायचे ठरले आहे. हा निर्णय व नियोजन चांगले आहे. परंतु परिस्थिती काही बदलत नाही. आमच्या प्रकल्पाची 70 टक्के कामे झालेली आहेत ते पूर्ण करण्याकरिता एक दीड वर्षापासून निधी पाहिजे तेवढा मिळत नाही. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रातील प्रकल्प अपूर्ण आहेत. 1996 मध्ये युती सरकार असताना कृष्णा खोरे महामंडळाकडून काही प्रकल्प सुरु केले होते पण अजूनही ते प्रकल्प अपूर्ण आहेत. म्हणून या प्रकल्पाला भरीव निधीची तरतूद होणे आवश्यक आहे. तरच ते प्रकल्प पूर्ण होऊ शकतील.

अध्यक्ष महोदय, सातारा जिल्हयातील याबाबतचे उदाहरण सांगतो. आमच्या भागातील डोमलगाव प्रकल्पाकरिता आघाडी सरकारच्या काळात श्री.शरद पवार साहेब, श्री.अजित पवार व माननीय सभापती श्री.रामराजे नाईक-निंबाळकर यांच्या प्रयत्नामुळे भरीव निधी मिळाला असून बऱ्यापैकी काम पूर्ण झालेले आहे. पण अजूनही 122 किलोमीटरपासून पुढे 50 किलोमीटर अपूर्ण असलेली कामे पूर्ण होण्यासाठी 150 कोटीची आवश्यकता आहे. याकरिता आपण लवकर तरतूद करावी अशी विनंती करतो. हे काम झाले तर फलटण खंडाळा तालुके चांगले होऊ शकतात.

अध्यक्ष महोदय, निरा देवघर प्रकल्पाकरिता 22 कोटीची गरज आहे. खंडाळा तालुक्यातील वाघोसी गावापर्यंतची कामे अपूर्ण आहेत. त्यापुढे फलटण तालुक्यात भूसंपादनाची कामे अपूर्ण आहेत. याकरिता भरीव निधी दिला तर कामे पूर्ण होऊ शकतील. आघाडी सरकारच्या काळात याकरिता 150 कोटीचे टेंडर काढलेले होते नंतर ते रद्द केले. याकरिता पुन्हा टेंडर काढण्यात यावे अशी मी विनंती करतो. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

-----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संजय सावकारे (भुसावळ) : अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलताना मी माननीय जलसंपदा मंत्री यांचे लक्ष वेधू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, जळगाव जिल्हयातील शेळगाव बॅरेज पूर्ण झाला तर भुसावळ, धरणगाव, यावल, चोपडा येथील सिंचन व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मोठया प्रमाणावर सुटू शकतो. म्हणून माझी विनंती आहे की, शेळगाव बॅरेजचे काम आपण तातडीने पूर्ण करावे. पाडळसे व हातनूर धरण याकरितासुध्दा निधी देण्यात यावा अशी मी विनंती करतो व माझे दोन शब्द संपवितो.

-----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.जयप्रकाश मुंदडा (वसमत) : अध्यक्ष महोदय, अध्यक्ष महोदय, 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, आमदार निधी वाढला पाहिजे कारण दरवर्षी डीएसआर रेट वाढत असतो. 2011 पासून दोन कोटी आमदार निधी दिला जात आहे. आतापर्यंत त्यामध्ये वाढ झालेली नाही पण डीएसआरमध्ये प्रत्येक वर्षी वाढ होत आहे. त्या मानाने आमदार निधीमध्ये वाढ होण्याची गरज आहे. एवढेच नव्हे तर यावर्षी पाणीटंचाईमुळे आमदार निधीतून कामे पूर्ण होऊ शकलेली नाहीत. म्हणून उरलेला निधी पुढील वर्षी खर्च करण्याची परवानगी देण्यात यावी.

अध्यक्ष महोदय, मी अन्न व नागरी पुरवठा यांना विनंती करतो की, युती सरकारच्या काळामध्ये स्वस्त धान्य दुकानात पाच वस्तुंचे भाव स्थिर होते. तेलाचा भाव मार्केटमध्ये 100 रुपये असला तरी आपणास ठरावीक भागात तेल, साखर मिळत होती. त्याप्रमाणे आपण 5 वस्तुंचे भाव स्थिर करावेत अशी विनंती करतो. आज फेअर प्राईज शॉपवर गोडतेल, साखर, तूरडाळ मिळत नाहीत, या वस्तु उपलब्ध करुन द्याव्यात अशी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, माननीय जलसंपदा मंत्री यांना विनंती करतो की, उच्च पातळीवरील जलसंपदा विभागाचे बंधारे पूर्णा नदीवर ताबडतोब बांधण्याकरिता प्रशासकीय मान्यता देऊन सुरुवात करावी. त्याच ठिकाणी 10 वर्षापूर्वी अर्धवट राहिलेल्या ढवळगाव सावंगी बंधाऱ्याचे 50 टक्के काम पूर्ण झालेले आहे. तो बंधारा पूर्ण करण्यासाठी सुधारीत प्रशासकीय मान्यता द्यावी, अशी विनंती करतो व थांबतो.

-----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) : अध्यक्ष महोदय, 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, लातूर जिल्हयाची परिस्थिती पाण्याच्या बाबतीत अत्यंत बिकट झालेली आहे. तेथे मांजरा नदीवर बॅरेज बांधलेले आहेत परंतु भूसंपादनाचे तेथील लोकांचे पैसे देण्याचे राहिले आहेत. त्यामुळे त्या बंधाऱ्याची क्षमता 7 मीटर पाणी अडविण्याची असतानासुध्दा केवळ 4 मीटर पर्यत पाणी अडविले जात आहे. कारण भूसंपादनाचे पैसे न मिळाल्यामुळे शेतकरी त्याकरिता विरोध करीत आहेत.

अध्यक्ष महोदय, रेणा नदीवर बॅरेजेस करण्याबाबतची आमची अत्यंत महत्वाची मागणी आहे या बॅरेजेसची कामे अर्धवट झालेले आहेत. याकरिता 7.5 कोटी रुपयांची आवश्यकता आहे. याकडे माननीय जलसंपदा मंत्री यांनी लक्ष द्यावे व याबाबत तरतूद करावी अशी मी विनंती करतो व थांबतो.

**तालिका सभाध्यक्ष** : सभागृहाची वेळ आजच्या कामकाज पत्रिकेतील सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चा संपेपर्यत वाढविण्यात येत आहे.

.....6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.बबनराव शिंदे (माढा) : अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे. माननीय राज्यपाल यांच्या दिनांक 11 मार्च, 2016 च्या निदेशानुसार अप्पर मुख्य सचिव वित्त विभाग, प्रधान सचिव जलसंपदा विभाग यांच्या समितीला असे कळविले आहे की, नियतव्यय वाटप करतेवेळी पूर्णत्वास आलेल्या प्रकल्पांना अग्रक्रम द्यावा.

अध्यक्ष महोदय, माझी विनंती आहे की, 90 टक्के पूर्ण झालेला सीना-माढा प्रकल्प हा दुष्काळी भागातील आहे. यावर आतापर्यंत 300 कोटी रुपये खर्च झालेले आहेत. याकरिता आता 50 कोटी दिले तर 6 हजार हेक्टर क्षेत्र एक वर्षात बागाईत होईल. येथ फक्त कॅनॉलची कामे राहिलेली आहेत. म्हणून माननीय जलसंपदा मंत्री यांनी याद्वारे दुष्काळी भागाला न्याय द्यावा कारण येथील सर्व गावांमध्ये आज टँकर चालू आहेत.

अध्यक्ष महोदय, मराठवाडा व विदर्भातील आत्महत्येचे लोण सोलापूर जिल्हयात आलेले आहे. कर्जबाजारीपणाला कंटाळून घाटनेल तालुका माढा येथील शेतकरी कै.कदम यांनी गळफास घेऊन आत्महत्या केलेली आहे. माझी विनंती आहे की, ही परिस्थिती टाळायची असेल तर मराठवाडयाच्या शेजारी असलेल्या सोलापूर जिल्हयावर आपण लक्ष द्यावे.

अध्यक्ष महोदय, अर्थमंत्री महोदय येथे उपस्थित आहेत. आमदार आदर्श गाव योजनेबाबत त्यांनी सांगितले आहे पण त्याकरिता निधीची तरतूद केलेली नाही. आमदारांनी 10 लाख दिले तर शासनाने त्यात 20 लाख द्यावेत. म्हणजे आम्ही आमदार निधीतून 10 लाख रुपये देतो, असे शासनाने यामध्ये 20 लाख दिले तर 30 लाखात आदर्श गाव करता येईल. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

-----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

यानंतर V V-1

डॉ.शशिकांत खेडेकर ( सिंदखेडराजा ): अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पीय मागण्यांवर माझे विचार मांडण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय वित्तमंत्री महोदयांचे मी अभिनंदन करतो. त्यांनी स्थानिक क्षेत्र विकास निर्देशांकाच्या कार्यक्रमाच्या निकषामध्ये सुधारणा करण्याकरिता त्यांनी आमदारांची मते मागितलेली आहेत. ई-लर्निंगकरिता ग्रामीण भागातून शिक्षण दर्जावाढीकरिता मोठ्या प्रमाणात मागणी होत आहे. याकरिता शासनाने आमदार निधीतून खर्च करण्याची परवानगी द्यावी.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामध्ये खडकपूर्णा प्रकल्प आहे. त्यामधील नदीमध्ये एकूण 40 नद्यांचा उगम आहे. या भागामध्ये मूळ प्रकल्पातील पाणी सोडण्याची तरतूद नाही. पाणी टंचाई अंतर्गत या गावांना खडकपूर्णा प्रकल्पातील पाणी सोडण्याकरिता परवानगी दिली तर त्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटेल. खडकपूर्णा प्रकल्पग्रस्तांची दिनांक 03 फेब्रुवारी,2016 रोजी माननीय जलसंपदा मंत्री महोदयांनी बैठक घेतली होती. यामध्ये लाभक्षेत्रापासून वंचित राहिलेल्या गावांना लाभ देण्याबाबत बैठक घेतली होती. दिनांक 03 फेब्रुवारी,2016 नंतर एका महिन्याने बैठक घेण्याचे आश्वासन दिले होते. जलसंपदा मंत्री महोदयांनी एका महिन्यामध्ये बैठक न घेतल्यामुळे त्या भागामध्ये आंदोलने सुरु झालेली आहेत. माननीय मंत्री महोदयांनी ही बैठक एका महिन्याच्या कालावधीत घ्यावी, अशी मी विनंती करतो. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

------

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सन्माननीय सदस्य :अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पीय मागण्यांवर माझे विचार मांडण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, या सभागृहामध्ये प्रत्येक सन्माननीय सदस्य आपापले मत व्यक्त करीत असताना विविध प्रकल्पाकरिता पैसे मागत आहे. माझ्या मतदारसंघातील विसापूर व सिना धरणाचा समावेश कुकडीमध्ये करण्यात यावा, याकरिता मी सातत्याने पाठपुरावा करीत आहे. याकरिता शासनाला कोणताही वाढीव निधी द्यावा लागणार नाही. कारण विसापूर धरणामध्ये पाणी सोडण्याकरिता शासनाने गेट केलेले आहे. सिना धरणामध्ये पाणी सोडण्याकरिता बोगदा केलेला आहे. या धरणांचा कुकडीमध्ये समावेश झाल्यानंतर येथील प्रश्न सुटणार आहे. आमच्या भागातील नद्यांवरील बंधा-यांच्या प्लेटी खराब झालेल्या आहेत. यामुळे तेथील पाणी अडविता येत नाही. या बंधा-यांच्या प्लेटींकरिता शासनाने निधी द्यावा, अशी मी विनंती करीत आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-----

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सन्माननीय सदस्य : अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पीय मागण्यांवर माझे विचार मांडण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, माझा मतदारसंघ हा तेलंगणा व कर्नाटक या राज्याच्या सीमावर्ती भागात असलेला डोंगराळ भाग आहे. मुखेड तालुका व माझ्या मतदारसंघातील लेंडी प्रकल्प 28-29 वर्षापासून निधीसाठी प्रकल्पासाठी रखडलेला आहे. या धरणातील बुडित क्षेत्रातील 11 गावांचे पुनर्वसन करण्याकरिता व त्यांना नागरी सुविधा,मोबदला देण्याबाबतचे प्रश्न प्रलंबित आहेत. तेलंगणा याकरिता त्यांच्या हिश्याचे 38 टक्के देण्याकरिता सकारात्मक आहे. जलसंपदा मंत्री महोदयांनी याकडे लक्ष द्यावे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-----

....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नरहरी झिरवाळ ( दिंडोरी ): अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पीय मागण्यांवर माझे विचार मांडण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामध्ये देशात व राज्यात गाजलेला मांजरपाडा प्रकल्प-1 आणि 2 आहे. या प्रकल्पाकरिता सुप्रमा दिल्या असत्या तर काम लवकर सुरु झाले असते. असे झाले असते तर नाशिक जिल्हयातील 60 टक्के भाग यंदा दुष्काळाला सामोरा गेला नसता. आता तरी किमान तत्काळ या कामाला सुरुवात करावी. याचे 90 टक्के काम पूर्ण झालेले आहे. सन 2011-2012 मध्ये महामंडळाने 24 साठवण तलावांना मान्यता दिलेली आहे. ...(अडथळा )....एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

------

....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रमेश बुंदिले (दर्यापूर ): अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पीय मागण्यांवर माझे विचार मांडण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या दर्यापूर मतदारसंघामध्ये 7-8 वर्षापासून 3 प्रकल्प अर्धवट अवस्थेत पडून आहेत. सावंगा, कळाशी, सामदा हे प्रकल्प लवकर व्हावे, याकरिता निधी देण्यात यावा. शहानूर या प्रकल्पाच्या कॅनॉल्समध्ये झाडी आलेली आहे. या कॅनॉलमधील झाडी काढून ते दुरूस्त करण्याकरिता व्यवस्था करण्यात यावी. खेरकुडे धरणावरील कॅनॉलमध्येही झाडी आलेली आहे, या कॅनॉलच्या दुरूस्तीकरिता पैसे मिळावे, अशी मी विनंती करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-----------

....6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.डी.एस.अहिरे (साक्री ): अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पीय मागण्यांवर माझे विचार मांडण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, जे प्रकल्प 90-95 टक्के पूर्ण झालेले आहेत, ज्या प्रकल्पांचे केवळ कॅनॉल्स राहिलेले आहेत, ते पूर्ण करण्यात यावे. माझ्या मतदारसंघामध्ये अक्कलपाडा, लाठीपाडा, जानपेडी या प्रकल्पांच्या कॅनॉल्सची कामे पुरेसे पाणी असूनही पूर्ण झालेली नाहीत. ती कामे शासनाने पूर्ण करावी.

अध्यक्ष महोदय, रेशन दुकानदार माल उचलतांना वेगवेगळी कारणे सांगून ग्राहकांची अडवणूक करीत असतो. रेशन दुकानदाराला मालाची उचल करण्याकरिता तारीख नेमण्यात यावी. प्रत्येक महिन्याच्या 11 ते 20 तारखेपर्यंत रेशन दुकानदाराने ग्राहकांपर्यंत माल देण्याबाबत शासनाने सूचना करणे आवश्यक आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

------

....7

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.बाबुराव पाचर्णे ( शिरूर ):अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पीय मागण्यांवर माझे विचार मांडण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, राज्यपाल महोदयांच्या निदेशानुसार विदर्भ-मराठवाडयातील अनुशेष भरल्याशिवाय आम्हाला निधी मिळत नाही. प्रकल्पाची कामे 70-80 टक्के पूर्ण असतांनाही त्याकरिता सुप्रमा व निधी मिळत नाही. कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम 1996 च्या कलम 5(28) या तरतुदीनुसार राज्य शासनास व महामंडळास जमिनीच्या विक्रीद्वारे निधीचा स्त्रोत उभारण्याचे पूर्ण अधिकार प्राप्त आहेत. आमच्या भागामध्ये ज्या किंमती जमिनी आहेत, त्या पारदर्शी पध्दतीने विक्री केली तर याकरिता निधी प्राप्त होईल. प्रलंबित कामे त्यातून पूर्ण होतील. याकडे माननीय मंत्री यांनी लक्ष द्यावे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.समीर कुणावार ( हिंगणघाट ):अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पीय मागण्यांवर माझे विचार मांडण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील काही गावांमध्ये 25-30 वर्षापासून काही लोक अतिक्रमण करुन राहत आहेत. हे लोक त्या भागामध्ये झोपडया बांधून राहत आहेत. यामुळे गावामध्ये वाद निर्माण झालेले आहेत. या अतिक्रमण केलेल्या लोकांना घरकूले मंजूर झालेली आहेत. परंतु ही घरकुले बांधण्याकरिता जागा नाही. माझ्या मतदारसंघामधील 50 गावांची कामे हाती घेतलेली आहेत. याबाबत शासनाने असे म्हटले की, रेडी रेकनरप्रमाणे पैसे भरावे लागतील. प्रत्येक गावामध्ये रेडी रेकनरचा रेट 300-500 रुपये इतका आहे. रेडी रेकनरप्रमाणे जागेचे पैसे गरीब मजूर भरु शकत नाही. माननीय अर्थमंत्री यांना माझी विनंती आहे की, त्यांनी रेडी रेकनरच्या दरामध्ये या मजूरांकरिता 75 टक्के सूट दिली तर त्यांचे हे काम 15-20 हजार रुपयांमध्ये होऊ शकते. यामुळे त्यांना घराकरिता त्यांच्या मालकी हक्काच्या जमिनीचे पट्टे मिळू शकतात. माझ्या मतदारसंघातील धरणांवरील बॅरेजेसचे प्रश्न सुटले पाहिजेत. प्रत्येक गावातील ओबीसी समाज आज घरकुल योजनेपासून वंचित आहे. याकडेही शासनाने लक्ष द्यावे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-------

....9

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती देवयानी फरांदे ( नाशिक-मध्य ): अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पीय मागण्यांवर माझे विचार मांडण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, आमचा नाशिक जिल्हा सुजलाम आणि सुफलाम जिल्हा आहे. सन 2005 मध्ये समन्यायी पाणी वाटप कायद्यानुसार नाशिककरांवर अन्याय झालेला आहे. या संदर्भातील मेंढेगिरी समितीचा अहवाल शासनाने स्वीकारलेला नसतानाही या वर्षी त्यातील शिफारशीप्रमाणे पाणीवाटप करण्यात आलेले आहे. या संदर्भातील पाणी वाटपाचे काम एमडब्ल्यूआरआरआयच्या अहवालानुसार केलेले आहे. माननीय जलसंपदा मंत्री हे नाशिक जिल्हयाचे पालकमंत्री आहेत. हायकोर्टाच्या आदेशानुसार त्यांनी जायकवाडी धरणामध्ये मोठया प्रमाणात पाणी सोडलेले आहे. असे असतानाही त्यांना नाशिक जिल्हयातील जनतेच्या रोषाला सामोरे जावे लागले. जायकवाडीला नाशिकच्या वाटयाच्या पाण्यामधून 10.13 टीएमसी पाणी सोडण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या 10.13 टीएमसी पाण्यापैकी तेथे केवळ 6 टीएमसी पाणी पोहोचलेले आहे.

डब्ल्यूडब्ल्यू-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. देवयानी फरांदे........

अध्यक्ष महोदय, जायकवाडी धरणातील 7.5 टी.एम.सी. पाणी हे बाष्पीभवनाद्वारे नाश होणार आहे. त्यामुळे जलसंपत्तीचे खूप मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. मी माननीय पीठासीन अधिकाऱ्यांचे चर्चेच्या अनुषंगाने एका गोष्टीकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करणार आहे. सन 2012 पासून जायकवाडीच्या प्रकल्पासाठी पाणी सोडले जात आहे. जायकवाडी जलाशयातील मृत पाणीसाठ्याच्या खालील पाण्याचा दरवर्षी शेती व उद्योगासाठी पाण्याचा बेसुमारपध्दतीने उपसा होत असतो.

अध्यक्ष महोदय, वेळे अभावी मी माझे भाषण या ठिकाणी संपवित आहे.

------

.......2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, मी फक्त जलसंपदा विभागाच्या माननीय मंत्र्यांना फक्त तीन सूचना करुन माझे भाषण संपविणार आहे.

अध्यक्ष महोदय, साईबाबा संस्थानकडून 500 कोटी रुपये निळवंडे धरणाला अतिरिक्त निधी देण्याचे मान्य केले होते. फक्त दायित्व स्वीकारावयाचे आहे. साईबाबा संस्थानाचे पैसे किती वर्षात परत केले जाणार आहे ? यासंदर्भात शासन स्तरावरुन निर्णय होण्याची गरज आहे. या विषयाच्या अनुषंगाने बैठक झालेली आहे. आज त्यासंदर्भातील धोरणात्मक निर्णय करावा लागणार आहे. सद्य:स्थितीत निळवंडे धरणाचे काम पूर्ण झालेले आहे. कालव्याच्या कामासाठी निधी उपलब्ध करुन दिला जात आहे. 500 कोटी रुपयांचे दायित्व स्वीकारण्यासंदर्भातील घोषणा होत नाही.

अध्यक्ष महोदय, पश्चिम वाहिन्यातील पाणी समुद्राला जाऊन मिळत आहे. हे पाणी गोदावरीच्या खोऱ्यात आणण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. हे काम करण्यासाठी किमान सर्व्हेक्षणाचे काम तरी सुरु करण्याची गरज आहे. तसेच त्यासाठी निधी देखील उपलब्ध करुन देण्याची गरज आहे. मध्यवैतरणा धरणातील पाणी मुंबई महानगरपालिकेसाठी राखून ठेवण्यात आलेले आहे. मुंबई महानगरपालिकेला अन्य धरणातून पाणी मिळणार आहे. 14 ते 15 टी.एम.सी.पाणी गोदावरी खोऱ्यात आणल्यानंतर ते जायकवाडीसाठी उपलब्ध झाले तर त्याबाबत आमची कोणतीही हरकत असणार नाही. यासंदर्भात शासनाने तातडीने पावले उचलण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, गोदावरी कालव्यांची स्थिती अतिशय जीर्ण झालेली आहे. पूर्वी नाबार्डमधून पैसा मिळाला होता. सद्य:स्थितीत काम थांबलेले आहे. या कालव्याला 100 वर्षे झालेली आहेत. अशा कालव्याला त्वरित निधी उपलब्ध करुन देण्यासाठी माननीय जलसंपदा मंत्र्यांनी भाष्य करावे, अशी विनंती करीत आहे.

अध्यक्ष महोदय, अन्न सुरक्षा योजनेतून धान्याचे वाटप केले जात आहे. यामध्ये अनेक दुकानदारांनी बोगस याद्या केलेल्या आहेत. आता नाशिक जिल्ह्यात जीपीएस यंत्रणा प्रायोगिक तत्वावर कार्यान्वित केली जाणार आहे. तसेच या कामासाठी आधार लिंकिंग केलेले आहे. अशी

....3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील.......

कार्यवाही केली तर 30 ते 35 टक्के बोगस कार्डधार बाहेर पडणार आहेत. शासनाने 76 टक्के सिलिंग लावले होते. 30 ते 35 टक्के बोगस कार्डधारक कमी झाल्यामुळे मूळ लाभार्थ्यांना सदर योजनेत सामावून घेण्याच्या संदर्भात निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. एवढे बोलून मी माझे भाषण या ठिकाणी संपवितो.

-----

.......4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुधीर मुनगंटीवार ( वित्त मंत्री ) : अध्यक्ष महोदय, वित्त विभागाच्या सन 2016-2017 करिता मागणी क्रमांक जी-1 ते जी-10 मध्ये रुपये 9 कोटी 16 लाख 39 हजार आणि योजनेतर 63 हजार 660 कोटी 87 लाख 45 हजार असे एकूण 63 हजार 670 कोटी 3 लाख 84 हजार रुपयांचे अनुदान मंजुर करण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागत आहे.

अध्यक्ष महोदय, नियोजन विभागाचे मागणी क्रमांक ओ-1, ओ-2 व ओ-4 ते ओ-13 या अनुदानांतर्गत योजनांतर्गत योजनांचे 2317 कोटी 41 लक्ष 27 हजार एवढ्या रक्कमेच्या अनुदानास मंजुरी देण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागत आहे.

अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 करिता नियोजन विभागांतर्गत रोजगार हमी योजना या उप विभागासाठी मागणी क्रमांक ओ-3, प्रधान लेखाशीर्ष 2505, ग्रामीण रोजगाराखाली योजनांतर्गत योजनेसाठी एकूण 3473 कोटी 70 लक्ष 53 लाख एवढ्या रक्कमेच्या अनुदानास मंजुरी देण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागत आहे.

अध्यक्ष महोदय, आज वित्त, नियोजन व नियोजन विभागात येणाऱ्या रोजगार हमी योजनांच्या मागण्यांवरील काही मूलभूत प्रश्न सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेले आहेत. वेळेअभावी मला सर्वच प्रश्नांची उत्तरे देता येणे शक्य नसले तरी जे मूलभूत प्रश्न आहेत, अशा प्रश्नांची मी थोडक्यात उत्तरे देण्याचा प्रयत्न करणार आहे.

अध्यक्ष महोदय, आमदार निधीचा प्रश्न महत्वाचा आहे. वित्तमंत्री या नात्याने आमदार निधी वाढविण्याच्या दृष्टीकोनातून विचार केला जात आहे. सद्य:स्थितीत राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा विचार लक्षात घेता या क्षणाला आमदार निधी वाढविण्याबाबतचा मला निर्णय करता आला नाही तर भविष्यात आमदार निधीत वाढ करण्याच्या दृष्टीकोनातून मी सकारात्मक विचार करणार आहे. आमदार निधीच्या संदर्भात मी सन्माननीय सदस्यांनाकडून सूचना मागविलेल्या आहेत. आमदार निधीमधील ज्या कामांना मंजुरी दिली जाते, अशा कामांमध्ये बदल करावयाचा आहे किंवा कसे याबाबत मी सूचना मागविलेल्या आहेत. काही सन्माननीय सदस्यांनी "ई-लर्निंग"च्या संदर्भात सूचना केलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांच्या सूचना प्राप्त झाल्यानंतर त्यांच्यासमवेत बैठकीचे आयोजन केले जाणार आहे. ज्या सन्माननीय सदस्यांच्या चांगल्या सूचना असतील, अशा सूचनांचा निश्चितपणे विचार केला जाणार आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुधीर मुनगंटीवार.........

अध्यक्ष महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी सभागृहातील चर्चेमध्ये सहभागी होता यावे याकरिता लॅपटॉपची मागणी केलेली आहे. मी स्वतः संगणाकाची सुरुवात करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यानंतर संगणक मिळाला होता. संगणक दिल्यानंतर आमदार निधीमध्ये 1 लक्ष 50 हजार रुपये 5 वर्षापर्यंत एकदाच लॅपटॉप किंवा संगणक घेऊ शकतो. आज वाढती महागाई लक्षात घेता आमदारांच्या संगणक ऑपरेटरला कोणताही पैसा दिला जात नाही. माझ्या विभागातर्फे संगणक ऑपरेटरच्या संदर्भातील विचार केला जात आहे. आमदारांना स्वतंत्रपणे एक संगणक ऑपरेटर दिला पाहिजे. संगणक ऑपरेटर न दिल्यामुळे आणि दुसरीकडे विधिमंळातील सर्व कामकाज संगणकीय पध्दतीने केले जाणार आहे. त्यामुळे संगणकाच्या माध्यमातून चांगला उपयोग होतो. संगणामध्ये आवश्यक ती माहिती मिळाल्यामुळे आपल्या चर्चेचा दर्जा देखील सुधारण्यास मदत होणार आहे. सभागृहातील कामकाजाच्या संदर्भात प्रत्येक सन्माननीय सदस्य आणि अधिकारी वर्गाला मोबाईलवर एसएमएस येत आहे. महत्वाचा विषय उपस्थित केल्यानंतर मी माझे भाषण संपविणार आहे. जलसंपदा विभागाचे उत्तर माननीय जलसंपदा मंत्री देणार आहेत.

अध्यक्ष महोदय, सभागृहातील ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. ग.आ.देशमुख आणि इतर सन्माननीय सदस्यांनी देशामध्ये आपण 28व्या क्रमांकावर असल्याची माहिती दिलेली आहे. ही आपल्या सर्वांसाठी एक चिंतेची बाब आहे. माझ्याकडे कोणत्या राज्याने सिंचनासाठी किती तरतूद केलेली आहे, याची सर्व आकडेवारी उपलब्ध आहे. आपला प्लॅन साईज दिला जात नाही. मुख्यमंत्री महोदय आणि माननीय जलसंपदा मंत्री यांनी जलसंपदा विभागासाठी प्रोजेक्ट फायनान्स घेऊन वेग देता येईल काय याबाबतचा विचार केला जात आहे. याशिवाय सद्यःस्थितीमध्ये दुसरा कोणताही पर्याय दिसून येत नाही. प्रोजेक्ट फायनान्स घेऊन प्रकल्प वेगाने पूर्ण करण्यासाठी वित्त आणि नियोजन विभागाच्या माध्यमातून जेवढे लक्ष देता येणे शक्य आहे, तेवढे देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

अध्यक्ष महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी आमदार निधीमध्ये वाढ केली पाहिजे, अशी आग्रही मागणी केलेली आहे. भविष्यात आमदार निधीत वाढ करण्याच्या दृष्टीकोनातून मी सकारात्मक विचार करणार आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. ग. आ. देशमुख : अध्यक्ष महोदय, आमदार निधी लॅप्स होणार नाही, याबाबतीत वित्तमंत्र्यांनी सभागृहाला आवश्यक ती माहिती द्यावी.

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, खासदार निधीच्या धर्तीवर आमदार निधी लॅप्स होणार नाही, याचा देखील विचार केला जाणार आहे. आमदार निधी लॅप्स होणार नाही, या दृष्टीकोनातून विचार करु. त्यासंदर्भातील निदेश दिले जाणार आहेत.

अध्यक्ष महोदय, मी डोंगरीच्या संदर्भात बैठक घेतलेली आहे. सदर बैठकीत आमदार महोदयांना सूचना करण्याबाबत विनंती केली होती. डोंगरीच्या संदर्भात केवळ 7 सूचना आलेल्या आहेत आणि हे एक आश्चर्य म्हणावे लागणार आहे.

XX-1......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुधीर मुनगंटीवार....

डोंगरी भागातील कामाच्या निधीच्या संदर्भात तसेच निधी वाढीच्या संदर्भात आपण बेठक घेतल्यानंतर मी स्वतः दिनांक 29 जुलै, 2015 रोजी एक बैठक घेतली होती. मला असे वाटते की, आपल्याला सक्रियता वाढवावी लागेल त्यामुळे आपल्याला निर्णय घेणे सोपे होईल. आपण जो निधी देतो, त्याच्या उपयोगितेसंबंधी जोपर्यंत निर्णय होत नाही, तोपर्यंत आपल्याला निधीसंदर्भात निर्णय घेता येत नाही. आपण माननीय पालकमंत्री महोदयांकडे निर्णय दिला, परंतु आपल्या सूचना व्यवस्थित दिल्यावरच आपल्याला निर्णय घेणे सोपे होईल. वित्त व नियोजन विभागाच्या मागण्या या सभागृहाने मान्य कराव्यात, अशी मी सभागृहाला विनंती करतो.

--------------

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे (सांस्कृतिक कार्य मंत्री) : अध्यक्ष महाराज, मला माननीय वित्त मंत्र्यांना एवढीच सूचना करावयाची आहे की, आपण "आमदार निधी" असा शब्द वापरला त्याऐवजी "मतदारसंघ विकास निधी" हा शब्द वापरला तर ते अधिक संयुक्तिक होईल. अन्यथा लोकांना असे वाटेल की, आमदारांचा हा निधी आहे. म्हणून आपण "मतदारसंघ विकास निधी" किंवा "स्थानिक विकास निधी" हा शब्द वापरला तर त्यातून चांगला संदेश जनतेमध्ये जाईल, असे मला वाटते.

अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने सन 2016-2017 या आर्थिक वर्षासाठीच्या सांस्कृतिक उप विभागासाठी मागणी क्रमांक झेडडी-1, झेडडी-2, झेडडी-3, झेडडी-4, झेडडी-5, झेडडी-6 या मागणी क्रमांकातंर्गत या योजनेखाली 94 कोटी 93 लाख 85 हजार आणि योजनेतर योजनेखाली एकूण रुपये 92 कोटी 80 लाख 35 हजार, अशा एकूण 187 कोटी 74 लाख 30 हजार रुपयांच्या अनुदान मागण्यांना सभागृहाने मंजूर कराव्यात, अशी मी सभागृहास विनंती करतो.

सन्माननीय सदस्य श्री.धैर्यशील पाटील यांनी औंढा येथे बालाजी चिटणीस यांच्या स्मारकाविषयची मुद्दा मांडला. हा विषय सांस्कृतिक खात्याचा असला तरी जमीन महसूल खात्याची आहे. या स्मारकाचा विचार सकारात्मक करु. सन्माननीय सदस्य श्री.अमित देशमुख यांनी जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी नाट्यगृह योजनेसाठी बजेटमध्ये तरतूद करण्याचे माननीय वित्त मंत्र्यांनी घोषित केलेले आहे. पुढील साडेतीन चार वर्षात प्रत्येक जिल्ह्यात नाट्यगृह ही योजना आपण पूर्ण करणार आहोत. चित्रपटांना अधिक अनुदान देण्यासंदर्भात मुद्दा उपस्थित करण्यात आला, परंतु चित्रपटांपेक्षा नाटकांना अनुदान देण्यासंबंधीचाचा विचार सरकार सकारात्मक करीत आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी चांगल्या सूचना केल्या आहेत. त्या सर्व सूचनांची लेखी उत्तरे विभागाकडून निश्चितपणे पाठविले जातील. सांस्कृतिक खात्याच्या वरील मागण्या या सभागृहाने मंजूर कराव्यात, अशी मी पुन्हा सभागृहास विनंती करतो.

-------

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष महाजन (जलसंपदा मंत्री) : अध्यक्ष महाराज, सन 2016-2017 या आर्थिक वर्षातील जलसंपदा विभागाच्या मागणी क्रमांक आय-2 ते आय-7 खालील रुपये 3656, 8289 कोटी रुपये व योजनातंर्गत 8063, 5365 कोटी रुपयांच्या मागण्या या सभागृहाने मंजूर करण्याची विनंती मी सभागृहास करीत आहे.

अध्यक्ष महाराज, सन 2015-2016 यावर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये माननीय वित्त मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार आणि माननीय मुख्यमंत्री यांनी या विभागाला 7272 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला आहे. मला असे वाटते की, गेल्या पाच वर्षात आकडे खूप फुगविण्यात आले होते. कधी 8 हजार कोटी, कधी 9 हजार कोटी, तर कधी 10 हजार कोटी रुपये, परंतु आम्ही गेल्यावर्षी 9 हजार कोटी रुपयांची विभागासाठी तरतूद केली. हा निधी मंजूर केल्यानंतर गेल्या पाच वर्षात कधी 30 टक्के कपात, तर कधी 40 टक्के कपात लावल्यामुळे हा आकडा 6 हजार कोटी रुपयांच्या वर गेलेला नाही. यावेळी मात्र 7272 कोटी रुपये माननीय वित्तमंत्र्यांनी या खात्यासाठी तरतूद केली आहे. माननीय वित्तमंत्र्यांनी असेही सांगितले होते की, एक रुपया कमी दिला तरी मी माझ्या पदाचा राजिनामा देईल. मी सुध्दा त्यांच्या शब्दाला तेवढाच मान दिला आणि अधून मधून त्यांना भीती वाटत होती की, खरेच काही करावे लागते की काय, मुद्दाम करणार नाही, परंतु विभागाचे सर्व पैसे खर्च केलेले आहेत. म्हणून माननीय वित्त मंत्री आणि माननीय मुख्यमंत्री यांचे मी मनापासून आभार व्यक्त करतो. या खात्यामध्ये गेल्या वर्षभरात अनेक चांगले निर्णय घेतले आहेत. भूसंपादनाची आपण थेट खरेदी सुरु केली. भूसंपदानामध्ये अनेक अडचणी येत होत्या म्हणून शेतकऱ्याच्या संमतीने थेट खरेदी करुन भूसंपादनाचा विषय मार्गी लावण्याचा प्रयत्न केला. भूसंपादाविषयी अनेक तक्रारी, अडचणी होत्या.

अध्यक्ष महाराज, जलसंपदा खात्यामध्ये तीन लाखाच्या वर काम असेल तर तेथे आपण ई टेंडरिंग पध्दत लागू केली. पूर्वी या विभागात प्री क्वॉलिफिकेशन होते, परंतु आपले सरकार आल्यानंतर आपण पोस्ट क्वॉलिफिकेशनचा निर्णय घेतला. प्री क्वॉलिफिकेशनमध्ये अनेक तक्रारी होत्या, अनेक अनियमितता, गैरव्यवहार, भ्रष्टाचार झाल्याच्या सुरस कथा आपण गेल्या दोन वर्षापासून ऐकत आलो आहे. त्यामुळे अनेक प्रकल्प चौकशीच्या फेऱ्यामध्ये अडकले आहेत.

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष महाजन....

म्हणून आपण प्री क्वॉलिफिकेशनच्या ऐवजी पोस्ट क्वॉलिफिकेशन केले म्हणून मला या ठिकाणी सांगण्यास अभिमान वाटतो की, गेल्या दीड वर्षभरात आपण जेवढे टेंडर काढले ते सर्व टेंडर बिलो गेले आहेत. नंदूरबार जिल्ह्यातील टेंडर 34 टक्के बिलो गेले आहे. काही प्रकल्पांमध्ये तर 34 टक्के, काही प्रकल्पांमध्ये 20 टक्के टेंडर बिलो गेलेले आहेत. स्पर्धा आणि पारदर्शकता एवढी वाढली आहे की, इतक्या बिलो स्वरुपात टेंडर यापूर्वी कधी गेले नव्हते. यापूर्वी एकही बिलो टेंडर गेलेले नव्हते तर अबॉव्ह जात होते, यावरुन आपला पारदर्शक कारभार कसा चाललेला आहे, याची आपल्याला सर्वांना कल्पना येईल.

अध्यक्ष महाराज, सुप्रमा ही जलसंपदा खात्याला लागलेली कीड म्हणावी लागेल. गेल्या पाच वर्षात सुप्रमा देण्यासाठी कोणीच धजावले नाही. मागील सुप्रमाच्या अडचणीमुळे गेल्या पाच वर्षात एकाही प्रकल्पाला सुप्रमा दिलेली नव्हती, हे सर्व प्रकल्प असेच पडून होते. अनेक प्रकल्पासंदर्भात तक्रारी आल्यामुळे त्यांच्या चौकशा सुरु होत्या. अनेक प्रकल्पांच्या बाबतीत तक्रारी झाल्यामुळे हे सर्व प्रकल्प प्रलंबित होते. अनेक लोकांवर कारवाई सुरु होती त्यामुळे सुधारित प्रशासकीय मान्यता कोण देईल, यासाठी कोणीच पुढे आले नाही. म्हणून आपण निर्णय घेतला की, सुप्रमा केल्याशिवाय या खात्याची कामे होणार नाहीत म्हणून आम्ही गेल्या वर्षभरात हे सरकार आल्यानंतर जवळपास 100 सुप्रमा दिल्या आहेत.

अध्यक्ष महाराज, या सभागृहात माननीय विरोधी पक्षनेते बसलेले आहेत. परवा माननीय विरोधी पक्षनेत्यांनी वाशिमच्या जिल्ह्याच्या बातमीत या 11 प्रकल्पांना सुप्रमा कशी दिली, दूरदर्शनवर मी हे बघितले. आपल्या खात्याचा पहिला भ्रष्टाचार पाटबंधारे विभागाचा उघकीस आला. काही ठिकाणी असे सांगण्यात आले की, श्री.गिरीष महाजन यांचा पहिला भ्रष्टाचार उघडकीस आला. सन 2009 मध्ये 90 कोटी रुपयांच्या कामाचे एस्टिमेटस झाले आणि टंडर दिले गेले. जे टेंडर दिले गेले त्याला सन 2006 पर्यंत सुप्रमा दिलेली नव्हती. जे काम या ठिकाणी घेण्यात आले ते दुसऱ्या धरणाच्या कामाचे एस्टिमेटस या ठिकाणी जसेच्या तसे देण्यात आले. तेव्हाचे 90 कोटी रुपयांच्या कामाची किंमत आता 750 कोटी रुपयांपर्यंत गेली आहे, हे खरे आहे. परंतु आपण हे काम देताना त्याची तांत्रिक कोठलीही बाजू बघितली नाही. तेथे हॉर्ड रॉक हा

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष महाजन....

पाच फुटावर, सात फुटावर होता आणि इकडे 50, 100 फुट खोल गेल्यावर सुध्दा हॉर्ड रॉक लागत नव्हता. जवळपास 324 कोटी रुपये प्लिंथसाठी वाढलेले आहेत. भूसंपदानामध्ये पैसे वाढले, त्याच्या प्लिंथमध्ये पैसे वाढले. पुनर्वसन, रेडी रेकनर, डीएसआर यामुळे मुळे तेथे भाव वाढलेले आहेत. म्हणून हा प्रकल्प जवळपास 750 कोटी रुपयांपर्यंत गेला. हा वाशिम जिल्ह्यातील प्रकल्प असून त्याचे काम 70 टक्के पूर्ण झाले आहे.

यानंतर YY-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गिरीष महाजन ....

त्या ठिकाणी पाण्याची टंचाई आहे आणि म्हणून तो प्रकल्प पूर्ण करणे हे राज्यपाल महोदयांच्या निदेशाप्रमाणे सर्वांना बंधनकारक होते. याकरिता एसएलटीसी असेल, इपीसी असेल, नियामक मंडळात असेल आणि नंतर कॅबिनेटमध्ये आणून आम्ही सर्वांनी हा निर्णय केला. आठ महिने आम्ही या सर्वांवर अभ्यास केला. शेवटी हे करावे लागणार होते अन्यथा सव्वाचारशे कोटी रुपये या प्रकल्पावर खर्च झाले आहेत ते सोडून द्यायचे काय, प्रकल्प तोडून टाकायचे आहेत काय ? त्यामुळे आम्ही राहिलेल्या 300 कोटी रुपयांना मंजुरी दिली. हा प्रकल्प आता आम्ही या दोन महिन्यांमध्ये पावसाळ्याच्या अगोदर पूर्ण करीत आहोत. जवळपास 10 हजार हेक्टर जमिनीला पाणी मिळणार आहे. याकरिता आपण आरोप करताना ....

श्री. भास्कर जाधव (बसून) : आज कोणी आरोप केला नाही.

श्री. गिरीष महाजन : आज नाही केला, 15 दिवसांपूर्वी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या संदर्भात आरोप केला. मला असे वाटते की, या खात्यामध्ये जी पुढची कामे आहेत ती सर्व कामे आता अशीच येणार आहेत. कारण आपण मंजुरी देताना कोठे 50 कोटी रुपयांच्या धरणाला परवानगी दिली, एखाद्या केटी वेअरला परवानगी दिली. त्याचप्रमाणे आपण बॅरेजमध्ये केले, त्याचे 500 कोटी रुपये झाले. कुठे 700 कोटी रुपये दिले, त्याच ठेकेदाराला 50 कोटी रुपयांचे काम दिले. त्याला आपण पुढे 700 कोटी रुपयांचे काम वाढवून दिले.

अध्यक्ष महोदय, अनेक अडचणी या खात्यामध्ये आहेत. परंतु, शेवटी आपल्याला शेतकऱ्याला न्याय द्यायचा आहे. आपल्याला लोकांनाही न्याय द्यायचा आहे, त्यांनाही आपल्याला पाणी द्यायचे आहे. आपण अशा पद्धतीने कामे सोडून दिली किंवा आम्ही म्हटले की, आम्ही आता करणार नाही कोणी जबाबदारीच घेणार नाही, तर मला असे वाटते की आपण या राज्यातील दुष्काळी परिस्थितीला अजून खतपाणीच घालू.

अध्यक्ष महोदय, मी तर यावेळेस असेही म्हटले होते की, आपणच आपली एक कमिटी करावी, तुम्ही त्यामध्ये रहा आणि तुम्ही निर्णय घ्या. आमच्याकडे इतकी पारदर्शकता आहे की, त्या बाबतीत पाटील साहेब आपल्याही मनात कोठे शंका नसेल. माननीय विरोधी पक्ष नेते येथे बसलेले आहेत, आपण त्यांनाही विचारा. सर्वांना विचारून सर्वांच्या संमतीने आपण काम करीत आहोत.

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गिरीष महाजन ....

अध्यक्ष महोदय, सुप्रमाचे आमच्या डोक्यावर जे ओझे आहे ते कमी करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. सुप्रमा दिल्याशिवाय या राज्यातील प्रकल्प आता मार्गीच लागणार नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. सुप्रमा देण्याच्या संदर्भात मराठवाडा, विदर्भ, तापी खोरे आहे, आपण या स्थानिक महामंडळांना ....

काही सन्माननीय सदस्य (बसून): कोकण देखील आहे.

श्री. गिरीष महाजन : कोकणाबाबत मी काय बोलू ? तर आपण या 2 महामंडळांना सुप्रमा देण्याचे अधिकार दिलेले आहेत. कारण तेथे बॅकलॉग खूप मोठा आहे. मराठवाडा, विदर्भातील बॅकलॉग मोठा आहे. याकरिता त्यांनाच त्या ठिकाणी सुप्रमा देण्याचे अधिकार दिलेले आहेत. ज्या सुप्रमा अवाक्याच्या बाहेर असतील, खूप मोठी वाढ त्या ठिकाणी झाली असेल मग त्या इपीसीमध्ये येतील, तेथून नंतर नियामक मंडळात येतील तेथून मग कॅबिनेटमध्ये आम्ही विचारार्थ ठेवणार आहोत. परंतु, सुप्रमा द्याव्याच लागणार आहेत, सुप्रमा दिल्याशिवाय दुसरा कुठलाही पर्याय नाही. त्याशिवाय प्रकल्प पूर्ण करता येणार नाहीत. याकरिता हा निर्णय आपण याठिकाणी घेतलेला आहे.

अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 करिताची सर्व आकडेवारी माझ्याकडे आहे परंतु, ती मी या ठिकाणी ठेवणार नाही. रिक्त पदांच्या बाबतीत या ठिकाणी मागणी करण्यात आली. अनेक सन्माननीय सदस्यांनी त्याबाबत सांगितले आहे. या खात्यामध्ये खूप मोठ्या प्रमाणावर जागा रिक्त आहेत. इतक्या वर्षात कधीही दिली नसतील इतकी प्रमोशन आम्ही दिली आहेत. जे.ई. चे डेप्युटी केले, डेप्युटीचे एक्झेक्युटिव्ह केले, एक्झेक्युटिव्हचे एस.ई. केले, एस.ई. चे सी.ई. केले, इ.डी. केले. इतक्या वर्षात कधीही झाली नसतील, तेवढी प्रमोशन आपण या खात्यात दिली आहेत. परंतु, अजूनही ज्युनिअर इंजिनिअरच्या जागा हजाराच्या संख्येत रिक्त असल्याने फिल्डवर काम करणारे जे अधिकारी आहेत, त्यांची संख्या या खात्यात खूप कमी आहे. त्यामुळे आपण तत्काळ निर्णय घेऊन या 1400 जागा भरण्याचा निर्णय घेतला.

अध्यक्ष महोदय, आपण त्याची सर्व प्रक्रिया सुरु केली होती. परंतु, कोर्टाने पुन्हा त्यावर स्टे आणला. तेथे डिप्लोमा घ्यायचे की, बी.ई. घ्यायचे यावर पुन्हा वाद निर्माण झाला. कोर्टामध्ये काही मंडळी गेली. कालच कोर्टाने निर्णय दिला की, डिप्लोमा विद्यार्थीच घेतले पाहिजेत. आता आपला

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गिरीष महाजन ....

हा मार्गही मोकळा झाला आहे. मला असे वाटते की, 15-20 दिवसांत, फार झाले तर महिन्याभरात या सर्व जागा आपण भरणार आहोत. नवीन तरुण कार्यकर्ते ... कार्यकर्ते नाहीत हा नेहमीचा शब्द आपल्याकडून बोलला जातो, तर नवीन तरुण इंजिनिअर्स आपल्याला या खात्याच्या सेवेसाठी उपलब्ध होणार आहेत.

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी अनेक गोष्टींचा ऊहापोह करता येईल. अनेक निर्णयांना केंद्राकडून आपण मंजुऱ्या घेतल्या. पर्यावरणाच्या घेतल्या, भूसंपादनाच्या घेतल्या, वन खात्याच्या घेतलेल्या आहेत. खूप गोष्टी याबाबतीत बोलता येतील. काही सन्माननीय सदस्यांनी काही मागण्या केलेल्या आहेत. काही सन्माननीय सदस्यांनी आपापल्या मतदारसंघातील प्रश्न या ठिकाणी उपस्थित केलेले आहेत. मला असे वाटते की, सर्वच सन्माननीय सदस्यांनी या खात्यावर प्रश्न उपस्थित केले आहेत. हे सर्व सांगत बसलो तर तास-दीड तास जाईल.

अध्यक्ष महोदय, विशेष करुन ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.ग.आ. देशमुख यांनी काही प्रश्न उपस्थित केले आहेत. ते म्हणाले की, सन 2015-2016 च्या आर्थिक पाहणी अहवालात सिंचनाची माहिती उपलब्ध नाही. यावरुन जलसंपदा विभाग सिंचनाबाबत गंभीर नाही, असा त्यांनी आक्षेप घेतलेला आहे. परंतु, सन 2015-2016 च्या आर्थिक पाहणी अहवालातील पृष्ठ क्रमांक 81 वर सिंचन क्षेत्राची माहिती दिलेली आहे. आपण पृष्ठ क्रमांक 81 पाहिले तर त्यावर सर्व माहिती दिलेली आहे. यासंदर्भात शासन गंभीर नाही हे म्हणणे काही फार संयुक्तिक होणार नाही. मला असे वाटते कधी नव्हे इतक्या बैठका मुख्यमंत्री महोदयांनी घेतल्या. स्टेट वॉटर प्लानच्या संदर्भात नियोजन आपण केलेले आहे. गोदावरीचा आपण टो घेतलेला आहे. पुढच्या महामंडळामध्ये सर्व प्लान आपण या ठिकाणी घेत आहोत. जे जे करता येण्यासारखे आहे ते आम्ही सर्व करीत आहोत. जून, 2014 अखेर निर्मित सिंचन क्षमता 48.66 लक्ष हेक्टर असून प्रत्यक्ष सिंचन क्षेत्र 31.37 लक्ष हेक्टर आहे. ही सर्व आकडेवारी पृष्ठ क्रमांक 81 वर नमूद केलेली आहे.

कृष्णा पाणी तंटा लवादाच्या दुसऱ्या निर्णयास असलेली न्यायालयाची स्थगिती उठविण्याचा प्रयत्न करावा, असेही आपण म्हटले आहे. त्यासाठी आम्ही अतिशय प्रयत्नशील आहोत. मुख्यमंत्री

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गिरीष महाजन ....

महोदयांनी या संदर्भात 2-3 वेळा आढावा बैठकाही घेतल्या आहेत. संबंधित अधिकाऱ्यांना सूचनाही दिलेल्या आहेत. मलाही माहीत आहे की, हा प्रश्न मिटल्याशिवाय, ही स्थगिती उठल्याशिवाय त्या भागाला न्याय मिळू शकणार नाही. त्यामुळे शासनही याबाबतीत अतिशय गंभीर आहे.

टेंभू, ताकारी, म्हैसाळला निधी वाढवून मिळावा. तेथे सन 2016-2017 मध्ये टेंभूकरिता आपण चांगली तरतूद करणार आहोत. परंतु, एक गोष्ट निश्चित झाली की, यावेळेस प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेमध्ये पहिल्या टप्प्यात आपण 7 प्रकल्प हातात घेतले आहेत. याकरिता आपल्याला जवळपास 2100 कोटी रुपयांची तरतूद करावी लागली. केंद्राने निधी दिला आणि आपली जवळपास 2100 कोटी रुपयांची मॅचिंग अमाऊंट दिली. त्यामुळे साहजिकच आपल्या सर्वांनाच असे वाटले की, आमच्याकडे पैसेच शिल्लक नाहीत. हे खरे आहे कारण 7 प्रकल्प आपण प्राधान्याने घेतलेले आहेत, पुढच्या टप्प्यामध्ये अजून आपण 13 प्रकल्प घेतले आहेत. असे 26 प्रकल्प आपण 3 टप्प्यांमध्ये दरवर्षी पूर्ण करणार आहोत.

अध्यक्ष महोदय, जे प्रकल्प अपूर्णावस्थेत पडले आहेत, त्यांना केंद्राकडून मोठा निधी मिळणार आहे, त्याची मॅचिंग अमाऊंट आपल्याला द्यावी लागणार आहे. परंतु, बाकीचे सर्व प्रकल्प आहेत, आता विदर्भामध्ये तसेच झाले आहे, गोसीखुर्दला 1 हजार कोटी रुपये दिले. दुसऱ्या प्रकल्पाला 700 कोटी रुपये दिले. अशाप्रकारे 1700 कोटी रुपये दिले आहेत. त्यानंतर माननीय श्री. सुधीर मुनगंटीवार मला म्हणतात की, माझ्या प्रकल्पाचे काय ? राहिलेल्या प्रकल्पाकरिता आता फक्त 14 कोटी रुपये शिल्लक राहिले आहेत, ही वस्तुस्थिती आपल्याला नाकारता येणार नाही. या प्रकल्पांसाठी काय व्यवस्था करायची किंवा काही हजार कोटी रुपये गोसीखुर्दवर खर्च होतील, नाही होतील मग त्यातून आपल्याला काही पैसे येथे देता येतील काय किंवा माननीय श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितल्याप्रमाणे आम्ही या विषयावर अतिशय गंभीर आहोत.

अध्यक्ष महोदय, आपल्याला या राज्यातील प्रकल्प पूर्ण करावयाचे आहेत. सर्व सन्माननीय सदस्यांची हीच मागणी आहे की, आम्हाला निधी द्या. आम्हाला पैसे द्या, आमच्या निधीचे काय ? मी सर्वांची नावे घेणार नाही परंतु, मी सर्व सन्माननीय सदस्यांचे नाव व प्रश्नही लिहून ठेवले आहेत.

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गिरीष महाजन ....

सर्वांचे म्हणणे हेच आहे की, आम्हाला निधी द्या. मला असे वाटते की, या खात्याला जोपर्यंत आपण पूर्ण पैसा उपलब्ध करुन देणार नाही, तोपर्यंत या खात्याला न्याय मिळणार नाही. कारण आज आपल्या प्रत्येकाच्या मतदारसंघातील पिण्याच्या पाण्याचा, शेतीचा, उद्योगाचा प्रश्न आहे. आज दुष्काळी परिस्थिती असल्याने आपण पाहत आहोत की, सगळीकडे पाण्यासाठी लोक सैरावैरा पळत आहेत. लोकप्रतिनिधींना कोणी जागेवर बसू देत नाहीत. याकरिता मला असे वाटते की, या विभागाला पैसे देणे आवश्यक आहे. परंतु, सन 2009 पासून सन 2014 पर्यंत जवळपास 50 हजार कोटी रुपयांची नवीन कामे निघाली. मग कसे देणार ? 1 लाख कोटी रुपयांची कामे आता आपल्या डोक्यावर आहेत. आपण बजेट 8 किंवा 10 हजार कोटी रुपयांचे केले तरी, मला असे वाटते की, आपण या खात्याला न्याय देऊ शकणार नाही. या खात्याला न्याय द्यायचा असेल तर मला असे वाटते की, आपल्याला कुठे तरी एक रकमी कर्ज घ्यावे लागेल, ॲन्युईटी करावी लागेल, कर्जरोखे काढावे लागतील. खऱ्या अर्थाने जर या शेतकऱ्याला न्याय द्यायचा असेल तर, राज्यामध्ये कोणत्याही परिस्थितीत एक आर्थिक स्त्रोत उभा करुन सर्व प्रकल्प पूर्ण करावे लागतील.

अध्यक्ष महोदय, मी पुन्हा एकदा आपल्याला या निमित्ताने सांगेन की, शासन या बाबतीत अतिशय गंभीर आहे. माननीय वित्त मंत्री, मुख्यमंत्री महोदय या ठिकाणी आहेत. माननीय श्री. नितीन गडकरी साहेबांबरोबर माझी 2-3 वेळा चर्चा झालेली आहे. त्यांनी सांगितले आहे की, काही करा. कमीत कमी व्याजाबाबत आम्ही चर्चा करीत आहोत. बाहेरच्या देशांबरोबर बोलत आहोत, जायकाशी बोलत आहोत. काही वित्तीय संस्थांशी बोलत आहोत. आपले या वर्षीचे कर्ज 8 हजार कोटी रुपये आहे. सोबत 10-12 हजार कोटी रुपये लावले म्हणजे दरवर्षी 20 हजार कोटी रुपये अशाप्रकारे 3-4 वर्षे आपण केले तर मला असे वाटते की, आपण या खात्याला 70-80 हजार कोटी रुपये देऊन कुठे तरी न्याय देऊ शकू आणि तेव्हाच या खात्यातील सर्व प्रकल्प पूर्ण होतील. त्याशिवाय मला असे वाटते की, यात कोणता मार्ग निघणार नाही. एक तर आपल्याला सुप्रमा द्याव्या लागतील.

...6/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गिरीष महाजन ....

अध्यक्ष महोदय, काही पर्यावरणाचे, काही वनाचे प्रश्न आहेत. केंद्रामध्ये मंत्री आपल्या महाराष्ट्रातील असल्याने तेही या भागाला न्याय देत आहेत. आपण प्रस्ताव पाठविला की, त्याला लगेच मंजुरी देत आहेत. अनेक प्रकल्पांना आपण मंजुरी घेतलेली आहे. त्याचा उल्लेख मी वेळेअभावी करणार नाही. आपले सर्व प्रकल्प गेली वर्षानुवर्षे प्रलंबित होते त्यांना आपण न्याय देण्याचा प्रयत्न करीत आहोत. सन्माननीय सदस्य डॉ. अनिल बोंडे यांनी अनेक प्रश्न उपस्थित केलेले आहेत.

ZZ-1/...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गिरीश महाजन.....

आपण व्हीआयडीसीकडे अखर्चित असलेला निधी खर्च करावा, कालवे पाईप लाईनमधून करावे, सिंचन प्रकल्पावर पर्यटन विकास करावा, इत्यादी बाबी आपण सांगितल्या. व्हीआयडीसीमध्ये जवळपास 4 हजार कोटी रुपये एकाच विभागामध्ये पडून आहे, हे खरे आहे. दुसरीकडे अशी परिस्थिती आहे की, आपल्याकडे खर्च करण्यासाठी पैसे नाही. परंतु या भागामध्ये अशी परिस्थिती आहे. कारण त्यांचा अनुशेष होता. त्यामुळे हा पैसा देणे क्रमप्राप्त आहे. आज पैसे पडलेले असले तरी या वर्षी पुन्हा त्यांच्याकडे पैसे जाणार आहे. त्यामुळे तो आकडा पुन्हा वाढणार आहे. या ठिकाणी काम करीत असताना अनेक अडचणी आहेत. जसे मी वाशिम संदर्भात सांगितले की, हा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. त्यास कोणी मान्यताच देत नव्हते. त्यामुळे त्या ठिकाणी सुप्रमाचा पुन्हा प्रश्न आहे. वनाचा प्रश्न आहे, पर्यावरणाचा प्रश्न आहे. सरकार किंवा शासन किंवा आमचे सर्व अधिकारी तातडीने पाठपुरावा करीत आहेत. ते मार्गी लागावे व विदर्भाला न्याय मिळावा, याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. राज्यातील कालव्यांसाठी पाईपलाईन वापरण्याचे धोरण विचाराधीन आहे. आतापर्यत आपण कॅनॉलने पाणी देत आहोत. आम्ही या ठिकाणी अनेक चांगले निर्णय घेतले व घेणार आहोत. कॅनॉलच्या माध्यमातून पाणी दिल्यामूळे जवळपास 50 ते 60 टक्के गळती होते. म्हणजे धरणातून 10 टीएमसी पाणी निघाले तर शेवटपर्यंत केवळ 5 टक्के किंवा 4 टक्के म्हणजेच 4, 5 टीएमसी पाणी पोहचते. त्यामुळे जवळपास 50 ते 60 टक्के गळती होते. पाण्याचे महत्त्व आपल्याला माहीत आहे. दुष्काळी भागामध्ये पाण्याकरिता वणवण फिरावे लागत आहे. शेतकऱ्यांच्या द्राक्षबागा, डाळींबाच्या बागा वाळत आहेत. शेतकरी ऊसाला पाणी देऊ शकत नाही. त्यामुळे आपण पाण्याची किंमत ओळखली पाहीजे. भविष्यकाळामध्ये पाण्याला प्राधान्य दिलेले आहे. याकरिता आपण एक पॉलिसी करीत आहोत. ओपन कॅनॉलने आता कुठेही पाणी दिले जाणार नाही. बंद आपण नलीकेद्वारेच पाणी देणार आहोत, हे धोरण आम्ही स्वीकारले आहे. सोलापूरला पाणी द्यायचे असल्यास, म्हणजेच उजनी धरणातून पाणी निघाले तर सोलापूरला 1 टीएमसी पाणी पोहोचवायचे असेल तर 8 टीएमसी पाणी सोडावे लागते. पंढरपूर, सोलापूर या भागामध्ये पाणी सोडायचे असेल तर आठ पट, सात पट पाणी वाया जाते. यापेक्षा पाईप लाईनद्वारे पाणी सोडल्यास 100 टक्के नाही, तर 90, 95 टक्के पाणी नक्कीच पोहचेल. त्यामध्ये केवळ 5 ते 10 टक्के लॉस होईल. परंतु 80 ते 90 टक्के लॉस झाला तर भविष्यामध्ये हे महाराष्ट्राला



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गिरीश महाजन.....

परवडणारे होणार नाही. त्यामुळे पाण्याचे नियोजन करुन बंद कुपनलिकेद्वारेच पाणी द्यावे लागणार आहे.

अध्यक्ष महोदय, भविष्य काळात पाण्याची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. शहरीकरण वाढत आहे. पुणे, मुंबई, नाशिक सारख्या ठिकाणी शहरीकरण झाल्यामुळे नागरी वस्त्या वाढत आहेत, इंडस्ट्रीज देखील वाढत आहेत. त्यामुळे शेतीकडील पाणी काढून शहरांकडे द्यावे लागत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी बनविलेल्या धरणांमधून त्यांना न्याय देता येत नाही. आपण पुणे येथे 6 टीएमसीचा एसटीपी प्लँट केला. तेच पाणी काढून शेतकऱ्यांना दुसऱ्या कॅनॉलने देत आहोत. मुंबईसारख्या ठिकाणी तेच करावे लागणार आहे. कंम्पलशनच करावे लागणार आहे. एसटीपी प्लॅन तयार करावा, वापरलेले पाणी दुसरी कडे द्यावे, असे सोलापूर येथे सांगितले आहे. सर्वच भागामध्ये, मोठ्या शहरांमध्ये हे प्लॅन करावे लागणार आहेत.

अध्यक्ष महोदय, इस्त्राईल या देशामध्ये पाण्याच्या एका थेंबाचे नियोजन केले जाते. तेथे घरातून निघालेले बादलीभर पाणी देखील वाया जाऊ दिले जात नाही. त्या ठिकाणी कमीतकमी पाण्यामध्ये चांगले नियोजन केले जात आहे. आपल्याकडेही असे करण्याची गरज आहे. काही ठिकाणी 400 मीलीमिटर पाऊस पडतो, तर काही ठिकाणी 6 हजार मिलीमिटर पाऊस पडतो. ज्या भागात जास्त पाऊस पडतो तेथे चांगला वापर सुरु असतो, जेथे पाऊस कमी असतो तेथे पाणी मिळत नाही. त्यामुळे सर्व भौतिक बाबींचा विचार करुन पाण्याचे नियोजन करावे लागणार आहे.

अध्यक्ष महोदय, आपण यासंदर्भात दिनांक 22 मार्च 2016 रोजी चांगला कार्यक्रम आयोजित केलेला होता. आपण जल जागृती सप्ताह साजरा केला. त्यानुषंगाने शाळा, महाविद्यालय, शेतकरी या सर्वांनी त्यासंदर्भात प्रयत्न केला...(अडथळा)...चवदार तळ्याच्याबाबतीत मला कळाले नाही, आपण त्याचा 'ध' चा 'मा' का करावा. मी स्वत: त्या ठिकाणी 5 तलावांवर गेलो. आम्ही पाण्याचे पुजन केले. अनेक लोकप्रतिनिधी त्या ठिकाणी गेले. त्याठिकाणी दुसरे काही इन्टेंशन नसताना आपण महत्त्वाचा विषय सोडून दिला. आपण तेवढी प्रसिद्धी जल जागृतीकरिता दिली असती तर त्याचा काहीतरी फायदा झाला असता. परंतु आपण तसे केले नाही...(अडथळा)...राजकीय नाही. मी केवळ जलजागृतीचा विषय केला. आपणच सांगितले की, चवदार तळ्याची पुजा केली. राजकीय विषय सोडवा.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गिरीश महाजन.....

अध्यक्ष महोदय, आपल्याला भविष्यकाळामध्ये बंद पाईपलाईन सारखेच ड्रीपला देखील प्राधान्य द्यावे लागणार आहे. सुक्ष्म सिंचन पद्धतीनेच पाणी द्यावे लागणार आहे. आपण दोनशे, तिनशे किलोमिटर अंतरावरुन पाणी आणतो. टेंभू, ताकारी सारख्या ठिकाणी एवढ्या लांबून पाणी आणतो. परंतु हे पाणी सरळ पद्धतीने न दिल्यामुळे त्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होतो. आपण त्याची कल्पना देखील करु शकत नाही. आपण ऊसाला ड्रीपने पाणी दिले किंवा ठिबक सिंचन पद्धतीने पाणी दिले तर आपले 70 टक्के पाणी वाचू शकते. वाचलेल्या पाण्यामुळे आपली सिंचन क्षमता जास्त वाढू शकते. असे केल्यास सिंचन जास्त करता येऊ शकेल. त्यामुळे भविष्यकाळामध्ये स्प्रिंकलर, सुक्ष्मसिंचन याला प्राधान्य द्यावे लागणार आहे. कारण पडणारा पाऊस तेवढाच आहे. दिवसेंदिवस निसर्गाचे चित्र बदलत चालले आहे. त्यामुळे उपलब्ध पाण्यामध्ये सिंचन क्षमता जास्त वाढवायची असेल तर या सर्व बाबींचा अवलंब करावा लागेल. येणाऱ्या भविष्य काळामध्ये बंद पाईपलाईन सारखे प्रयोग किंवा सुक्ष्म सिंचन पद्धतीला वेळ प्रसंगी सक्ती करावी लागली तरी चालेल, परंतु या पद्धतीनेच नियोजन करावे लागणार आहे.

अध्यक्ष महोदय, जवळजवळ 25 सन्माननीय सदस्यांनी आपल्या सूचना मांडल्या असून त्या माझ्याकडे लिहिलेल्या आहेत. आपण म्हणाल तर मी त्या वाचून दाखवितो. लेंडी येथील प्रकल्प आहे. सन्माननीय सदस्य श्री. शंभुराज देसाई यांनी एका प्रकल्पाबाबत सांगितले. सन्माननीय सदस्य श्री. गोपालदास अग्रवाल यांनी आपले प्रश्न मांडले. सर्व प्रश्न मी लिहून घेतलेले आहेत, परंतु सर्वांचे सोल्युशन एकच आहे की, त्याकरिता निधी देण्यात यावा.

अध्यक्ष महोदय, शिर्डीला 500 कोटी रुपये देऊन तेथील प्रश्न मार्गी लावत आहोत. परवा माननीय मुख्यमंत्री यांच्यासोबत चर्चा झाली. सीईओ देखील आले होते. आपण अनेक वेळेला बैठका घेतल्या असून तो प्रकल्प लवकरात लवकर मार्गी लावायचा आहे. कारण शिर्डीला 100 वर्षे पूर्ण होत आहेत. तेथे देवदर्शनाकरिता अनेक भावीक येतात. तेथे मोठ्या प्रमाणात पाण्याचा वापर असतो. त्यानांही पाणी द्यायचे आहे. परंतु प्राप्त परिस्थितीमध्ये आपण त्यांना पाणी देऊ शकत नाही. आपण महामंडळाला 500 कोटी रुपये देऊ केलेले आहे. काही महामंडळ तर काही आम्ही असे करुन तेथील निळवंडेच्या कालव्याचा प्रश्न मार्गी लावायचा आहे. प्रधानमंत्री सिचाई योजनेमध्ये हाच प्रकल्प प्राधान्याने हाती घ्यावा, अशी मी वर विनंती केलेली आहे. परंतु भविष्यकाळात या

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गिरीश महाजन.....

खात्यासाठी, शेतकऱ्यांच्या पाण्यासाठी व इतर ठिकाणच्या पाण्यासाठी करावयाच्या आवश्यक बाबींकरिता आम्ही निश्चित प्रयत्न करु, असे मी आपल्याला आश्वासन देतो...(अडथळा)... मी सर्व सन्माननीय सदस्यांचे प्रश्न आणि त्याची उत्तरे लिहून ठेवलेली आहेत. परंतु वेळेचा अभाव आहे. सर्वांना लवकर जायचे आहे. आपण सर्वांनी दिलेल्या प्रश्नांचे येत्या आठवड्याभरात लेखी स्वरुपात पॉझीटीव्ह उत्तर देण्यात येईल. आपले प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शासन गंभीर आहे. माझ्या विभागाच्या मागण्यांना मंजूरी द्यावी, अशी मी आपल्याला विनंती करतो. धन्यवाद.

---*---

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गिरीष बापट (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री) : अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या अर्थसंकल्पीय मागणी क्र. एम-1, एम-2, एम-3, एम-4, एम-5, एम-6 या योजनेतर व योजनांतर्गत खर्चाच्या एकूण 6 हजार 246 कोटी रुपयांच्या मागण्यास मान्यता द्यावी, अशी मी सभागृहाला विनंती करतो.

श्री. गोपालदास अग्रवाल : अध्यक्ष महोदय, आपण 14 जिल्ह्यांमध्ये अन्न सुरक्षा कायदा लागू केलेला आहे. या 14 जिल्ह्यांप्रमाणे नक्षलग्रस्त गोंदीया, गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर या चार जिल्ह्यांचा या योजनेत समावेश करावा, अशी मी विनंती केली होती. या जिल्ह्यांमध्ये दरडोई उत्पन्न खुपच कमी आहे. या चार जिल्ह्यांचा अन्न सुरक्षा योजनेत समावेश करण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

श्री. गिरीष बापट : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी केलेल्या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार केला जाईल. सभागृहाचा मूड नसल्यामुळे मी अधिक भाषण करीत नाही.

अध्यक्ष महोदय, आता मी सन 2016-2017 च्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या अर्थसंकल्पीय मागणी क्रमांक झेडडी-1, झेडडी-2, झेडडी-3, झेडडी-4, झेडडी-5, झेडडी-6 या 3,452 पर्यटन विभाग, पर्यटनाच्या योजनांतर्गत रुपये 250 कोटी व योजनेतर रुपये 3.80 लक्ष इतक्या खर्चाच्या अर्थसंकल्पीय मागण्यांना मंजुरी देण्याची मी आपल्या मार्फत सभागृहाला विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या वित्त व नियोजन विभागाच्या मागण्यांना सभागृहाने मंजुरी द्यावी, अशी मी आपल्या मार्फत विनंती करतो.

**तालिका सभाध्यक्ष** : आता मी सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील वित्त विभाग, जलसंपदा विभाग, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, नियोजन विभाग आणि पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग या विभागाच्या मागण्या म्हणजे मागणी क्रमांक जी-1, जी-2, जी-4, जी-5, जी-6, जी-7, जी-8, जी-10, आय-2,आय-3,आय-4,आय-5,आय-7, एम-1, एम-2, एम-3, एम-4, एम-5, एम-6, ओ-1, ओ-2, ओ-3, ओ-4, ओ-6, ओ-7, ओ-8, ओ-9, ओ-14, ओ-15, ओ-16, ओ-17, ओ-18, ओ-19, ओ-20, ओ-21, ओ-22, ओ-23, ओ-24, ओ-25, ओ-26, ओ-27, ओ-28, ओ-29, ओ-30, ओ-31, ओ-32, ओ-33, ओ-34, ओ-35, ओ-36, ओ-37,

...6/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभाध्यक्ष**.....

ओ-38, ओ-39, ओ-40, ओ-41, ओ-42, ओ-43, ओ-44, ओ-45, ओ-46, ओ-47, ओ-48, ओ-49, ओ-10, ओ-11, ओ-12, ओ-13, ओ-14, ओ-15, ओ-16, ओ-17, ओ-18, ओ-19, ओ-20, ओ-21, ओ-22, ओ-23, ओ-24, ओ-25, ओ-26, ओ-27, ओ-28, ओ-29, ओ-30, ओ-31, ओ-32, ओ-33, ओ-34, ओ-35, ओ-36, ओ-37, ओ-38, ओ-39, ओ-40, ओ-41, ओ-42, ओ-43, ओ-44, ओ-45, ओ-46, ओ-47, ओ-48, ओ-49, झेडडी-1, झेडडी-2, झेडडी-3, झेडडी-4, झेडडी-5, झेडडी-6 वितरित केलेल्या सूचित दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकतो.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

...AAA/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : मुंबई महानगरपालिकेतील उघडकीस आलेली गैरकारभार व भ्रष्टाचाराची प्रकरणे व पेंडसे-केंद्रेकर अहवालातील शिफारशींच्या अंमलबजावणी संदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही

**मु. शी.** : मुंबई महानगरपालिकेतील उघडकीस आलेली गैरकारभार व भ्रष्टाचाराची प्रकरणे व पेंडसे-केंद्रेकर अहवालातील शिफारशींच्या अंमलबजावणी संदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही या विषयावर सर्वश्री राधाकृष्ण विखे पाटील, अजित पवार, पृथ्वीराज चव्हाण, जयंत पाटील, डॉ. पतंगराव कदम, सर्वश्री दिलीप वळसे-पाटील, गणपतराव देशमुख, बाळासाहेब थोरात, भास्कर जाधव, मो. आरिफ नसीम खान, जितेंद्र आव्हाड, गोपालदास अग्रवाल, जयदत्त क्षीरसागर, विजय वडेट्टीवार, हनुमंत डोळस, नितेश राणे, पांडुरंग बरोरा, अब्दुल सत्तार, डॉ. सतीश पाटील, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री नरहरी झिरवाळ, सुनिल केदार, दिपक चव्हाण, सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री अस्लम शेख, वसंतराव चव्हाण, डी.पी.सावंत, कालीदास कोळंबकर, मधुकरराव चव्हाण, काशीराम पावरा, अमिन पटेल, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री जयकुमार गोरे, राहुल बोंद्रे, अमित झनक, अमर काळे, ॲड. के. सी. पाडवी, सर्वश्री डी. एस. अहिरे, हर्षवर्धन सपकाळ, रणजित कांबळे, श्रीमती अमिता चव्हाण, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री कुणाल पाटील, शेख आसिफ शेख रशिद, श्रीमती निर्मला गावित, सर्वश्री संग्राम थोपटे, भाऊसाहेब कांबळे, ॲड. त्र्यंबक भिसे, सर्वश्री अमित देशमुख, बसवराज पाटील, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री सिध्दाराम म्हेत्रे, भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव

श्री. भास्कर जाधव (गुहागर) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.स. नियम 293 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"मुंबई महानगरपालिकेच्या गैरकारभाराची व भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे उघडकीस येऊनही शासनाने त्याची दखल न घेणे, मुंबईतील मैदानांचा लिलाव, गृहनिर्माण धोरणाच्या

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. भास्कर जाधव.....

अनिश्चिततेमुळे म्हाडाच्या ३०० इमारतींचा रखडलेला पुनर्विकास, म्हाडाच्या संक्रमण शिबीरातील घुसखोरी, SRA चे रखडलेले प्रस्ताव, गिरणी कामगारांच्या घरांच्या प्रश्नाकडे झालेले दुर्लक्ष, मुंबई महापालिका क्षेत्रात डम्पिंग ग्राऊंडचा यक्ष प्रश्न, मुंबई मेट्रो व विकास आराखड्यातील घोटाळा, वाहनतळाची निर्माण झालेली समस्या व होणारी वाहतुकीची कोंडी, बीडीडी चाळीच्या पुनर्विकासाबाबत निर्णय न होणे, अनधिकृत बांधकामांना मिळणारे संरक्षण, उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास होणे, उर्वरित मोडकळीस इमारतींचा पुनर्विकास करण्याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, कोस्टल रोडला स्थानिक रहिवाशी व कोळीवाड्यांचा असलेला विरोध, कोकणाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, फळ प्रक्रिया उद्योगास चालना देणे, राज्यातील ४८ लहान मोठी बंदरे कोकणात असताना, त्यांच्या विकास व देखभालीकडे होत असलेले दुर्लक्ष, कोकणातील पर्यटनस्थळांचा विकास करुन ठोक पॅकेज देण्याची आवश्यकता, मुंबई उपनगर जिल्ह्यासह सातही जिल्ह्यातील समुद्रकिनारी असलेली शहरे व गावांना सीआरझेडचा बसलेला फटका, परिणामी शहरे व गावांचा खुंटलेला विकास, सी-वर्ल्ड प्रकल्पाचे कामास अद्यापही सुरुवात न होणे, कोकणात ७२० कि.मी.चा समुद्रकिनारा असूनही अद्यापही मेरीटाईम ट्रेनिंग इन्स्टिट्युट आणि फिशरिज विद्यापीठ नसणे, कोकणात येऊ घातलेले १८ ते १९ औष्णिक प्रकल्प, परिणामी धोक्यात येणारे पर्यावरण, त्यामुळे मासे मृत होण्याचे वाढते प्रमाण, परिणामी लोकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याकरिता पेंडसे-केंद्रेकर अहवालाच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही विचारात घेण्यात यावी."

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभाध्यक्ष (श्री.योगेश सागर)** : म.वि.स.नियम 293 अन्वये प्रस्तावावरील चर्चा ऑन लेग ठेवण्यात येत असून त्यावर उद्या चर्चा घेण्यात येईल.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या शुक्रवार दिनांक 1 एप्रिल, 2016 रोजी सकाळी 10 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक 6 वाजून 50 मिनिटांनी शुक्रवार, दिनांक 1 एप्रिल, 2016 रोजी सकाळी 10 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION